॥ श्री ॥

७ तृप्तिदीप:

ह्या प्रकरणामध्यें मुख्यत्वानें श्रुतीचें व्याख्यान करावयाचें असल्यामुळें, ह्या सप्तम प्रकरणाचा आरंभ करणारे श्रीभारतीतीर्थगुरु प्रथमत: प्रकरणार्थ मूलभूत श्रुति सांगतात.

आत्मानं चेद्विजानीयादहमस्मीति पूरुष: ।
किमिच्छन्कस्य कामाय शरीरमनुसंज्वरेत् ॥१

अन्वयार्थ - [पुरुष: 'अयं अस्मि' इति आत्मानं विजानीयात् चेत्-] पुरुष 'हा मी आहें' **असें आत्म्याला स्वत:ला जर जाणेल तर मग [किं इच्छन्-] कशाची इच्छा करून [कस्य कामाय-] व कोणाच्या सुखाकरितां [शरीरं अनुसंज्वरेत्-] तो शरीराच्या मागोमाग स्वत: संतप्त होईल ?**

प्रकाश:- हातांतील कंकणाप्रमाणें आत्म्याचें साक्षात् ज्ञान होणें शक्य आहे. म्हणजे ज्ञेय, ज्ञान व ज्ञाता या भावनाद्वारा जसें कंकण दिसतें, तसा जरी हा न दिसला तरी ह्या स्वसंवेद्याच्या सत्तेविषयीं निश्चय होणें युक्त आहे. म्हणून श्रीभारतीतीर्थ श्रुतीच्या आधारानें म्हणतात, पुरुषाला 'हा मी आहें' असें एकदा समजलें म्हणजे मग त्याला स्वत:विषयीं संशय रहात नसल्यामुळें अविद्वान् पुरुष जसें 'शरीरच मी' असें समजून त्याच्या पीडेनें पीडित होतात तसा तो होत नाहीं. कारण "मी एक आहें, अद्वितीय आहें, निरिच्छ आहें, शरीरातीत आहे" इत्यादि प्रकारें ज्ञान झाल्यावर चिंतेला जागाच राहत नसल्यामुळें व इच्छेचें निमित्त समूल नष्ट झाल्यामुळें त्याला शरीराच्या अपेक्षेनें होणाऱ्या यातना होत नाहींत. तात्पर्य-चित् व जड यांचें ऐक्य हेंच जीवांच्या यातनेचें मुख्य बीज होय. पंचदशीचीं पंधरा प्रकरणें श्रीविद्यारण्यांनीं केलेलीं आहेत, असें पुष्कळांना माहीत आहे, पण तें खरें नव्हे. कारण पंचदशीच्या दोन्ही टीकाकारांनीं गेल्या प्रकरणापर्यंतच श्रीविद्यारण्याचार्यांचा प्रतिप्रकरणारंभीं साक्षात् किंवा अर्थत: निर्देश करून आतां येथून पुढें श्रीभारतीतीर्थांचा निर्देश केला आहे, त्यावरून चित्रदीपान्त सहा प्रकरणें पूर्वाश्रमीं सर्वज्ञ माधवाचार्य या नांवानें प्रसिद्ध असलेल्या विद्यारण्यांनीं केलेलीं आहेत. अवशिष्ट राहिलेलीं नऊ प्रकरणें ह्यांच्या गुरूंनीं म्ह. भारतीतीर्थांनीं केलीं असें म्हणणें भाग पडतें. पंडित अच्युतरायांनीं तर "आपल्या परम धन्य शिष्यांची हीं सहा प्रकरणें पाहून संतुष्ट झालेल्या भारतीतीर्थांनीं पुढील नऊ प्रकरणें सहज लीलेनें केलीं व शिष्याच्या प्रतिज्ञेप्रमाणें केवल अद्वैत शास्त्राचें अवलंबन करणाऱ्या मुमुक्षूंवर अखंड उपकार केला" असें स्पष्ट म्हटलें आहे. ॥१॥

-आतां प्रस्तुत श्रुतिविचाराची प्रतिज्ञा करून त्याचें फल दाखवितात -

अस्या: श्रुतेरभिप्राय: सम्यगत्र विचार्यते ।
जीवन्मुक्तस्य या तृप्ति: सा तेन विशदायते ॥२

अन्वयार्थ - [अत्र अस्या: श्रुते: अभिप्राय: सम्यक् विचार्यते-] या प्रकरणांत या पूर्वोक्त श्रुतीचा अभिप्राय काय आहे, याचा पूर्णपणें विचार केला जातो. [तेन च जीवन्मुक्तस्य या तृप्ति: सा विशदायते-] व त्याच्या योगानें जीवन्मुक्त पुरुषाची जी तृप्ति ती स्पष्ट केली जाते.

प्रकाश:- अत्र-या तृप्तिदीप नामक सातव्या प्रकरणांत. अस्या:-'आत्मानं चेत् विजानीयात्-' इत्यादि कण्वोपनिषदांतील श्रुतीचा. **अभिप्राय:**-तात्पर्य हाच श्रुतीचा खरा अर्थ आहे; वाच्य अर्थ हा खरा अर्थ नव्हे. कारण तोच खरा, असें जर मानलें, तर वेदांतील

आख्यायिकाहि खऱ्या मानाव्या लागतील, पण तसें पूर्वींच्या कोणत्याहि आचार्यांनीं मानलेलें नाहीं. **विशदायते** - या श्रुतीचें तात्पर्य काय आहे हें सांगितलें कीं तेवढ्यानेंच जीवन्मुक्त पुरुषाची तृप्ति कशी असते हें स्पष्ट होतें. म्हणजे जीवन्मुक्त पुरुषाच्या तृप्तीचें वर्णन करण्याकरितां निराळा प्रयत्न करावा लागत नाहीं. ॥२॥

-''पदच्छेद: पदार्थोक्तिर्विग्रहो वाक्ययोजना आक्षेपस्य समाधानं व्याख्यानं पञ्चलक्षणम् ॥-''

पदांचा छेद करणें, पदांचा अर्थ सांगणें, समासांचा किंवा तद्धित शब्दांचा विग्रह करणें, वाक्यांची अन्वय द्वारा योजना करणें व आक्षेपांचें समाधान करणें, अशीं व्याख्यानांची पांच लक्षणें आहेत, असें सांगितलें असल्यामुळें 'पुरुष' शब्दाचा अर्थ सांगण्यासाठीं ग्रंथकार प्रथमत: उपोद्घातरूपानें सृष्टीचें संक्षेपत: वर्णन करितात.

मायाभासेन जीवेशौ करोतीति श्रुतत्वत: ।
कल्पितावेव जीवेशौ ताभ्यां सर्वं प्रकल्पितम् ॥३॥

अन्वयार्थ - ['माया आभासेन जीवेशौ करोति' इति श्रुतत्वत:-] माया चिदाभासाच्या योगानें जीव व ईश्वर करिते, असें श्रुतीमध्यें सांगितलेलें असल्यामुळें [जीवेशौ कल्पितौ एव-] जीव व ईश्वर कल्पितच आहेत. [च ताभ्यां सर्वं प्रकल्पितं अस्ति-] व त्यांनीं हें सर्व कल्पिलें आहे.

प्रकाश:- जीव व ईश्वर यांना निर्माण करणारी माया होय. व ती संसर्गामुळें स्वत:मध्यें येणाऱ्या चैतन्याभासानें त्यांना उत्पन्न करिते, असें श्रुतींत वर्णन आहे. अर्थात् जीव व ईश्वर दोघेहि आत्मस्वरूप असल्यामुळें मिथ्या (कल्पित) आहेत व अशा ह्या कल्पित जीवेश्वरांनीं सर्व सृष्टि निर्माण केली आहे. 'शुद्धसत्वप्रधान मायेमध्यें प्रतिबिंबित झालेल्या चैतन्याला ईश्वर व मलिनसत्वप्रधान मायेंत प्रतिबिंबित झालेल्या चैतन्याला जीव म्हणतात;' असें प्रथम प्रकरणांत व 'त्यांनींच हें सर्व द्वैतजात स्वसंकल्पानें निर्माण केलें आहे' असें द्वैतविवेकाख्य चवथ्या प्रकरणांत विस्तृतपणें वर्णन केलेलें आहे. तात्पर्य ईश्वरापासून तृणापर्यंत सर्व सृष्टी रज्जुसर्पाप्रमाणें कल्पित आहे. ॥३॥

-त्यांतील कोणीं किती द्वैत कल्पिलें तें सांगतात.-

ईक्षणादिप्रवेशान्ता सृष्टिरीशेन कल्पिता ।
जाग्रदादिविमोक्षान्त: संसारो जीवकल्पित: ॥४

अन्वयार्थ- [ईक्षणादि-प्रवेशान्ता सृष्टि: ईशेन कल्पिता अस्ति-] ईक्षणापासून प्रवेशापर्यंत जी सृष्टि ती ईश्वरानें कल्पिलेली आहे. [तथा जाग्रदादि विमोक्षान्त: संसार: जीवकल्पित: अस्ति-] त्याचप्रमाणें जाग्रदवस्थेपासून मुक्तीपर्यंत जो संसार तो जीवानें कल्पिलेला आहे.

प्रकाश:- प्राण्यांच्या विविधकर्मांच्या फलाचा काल प्राप्त झाला असतां पूर्वी केवळ सद्रूप असलेल्या शबल ब्रह्माला 'मी पुष्कळ व्हावें' अशी इच्छा होते. या इच्छेपासून सर्व भूतभौतिक सृष्टी निर्माण करून त्यांत प्रवेश करीपर्यंत जो सृष्टीक्रम श्रुतीनें सांगितलेला आहे तो ईश्वरकृत होय. म्हणजे ईश्वराच्या केवल संकल्पानेंच तो सर्व उत्पन्न झालेला आहे. पण तो संकल्पजन्य असल्यामुळें खोटा आहे. याचप्रमाणें संसाराचा जाग्रदवस्था हा आरंभ. आत्मसाक्षात्कारानें होणारा बाध तोच अंत होय. या जाग्रदादि, मोक्षान्त संसाराचा कल्पक जीव आहे अर्थात् हाहि खोटा आहे. तात्पर्य मायाजन्य जे जीवेश्वर त्यांनीं कल्पित अशी ही सर्व चराचर सृष्टि ती खोटी आहे असें समजावें. ॥४॥

-ह्याप्रमाणें दोन श्लोकांनीं 'पुरुष' शब्दाच्या अर्थाच्या उपयोगी असलेली जीवेश्वरकृत उभयविध सृष्टि सांगून आतां 'पुरुष' शब्दाचा अर्थ सांगतात-

भ्रमाधिष्ठानभूतात्मा कूटस्थासंगचिद्वपु: ।
अन्योन्याध्यासतोऽसंगधीस्थजीवोऽत्र पूरूष: ।।५

अन्वयार्थ - [य: कूटस्थासंगचिद्वपु:-] जो निर्विकार असंग चैतन्यरूप व [भ्रमाधिष्ठान-भूतात्मा-] भ्रमाचें अधिष्ठान झालेला आत्मा [स: एव अन्योन्याध्यासत: असंगधीस्थजीव: सन् अत्र पूरूष: इत्युच्यते-] तोच अन्योन्याध्यासानें असंग बुद्धींतील जीव होऊन त्यालाच या श्रुतींत 'पुरुष' असें म्हटलें आहे.

प्रकाश:- प्रथम श्लोकांत पुरुष म्हणून ज्याला म्हटलें आहे तो कोण ? असंग आत्मा पुरुष नव्हे; जड बुद्धी ही देखील पुरुष नव्हे; व त्या बुद्धींतील आभा हि पुरुष नव्हे; याचें कारण पुढच्या श्लोकांत समजेल. तर मग पुरुष म्हणजे कोण ? कधींहि विकार न पावणारें व कोठेंहि सक्त न होणारें असें चैतन्य व देह, इंद्रियें इत्यादिकांच्या भ्रमाला आधारभूत असा परमात्मा अन्योन्याध्यासाच्या योगानें बुद्धीमध्यें 'जीव' होतो व अशा असंग बुद्धिगत जीवरूप असंग परमात्म्यालाच श्रुतिमाता 'पुरुष' असें म्हणते. आत्मा व बुद्धि हीं परस्परविरोधी असल्यामुळें परमार्थत: असंग आहेत. म्हणजे ह्या उभयतांचा त्रिकालींहि संसग होणें शक्य नाहीं. पण अनादि अविद्येमुळें त्यांच्या धर्मांचा परस्पर आरोप झाला कीं त्या सर्व (जीव, बुद्धि व ईश्वर) या समूहाला पुरुष हें नांव प्राप्त होतें. ''पुरुष: स वा अयं पुरुष: सर्वासु पुर्षु पुरिशय इति'' अशा श्रुतीचा आधार आहे. ।।५।।

-'येथें 'पुरुष-' शब्दानें चिदाभासरूप जीवच घ्यावा, त्याबरोबर अधिष्ठानभूत कूटस्थ चैतन्य कशाला पाहिजे ?' उत्तर -

साधिष्ठानो विमोक्षादौ जीवोऽधिक्रियते न तु ।
केवलो निरधिष्ठानविभ्रांते: क्वाप्यसिद्धित: ।।६

अन्वयार्थ- [साधिष्ठान: जीव: विमोक्षादौ अधिक्रियते-] अधिष्ठानासह वर्तमान जीव मोक्षादिकांविषयीं अधिकारी होतो. [न तु केवल:-] केवल आभास नाहीं. [कुत:- निरधिष्ठानविभ्रान्ते: क्व अपि असिद्धित:-] कारण अधिष्ठानरहित भ्रांति कोठेंहि सिद्ध होत नाहीं.

प्रकाश:- साधिष्ठान: जीवाचें अधिष्ठान (आश्रय, बिंब) जें कूटस्थ चैतन्य त्यासहवर्तमानच जीव हा मोक्ष, स्वर्ग इत्यादिकांच्या साधनाधिष्ठानाचा अधिकारी होतो. केवळ जीव (चिदाभास) अधिष्ठानाचा आभास असल्यामुळें वस्तुत: तो कोणी पदार्थच नव्हे व त्यामुळें त्याला कोणत्याहि प्रकारचा अधिकार मिळणें शक्य नाहीं. कारण वंध्यापुत्र कोठें राज्य करीत असल्याचें ऐकण्यांत नाहीं. बरें जीव ही भ्रांति आहे असें म्हणावें तर ती अधिष्ठानावांचून कधीं होत नाहीं. असा नियम आहे. सारांश, केवल चिदाभास हा पुरुष होय, असें म्हणणें अयुक्त आहे. म्हणून पुरुषाचें पूर्वोक्त लक्षणच ग्राह्य होय. ।।६।।

-आतां अधिष्ठानासहवर्तमान असलेला जीवच संसारी, कर्ता, भोक्ता इत्यादि होतो, असें दोन श्लोकांनीं दाखवितात -

अधिष्ठानांशसंयुक्तं भ्रमांशमवलंबते ।
यदा तदाऽहं संसारीत्येवं जीवोऽभिमन्यते ।।७।।

अन्वयार्थ - [यदा जीव: अधिष्ठानांशसंयुक्तं भ्रमांशं अवलंबते-] जेव्हां जीव अधिष्ठानाच्या अंशासहवर्तमान भ्रमाच्या अंशाचा आश्रय करितो [तदा अहं संसारी इति एवं अभिमन्यते-] तेव्हां 'मी संसारी' असा अभिमान धरितो.

प्रकाश:- अधिष्ठानांशसंयुक्तं-जीवाचें अधिष्ठान जें कूटस्थ चैतन्य त्यासह. भ्रमांश-चिदाभास असणारीं सूक्ष्म व स्थूल हीं दोन शरीरें. अवलंबते-हेंच माझें

स्वरूप आहे अशा खोट्याच समजुतीचा स्वीकार करितो. सारांश, अधिष्ठानांश व भ्रमांश यांचें ऐक्य झाल्यावांचून चिदाभासाला संसारित्व येत नाहीं. ॥७॥

भ्रमांस्य तिरस्कारादधिष्ठानप्रधानता ।
यदा तदा चिदात्माहमसंगोऽस्मीति बुध्यते ॥८॥

अन्वयार्थ- [यदा भ्रमांशस्य तिरस्कारात् -] ज्यावेळीं भ्रमाच्या अंशाचा तिरस्कार केल्यामुळें [अधिष्ठानप्रधानता भवति-] अधिष्ठानाचें प्राधान्य होतें [तदा अहं चिदात्मा असंग: अस्मि इति बुध्यते-] त्या वेळीं मी चिदात्मा असंग आहें, असें तो समजतो.

प्रकाश:- भ्रमांशस्य- दोन्ही देहांसहवर्तमान चिदाभासाचा. तिरस्कारात्-हें सर्व मिथ्या आहे अशा ज्ञानानें अनादर वाटल्यामुळें. सारांश, दीर्घकालपर्यंत निष्ठापूर्वक श्रवणादिकांचा अभ्यास व गुरुचरण-कमलाची प्रेमपूर्वक सेवा यांच्या योगानें भ्रमांशाचा अनादर वाटून जेव्हां मुमुक्षु अधिष्ठानरूप होऊन राहतो तेव्हां त्याला मी असंग, कूटस्थ, आत्मा आहें असें नि:संशय वाटतें. ॥८॥

-'अहोपण अधिष्ठान चैतन्य हेंच जीवाचें स्वरूप आहे, असें जर मानलें तर 'मी चिदात्मा व असंग आहें असें तो जाणतो,' हें म्हणणें अयोग्य ठरतें. कारण असंगचिद्रूप कूटस्थ 'अहं-' प्रत्ययाचा विषय होत नाहीं' अशी शंका घेऊन तिचें समाधान-

नासंगेऽहंकृतिर्युक्ता कथमस्मीति चेच्छृणु ।
एको मुख्यो द्वावमुख्यावित्यर्थस्त्रिविधोऽहम: ॥९

अन्वयार्थ - [असंगे अहंकृति: न युक्ता] असंग आत्म्याचे ठिकाणीं अहंकार असणें अयुक्त आहे [अत: 'अस्मि' इति कथं जानीयात्-] तेव्हां 'आहे' असें तो कसें जाणील ? [इति चेत् शृणु-] असें जर म्हणशील तर ऐक. [एक: मुख्य: द्वौ अमुख्यौ-] एक मुख्य व दोन गौण [इति अहम: त्रिविध: अर्थ: अस्ति-] असे 'अहं-' या शब्दाचे एकंदर तीन अर्थ आहेत.

प्रकाश:- अहो पण आत्मा जर संगरहित आहे, तर त्याचे ठिकाणीं 'अहं' अशी अहंवृत्ति तरी कोठून असणार ? कारण मुमुक्षु अधिष्ठानप्रधान झाला कीं सुषुप्तीप्रमाणें त्याला द्वैताचें भान होणें शक्य नाहीं. व अन्य असें जर कांहीं नाहीं तर त्याहून निराळा 'मी' हें तरी कोणाला वाटणार ? अशी जर तूं शंका काढशील, तर ह्याचें उत्तर सांगतों, ऐक. अहं या शब्दाचे एक मुख्य व दोन गौण असे एकंदर तीन अर्थ आहेत व आम्ही या ठिकाणीं जो 'अहं' शब्द योजिलेला आहे, तो अमुख्य आहे. याचें सविस्तर वर्णन पुढें होणार आहे. ॥९॥

-आतां प्रथमत: 'अहं'चा मुख्य अर्थ सांगतात-

अन्योन्याध्यासरूपेण कूटस्थाभासयोर्वपु: ।
एकीभूय भवेन्मुख्यस्तत्र मूढै: प्रयुज्यते ॥१०॥

अन्वयार्थ - [कूटस्थाभासयो: वपु: अन्योन्याध्यासरूपेण एकीभूय मुख्य: भवेत्-] कूटस्थ व चिदाभास यांचें स्वरूप अन्योन्याध्यासरूपानें एक होऊन तोच 'अहं-' शब्दाचा मुख्य अर्थ होतो. [तत्र मूढै: प्रयुज्यते-] कारण त्याअर्थीं मूढ लोकं त्याचा प्रयोग करितात.

प्रकाश:- कूटस्थ व चिदाभास यांचें ऐक्य झाल्यामुळे परस्परांविषयीं अविवेक होऊन जो 'अहं' असा शब्दप्रयोग होतो तो मुख्य होय. कारण बहुतेक सर्व मनुष्यें कूटस्थ व चैतन्य यांच्या अविवेकजन्य ग्रंथीला उद्देशूनच 'मी' असें म्हणतात. व हा 'मी' आबालवृद्धांना ठाऊक असतो, कारण व्यवहारांत मी ब्राह्मण, मी क्षत्रिय, इत्यादि शब्दप्रयोग होत असल्याचें सर्वत्र दिसतें. सारांश, सर्व प्राण्यांच्या परिचयांतला जो 'अहं' तोच मुख्य होय. ॥१०॥

-आतां दोन अमुख्य 'अहं' कोणते तें सांगतात-

पृथगाभासकूटस्थावमुख्यौ तत्र तत्त्ववित् ।
पर्यायेण प्रयुंक्तेऽहं शब्दं लोके च वैदिके ।।११

अन्वयार्थ - [यत: तत्त्ववित् तत्र अहं शब्दं लोके वैदिके च पर्यायेण प्रयुंक्ते -] ज्या अर्थी तत्त्ववेत्ता पुरुष आभास व कूटस्थ यांच्या ठिकाणीं 'अहं-' शब्द लौकिक-वैदिक व्यवहारांत पर्यायानें योजितो [अत: पृथक् आभासकूटस्थौ अमुख्यौ भवत:-] त्याअर्थी आभास व कूटस्थ हे 'अहं-' शब्दाचे अमुख्य अर्थ होतात.

प्रकाश:- प्राकृतपुरुषाप्रमाणें तत्त्ववित् पुरुष जडचैतन्याचें ऐक्य करीत नसल्यामुळें तो व्यावहारिक लोकांशी भाषण करीत असतांना एका प्रकारें 'अहं' शब्द योजितो व वैदिक व्यवहारकालीं म्हणजे शिष्याशीं संभाषणादि करीत असतांना निराळ्या प्रकारें योजितो. उदाहरणार्थ पहा:- मी आज गंगेवर स्नान करण्यास जातों. यांतील अहं शब्द केवल चिदाभासाला उद्देशून त्यानें योजिलेला आहे. व 'मी ब्रह्म आहें' या वाक्यांतील 'अहं' शब्द केवल कूटस्थाला उद्देशून आहे. यास्तव विद्वानांनीं योजिलेला 'अहं' शब्द भिन्न कालीं भिन्न वस्तु दाखवीत असतो. तस्मात् केवल आभास व केवल कूटस्थ यांचें लक्षणेनें ज्ञान करून देणारे अहं शब्द अमुख्य (गौण) आहेत. ।।११।।

-'लौकिक व वैदिक व्यवहारकालीं विद्वान् 'अहं-' शब्द पर्यायानें योजितो' असें जें वर म्हटलें आहे त्याचेंच आतां दोन श्लोकांनीं स्पष्टीकरण करितात-

लौकिकव्यवहारेऽहं गच्छामीत्यादिके बुध: ।
विविच्यैव चिदाभासं कूटस्थातं विवक्षति ।।१२

अन्वयार्थ - [अहं गच्छामि इत्यादिके लौकिक-व्यवहारे-] 'मी जातों' इत्यादि लौकिक व्यवहारांत [बुध: कूटस्थात् चिदाभासं विविच्य एव-] ज्ञाता कूटस्थाहून चिदाभासाला पृथक् करूनच [तं विवक्षति-] त्याला 'अहं' असें म्हणत असतो.

प्रकाश:- शरीर असेंपर्यंत, निदान त्याच्याकरितां तरी, ज्ञान्याला व्यवहार केलाच पाहिजे. पण तो ज्ञानी अगदीं प्राकृताप्रमाणें देहापासून अहंकारापर्यंत जेवढ्या वस्तु आहेत त्या सर्वांचें ठिकाणीं 'अहं' असें तादात्म्य करून व्यवहार करीत नाहीं. तर 'मी जातों' या लौकिकवाक्यांत सुद्धां चिदाभास कूटस्थाहून अगदीं निराळा आहे. असें समजून केवळ चिदाभासालाच 'अहं' असें तो म्हणतो; व नंतर व्यवहार करितो. कारण असंग व निराकार आत्मा जाणें, येणें, बसणें, इत्यादि व्यवहार कधींच करणार नाहीं अशी त्याची दृढ समजूत असते. सारांश, विद्वान् पुरुष व्यावहारिक भाषेंत केवळ चिदाभासालाच 'अहं' असें म्हणत असतो. ।।१२।।

असंगोऽहं चिदात्माऽहमिति शास्त्रीयदृष्टित: ।
अहंशब्दं प्रयुंक्तेऽयं कूटस्थे केवले बुध: ।।१३

अन्वयार्थ - [अयं बुध: शास्त्रीयदृष्टित:-] हा ज्ञानी शास्त्रीय दृष्टीनें ['अहं असंग; चिदात्मा'-] 'मी असंग आहे; मी चिदात्मा आहे' [इति केवले कूटस्थे अहंशब्दं प्रयुंक्ते-] इत्यादि प्रकारें केवल कूटस्थाच्या ठिकाणीं 'अहं-' शब्दाचा प्रयोग करितो.

प्रकाश:- शास्त्रीयदृष्टित:- वेदान्ताचें श्रवण केल्यानें उत्पन्न झालेलें जें ज्ञान त्या ज्ञानदृष्टीनें केवले कूटस्थ-प्रकाश जसा अंधकारापासून पृथक् असतो, त्याप्रमाणें चिदाभासाहून अगदीं भिन्न असलेल्या निर्विकार आत्म्याचे ठिकाणीं. तात्पर्य, ज्ञानी पुरुष शास्त्रीयदृष्टीनें जो 'अहं' असा शब्द योजितो, तो चिदाभास व कूटस्थ यांच्या ऐक्याला किंवा चिदाभासाला उद्देशून नसतो; तर तो सर्वाधारभूत प्रत्यगात्म्याला उद्देशून असतो. इंद्रानें प्रतर्दनाला उपदेश करितांना "मी प्रज्ञानात्मा प्राण आहें." असें म्हटलें आहे. पण तें शास्त्रदृष्ट्या म्हटलेलें असल्यामुळें त्याचा इंद्राच्या शरीरादिकांशीं कांहीं संबंध नाहीं; असें 'शास्त्रदृष्ट्या तूपदेशो वामदेववत्' या व्याससूत्रांत

व त्यावरील शांकरभाष्यांत स्पष्टपणें सिद्ध केलें आहे. ॥१३॥

-(शंका) अहोपण,

ज्ञानिताज्ञानिते त्वात्माभासस्यैव न चात्मन: ।
तथा च कथमाभास: कूटस्थोऽस्मीति बुध्यताम् ॥१४

अन्वयार्थ-[ज्ञानिताज्ञानिते तु आत्माभासस्य एव-] ज्ञानित्व व अज्ञानित्व हे धर्म आत्म्याच्या आभासाचेच आहेत. [च आत्मन: न-] आत्म्याचे नव्हेत. [तथा च आभास: 'अहं कूटस्थ: अस्मि-'] तेव्हां आभास 'मी कूटस्थ आहें' [इति कथं बुध्यताम्-] असें कसें समजेल ?

प्रकाश:- हा सर्व श्लोक शंकारूप आहे. ज्ञानत्वादि धर्म चैतन्याभासाचे आहेत असें तुम्हालाहि मान्य आहे. तेव्हां त्याचे धर्म कूटस्थ आत्म्याच्या ठिकाणीं कसे जाणार ? आणि असें जर होणें शक्य नाहीं, तर 'मी कूटस्थ आहे' असें तरी चिदाभासाला कसें म्हणतां येईल ? ज्ञानत्वादि धर्म चिदाभासच आहेत हें तर उघड आहे. कारण ते असंग चिद्रूप आत्म्याचे नव्हेत, हें निराळें सांगण्याची आवश्यकता नाहीं. तात्पर्य, कूटस्थाहून अगदीं भिन्न असणारा चिदाभास आत्मा कसा होणार ? ॥१४॥

या पूर्वोक्त शंकेचा आतां परिहार करितात

नायं दोषश्चिदाभास: कूटस्थैकस्वभाववान् ।
आभासत्वस्य मिथ्यात्वात्कूटस्थत्वावशेषणात् ॥१५

अन्वयार्थ- [अयं दोष: न-] हा दोष येत नाहीं. [आभासत्वस्य मिथ्यात्वातेत्-] [आभासत्व खोटें असल्यामुळें [च कूटस्थत्वावशेषणात्-] व कूटस्थत्व अवशिष्ट राहात असल्यामुळें [चिदाभास: कूटस्थैकस्वभाववान् अस्ति-] चिदाभास 'कूटस्थ' याच एका स्वभावानें युक्त आहे.

प्रकाश:- चिदाभास म्हणून जर कोणी कूटस्थाहून खरोखरीच निराळा पदार्थ असता तर ही तुमची शंका योग्य झाली असती. पण जो जो आभास (ती वस्तु नसतांना तिच्यासारखा भास) तो तो खोटा अशी व्याप्ति असल्यामुळें आभासाच्या निवृत्तीनंतर त्यांचें अधिष्ठान अवशिष्ट राहणेंच युक्त आहे. जसें एकदा विलासी पुरुष आपल्यापुढें आरसा धरून त्यांत आपलें स्वरूप पहात असला तरी त्यांत दिसणारें मुख खोटें असतें, व पाहणाऱ्या पुरुषाचें मुख हेंच त्याचें खरें तत्त्व असतें, त्याप्रमाणें बुद्धिस्थ आभास हा खोटा आहे व त्याचें बिंबभूत कूटस्थ सत्य आहे. सारांश, आभासाचा कूटस्थ हाच एक स्वभाव आहे. आणि त्यामुळें 'मी कूटस्थ आहें' असा जो गौण प्रयोग होत असतो तो केवळ शास्त्रीयदृष्ट्या होय. ॥१५॥

-'अहो पण आभास जर खोटा, तर त्याच्या आश्रयाने रहाणारें 'मी कूटस्थ' हें ज्ञानहि खोटेंच,' अशी शंका घेऊन समाधान करितात-

कूटस्थोऽस्मीति बोधोऽपि मिथ्या चेन्नेति को वदेत् ।
न हि सत्यतयाऽभीष्टं रज्जुसर्पविसर्पणम् ॥१६

अन्वयार्थ - [कूटस्थ: अस्मि इति बोध: अपि मिथ्या इति चेत्-] 'मी कूटस्थ आहें' हें ज्ञान सुद्धा खोटें, असें जर म्हणशील तर ['न' इति क: वदेत्-] 'नाहीं,' असें कोण म्हणतो ? [हि रज्जु सर्पविसर्पणं सत्यतया न अभीष्टम्-] कारण रज्जूवर भासणाऱ्या सर्पाचें चलन सत्य आहे, असें कोणालाहि मान्य नाहीं.

प्रकाश:- 'मी कूटस्थ आहें' अशा प्रकारें होणारा जो विद्वानाचा शास्त्रीयदृष्ट्या व्यवहार तो परमार्थत:

खोटाच आहे. तो खरा आहे, असें कोणीहि म्हणणार नाहीं. कारण तसें म्हणणें हा सुद्धां एक वाणीचा व्यापार आहे. व सर्व कायिक, वाचिक, मानसिक व्यापार हा शुद्ध व्यवहाराच असल्यामुळें तो चिदाभासाचा आश्रय करून असतो हें उघड आहे; आणि त्यामुळेंच तो खोटा आहे. रज्जूच्या आश्रयानें भासणारा भुजंग भ्रमिष्टाला चालत आहेसा वाटतो, पण तें त्याचें वाटणें खरें का असतें ? तसाच प्रकार या 'अहं' चा आहे, असें समजावें. ॥१६॥

-'पण हें ज्ञान जर मिथ्या आहे, तर त्याच्या योगानें संसाराची निवृत्ति कशी होणार ?' उत्तर -

तादृशेनापि बोधेन संसारो हि निवर्तते ।
यक्षानुरूपो हि बलिरित्याहुर्लौकिका जना: ॥१७

अन्वयार्थ - [तादृशेन बोधेन अपि संसार: निवर्तते हि-] तशा प्रकारच्या बोधानें सुद्धां संसाराची निवृत्ति होतेच. [हि यक्षानुरूप: बलि: इति लौकिका: जना: आहु:-] कारण 'जसा यक्ष तसा बलि' असें प्राकृत लोक म्हणत असतात.

प्रकाश:- जसा समंध किंवा पिशाच असेल तसाच त्याला बलि दिला पाहिजे असें व्यावहारिक लोक सुद्धां म्हणत असतात. किंवा स्वप्नांमध्यें दिसलेला व्याघ्र व त्यामुळें वाटलेली भीति स्वप्नांतील आप्ताच्या उपदेशानेंच नाहींशी होणार हें उघड आहे. त्याप्रमाणेंच हा खोटा संसार नष्ट होण्यास असलें खोटें ज्ञानच उपयोगीं पडतें. सारांश, मिथ्या संसाराची निवृत्ति करण्यास मिथ्या ज्ञानच जर उपयोगीं पडलें तर त्यांत कांहीं हानि नाहीं. ॥१७॥

--आतां या प्रकरणाचा उपसंहार करितात-

तस्मादाभासपुरुष: सकूटस्थो विविच्य तम् ।
कूटस्थोऽस्मीति विज्ञातुमर्हतीत्यभ्यधाच्छ्रुति: ॥१८

अन्वयार्थ- [तस्मात् सकूटस्थ: आभास-पुरुष:-] तस्मात् कूटस्थासह चिदाभास, हा पुरुष होय. [तं विविच्य-] त्या कूटस्थाला चिदाभासाहून पृथक् करून [कूटस्थ: अस्मि इति विज्ञातुं अर्हति-] 'मी कूटस्थ आहें' असें ज्ञान होणें शक्य आहे, [इति श्रुति: अभ्यघात्-] असें श्रुतीनें सांगितलें आहे.

प्रकाश:- ज्या अर्थीं कूटस्थ हेंच चिदाभासाचें स्वरूप आहे, त्या अर्थीं पुरुष या शब्दानें ज्याचा उल्लेख करितात तो कूटस्थासह वर्तमान चिदाभास होय. म्हणून अधिष्ठानभूत कूटस्थाचें मिथ्याभूत अशा स्वत:हून विवेकानें पृथक्करण केल्यानें मी कूटस्थ आहें, असें ज्ञान होणें अशक्य नाहीं. हें सुचविण्याकरितां श्रुतीनें 'अस्मि' असें म्हटलें आहे. ॥१८॥

-याप्रमाणें 'आत्मानं चेत्' इत्यादि श्रुतींतील 'पुरुष' व 'अस्मि' या दोन पदांचा तात्पर्यार्थ सांगून 'अयं' या पदाच्या प्रयोगाचा अभिप्राय सांगतात-

असंदिग्धाविपर्यस्तबोधो देहात्मनीक्ष्यते ।
तद्वदत्रेति निर्णेतुमयमित्यभिधीयते ॥१९

अन्वयार्थ- [देहात्मनि असंदिग्धाविपर्यस्तबोध: यद्वत् ईक्ष्यते-] देहरूप आत्म्याविषयीं नि:संशय व विपर्यासरहित ज्ञान जसें होत असल्याचें दिसतें [तद्वत् अत्र इति निर्णेतु 'अयं' इति अभिधीयते-] तसेंच या प्रत्यगात्म्याविषयीं ज्ञान झालें पाहिजे, असा निर्णय करण्याकरितां 'अयं म्ह० हा' असें म्हटलें आहे.

प्रकाश:- असंदिग्ध म्हणजे 'हा घट आहे कीं अन्य कांहीं आहे' याप्रमाणें जसा लौकिक पदार्थांविषयीं संशय उत्पन्न होतो, त्याप्रमाणें ''देही हा आत्मा आहे कीं अन्य कांहीं आहे'' असा संशय उत्पन्न न होतां व अविपर्यस्त-म्हणजे शुक्ति असतांना ती जशी हें रजत आहे असें वाटतें, तसें देह असतांना तो इंद्रियें आहे

किंवा पाषाण आहे असें वाटत नाहीं, तर प्राकृत पुरुषाला देह हाच आत्मा आहे ह्याविषयीं कधींच संशय येत नाहीं; त्याचप्रमाणें या प्रत्यगात्म्याविषयींहि संशयविपर्ययरहित ज्ञान संपादन केलें पाहिजे, असा मुमुक्षूला निर्णय करितां यावा म्हणून 'अयं' म्हणजे हा प्रत्यक्ष भासणारा (स्वसंवेद्य) असें श्रुतीनें म्हटलें आहे. सारांश मी ब्राह्मण, मी गोरा, मी विद्वान्, इत्यादि जसें देहाभिमानी प्राकृत कधीं विसरत नाहींत तसेंच कूटस्थ आत्म्याला कधीं न विसरणें व पूर्वोक्त सर्व खोटें आहे, असें समजणें हें मोक्षदायी ज्ञान होय. ॥१९॥

-अशा प्रकारचा बोधच मोक्षाचें साधन आहे, या विषयीं उपदेशसाहस्त्रींतील आचार्यवाक्याचें आनुकूल्य दाखवितात-

देहात्मज्ञानवज्ज्ञानं देहात्मज्ञानबाधकम् ।
आत्मन्येव भवेद्यस्य स नेच्छन्नपि मुच्यते ॥२०

अन्वयार्थ- [देहात्मज्ञानवत् आत्मनि एव देहात्मज्ञानबाधकं ज्ञानं यस्य भवेत्-] 'देहच मी' या ज्ञानाप्रमाणें आत्म्याविषयींच देहात्मज्ञानाचा बाध करणारें ज्ञान ज्याला होतें [सः नेच्छन् अपि मुच्यते-] त्याची इच्छा नसली तरी तो मुक्त होतो.

प्रकाशः- श्रीभाष्यकार म्हणतात- प्राकृतात देह हाच आत्मा आहे असें ज्ञान जसें निःसंशय असतें, तसेंच-आत्मा देह नव्हे तर तो नित्य शुद्ध, बुद्ध, व मुक्त आहे असें पूर्वोक्त देहात्मभावनेचा नाश करणारें दृढ ज्ञान ज्या धन्य व कृतकृत्य भाग्यवानाला होतें त्याची मोक्षाविषयीं इच्छा नसली तरी तो मुक्त होतो. म्हणजे अग्नीवर न समजतां जरी पाय पडला तरी तो जसा दाह करितोच त्याप्रमाणें हें पूर्वोक्त आत्मज्ञान झालें कीं त्याचें मोक्ष हें फळ अवश्य मिळतेंच. ॥२०॥

श्रुतिस्थ 'अयं' या पदाच्या दुसऱ्या अभिप्रायाची शंका घेऊन तिला अनुमोदन देतात-

अयमित्यपरोक्षत्वमुच्यते चेत्तदुच्यताम् ।
स्वयंप्रकाशचैतन्यमपरोक्षं सदा यतः ॥२१

अन्वयार्थ - [अयं इति अपरोक्षत्वं उच्यते चेत्-] 'अयं' - हा या पदानें आत्म्याचें अपरोक्षत्व सांगितलें जातें, म्हणून जर म्हणशील तर [तत् उच्यतां-]तेंच सांगितलें जावो.[यतः स्वयंप्रकाश-चैतन्यं सदा अपरोक्षं-] कारण स्वयंप्रकाश चैतन्य सदा अपरोक्ष आहे.

प्रकाशः- 'इदमस्तु संनिकृष्टं समीपतरवर्ति चैतदो रूपम्' ह्या वचनानुसार 'हा घट आहे' इत्यादि व्यावहारिक प्रयोगांतील 'हा' या शब्दानें निर्दिष्ट वस्तु अपरोक्ष असते. म्हणजे 'हा' हें ज्याचें विशेषण आहे, असा घटादि पदार्थ प्रत्यक्ष दिसत असतो; ही गोष्ट सर्व विचक्षणांस ठाऊक आहे, त्याचप्रमाणें 'अयमस्मीति पूरुषः' वाक्यांतील 'अयं' शब्दाचा अर्थहि प्रत्यक्ष असावयास पाहिजे असें जर तूं म्हणशील तर तें आम्हांस इष्टच आहे कारण स्वयंप्रकाश चैतन्य सदा अपरोक्ष आहे असें आम्हीं श्रुतीच्या अनुरोधानें मानीत असतों. पण 'अयं' ह्या शब्दामुळें घटाप्रमाणें किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या एकाद्या पदार्थाप्रमाणें आत्मा ज्ञेय होईल, अशी आशा करणें व्यर्थ आहे. ॥२१॥

-'हा आत्मा' असें म्हटल्यास त्याच्या ठिकाणीं परोक्षत्व हा धर्महि राहतो असें वाटतें. कारण जो पदार्थ पूर्वी अज्ञात असून पुढें इंद्रियसंबंधामुळें ज्ञात होतो त्यालाच प्रत्यक्ष ज्ञानसमयीं 'हा' असें म्हणत असतात; पण आत्मा स्वयंप्रकाश व अपरोक्ष आहे असें तुम्ही सांगतां ! तेव्हां एकाच आत्म्याच्या ठायीं परोक्षत्व अपरोक्षत्व किंवा ज्ञान व अज्ञान हे परस्परविरोदी धर्म कसे राहतील ?' उत्तर -

परोक्षमपरोक्षं च ज्ञानमज्ञानमित्यदः ।
नित्यापरोक्षरूपेऽपि द्वयं स्याद्दशमे यथा ॥२२

अन्वयार्थ- [यथा दशमे परोक्षं च अपरोक्षं ज्ञानं च अज्ञानं इति अदः द्वयं-] आपणांस सोडून इतरांस

मोजणाऱ्या व 'आपल्यांतील दहावा मनुष्य नाहीं' असें म्हणणाऱ्या पुरुषाच्या ठायीं जसें परोक्ष, अपरोक्ष, ज्ञान-अज्ञान, हीं दोन्ही राहतात [तथा नित्यापरोक्षरूपे अपि स्यात्-] त्याप्रमाणें नित्य अपरोक्षरूप आत्म्याच्या ठायींहि परोक्ष व अपरोक्ष, ज्ञान व अज्ञान हीं दोन्ही राहतात.

प्रकाश:- दहाव्या पुरुषाच्या ठायीं ज्ञान व अज्ञान कसें असतें व तो स्वत:ला कसा विसरतो इत्यादि प्रकार पुढच्या पांच श्लोकांत स्पष्ट होणार असल्यामुळें त्याचा येथें विस्तार करीत नाहीं. ॥२२॥

-'दशमे यथा' या दृष्टान्ताचें स्पष्टीकरण-

नवसंख्याहृतज्ञानो दशमो विभ्रमात्तदा ।
न वेत्ति दशमोऽस्मीति वीक्ष्यमाणोऽपि तान्नव ॥२३

अन्वयार्थ- [नवसंख्याहृतज्ञान: दशम:-] नऊ या संख्येनें ज्याचें ज्ञान हरण केलें आहे असा दहावा मनुष्य [तान् नव वीक्ष्यमाण: अपि-] त्या नवांस पाहत असूनहि [अहं दशम: अस्मि इति तदा विभ्रमात् न वेत्ति-] मी दहावा आहें, असे त्या वेळीं भ्रमामुळें जाणत नाहीं.

प्रकाश:- याविषयीं अशीं आख्यायिका आहे. एकदा पृथ्वीप्रदक्षिणेच्या उद्देशानें प्रथमत: भारतवर्षांतील सर्व तीर्थांचें सेवन करण्याकरितां निघालेल्या दहा ब्राह्मणांनीं एके दिवशीं सायंकाळीं एका मोठ्या नदींचें उल्लंघन केलें. त्या पाण्यानें तुडुंब भरलेल्या नदीवर पूल नसल्यामुळें त्या सर्वांना पोहत पलीकडे जावें लागलें. मोठ्या प्रयासानें सायंकाळीं पलीकडे पोंचल्यावर आपल्यांतील कोणी नदीमध्यें बुडून मेला तर नाहीं ? असा संशय आल्यामुळें त्यांतील एक सर्वांस मोजूं लागला. पण स्वत:ला सोडून इतरांस मोजणाऱ्या त्या बिचाऱ्याचें, मीच दहावा आहें, हें ज्ञान नष्ट झालें; व त्यामुळें तोच जरी स्वत: त्यांतील दहावा मनुष्य होता व आपल्यापुढें असलेल्या इतर नऊ सोबत्यांस जरी तो प्रत्यक्ष पाहत होता, तरी भ्रम पडल्यामुळें त्यास मीच दहावा आहें, असें ज्ञान झालें नाहीं. तात्पर्य, अशाप्रकारें त्याला स्वत:चें अपरोक्ष ज्ञान जरी होतें, तरी त्याचा भ्रमामुळें जसा कांहीं नाशच झाला होता व त्यामुळें त्याला स्वत:चें भान राहिलें नाहीं. ॥२३॥

-ह्याप्रमाणें दृष्टान्तभूत दशम पुरुषाला स्वत:चें नित्य अपरोक्ष ज्ञान असतांनाच अज्ञानाचाहि अनुभव कसा येतो, तें दाखवून त्या अज्ञानाचें कार्य आवरण दाखवितात-

न भाति नास्ति दशम इति स्वं दशमं तदा ।
मत्वा वक्ति तदज्ञानकृतमावरणं विदु: ॥२४

अन्वयार्थ - [तदा दशम:-] सर्वांची गणना करिते वेळीं दहावा [स्वंदशमं सन्तं-] स्वत:च दहावा असतांना [दशम: न भाति अत: नास्ति इति मत्वा-] दहावा भासत नाहीं, म्हणून तो नाहींच, असें मानून [तथा वक्ति--] तसें नि:शंकपणें बोलून दाखवितो. [अस्य यत्कारणं तत् अज्ञानकृतं आवरणं इति बुधा: विदु:-.] ह्या चमत्कारिक व्यवहाराचें जें कारण तेंचें अज्ञानाचें आवरणसंज्ञक कार्य आहे, असें विद्वान् लोक समजतात.

प्रकाश:- तुम्हां सर्वांस मीं मोजलें, पण मला तुम्हीं नऊजणच दिसत आहां. दहाव्याची काय वाट झाली, कांहीं समजत नाहीं. असें जें वाटणें, त्याला अज्ञानावरण (अज्ञान+आवरण) असें म्हणतात. या आवरणाचा एका अपरोक्ष ज्ञानानेंच नाश होत असतो. तसेंच दहावा तुमच्यामध्यें नाहीं, कारण तो जर येथें असता तर तुम्हांप्रमाणें दिसला असता - या आवरणास असदावरण (असत् + आवरण) म्हणतात. याचा परोक्ष (केवल शाब्दिक) ज्ञानानेंहि बाध होत असतो. परमपूज्य अच्युतराय मोडकांनीं श्री रामकृष्णाचें व्याख्यान बरोबर नाहीं असें म्हणून या श्लोकाचें अन्य रीतीनें विवरण केलें आहे. श्री

रामकृष्णांच्या व्याख्यानाप्रमाणेंच मीं या श्लोकाचा अन्वय लिहिलेला असल्यामुळें त्या, व प्रस्तुतसमर्यी संक्षेपतः देत असलेल्या या व्याख्यानांत काय फरक आहे तो बहुश्रुत व सूक्ष्मबुद्धि वाचकांस समजून येईल.

"तदा- आपल्याहून निराळ्या अशा नऊ पुरुषांची गणना करिते वेळीं स्वं दशमं-मी दहाची गणना करण्यास प्रवृत्त झालों आहें असें; मत्वा-जाणूनहि- दहावा नाहीं इत्यादि प्रकारें बोलतो. यालाच पंडित अज्ञानकृत आवरण असें समजतात." पूर्वोक्त व्याख्यानाहून प्रस्तुत व्याख्यान अधिक डौलदार असून पूर्वव्याख्यानांतील स्वं, दशमं, सन्तं, या तीन पदांचा अन्वय कोणच्या पदार्शी कसा लावावयाचा, हेंहि बरोबर समजत नाहीं. असो; तात्पर्य अपरोक्षज्ञानकालींहि अज्ञान कसें भासतें व आपलें आवरणरूपी कार्य कसें करितें, हें येथें उत्तमप्रकारें दाखविलें आहे. ॥२४॥

--अज्ञानाचें दुसरें कार्य विक्षेप आहे. यास्तव दृष्टान्तांतील विक्षेप दाखवितात-

नद्यां ममार दशमइति शोचन्प्ररोदिति ।
अज्ञानकृतविक्षेपं रोदनादिं विदुर्बुधाः ॥२५

अन्वयार्थ- [दशमः नद्यां ममार इति शोचन् सः प्ररोदिति-] दहावा नदींत बुडून मेला असें म्हणून खेद करणारा तो दहावा रडतो. [बुधाः इमं रोदनादिं अज्ञानकृतविक्षेपं विदुः-] ज्ञानी लोक या रोदनादिकाला अज्ञानकृत विक्षेप समजतात.

प्रकाशः- अज्ञानाचें पहिलें कार्य आवरण म्हणजे वस्तूस आच्छदित करणें व दुसरें कार्य विक्षेप म्हणजे ज्या वस्तूचें खरें रूप अज्ञानाच्या आवरण नामक प्रथम कार्यामुळें आच्छादित झालेलें असतें, तिचें भलत्याच प्रकारें भान होणें, हें होय. मंद अंधकारांत पडलेली दोरी 'ही दोरी आहे' अशाप्रकारें न समजणें हें अज्ञान. याच्या योगानें दोरीचें खरें रूप झांकून जातें. ह्यालाच आवरण म्हणतात. पुढें या आवरणांमुळें 'हा मोठा भुजंग आहे' असें भ्रामक ज्ञान होतें. हेंच विक्षेपसंज्ञक अविद्येचें दुसरें कार्य होय. तसेंच प्रस्तुत दृष्टांतांत 'मीच दहावा आहें' असें न समजणें हें अज्ञान; दहावा नदींत बुडून मेला, भासत नाहीं. इत्यादि आवरण व त्याच्या करितां रोदन इत्यादि करणें हा विक्षेप होय. तात्पर्य सामान्यतः एकादी वस्तु अपरोक्ष असतांनाहि विशेषतः तिचें अभान होणें अशक्य नाहीं. ॥२५॥

-दहाव्या मनुष्याच्या असत्त्वांशाचें निवारण करणारें परोक्ष ज्ञान सांगतात-

न मृतो दशमोऽस्तीति श्रुत्वाऽऽप्तवचनं तदा ।
परोक्षत्वेन दशमं वेत्ति स्वर्गादिलोकवत् ॥२६

अन्वयार्थ- [तदा 'दशमः न मृतः अस्ति-'] तेव्हां 'दहावा मेला नाहीं, जिवंत आहे' [इति आप्तवचनं श्रुत्वा-] असें आप्ताचें वचन ऐकून [सः दशमं स्वर्गादिलोकवत् परोक्षत्वेन वेत्ति-] तो दहाव्या पुरुषास स्वर्गादि लोकाप्रमाणें परोक्षत्वानें जाणतो.

प्रकाशः- आपल्यांतील दहावा मनुष्य नदींत बुडाला असें समजून रडत असलेल्या त्या पुरुषाचा स्वर ऐकून जवळच असलेल्या कोणा आप्ताला करुणा आली, व तो काय झालें, म्हणून पाहण्याकरितां त्याच्याजवळ आला. सर्व प्रकार ऐकून घेतल्यावर व त्या प्रवाश्यांस मोजून पाहिल्यावर तो म्हणाला, "तुमच्यांतील दहावा मेला नाहीं जिवंत आहे." हें त्याचें वाक्य ऐकतांच तो रडणारा दहावा मनुष्य रडणें सोडून आपल्यांतील दहावा कोठें आहे तें समजून घेण्याविषयीं उत्सुक झाला. तात्पर्य शाब्दिक ज्ञानाच्या योगानें असत्वावरण नष्ट होतें ही गोष्ट सिद्ध झाली. या श्लोकांत आप्तवचनं असा एक शब्द आहे व त्यामुळेंच असत्त्वारण नाहींसें होतें असें सुचविलें आहे. यास्तव या आप्तवचनाचें थोडेसें अधिक विवरण केलें पाहिजे. सांख्यशास्त्रांत आप्तवचनाचें **आप्तश्रुतिः** असें लक्षण आढळतें व

त्याचा अर्थ-वाक्यापासून उत्पन्न झालेलें योग्य वाक्यार्थ ज्ञान-असा आहे. पण हा अर्थ प्रस्तुतस्थळीं बरोबर लागू पडत नाहीं. यास्तव आप्त म्हणजे यथार्थ बोलणारा; व त्याचें जें वचन तें आप्तवचन असा येथें नैयायिकांच्या पद्धतीप्रमाणें अर्थ करणें योग्य दिसतें. पंडित अच्युतरायांनीं "ज्याचा पूर्वीं परिचय झाला आहे व त्यामुळें ज्याचें वाक्य पूर्णपणें प्रमाण असतें असा ऐकणाराचा निश्चय झालेला आहे, अशा निष्कपटी पुरुषाचें वाक्य" असा या शब्दाचा अर्थ केला आहे. पण प्रवासामध्यें अशा प्रकारचा पुरुष भेटणें अशक्य दिसतें.त्या दहा प्रवाश्यांपैकींच एकानें खरा प्रकार जाणून प्रस्तुत वाक्य उच्चारिलें अशी जर कल्पना केली, किंवा नदीच्या पलीकडे पोंचल्यावर ते सर्व एका गावांत जाऊन उतरले व तेथें या भ्रमिष्टांचा कोणी पूर्वपरिचित होता असें समजलें, तर हें व्याख्यान निर्दोष ठरणार आहे. नैयायिकांच्या पद्धतीप्रमाणें जरी अर्थ केला तरी- 'हा यथार्थवक्ता आहेच' अशा ऐकणाराची एकाएकीं खात्री होणें अशक्य आहे- असा एक संशय येथें येण्यासारखा आहे. पण आकृतीवरूनहि अगदीं अपरिचित अशा मनुष्याविषयीं पुष्कळ वेळां बरोबर अनुमान करितां येतें. शिवाय 'दहावा आहे' असें ऐकतांच 'कोठें आहे?' असा प्रश्न होणार हें बोलणारास ठाऊक असल्यामुळें तो एकदम असें साहस करील ही कल्पनाहि करणें अयोग्य आहे. **स्वर्गादिलोकवत्**- वेदरूपी आप्तवचनावरून स्वर्गादिकांचें जसें परोक्ष (अप्रत्यक्ष) ज्ञान होतें, त्याप्रमाणें प्रस्तुतप्रसंगीं रडणाऱ्या भ्रमिष्टास दहाव्याविषयीं होतें. ॥२६॥

-आतां त्याच्याच अभानावरणाचें निवारण करणारें अपरोक्षज्ञान कसें हातें, तें सांगतात-

त्वमेव दशमोऽसीति गणयित्वा प्रदर्शितः ।
अपरोक्षतया ज्ञात्वा हृष्यत्येव न रोदिति ॥२७

अन्वयार्थ - [**त्वम् एव दशमः असि इति गणयित्वा प्रदर्शितः सः**-] तूंच दहावा आहेस असें ज्याला मोजून दाखविलें आहे, असा तो [**अहं दशमः अस्मि इति अपरोक्षतया ज्ञात्वा हृष्यति एव न रोदिति**-] **मीच दहावा आहें, असें अपरोक्षपणें जाणून आनंदितच होतो, रडत नाहीं.**

प्रकाश:- आमच्यांतील दहावा जर मेला नाहीं, तर कोठें आहे ? असा त्यानें प्रश्न केला असतां "तूंच दहावा आहेस. पण इतरांस मोजून तूं स्वतःस सोंडीत होतास व त्यामुळें दहावा मेला असा तुला भ्रम झाला," असें बोलून त्यानें दहांसहि मोजून दाखविलें असतां मीच दहावा आहें-असें त्यास प्रत्यक्ष ज्ञान होतें व त्याबरोबर त्याला मोठा चमत्कार वाटून तो हसूं लागतो. आपल्यांतील दहाव्याचा साक्षात्कार झाल्यावर, तो पूर्वीप्रमाणें रडत नाहीं, हें उघड आहे. ॥२७॥

- ह्याप्रमाणें दृष्टान्तभूत दशमाविषयीं कोणत्या सात अवस्था होतात तें सांगून त्या दार्ष्टान्तिक आत्माच्या ठायींहि योजाव्या, असें सांगतात--

अज्ञानावृतिविक्षेपद्विविधज्ञानतृप्तयः ।
शोकापगम इत्येते योजनीयाश्चिदात्मनि ॥२८

अन्वयार्थ - [**अज्ञानावृतिविक्षेपद्विविधज्ञानतृप्तयः च शोकापगमः**-] **अज्ञान, आवरण, विक्षेप, परोक्ष व अपरोक्ष ज्ञान, तृप्ति व शोकाचा नाश** [**इति एते अध्यस्ताः अवस्थाविशेषाः चिदात्मनि योजनीयाः**-] **हे आरोपित अवस्थाविशेष चिदात्म्याच्या ठायीं योजावे.**

प्रकाश:- भ्रमाच्या उत्पत्तीपासून त्याच्या अंतापर्यंत एकंदर सात अवस्था होत असतात. त्या कोणत्या व कशा होतात हें गेल्या पांच श्लोकांत क्रमानें सांगितलें आहे व येथें त्यांचा क्रमानें नामनिर्देश करून आत्मविषयक भ्रामामध्येंहि त्यांची योजना करावी असें म्हटलें आहे. ॥२८॥

-या सात अवस्थांची आत्म्याच्या ठिकाणीं योजना कशी करावयाची तें स्वतः ग्रंथकारच आता क्रमानें पुढच्या चार श्लोकांत दाखवितात-

संसारासक्तचित्त: संश्चिदाभास: कदाचन ।
स्वयंप्रकाशकूटस्थं स्वतत्त्वं नैव वेत्त्ययम् ॥२९

अन्वयार्थ - [अयं चिदाभास:-] हा चिदाभास [संसारासक्तचित्त: सन्-] संसारामध्यें - विषय-संपादनादि चिंतनांत ज्याचें चित्त आसक्त झालें आहे, असा होत्साता [कदाचन] श्रुतीचा विचार करण्यापूर्वी केव्हांच [स्वतत्त्वं स्वयंप्रकाश कूटस्थ-] आपलें स्वरूप असा जो चिद्रूप प्रत्यगात्मा त्याला [न एव वेत्ति-] जाणत नाहीं.

प्रकाश:- या श्लोकांत आत्मविषयक अज्ञान दाखविलें आहे. चिदाभास म्हणजे जीव. द्रव्यादि इष्टविषय कसे प्राप्त होतील या विवंचनेंत जो जीव पडलेला असतो त्याला सत्संग, गुरूपदेश व शास्त्रश्रवण याचा लाभ होत नाहीं. कारण त्या बिचाऱ्यास इष्टार्जनापुढें फुरसतच मिळत नाहीं; आणि त्यामुळें स्वयंज्योतिरूप व निर्विकार असें आपलें तत्त्व त्याला समजत नाहीं. हेंच अज्ञान होय. या अज्ञानामुळेंच पुढच्या सहा अवस्था होत असतात. योगशास्त्रामध्येंहि अविद्या ही उत्तरक्लेशांची भूमि आहे असें म्हटलें आहे. ॥२९॥

--आतां आत्म्याचे ठिकाणीं दोन प्रकारचें अविद्याकार्य कसें होतें, तें सांगतात -

न भाति नास्ति कूटस्थ इति वक्ति प्रसंगत: ।
कर्ता भोक्ताऽहमस्मीति विक्षेपं प्रतिपद्यते ॥३०

अन्वयार्थ - [प्रसंगत: 'कूटस्थ: न भाति नास्ति' इति वक्ति-] तो चिदात्म्याविषयीं बोलण्याचा प्रसंग आला असतां 'कूटस्थ भासत नाहीं व तो नाहीं' असें बोलतो [तथा अहं कर्ता च भोक्ता अस्मि-] व मी कर्ता आणि भोक्ता आहें [इति विक्षेपं प्रतिपद्यते-] अशा विक्षेपास प्राप्त होतो.

प्रकाश:- ज्याचा तो विषय नसतो त्याविषयीं तो मूढ असतो; व कोणीं प्रश्न केला असतां तो त्याविषयीं भलतेंच कांहीं तरी उत्तर देतो हें सर्वांस ठाऊक आहे. जे लोक अगदीं पशुवृत्ति असतात त्यांना जर आत्माविषयीं कोणीं प्रश्न केला तर अनात्मा हाच त्यांचा नेहमींचा विषय असल्यामुळें ते अगदीं अयोग्य उत्तर देतात. व त्यांतील प्रत्येक अनात्म्यास आत्मा समजून मी कर्ता व भोक्ता (म्हणजे देहेंद्रियादि साधनांच्या योगानें होणारें प्रत्येक कृत्य करणारा व त्यांचें बरेंवाईट फल भोगणारा) आहें असें मानतो. हाच 'विक्षेप' होय. ॥३०॥

- आतां द्विविध ज्ञान सांगतात -

अस्ति कूटस्थ इत्यादौ परोक्षं वेत्ति वार्तया ।
पश्चात्कूटस्थ एवास्मीत्येवं वेत्ति विचारत: ॥३१॥

अन्वयार्थ - **[आदौ वार्तया 'कूटस्थ: अस्ति' इति परोक्षं वेत्ति-] प्रथमत: दुसऱ्याच्या सांगण्यावरून 'कूटस्थ आहे' असें परोक्ष ज्ञान होतें [पश्चात् विचारत: कूटस्थ: एव अहं अस्मि इति एवं वेत्ति] नंतर विचाराच्या योगानें 'कूटस्थच मी आहें'** असें तो जाणतो.

प्रकाश - परोक्ष म्हणजे साक्षात्काररहित ज्ञान उदाहरणार्थ एकाद्या विश्वासास पात्र असलेल्या मनुष्यानें 'हल्लीं येथें एक महाविद्वान् यति आले आहेत. अमुक स्थळीं राहतात' असें सांगितलें असतां त्यावरून ऐकणारास यतिविषयीं जें ज्ञान होतें तें परोक्ष ज्ञान होय. व त्यांस पाहण्याच्या इच्छेनें ते जेथें राहत असतील तेथें जाऊन त्याचें स्वनेत्रांनीं दर्शन घेतलें असतां जें ज्ञान होतें तें अपरोक्ष किंवा साक्षात् ज्ञान होय. परोक्षज्ञानावांचून अपरोक्ष ज्ञान होत नाहीं. यास्तव प्रथमत: परोक्ष ज्ञानाकरितां प्रयत्न करून व तें संपादून घ्यावें म्हणजे तात्काळ पुढें गति होऊन अपरोक्ष ज्ञानहि थोड्याच अवकाशांत होतें. कूटस्थ म्हणजे निर्विकार, सुख, दु:ख, लोभ, मोह, तृष्णा इत्यादि सर्व वृत्ती विकार होत. पण त्या आत्म्याच्या नव्हेत, बुद्धीच्या आहेत. तस्मात्

आत्मा कूटस्थ असून माझें यथार्थ स्वरूप तो निर्विकार आत्माच आहे असा प्रत्यय येणें हें अपरोक्ष ज्ञान होय; व तें श्रवणादिकांच्या योगानें होणाऱ्या परोक्ष ज्ञानानंतर होत असतें. ॥३१॥

-आतां या श्लोकांत क्रमानें प्राप्त होणाऱ्या पुढच्या दोन अवस्था दाखवितात -

कर्ता भोक्तेत्येवमादि शोकजातं प्रमुंचति ।
कृतं कृत्यं प्रापणीयं प्राप्तमित्येव तुष्यति ॥३२

अन्वयार्थ - [ततः कर्ता भोक्ता इत्येवमादि शोक जातं प्रमुंचति-] त्यानंतर मी कर्ता आहें, भोक्ता आहे इत्यादि प्रकारचा सर्व शोक तो सोडतो [अनंतरं च कृत्यं कृतं, प्रापणीयं प्राप्तं एव, इति तुष्यति-] व त्यानंतर मीं कर्तव्यकर्म केलें व प्राप्त करून घेण्यास योग्य असें सर्व प्राप्त करून घेतलेंच असें म्हणून संतुष्ट होतो.

प्रकाश:- या श्लोकांत शोकाचा नाश व अव्याहत तृप्ति ह्या दोन अवस्था दाखविल्या आहेत. पण ह्या अवस्था अपरोक्ष ज्ञानानंतर प्राप्त होत असतात. अर्थात् अपरोक्ष ज्ञान हें या उभयविध अवस्थांचें कारण आहे. 'कारण' हें 'कार्याच्या' पूर्वी असावें लागतें. यास्तव परोक्षज्ञानद्वारा अपरोक्ष ज्ञान झालें असतां, फलभूत अशा ह्या अवस्था आपोआप प्राप्त होतात. पूर्वोक्त विविध ज्ञानाप्रमाणें याच्याकरितां विशेष प्रयास करावा लागत नाहीं. आतां मी कर्ता व भोक्ता आहें असें समजण्यांत शोक तो काय होणार ? असें कोणी म्हणतील; कारण 'हाय ! हाय !' इत्यादि शब्द उच्चारून मोठमोठ्यानें हृदयादिकांवर प्रहार करणें व आक्रोश करणें म्हणजे शोक होय, असें बहुतेकांस माहित आहे, पण तें त्याचें म्हणणें युक्त नाहीं. कारण विवेकी असतात त्यांना सृष्टींतील यच्चयावत् सर्व भाव दुःखकारक वाटतात. शरीराच्या इतर भागावर काठीच्या सामान्य प्रहारानेंहि जितकें दुःख होत नाहीं त्याच्या शतपट दुःख नेत्रामध्यें बारीकसा लोकरीचा तंतु फिरवल्यानें होतें याचें कारण एक भाग राकट व दुसरा नाजुक हेंच आहे. हाच न्याय अविवेकी व विवेकी यांच्या दुःखाविषयीं समजावा.

'सर्व दुःखं विवेकिनां' या न्यायानें व सर्व प्राण्यांच्या अनुभवावरूनहि कर्तृत्वादि भाव दुःखदायी आहेत असें स्पष्ट होतें. कारण जेथें जेथें कर्तृत्वादि भाव तेथें तेथें अशांतिरूपी दुःख, असें या उभयतांचें साहचर्य (व्याप्ति) सर्वत्र प्रत्ययास येतें. ''व्याप तितका संताप'' असें व्यावहारिक लोकहि म्हणत असतात. 'मी कर्ता' या एका भावाबरोबर तदनुषंगी सर्व दोष मनुष्यामध्यें येऊन उभे राहतात. आणि दोष हें दुःखाचें बीज आहे असें अनेक साधुसंतहि आम्हांस आज आपल्या वाणीच्या द्वारा सांगत आहेत. तस्मात् कर्ता, भोक्ता इत्यादि भाव दुःखरूप आहेत असें म्हणणें अयोग्य नव्हे.

शोकजात सुटल्यावर साधकास निरतिशय तृप्तीचा लाभ होतो. जोपर्यंत कोणाला कांहीं कर्तव्य असतें. किंवा कांहीं प्राप्त करून घ्यावयाचें असतें, तोंपर्यंत त्याचें मन तृप्त होणें शक्य नाहीं; पण ह्या साधकाचा कर्तृभाव व भोक्तृभाव नष्ट झाल्यामुळें त्याला कर्तव्य व प्रापणीय अस कांहीं राहतच नाहीं. कारण कर्ता असेपर्यंत कर्तव्य व भोक्ता असेपर्यंत भोग्य असणार हें उघडच आहे; व 'निमित्ताचा नाश झाला असतां नैमित्तिकाचाहि नाश होतो' असा सामान्य नियम आहे; आणि त्याला अनुसरून कर्तृत्वादि निमित्तें नष्ट झाल्यावर कर्तव्यादिक न राहणें हेंच उचित होय. पुढें कर्तव्यादि जीं अतृप्तीचीं कारणें यांचाच समूल नाश झाल्यामुळें कार्यरूप अतृप्तीचा नाश होतो हें निराळें सांगण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. तात्पर्य, माझें सर्व कर्तव्य मी करून सोडलें आहे व प्राप्त करून घेण्यासारखें जें होतें तें प्राप्त करून घेतलें आहे अशी दृढभावना झाल्यावर तृप्ति हा त्याचा स्वभावच होऊन राहतो. याविषयीं विद्यानंदाख्य चवदाव्या प्रकरणांतहि

बरेंच विवेचन होणार आहे. ॥३१॥

- याप्रमाणें दार्ष्टान्तिकांतहि सांगितलेल्या या सात अवस्थांचा अनुवाद करून 'त्या आत्म्याच्या आहेत असें मानल्यास त्याचें कूटस्थत्व बाधित होईल' अशी शंका घेऊन त्या सातहि अवस्था कूटस्थ आत्म्याच्या नसून चिदाभासाच्या आहेत असें सांगतात-

अज्ञानमावृतिस्तद्वद्विक्षेपश्च परोक्षधी: ।
अपरोक्षमति: शोकमोक्षस्तृप्तिर्निरंकुशा ॥३३
सप्तावस्था इमा: सन्ति चिदाभासस्य तास्विमौ ।
बंधमोक्षौ स्थितौ तत्र तिस्रो बंधकृत: स्मृता: ॥३४

अन्वयार्थ - [अज्ञानं आवृति: तद्वत् विक्षेप: परोक्षधी: च अपरोक्षमति: शोकमोक्ष:-] अज्ञान, आवरण, विक्षेप, परोक्षज्ञान, अपरोक्षज्ञान, शोकापासून सुटका [तथा निरंकुशा तृप्ति:-] व अव्याहत तृप्ति [इति इमा: सप्त अवस्था: चिदाभासस्य सन्ति-] अशा ह्या सात अवस्था चिदाभासाच्या-जीवाच्या आहेत. [तासु इमौ बंधमोक्षौ स्थितौ-] त्यांमध्यें हे बंध व मोक्ष स्थित आहेत. [तत्र तिस्र: बंधकृत: स्मृत:-] त्यांतील तीन बंध करणाऱ्या आहेत, असें शास्त्रकारांनीं म्हटलें आहे.

प्रकाश:- ह्या सातहि अवस्था स्वत: आत्म्याच्या नव्हेत. कारण विकारशून्य आत्म्याच्या ह्या अवस्था आहेत असें जर म्हटलें, तर तोहि विकारी आहे असें म्हणावें लागेल. पण तें शास्त्र व अनुभव यांच्या विरुद्ध आहे. यास्तव त्या चिदाभासाच्या आहेत असें म्हणावें लागतें. या सात अवस्थांचाच बंध व मोक्ष होतो, म्हणजे यांतील अज्ञान, आवरण व विक्षेप ह्या तीन अवस्था बंधरूप व त्यांच्या पुढील चार अवस्था मोक्षरूप आहेत. ॥३३, ३४॥

-पण ह्यांतील तीन अवस्था बंध करणाऱ्या कशा हें दाखविण्यासाठीं क्रमानें त्यांतील प्रत्येकीचें कार्य दाखवून स्वरूपहि सांगावे, म्हणून प्रथम अज्ञानाचें स्वरूप दाखवितात -

न जानामीत्युदासीनव्यवहारस्य कारणम् ।
विचारप्रागभावेन युक्तमज्ञानमीरितम् ॥३५

अन्वयार्थ - [विचारप्रागभावेन युक्तं न जानामि इति उदासीनव्यवहारस्य यत् कारणं-] विचारप्रागभावासह 'मी जाणत नाहीं' अशा उदासीन व्यवहाराचें जें कारण [तत् अज्ञानं इति ईरितम्-] तेंच 'अज्ञान' होय असें सांगितलें आहे.

प्रकाश:- विचाराचा प्रागभाव म्हणजे विचारास सुरुवात होण्याच्या पूर्वींची अवस्था. अर्थात् विचारास सुरुवात करण्याच्या पूर्वी मी जाणत नाहीं असा जो कोणीहि सामान्य मनुष्य आपल्या स्वरूपाविषयीं उदासीन शब्दव्यवहार करीत असतो याचें कारण अज्ञान हेंच आहे. या श्लोकाच्या स्पष्टीकरणार्थ अच्युतरायांनीं आपल्या टीकेंत एक कारिका दिली आहे तिचा अर्थासह येथें निर्देश करणें प्रशस्त वाटतें.

"मम देहो मम प्राणो मम चित्तं च धीर्मम ।
सुखं ममेति यो वेत्ति स कस्त्वमिह नोत्तरम् ॥

अर्थ - "माझा देह, माझा प्राण, माझें चित्त, माझी बुद्धि व माझें सुख असें जो जाणतो त्याला जर "तूं कोण बाबा' असा प्रश्न केला तर उत्तर देतां येत नाहीं.

तात्पर्य, सर्व प्रत्ययांचा स्वप्रकाशरूप व एक असा जो आश्रय त्याचें सामान्यत: मान जरी असलें, तरी तें विशेषत: नसणें हेंच अज्ञानाचें लक्षण होय. यावरून अज्ञान म्हणजे ज्ञानाचा-अभाव नसून अनादि, भावरूप व अपरोक्षज्ञानानें बोधित होणारा असा स्वरूपज्ञानाचा प्रतिबंध होय-हेंहि सहज सिद्ध झालें ॥३५॥

- आवृत्तीचें स्वरूप व कार्य सांगतात -

अमार्गेण विचार्याथ नास्ति नो भाति चेत्यसौ ।

विपरीतव्यवहृतिरावृते: कार्यमिष्यते ॥३६

अन्वयार्थ - [अमार्गेण विचार्य अथ नास्ति च न भाति-] भलत्याच मार्गानें विचार करून नंतर 'आत्मा नाहीं व भासत नाहीं,' [इति असौ विपरीतव्यहृति:-] अशा प्रकारचा जो हा विपरीत व्यवहार [आवृते: कार्यं इष्यते-] तेंच आवरणाचें कार्य मानलेलें आहे.

प्रकाश: - उपनिषदादि आत्मविचारांचीं उत्तम व शास्त्रीय साधने सोडून व बौद्धचार्वाकादि तार्किकांच्या तर्कांचा अवलंब करून जे शुष्क तर्क करितात त्यांस, अभाव, आवरण व असत्त्वावरण यांच्या योगानें देहेंद्रियांहून भिन्न कूटस्थ सच्चिदानंदलक्षण व स्वप्रकाश असा आत्मा नाहींच, कारण तो भासत नाहीं, असें ज्ञान होतें. व त्याप्रमाणें ते नि:शंकपणें बोलून दाखवितात. पण यांतील, त्यांचें अभान व असत्य वाटणें हें दोन प्रकारचें आवरण असून तसा व्यवहार करणें हें त्याचें कार्य आहे. ॥३६॥

- विक्षेपाचें स्वरूप व कार्य सांगतात -

देहद्वयचिदाभासरूपो विक्षेप ईरित: ।
कर्तृत्वाद्यखिल: शोक: संसाराख्योऽस्य बंधक: ॥३७

अन्वयार्थ - [देहद्वयचिदाभासरूप: विक्षेप: ईरित:-] स्थूल व सूक्ष्म या दोन देहांनीं युक्त असा जो चिदाभास तोच विक्षेप होय, असें म्हटलें आहे. [बंधक: संसाराख्य: कर्तृत्वाद्यखिल: शोक: अस्य कार्यं अस्ति-] व बद्ध करणारा आणि संसार हें ज्याला नांव आहे, असा कर्तृत्वादि सर्व शोकच या विक्षेपाचें कार्य आहे.

प्रकाश:- हात, पाय इत्यादिकांनीं युक्त असा हा अन्नमय संज्ञक स्थूल देह व पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें पांच प्राण, मन आणि बुद्धि यांच्या योगानें होणारा सूक्ष्म देह अशा या दोन देहांनीं युक्त असा जो चैतन्याचा आभास तोच अज्ञानाचें दुसरें विक्षेप नामक कार्य होय. आतां या विक्षेपाचें कार्य कोणतें तेंहि सांगतों. जीवाच्या बंधास कारण होणारा असा जो संसारसंज्ञक सर्व प्रकारचा शोक तेंच या चिदाभासरूप विक्षेपाचें कार्य होय. ॥३७॥

-'चिदाभासाच्या सात अवस्था आहेत असें जें तुम्ही पूर्वी श्लोक ३४ मध्यें म्हटलेंत तें अयुक्त आहे, कारण अज्ञान व आवरण विक्षेपोत्पत्तीच्या पूर्वींच स्थित असतात व चिदाभास विक्षेपांत अन्तर्भूत होतो. त्यामुळें त्या त्याच्या अवस्था आहेत, असें म्हणणें योग्य नाहीं' या शंकेचें समाधान.

अज्ञानमावृतिश्चैते विक्षेपात् प्राक्प्रसिध्यत: ।
यद्यप्यथाप्यवस्थे ते विक्षेपस्यैव नात्मन: ॥३८॥

अन्वयार्थ - [यद्यपि अज्ञानं च आवृत्ति: एते विक्षेपात् प्राक् प्रसिध्यत:] जरी अज्ञान व आवृति या दोन अवस्था विक्षेपाच्या पूर्वींच सिद्ध असतात [अथापि ते विक्षेपस्य एव अवस्थे न आत्मन:-] तरी त्या विक्षेपाच्याच अवस्था आहेत; आत्म्याच्या नव्हेत.

प्रकाश:- अज्ञानाचें कार्य दोन प्रकारचें. आवरण व त्याचें कार्य विक्षेप होय. अथवा आवरण व विक्षेप हीं दोन्हीं कार्यें अज्ञानाचींच आहेत असा कांहीं स्थळीं उल्लेख मिळत असल्यामुळें तसें जरी मानलें तरी आवरणावांचून विक्षेपाची उत्पत्ति कधींच होत नसल्यामुळें अज्ञान व आवरण हीं दोन्ही विक्षेपाच्या पूर्वीं असणें युक्त आहे, हें खरें; पण तेवढ्यावरूनच त्या आत्म्याच्या अवस्था आहेत असें म्हणण्याचें धैर्य करितां कामा नये. कारण आत्मा असंग आहे असें शेकडों श्रुति व युक्ति सिद्ध करीत आहेत. यास्तव त्या अवस्था विक्षेपाच्याच आहेत असें म्हणावें लागतें. ॥३८॥

-'अहो पण अवस्थावान् जो विक्षेप तो त्यावेळीं

मुळीं विद्यमानच नसतो. त्यामुळें अज्ञान व आवरण या त्याच्या अवस्था असणें शक्य नाहीं,' अशी आशंका घेऊन सांगतात.

विक्षेपोत्पत्तित: पूर्वमपि विक्षेपसंस्कृति: ।
अस्त्येव तदवस्थात्वमविरुद्धं ततस्तयो: ॥३९

अन्वयार्थ- [विक्षेपोत्पत्तित: पूर्वं अपि विक्षेपसंस्कृति: अस्ति एव-] विक्षेपाच्या उत्पत्तीपूर्वींहि विक्षेपाचा संस्कार आहेच [तत: तयो: तदवस्थात्वं अविरुद्धम्-] त्यामुळें त्या दोन अवस्था त्याच्या आहेत असें म्हणणें विरुद्ध नाहीं.

प्रकाश:- स्थूल व सूक्ष्म देहांनीं युक्त असा हा व्यक्त विक्षेप जरी अज्ञानादिकांचें कार्य आहे, तरी तो व्यक्त होण्यापूर्वीं नव्हता व सांप्रतकालीं नवीन उत्पन्न झाला आहे असें नाहीं. तर तो पूर्वींहि संस्काररूपानें होताच. **शंका:**- पण विक्षेपाप्रमाणें अज्ञान व आवरण हीं संस्काररूपानें नव्हतीं म्हणून तरी कशावरून ? **समाधान:**- तीं नव्हतीं असें आम्हीं कोठें म्हणत आहों, अज्ञानादिकहि पूर्वीं होतींच. पण 'बीज व वृक्ष' या न्यायानें तीं प्रवाहरूपानें अनादि आहेत. व त्यामुळें त्यांच्यामध्यें परस्पर कार्यकारणभाव येऊं शकतो. असंग आत्म्याच्या ह्या सात अवस्था आहेत असें म्हणणें अयुक्त आहे, हे तर आम्हीं पूर्वीं सांगितलें आहे. तस्मात् अज्ञान व आवरण ह्या संस्कारभूत विक्षेपाच्या अवस्था होऊ शकतात ॥३९॥

-'अहो पण अप्रसिद्ध विक्षेपसंस्कार मानून त्याच्या द्वारा अज्ञान व आवरण या विक्षेपाच्या अवस्था आहेत, असें म्हणण्यापेक्षां अधिष्ठानरूपानें प्रसिद्ध असलेल्या ब्रह्माच्या त्या अवस्था आहेत, असें मानणें अधिक सयुक्तिक नव्हे का ?' उत्तर -

ब्रह्मण्यारोपितत्वेन ब्रह्मावस्थे इमे इति ।
न शंकनीयं सर्वासां ब्रह्मण्येवाधिरोपणात् ॥४०

अन्वयार्थ - [ब्रह्मणि आरोपितत्वेन इमे ब्रह्मावस्थे इति न शंकनीयम् -] ब्रह्माच्या ठिकाणीं आरोपित असल्यामुळें ह्या त्याच्या अवस्था आहेत अशी शंका घेऊं नये, [कृत: ब्रह्मणि सर्वासां एव अधिरोपणात् -] कारण ब्रह्माच्या ठिकाणीं सर्वच अवस्थांचा अध्यारोप झालेला आहे.

प्रकाश:- अज्ञान व आवरण या दोन अवस्था ब्रह्माच्या ठायीं आरोपित आहेत. यास्तव 'त्या त्याच्याच आहेत' असें म्हणण्यास काय हरकत आहे ? असें जर तूं म्हणशील तर आम्ही तुला उलट असें विचारूं कीं विक्षेपादि पुढील पांच अवस्थाहि ब्रह्माच्याच ठायीं आरोपित आहेत. तेव्हां त्याहि त्याच्याच अवस्था आहेत, असें तरी कां म्हणूं नये ? व असें झाल्यावर परोक्ष व अपरोक्ष ज्ञान, शोक व मोक्ष, तृप्ति इत्यादि सर्व भाव ब्रह्माचेच होणार व त्यामुळें जीवाकरितां एकहि अवस्था राहणार नाहीं. तसेंच हा सर्व प्रकार श्रुति व अनुभव यांच्या विरुद्ध आहे. ॥४०॥

-'अहो पण सर्वच अवस्था ब्रह्मावर आरोपित जरी असल्या तरी विक्षेपाची उत्पत्ति झाल्यानंतर प्रतीत होणाऱ्या संसारित्वादि अवस्था जीवाच्या आहेत, असा अनुभव येतो. त्यामुळें त्या ब्रह्माच्या अवस्था नव्हेत,' अशी शंका घेऊन 'तर मग त्याच न्यायानें अज्ञान व आवरणहि जीवाच्या आश्रयानेंच प्रतीत होत असल्यामुळें त्या ब्रह्मावस्था नव्हेत,' असें सांगतात -

संसार्यहं विबुद्धोऽहं नि:शोकस्तुष्ट इत्यपि ।
जीवगा उत्तरावस्था भान्ति न ब्रह्मगा यदि ॥४१
तर्ह्यज्ञोऽहं ब्रह्मसत्त्वभाने मद्दृष्टितो न हि ।
इति पूर्वे अवस्थे च भासेते जीवगे खलु ॥४२

अन्वयार्थ - [यद्यपि अहं संसारी, अहं विबुद्ध:, अहं नि:शोक:, अहं तुष्ट:, इति उत्तरावस्था: जीवगा: भान्ति न ब्रह्मगा:-] जरी मी संसारी, मी ज्ञानी, मी सुखी व मी तृप्त,. अशा ह्या पुढच्या अवस्था

जीवाच्या ठिकाणीं भासतात व ब्रह्माच्या ठिकाणीं भासत नाहींत, [तर्हिं अहं अज्ञः मद्दृष्टितः ब्रह्मसत्त्वभाने न हि-] तरी मी अज्ञ आहें, माझ्या दृष्टीनें ब्रह्माचें सत्त्व व भान होत नाहीं, [इति पूर्वे अवस्थे खलु जीवगे भासेते-] अशा पूर्वींच्या दोन अवस्थाहि जीवाच्या ठिकाणीं भासतात.

प्रकाशः- ह्यांतील पहिल्या श्लोकांत शंकेचा अनुवाद करून दुसऱ्यांत तिचें सदोषत्व दाखविलें आहे. संसारी- कर्तृत्वादि धर्मवान्. विबुद्धः- तत्त्वसाक्षात्कार-वान्. निःशोकः- परोक्ष ज्ञानानें होणाऱ्या शोकाच्या क्षयानें युक्त. तुष्टः- संतोषवान्; ह्या विक्षेपाच्या पुढील चार अवस्था जीवाच्या आहेत. कारण याला स्वानुभव हेंच प्रबल प्रमाण आहे. व यथार्थ अनुभवापेक्षां दुसरें कोणतेंहि प्रमाण प्रबल नसतें, असें तुम्हांसहि मान्य आहे. तेव्हां सर्व अवस्था ब्रह्माच्या ठिकाणीं जरी आरोपित असल्या तरी ह्या पुढच्या अवस्था जीवाच्या आहेत, असें स्पष्ट दिसतें व त्यामुळें ह्या ब्रह्माच्या नव्हेत व 'पहिल्या दोन अवस्थाहि जीवाच्या आहेत' असें मानण्यास कांहीं प्रबल प्रमाण नसल्यामुळें ह्या ब्रह्माच्या आहेत, असें जरी म्हटलें तरी तें बरोबर नव्हे. कारण, 'मी अज्ञ आहें' 'ब्रह्म आहे व तें भासतें' असें निदान मला तरी वाटत नाहीं. असेंहि जीव स्वानुभवानें सांगत असतो व त्यामुळें ह्या जीवगत अवस्था आहेत असेंहि स्पष्ट होतें. तात्पर्य ब्रह्माच्या ठिकाणीं आरोपित असल्यामुळें पहिल्या दोन अवस्था त्याच्या आहेत व बाकीच्या जीवाच्या आहेत, हें म्हणणें निष्फल होय. ॥४१, ४२॥

- 'तर मग सर्वज्ञात्ममुनीश्वरांनीं संक्षेपशारीरकांत 'ब्रह्म अज्ञानाचे आश्रयस्थान आहे' असे कसें म्हटलें आहे ?' उत्तर -

अज्ञानस्याश्रयो ब्रह्मेत्यधिष्ठानतया जगुः ।
जीवावस्थात्वमज्ञानाभिमानित्वादवादिषम् ॥४३

अन्वयार्थ - [ते 'अज्ञानस्य आश्रयः ब्रह्म' इति अधिष्ठानतया जगुः-] पूर्वींच्या आचार्यांनीं 'अज्ञानाचा आश्रय ब्रह्म आहे' असें जें म्हटलें आहे, तें ब्रह्म त्याचें अधिष्ठान असल्यामुळें म्हटलें आहे. [किंतु अहं अत्र अज्ञानाभिमानित्वात् अज्ञानस्य जीवावस्थात्वं अवादिषम्-] पण मी येथें जीव अज्ञानाचा अभिमान बाळगीत असल्यामुळें अज्ञान ही त्याची अवस्था आहे, असें म्हटलें आहे.

प्रकाशः- संक्षेपशारीरककार व इतरहि आचार्य यांचें म्हणणें मला अक्षरशः मान्य आहे. व त्यामुळें मी त्यांच्या विरुद्ध असें येथें कांहीं एक सांगितलेलें नाहीं. कारण अज्ञानाचा आश्रय ब्रह्म आहे, असें त्यांनीं म्हटलें आहे. व अज्ञान ही जीवाची अवस्था आहे, असें मी म्हटलें आहे. सर्व प्रपंचाचें अधिष्ठान ब्रह्म असल्यामुळें त्यांचें म्हणणें जसें युक्त आहे, तसेंच ब्रह्म विकारशून्य असल्यामुळें व मी अज्ञ आहे असा प्रत्येकाचा यथार्थ अनुभव असल्यामुळें 'मी कर्ता आहें' इत्यादिकाप्रमाणें अज्ञानादि सर्वहि त्याच्याच अवस्था आहेत. असें जें माझें म्हणणें आहें, तेंहि युक्तच आहे; शिवाय चाळीसाव्या श्लोकाच्या चवथ्या चरणांत मी त्यांच्या म्हणण्याचा अक्षरशः स्वीकार केला आहे, हें लक्षांत आणलें कीं त्यांच्या व माझ्या प्रतिपादनांत मुळींच विरोध नाहीं, असें सहज समजेल. ॥४३॥

-ह्याप्रमाणें बंधाला कारण होणाऱ्या तीन अवस्था दाखवून अविशिष्ट राहिलेल्या चार अवस्थांपैकीं पूर्वोक्त अज्ञान व आवरण यांच्या निवृत्तिद्वारा मोक्षाला कारण होणाऱ्या पुढील दोन अवस्थांचें प्रतिपादन करितात -

ज्ञानद्वयेन नष्टेऽस्मिन्नज्ञाने तत्कृतावृतिः ।
न भाति नास्ति चेत्येषा द्विविधाऽपि विनश्यति ॥४४

अन्वयार्थ - [ज्ञानद्वयेन अस्मिन् अज्ञाने नष्टे सति -] दोन प्रकारच्या ज्ञानानें हें अज्ञान नष्ट झालें असतां ['न भाति च न अस्ति' इति एषा द्विविधा

अपि तत्कृता आवृति: विनश्यति-] 'भासत नाहीं व नाहीं' असें हें दोन्हीं प्रकारचें अज्ञानानें केलेलें आवरण नष्ट होतें.

प्रकाश:- परोक्ष व अपरोक्ष असें दोन प्रकारचें ज्ञान आहे आणि पहिल्या ज्ञानानें 'असत्त्वावरण' व दुसऱ्या ज्ञानानें 'अभानावरण' नष्ट होत असतें असें मीं पूर्वीं सांगितलें आहे. व पुढच्या श्लोकांत स्वत: ग्रंथकार सांगणार आहेत. पण येथें अगोदर ज्ञानानें अज्ञानाचा नाश व नंतर आवरणरूपी त्यांच्या कार्याचा नाश अशी परंपरा मात्र सुचविली आहे. कारणांचा नाश झाला असतां कार्याचा नाश होणें ही न्यायसिद्ध गोष्ट होय. ॥४४॥

--आतां कोणत्या ज्ञानानें कोणत्या आवरणाची निवृत्ति होते, तें सांगतात -

परोक्षज्ञानतो नश्येदसत्त्वावृतिहेतुता ।
अपरोक्षज्ञाननाश्या ह्यभानावृतिहेतुता ॥४५

अन्वयार्थ -[परोक्षज्ञानत: असत्त्वावृतिहेतुता नश्येत् -] परोक्षज्ञानाच्या योगानें असत्त्वावरणाच्या कारणाचा नाश होतो. [हि अभानावृतिहेतुता अपरोक्षज्ञाननाश्या अस्ति -] व अभानावरणाचें कारण अपरोक्ष ज्ञानाच्या योगानें नाश पावणारें आहे.

प्रकाश:- अनेक जन्मार्जित सुकृताच्या योगानें सुबुद्धी होऊन जेव्हां प्राणी योग्य गुरूंच्या द्वारा शास्त्रांचा अभ्यास करूं लागतो; तेव्हां त्याला प्रथम 'कूटस्थ आत्मा आहे' असें ज्ञान होतें व त्याच्या योगानें तो नाहीं असें जें विचारापूर्वीं वाटत असतें, त्याच्या कारणाचा नाश होतो व पुढें निश्चयानें अभ्यास चालवून श्रवणादिकांच्या योगानें जेव्हां आत्मसाक्षात्कार होतो, तेव्हां "भासत नाहीं" या अभानावरणाच्या कारणाचा बोध होतो. तेव्हां केवल कार्याचा नाश होणें हा अत्यंत नाश नव्हे. तर कोणत्याहि वस्तूचा कारणासह जेव्हां नाश होतो, तेव्हां तिचा 'अत्यंत नाश' झाला असें म्हणतात, यास्तव केवल आवरणाचा नाश होतो असें न सांगतां त्याच्या कारणाचा नाश होतो असें म्हटलें आहे. व कारणाच्या नाशानंतर कार्यनाश म्हणून कांहीं रहात नाहीं. ॥४५॥

-आतां ज्ञानाच्या फलरूप दोन अवस्थांतील पहिली अवस्था सांगतात -

अभानावरणे नष्टे जीवत्वारोपसंक्षयात् ।
कर्तृत्वाद्यखिल: शोक: संसाराख्यो निवर्तते ॥४६

अन्वयार्थ - [अभानावरणे नष्टे -] अभानावरण नष्ट झालें असतां [जीवत्वारोपसंक्षयात् -] जीवत्वरूप आरोपाचा क्षय होत असल्यामुळें [संसाराख्य: कर्तृत्वाद्यखिल: शोक: निवर्तते-] संसारनामक कर्तृत्वादिरूप सर्व शोक निवृत्त होतो.

प्रकाश:- ज्ञानाच्या योगानें अज्ञानाचा बाध झाला असतां त्याच्या कार्याचा नाश होतो. त्याच्या अभानावरणरूप कार्याचा नाश झाला असतां मिथ्या प्रतीत होणारा जीवभाव जातो व त्याची निवृत्ति झाल्यामुळें सर्व शोक नाहींसा होतो. असें याचें तात्पर्य समजावें. ॥४६॥

-याप्रमाणें शोकापगमरूप अवस्था दाखवून 'निरंकुशतृप्ति' या नांवाची दुसरी अवस्था दाखवितात-

निवृत्ते सर्वसंसारे नित्यमुक्तत्वभासनात् ।
निरंकुशा भवेत्तृप्ति: पुन: शोकासमुद्भवात् ॥४७

अन्वयार्थ- [सर्वसंसारे निवृत्ते सति-] सर्व संसाराची निवृत्ति झाली असतां [नित्यमुक्तत्व-भासनात्-] नित्यमुक्तत्वाची प्रतीति येत असल्यामुळें [च पुन: शोकासमुद्भवात्-] व पुनरपि शोकाची उत्पत्ति होत नसल्यामुळें [निरंकुशा तृप्ति:

भवेत्-] अव्याहत तृप्ति होते.

प्रकाश:- पूर्वोक्त शोकाची निवृत्ति होतांच भाग्यवान् साधकास तात्काल नित्यमुक्तीचा लाभ होतो, व कारणासह शोकाची निवृत्ति झालेली असल्यामुळे त्यास तृप्ति प्राप्त होते. विषयांच्या भोगांपासून होणाऱ्या तृप्तीप्रमाणें ही तृप्ति इंद्रियजन्य नसल्यामुळें तिला पुन: कधींहि व कोणीहि प्रतिबंध करीत नाहीं. ॥४७॥

-अहोपण 'आत्मानं चेत् विजानीयात्०' या मंत्राचें व्याख्यान करण्यास तुम्ही प्रवृत्त झाला आहात. पण ते सोडून मध्येंच अज्ञानादि सात अवस्थांचें निरूपण करणें, अयोग्य आहे. तें प्रकृत विषयाशीं असंगत आहे' अशी आशंका घेऊन 'प्रस्तुत श्रुतीच्या तात्पर्यनिरूपणाचें अंग, या रूपानें अज्ञानादि अवस्थांचें निरूपण केलेलें असल्यामुळें तें प्रकृतासंगत नाहीं,' अशा आशयानें श्रुतीचें तात्पर्य सांगतात-

अपरोक्षज्ञानशोकनिवृत्त्याख्ये उभे इमे ।
अवस्थे जीवगे ब्रूत आत्मानं चेदिति श्रुति: ॥४८

अन्वयार्थ- ['आत्मानं चेत्' इति श्रुति:-] 'आत्मानं चेत्०' ही श्रुति [अपरोक्षज्ञानशोक-निवृत्त्याख्ये इमे उभे अवस्थे जीवगे ब्रूते-] अपरोक्ष ज्ञान व शोकनिवृत्ति या नांवाच्या या दोन्हीं अवस्था जीवाच्या आहेत, असें सांगते.

प्रकाश:- पूर्वोक्त सात अवस्थांतील पांचवी व सहावी अवस्था जीवगत आहे, हें या श्रुतीनें 'अयम-स्मीति' व 'शरीरमनुसंज्वरेत्' या दोन वाक्यांनीं सांगितलें आहे. अर्थात् हा मंत्र या दोन अवस्थांचें प्रतिपादन करण्याकरितांच प्रवृत्त झाला आहे. ॥४८॥

-'अहोपण, 'अयमित्यपरोक्षत्वं०'-२१ या श्लोकांत 'अयं-' पदानें आत्म्याचें अपरोक्षत्व सांगितलें जातें, असें तुम्हीं म्हटलें आहे. तेव्हां अर्थात् आत्मा अपरोक्ष ज्ञानाचा विषय आहे, परोक्ष ज्ञानाचा नव्हे,' अशी आशंका घेऊन अपरोक्ष ज्ञानाचें उपपादन करण्यासाठीं त्याचा विभाग दाखवितात-

अयमित्यपरोक्षत्वमुक्तं तद्द्विविधं भवेत् ।
विषयस्वप्रकाशत्वाद्धियाऽप्येवं तदीक्षणात् ॥४९

अन्वयार्थ - [अयं इति यत् अपरोक्षत्वं उक्तं-] 'हा' असें जें अपरोक्षत्व सांगितलेलें आहे [तत् विषयत्वप्रकाशत्वात्-] तें, चिद्रूपविषय स्वप्रकाश असल्यामुळें [च धिया अपि एवं तदीक्षणात्-] व बुद्धीच्या योगानेंहि त्याचें स्वप्रकाशरूपानें ज्ञान होत असल्यामुळें [द्विविधं भवेत्-] दोन प्रकारचें आहे.

प्रकाश:- 'हा' या अपरोक्ष ज्ञानाचा विषय चिद्रूप आत्मा असल्यामुळें व तो स्वप्रकाश म्हणजे आपल्या व्यवहाराकरिता अन्य साधनांची अपेक्षा न ठेवणारा असल्यामुळें आणि बुद्धीहि त्याचें स्वप्रकाशरूपानें ग्रहण करीत असल्यामुळें हें अपरोक्षत्व दोन प्रकारचें आहे. ॥४९॥

-अपरोक्ष ज्ञान असें दोन प्रकारचें असो; पण त्याचा परोक्ष ज्ञानाच्या विषयत्वाशीं काय संबंध ? उत्तर -

परोक्षज्ञानकालेऽपि विषयस्वप्रकाशता ।
समा ब्रह्मस्वप्रकाशमस्तीत्येवं विबोधनात् ॥५०

अन्वयार्थ - [परोक्षज्ञानकाले अपि-] अपरोक्ष ज्ञानाचे वेळीं जशी, तशीच परोक्ष ज्ञानाचे वेळींहि [विषयस्वप्रकाशता समा-] विषयाची म्ह० ब्रह्माची स्वप्रकाशता एकसारखीच आहे. कारण [ब्रह्म स्वप्रकाशं अस्ति इति-एवं विबोधनात्-] ब्रह्म स्वप्रकाश आहे, असाच त्या परोक्षज्ञानकालींहि त्याचा विशेष बोध झालेला असतो.

प्रकाश:- स्वप्रकाशता हा जो ब्रह्माचा स्वरूपभूत धर्म आहे, तो नित्य असल्यामुळें कोणत्याहि अवस्थेमध्यें त्याचा लोप होत नाहीं. व त्यामुळें तें नित्य अपरोक्षच आहे. पण-प्रतिबंधामुळें तसें भान न होतां जीवास 'ब्रह्म आहे' असें गुरु व शास्त्र यांच्या द्वारा समजणें हें परोक्ष ज्ञान व त्याचा साक्षात्कार होणें हें

अपरोक्ष ज्ञान होय-असें व्यवहारांत म्हणण्याचा परिपाठ आहे, असा या श्लोकाचा भावार्थ दिसतो. ॥५०॥

-'अहोपण, प्रत्यगभिन्न ब्रह्म हा ज्याचा विषय आहे त्या ज्ञानाला परोक्षत्व कोठचें ?' उत्तर -

अहं ब्रह्मेत्यनुल्लिख्य ब्रह्मास्तीत्येवमुल्लिखेत् । परोक्षज्ञानमेतन्न भ्रांतं बाधानिरूपणात् ॥५१

अन्वयार्थ - ['अहं ब्रह्म' इति अनुल्लिख्य-] **मी ब्रह्म आहें, असा साक्षात् अनुभव न घेतां [ब्रह्म अस्ति इति एवं उल्लिखेत्-] ब्रह्म आहे असे उल्लेखज्ञान होतें. [एतत् परोक्षज्ञानं-] हें परोक्ष ज्ञान आहे. [भ्रान्तं न-] हें भ्रान्त-भ्रमात्मक ज्ञान आहे, असें म्हणतां येत नाहीं. [बाधानिरूपणात्-] कारण त्याचा बाध होत असल्याचा अनुभव येत नाहीं.**

प्रकाश:- परोक्ष ज्ञानानें 'मी ब्रह्म आहें' असा बोध होत नाहीं, हें जरी खरें आहे, तरी 'ब्रह्म आहे' असा बोध होतोच. व हें जें ज्ञान आहे, तें भ्रामक आहे असेंहि म्हणतां येणार नाहीं. कारण हें भ्रामक आहे असें जर कोणी म्हणूं लागला, तर त्याला आम्ही असें विचारूं कीं तूं याला भ्रामक कां म्हणतोस ? त्याचा बाध होत असतो म्हणून, कीं त्याचा प्रत्यय येत नाहीं म्हणून, कीं साक्षात् ज्ञानास योग्य असलेल्या वस्तूचें परोक्ष ज्ञान झालें म्हणून, कीं त्याच्या कांहीं भागाचें ग्रहण होत नाहीं म्हणून ? यांतील प्रथम पक्ष तर संभवतच नाहीं कारण 'ब्रह्म आहे' या ज्ञानाचा, दीर्घकाल विचार केल्यानंतरहि बाध होत असल्याचें कोणाच्या प्रत्ययास येत नाहीं. अर्थात् बाध होत असल्यामुळें हें ज्ञान भ्रामक आहे, असें कोणासहि म्हणतां येणार नाहीं. ॥५१॥

ब्रह्म नास्तीति मानं चेत्स्याद्बाध्येत तदा ध्रुवम् । न चैवं प्रबलं मानं पश्यामोऽतो न बाध्यते ॥५२

अन्वयार्थ - ['ब्रह्म नास्ति' इति मानं स्यात् चेत्-] **'ब्रह्म नाहीं' असें जर कांहीं प्रमाण असत [तदा ध्रुवं बाध्येत-] तर त्याचा खचित बाध झाला असता [च एवं प्रबलं मानं न पश्याम:-] पण अशा प्रकारचें प्रबल प्रमाण आम्हांला दिसत नाहीं. [अत: न बाध्यते-] यास्तव त्याचा बाध होत नाहीं.**

-'परोक्षज्ञानांत त्याच्या विषयाचा साक्षात् प्रत्यय येत नसल्यामुळे तें भ्रामक आहे' म्हणून म्हणाल तर सांगतों-

व्यक्त्यनुल्लेखमात्रेण भ्रमत्वे स्वर्गधीरपि । भ्रांति:स्याद्व्यक्त्यनुल्लेखात्सामान्योल्लेखदर्शनात् ॥५३

अन्वयार्थ - [व्यक्त्यनुल्लेखमात्रेण भ्रमत्वे-] **पदार्थाचें प्रत्यक्ष ज्ञान होत नाहीं एवढ्याचवरून जर परोक्षज्ञानाला भ्रम म्हणत असाल तर [स्वर्गधी: अपि व्यक्त्यनुल्लेखात् सामान्योल्लेखदर्शनात् भ्रांति: स्यात्-] स्वर्गबुद्धिसुद्धां व्यक्तीचा उल्लेख होत नसल्यामुळें व सामान्य उल्लेख होत असल्यामुळें भ्रम होऊं लागेल.**

प्रकाश:- प्रत्यक्ष प्रत्यय येत नसल्यामुळें परोक्ष ज्ञान भ्रम आहे असें जर म्हटलें तर 'स्वर्ग आहे'हें ज्ञानहि भ्रम आहे असें म्हणावें लागेल. कारण स्वर्गाचेंहि ज्ञान होत नसतें व वेदवाक्यावरून त्याचें सामान्य ज्ञान मात्र झाल्याचें दिसतें. परंतु स्वर्गज्ञानास भ्रम म्हणणें म्हणजे वेदाचें प्रामाण्यच नाकारण्यासारखें असल्यामुळें परोक्षज्ञान भ्रम आहे, असें म्हणणें म्हणजे साहस करणेंच होय. ॥५३॥

-'अपरोक्षज्ञानाला योग्य असलेल्या पदार्थाचें परोक्ष ज्ञान होणें हा भ्रम आहे,' म्हणून म्हणाल तर सांगतों-

अपरोक्षत्वयोग्यस्य न परीक्षमतिर्भ्रम: परोक्षमित्यनुल्लेखादर्थात्पारोक्ष्यसंभवात् ॥५४

अन्वयार्थ - [अपरोक्षत्वयोग्यस्य परोक्षमति: भ्रम: न-] साक्षात् ज्ञानास योग्य असलेल्या पदार्थाचें परोक्षज्ञान होणें हा भ्रम नव्हे. [कुत:- ब्रह्म परोक्षं इति अनुल्लेखात्-] कारण, 'ब्रह्म परोक्ष आहे' असा प्रत्यय कधींच येत नाहीं, [अर्थात् पारोक्ष्यसंभवात्-] 'हें ब्रह्म' असा साक्षात्कार होत नसल्यामुळें अर्थात् त्याची परोक्षता संभवते.

प्रकाश:- अपरोक्षज्ञानास योग्य असलेल्या वस्तूचें परोक्ष ज्ञान झाल्यामुळें तो भ्रम आहे असें जर म्हणावें तर तेंहि बरोबर नाहीं. कारण परोक्ष ज्ञान अपरोक्ष ज्ञानाचें कारण आहे असें आम्ही पूर्वींच सांगितलें आहे. शिवाय स्वर्गाप्रमाणें ब्रह्म परोक्ष आहे; त्याचा इहलोकीं साक्षात्कार होण्यासारखा नाहीं. असें जर परोक्ष ज्ञानामुळें वाटलें असतें तर ती विपरीत भावना असल्यामुळें 'तो भ्रम आहे' असें आम्ही कबूल केलें असतें. पण 'ब्रह्म आहे' असें जें प्रथम केवल शाब्दिक ज्ञान होत असतें, त्यांत आत्माच ब्रह्म आहे असा साक्षात्कार होत नसल्यामुळें व तशा प्रकारच्या साक्षात्काराची ब्रह्मामध्यें योग्यता असल्यामुळें अर्थात् तें ज्ञान परोक्ष आहे व त्याचें पुढें अपरोक्ष ज्ञानामध्यें पर्यवसान होणारें असल्यामुळें तो भ्रमहि नव्हे ही गोष्ट सिद्ध होते. ॥५४॥

-आता 'अंशाचें ग्रहण न केल्यामुळें तें भ्रमज्ञान आहे' अशी शंका घेऊन तिचें निरसन-

अंशागृहीतेर्भ्रांतिश्चेद् घटज्ञानं भ्रमो भवेत् ।
निरंशस्यापि सांशत्वं व्यावर्त्यांशविभेदत: ॥५५

अन्वयार्थ- [अंशागृहीते: भ्रांति: इति चेत्-] कांहीं अंशाचें ग्रहण होत नसल्यामुळें परोक्षज्ञान भ्रम आहे, असें जर म्हटलें तर [घटज्ञानं अपि भ्रम: भवेत्-] घटज्ञानहि भ्रम होईल [व्यावर्त्यांश-विभेदत:-] पण व्यावर्त्य जी उपाधि तिच्या अंशामुळें स्वरूपांत भेद पडत असल्यामुळें [निरंशस्य अपि सांशत्वं भवेत्-] निरंश ब्रह्माचे ठिकाणींहि अंशयुक्तता येते.

प्रकाश:- आतां ब्रह्म आहे या शाब्दिक ज्ञानांत ब्रह्माच्या अंशाचें जरी ग्रहण होत असलें, तरी त्यांत प्रत्यगात्म्याच्या अंशाचें ग्रहण होत नाहीं. म्हणून तो भ्रम आहे असें जर म्हटलें तर ज्या वेळीं आपण एकादा घट पाहतों, किंवा असाच दुसरा एकादा पदार्थ पाहतों, त्या वेळीं त्याच्या एका बाजूचेंच किंवा बाहेरच्या भागाचेंच प्रत्यक्ष ज्ञान होतें, तेव्हां अंशाचें ग्रहण न होणें हें कारण अशा ज्ञानामध्येंहि असल्यामुळें तोहि भ्रम होय असें म्हणावें लागेल. यास्तव कांहीं अंशाचें ग्रहण होत नाहीं म्हणून तें ज्ञान भ्रम आहे हें म्हणणें अयुक्तिक होय.

शंका:- अहो पण घटादि पदार्थ सावयव असल्यामुळें त्यांच्या कांहीं अंशाचें ग्रहण होणे व कांहींचें न होणें ही गोष्ट संभवते. परंतु तुमचें ब्रह्म तर निरवयव आहे, तेव्हां त्याच्या अंशाचें अग्रहण होणें शक्य नाहीं.

समाधान:- परमार्थत: ब्रह्म निरंश आहे हें खरें पण ज्यांचा निषेध कर्तव्य आहे, अशा उपाधींच्या अंशामुळें त्याच्या ठायीं प्रातिभासिक सांशत्वहि येतें. ॥५५॥

-पूर्व श्लोकांत सुचविलेले दोन व्यावर्त्य अंश कोणते ते आतां सांगतात -

असत्त्वांशो निवर्तेत परोक्षज्ञानतस्तथा ।
अभानांशनिवृत्ति: स्यादपरोक्षधिया कृता ॥५६

अन्वयार्थ - [परोक्षज्ञानत: असत्त्वांश: निवर्तेत-] परोक्षज्ञानाच्या योगानें असत्त्वांशाची निवृत्ति होते [तथा अभानांशनिवृत्ति: अपरोक्षधिया कृता स्यात्-] व त्याचप्रमाणें अभानांशाची निवृत्ति अपरोक्ष ज्ञानाच्या योगानें होते.

अपरोक्ष ज्ञानाला योग्य असलेल्या पदार्थाचें

परोक्षज्ञान हा भ्रम नव्हे, हें दृष्टान्तानें दृढ करितात-

दशमोऽस्तीति विभ्रांतं परोक्षज्ञानमीक्ष्यते ।
ब्रह्मास्तीत्यपि तद्वत्स्यादज्ञानावरणं समम् ।।५७

अन्वयार्थ - [यथा 'दशम: अस्ति' इति परोक्षज्ञानं विभ्रान्तं ईक्ष्यते-] ज्याप्रमाणें 'दहावा आहे' हें परोक्षज्ञान भ्रांतिरहित आहे असें समजतात
[तद्वत् ब्रह्म अस्ति इति अपि स्यात्-] त्याचप्रमाणें ब्रह्म आहे हेंहि ज्ञान भ्रमशून्य होय. [अज्ञानावरणं, तु समम्-] कारण अज्ञानकृत आवरण दोन्हीं ठिकाणीं सारखेंच असते.

प्रकाश:- 'दहावा आहे' या आप्तानें उच्चारलेल्या वाक्यावरून होणारें परोक्षज्ञान भ्रम आहे, असें कोणीहि समजत नाहीं. हेंचसें काय, पण एकाद्याची जर कांहीं वस्तु सांडली असली व तो अति कष्टी होऊन तिच्याकरितां सर्व घर हुडकीत असला आणि इतक्यांत कोणी विश्वासास पात्र असलेल्या मनुष्यानें तुमची ती वस्तु आहे, असें सांगितलें, तर त्याच्यावरून होणारें वस्तूच्या अस्तित्वाविषयींचें ज्ञान भ्रम आहे असें तो मुळींच समजत नाहीं. तर उलट मोठ्या उत्कंठेनें 'कोठें आहे ?' असें विचारतो. ब्रह्म आहे, या ज्ञानाचाहि असाच प्रकार आहे. कारण अज्ञानामुळें पडलेलें असत्त्वावरण दोन्हीं ठिकाणीं सारखेच असून त्याची निवृत्ति करणें एवढेंच परोक्षज्ञानाचें काम असतें. ।।५७।।

-'अहोपण, वाक्यावरून जर परोक्षज्ञानच होत असेल तर अपरोक्ष ज्ञान कसें होणार' अशी शंका घेऊन विचार केल्यानें अपरोक्षज्ञानहि होतें, असें आतां दृष्टान्त देऊन सांगतात-

आत्मा ब्रह्मेति वाक्यार्थे नि:शेषेण विचारिते ।
व्यक्तिरुल्लिख्यते यद्वत् दशमस्त्वमसीत्यत: ।।५८

अन्वयार्थ- [यद्वत् दशम: त्वं असि इति अत:-] याप्रमाणें 'तूं दहावा आहेस' या वाक्यावरून दहाव्या पुरुषाचा साक्षात्कार होतो; [तद्वत् 'आत्मा ब्रह्म' इति वाक्यार्थ नि:शेषेण विचारिते सति-] त्याप्रमाणें 'आत्मा ब्रह्म आहे' या वाक्याच्या अर्थाचा पूर्णपणें विचार केला असतां [व्यक्ति: उल्लिख्यते-] याचा साक्षात्कार होतो.

प्रकाश:- तूं दहावा आहेस या वाक्यावरून आपल्या दशमत्वाचा जसा दहाव्याकरितां रडणाऱ्यास प्रत्यक्ष बोध होतो, त्याप्रमाणेंच गुरूंच्या मुखानें व शास्त्रद्वारा 'हा आत्मा ब्रह्म आहे' असें वाक्य ऐकून त्याच्या मुख्य अर्थाचा युक्तिप्रयुक्तीनें विचार केल्यावर 'मीच ब्रह्म आहें' असें साधकास साक्षात् ज्ञान होतें. म्हणजे प्रथम श्रवणद्वारा परोक्ष ज्ञान, नंतर मननानें निश्चय व निदिध्यासनानें साक्षात्कार हा वेदसिद्धान्त अबाधित ठरला. ।।५८।।

-विचारयुक्त वाक्यापासून अपरोक्ष ज्ञान कसें होतें, तें दाखवितात-

दशम: क इति प्रश्ने त्वमेवेति निराकृते ।
गणयित्वा स्वेन सह स्वमेव दशमं स्मरेत् ।।५९

अन्वयार्थ- [दशम: क: ? इति प्रश्ने-] दहावा कोण ? असा प्रश्न केला असतां, [त्वं एव इति निराकृते सति -] व तूंच असें उत्तर मिळालें असतां [स्वेन सह गणयित्वा-] आपल्यासह मोजून [स्वं एव दशमं स्मरेत्] मीच दहावा असें त्यास स्मरण होतें.

प्रकाश:- कोणीं करुणेनें 'तुमच्यांतील दहावा आहे. उगीच शोक करू नको' असें सांगितलें असतां 'कोठें आहे ?' असा सहजच तो प्रश्न करितो व या प्रश्नाचें यथार्थ उत्तर देण्यासाठीं 'तूंच दहावा आहेस' असें तो कारुणिक म्हणतो. हें त्यावें उत्तर ऐकून आश्चर्यचकित झालेला तो भ्रमिष्ट आपल्यासह इतरांस मोजतो. व शेवटीं 'अरे, दहावा तर मीच आहें' असें हंसत हंसत म्हणतो. म्हणजे त्याला आपल्या दहावेपणाचें जें विस्मरण झालें होतें, तें नाहीसें होतें. ।।५९।।

-'मी दहावा आहें' हें ज्ञान विचारसहित

वाक्यापासून झालेलें असल्यामुळें विपरीत ज्ञान नव्हे; असें सांगतात-

दशमोऽस्मीति वाक्योत्था न धीरस्य विहन्यते
आदिमध्यावसानेषु न नवत्वस्य संशय: ।।६०

अन्वयार्थ- [अस्य दशम: अस्मि इति वाक्योत्था धी: न विहन्यते-] या दहाव्याची 'तूंच दहावा आहेस' या वाक्यापासून झालेली 'मी दहावा आहें' ही बुद्धि कधींहि बाधित होत नाहीं. [आदिमध्यावसानेषु नवत्वस्य संशय: न-] मोजतांना आरंभापासून, मधून किंवा शेवटापासून जरी गणना केली तरी 'मी दहावा आहें कीं नाहीं' असा संशय त्याला येत नाहीं.

प्रकाश:- ज्याला पूर्वोक्त वाक्यापासून आपल्या दहावेपणाविषयीं नि:संशय ज्ञान झालें आहे, त्यास इतरांची गणना करीत असतां मी नववा आहें असा कधींच संशय येत नाहीं. व त्यामुळें वाक्यश्रवणानें होणारें ज्ञान केव्हांहि मिथ्या ठरत नाहीं, तेव्हां तो भ्रम आहे, असें कसें म्हणतां येईल ? ।।६०।।

या सर्वांची दार्ष्टांतिकाचे ठायीं योजना करितात-

सदेवेत्यादिवाक्येन ब्रह्मसत्त्वं परोक्षत: ।
गृहीत्वा तत्त्वमस्यादिवाक्याद्व्यक्तिं
समुल्लिखेत् ।।६१ ।।

अन्वयार्थ- ['सत् एव सोम्य' इत्यादिवाक्येन परोक्षत: ब्रह्मसत्त्वं गृहीत्वा-] 'सत् मात्र पूर्वी होतें' इत्यादि वाक्याच्या योगानें परोक्षपणें ब्रह्माचें सत्त्व जाणून ['तत्त्वमसि- आदिवाक्यात् व्यक्तिं समुल्लिखेत्-] 'तत्त्वमसि-' म्ह० तें तूं आहेस या वाक्यावरून 'तेंच सत् मी आहें' असा साक्षात्कार करावा. ('सदेव सोम्य०' या वाक्यावरून ब्रह्माच्या अस्तित्वाविषयीं प्रथम निश्चय करून 'तेंच पुढें जीवरूपानें शरीरांत प्रविष्ट झालें' इत्यादि युक्तींच्या पर्यालोचनानें ते सद्रूप ब्रह्मच प्रत्यगात्मा आहे, अशी संभावना करावी व शेवटीं 'तत्त्वमसि-' तें सद्रूप ब्रह्मच तूं आहेस, या वाक्यावरून अद्वितीय ब्रह्मरूप आत्म्यालाच 'मी ब्रह्म आहें' असें साक्षात् जाणावें.)

प्रकाश:- 'सदैव सोम्य' इत्यादि उद्दालक नामक पित्याच्या वाक्यावरून जगाचें कारण ब्रह्म आहे, अशी प्रथमत: श्वेतकेतूची परोक्ष भावना झाली. पुढें तें ब्रह्मच जीवरूपानें या जड पदार्थांत प्रविष्ट झालें आहे, असें युक्तिप्रयुक्तीच्या द्वारा त्यानें ठरविलें. शेवटीं 'तें तूं आहेस' या महावाक्यावरून त्यास ब्रह्मसाक्षात्कार झाला. असें छान्दोग्य उपनिषदाच्या सहाव्या अध्यायांत सांगितलेलें आहे. तात्पर्य, श्वेतकेतूप्रमाणेंच आधुनिक साधकानेंहि ज्ञान करून घ्यावें. ।।६१।।

आदिमध्यावसानेषु स्वस्य ब्रह्मत्वधीरियम् ।
नैव व्यभिच रेत्तस्मादापरोक्ष्यं प्रतिष्ठितम् ।।६२

अन्वयार्थ - [यस्मात् आदिमध्यावसानेषु इयं स्वस्य ब्रह्मत्वधी: न व्यभिचरेत् एव-] ज्या अर्थी आदि, मध्य व अंत या अवस्थांमध्यें 'मी ब्रह्म आहें' ही बुद्धि व्यभिचरित होतच नाहीं [तस्मात् अस्या: आपरोक्ष्यम् प्रतिष्ठितम्-] त्या अर्थीं हिची अपरोक्षता दृढ झाली. (ज्या अर्थीं ही आत्म्याची ब्रह्मत्वबुद्धि पांच कोशांतील कोणत्याहि कोशाला आत्मा जरी म्हटलें तरी बाधित होत नाहीं, त्या अर्थीं या बुद्धीचें अपरोक्षज्ञानत्व सिद्ध झालें.

प्रकाश:- पूर्वोक्त दृष्टान्ताप्रमाणें 'मी ब्रह्म आहें' ही बुद्धि कधींच बाधित होत नसल्यामुळें आत्म्याचें अपरोक्षत्व सिद्ध होतें. ।।६२।।

-अहोपण प्रथमत: केवल वाक्यावरून परोक्ष ज्ञान होतें व त्यानंतर विचारसहित वाक्यापासून अपरोक्ष ज्ञान होतें, हें कशावरून ज्ञात होतें ? उत्तर -

जन्मादिकारणत्वाख्यलक्षणेन भृगु: पुरा ।
पारोक्ष्येण गृहीत्वाऽथ विचाराद्व्यक्तिमैक्षत ।।६३

अन्वयार्थ - [पुरा भृगु: जन्मादिकारणत्वाख्य लक्षणेन पारोक्ष्येण गृहीत्वा-] पूर्वी भृगुनामक ऋषि

'जन्मादिकांचें कारणत्व' या नांवाच्या लक्षणावरून ब्रह्माचें परोक्षत्व ग्रहण करून [अथ विचारात् व्यक्तिं ऐक्षत-] नंतर विचारानें तो त्यास साक्षात् जाणता झाला. ('भृगु' या नांवाचा कोणी ऋषि पूर्वीं 'यतो वा इमानि भूतानि०' म्ह० ज्याच्यापासून हीं भूतें उत्पन्न होतात, ज्याच्यामुळें उत्पन्न झालेलीं तीं जिवंत राहतात व प्रलय होतांच ज्यांत प्रवेश करितात त्याला जाणण्याची इच्छा कर. ते ब्रह्म आहे' या वाक्यांत ऐकलेल्या जगज्जन्मादिकारणत्वरूप लक्षणावरून ब्रह्म जगत्कारण आहे, असें परोक्षपणें जाणून अन्नमयादि पंचकोशांचा विचार केल्यामुळें त्याला प्रत्यगात्मरूपानें साक्षात् जाणता झाला, असें तैत्तिरीय श्रुतींत सांगितलें आहे. त्यावरून प्रथम परोक्ष ज्ञान व नंतर विचारानें अपरोक्ष ज्ञान असा निश्चय होतो.)

प्रकाश:- वरुणाचा पुत्र भृगु शिष्यभावानें आपल्या पित्यापुढें गेला; व जिज्ञासेनें त्यास म्हणाला, 'हे प्रभो, मला ब्रह्माचें स्मरण करून द्या.' तें पुत्राचें वाक्य ऐकून ब्रह्मनिष्ठ वरुणमुनि फार संतुष्ट झाला, व तपश्चर्यापूर्वक तो त्यास ब्रह्मज्ञान सांगू लागला. पण ब्रह्माचा साक्षात्कार केवळ वर्णनें ऐकून किंवा वाचून होण्यासारखा नसल्यामुळें त्यामध्यें पुत्रास प्रवृत्त करण्याकरितां त्यानें त्यास केवल ब्रह्माचें तटस्थ लक्षण सांगितलें. ब्रह्मलक्षण ऐकतांच भृगु एकांतांत बसून आपणापाशींच विचार करूं लागला. पुष्कळ प्रकारें विचार केल्यावर त्यास आनंदरूप आत्म्याचा साक्षात्कार झाला, अशी पूर्वोक्त भृगुवल्लींत आख्यायिका आहे. व तिच्यामध्यें या जगाच्या उत्पत्तीचें, स्थितीचें व नाशाचें जें कारण तें ब्रह्म-असें लक्षण ऐकून भृगूस पूर्वीं ज्या ब्रह्माचें परोक्ष ज्ञान झालें होतें, त्याचाच पुढें विचारानें साक्षात्कार झाला - असें सांगितलें आहे. तात्पर्य, पूर्वोक्त प्रतिपादनास ही श्रुतीहि प्रमाण आहे. ॥६३॥

-'पण त्या पूर्वोक्त प्रकरणांत वरुणानें 'तूं ब्रह्म आहेस' असें अपरोक्ष ज्ञान करून देणारें वाक्य आपल्या पुत्रास सांगितलेलें नाहीं. तेव्हां त्यावांचून त्याला आत्मसाक्षात्कार कसा झाला ? उत्तर -

यद्यपि त्वमसीत्यत्र वाक्यं नोचे भृगोः पिता
तथाप्यन्नं प्राणमिति विचार्यस्थलमुक्तवान् ॥६४

अन्वयार्थ - [यद्यपि भृगोः पिता अत्र 'त्वं ब्रह्म असि' इति वाक्यं न ऊचे-] जरी भृगूच्या पित्यानें या आख्यायिकेंत 'तूं ब्रह्म आहेस' असें वाक्य उच्चारिलें नाहीं [तथापि अन्नं प्राणं इति विचार्यस्थलं उक्तवान्-] तरी 'देह, प्राण' असें म्हणून त्यानें विचाराचें योग्य स्थल सांगितलेंच होतें. ('तें तूं आहेस' असें वरुणानें सांगितलेलें नाहीं हें खरें, तथापि आत्मसाक्षात्काराला कारण होणाऱ्या विचारास योग्य असें स्थल त्यानें 'अन्नं प्राणं चक्षुः श्रोत्रं मनो वाचमिति' या वाक्यानें प्रदर्शित केलें आहे.)

प्रकाश:- 'तें तूं आहेस' असें वरुणानें सांगितलेलें नाहीं हें खरें, पण विचार कसा करावा - हें सुचविण्याकरितां त्याने प्रथमतःच देह, प्राण, मन इत्यादि शब्दांनीं पांच कोशांचा व चक्षु, श्रोत्र इत्यादि शब्दांनीं पांच ज्ञानेंद्रियांचा निर्देश करून हीं सर्व ज्ञानाचीं द्वारें आहेत, असें सांगितलें आहे. ॥६४॥

-'अन्नमयादि कोशांचा विचार केला असतां प्रत्यगात्म्याचा साक्षात्कार होऊं दे. पण त्याच्या योगानें ब्रह्माचा साक्षात्कार कसा होणार ?' उत्तर -

अन्नप्राणादिकोशेषु सुविचार्य पुनः पुनः ।
आनन्दव्यक्तिमीक्षित्वा ब्रह्मलक्ष्माप्ययूयुजत् ॥६५

अन्वयार्थ - [अन्नप्राणादिकोशेषु पुनः पुनः सुविचार्य-] अन्नमय-प्राणमयादि कोशांविषयीं वारंवार चांगला विचार करून [आनंदव्यक्तिं ईक्षित्वा-] आनंदरूप आत्म्याला पाहून [प्रत्यगात्मनि ब्रह्मलक्ष्म अपि अयूयुजत्-] त्या प्रत्यगात्म्याच्या

ठिकाणीं त्यानें ब्रह्माच्या लक्षणांचीहि योजना केली. (प्रत्यगात्माच ब्रह्म असल्यामुळें पंचकोशांच्या विचारानें आनंद आत्म्याचा अनुभव घेऊन 'आनंदापासून हीं सर्व भूतें उत्पन्न होतात, आनंदामुळेंच जिवंत राहतात व आनंदांतच लय पावतात' हें ब्रह्मलक्षणहि त्यानें प्रत्यगात्म्यामध्यें योजलें.)

प्रकाश:- 'शहाणा सुतानें स्वर्गास जातो' असें जें म्हणतात त्याप्रमाणें जरा विचाराची दिशा समजतांच भृगु अन्नमय, प्राणमय, इत्यादि कोशांविषयीं अहोरात्र विचार करूं लागला. व अन्नमयादि कोशच आत्मा आहे, असा त्याला प्रथम भ्रम झाला. पण पित्यानें सांगितलेलें सर्व लक्षण त्यांच्या ठायीं जुळत नसल्यामुळें त्यांना क्रमानें सोडीत व विचार करीत तो आंत आंत गेला व शेवटीं त्याला आनंदरूप आत्म्याचा साक्षात्कार झाला. तेव्हां त्यानें पूर्वोक्त ब्रह्मलक्षणाची त्याच्या ठायीं योजना केली व ती बरोबर आहे, अशीहि त्याची खात्री झाली. कारण आनंदापासून सर्व भूतांची उत्पत्ति आनंदाच्या आश्रयानेंच स्थिति व आनंदामध्यें लय होत असतो, ही गोष्ट सूक्ष्मदृष्टि लोकांच्या अनुभवाची आहे. ॥६५॥

-'अहोपण ब्रह्माचें लक्षण आनंद-आत्मरूपानें प्रत्यगात्म्याच्या ठिकाणीं योजणें योग्य नाहीं, कारण ब्रह्म तटस्थ असल्यामुळें म्ह. सृष्टीहून निराळें-तिच्या बाहेर दूर असल्यामुळें प्रत्यगात्म्याहून भिन्न आहे.' या शंकेचें समाधान -

सत्यं ज्ञानमनन्तं चेत्येवं ब्रह्मस्वलक्षणम् ।
उक्त्वा गुहाहितत्वेन कोशेष्वेतत्प्रदर्शितम् ॥६६

अन्वयार्थ - ['सत्यं ज्ञानं अनंतंच' इति-एवं ब्रह्मस्वलक्षणं उक्त्वा-] सत्य, ज्ञान व अनंत असें ब्रह्माचें स्वरूपलक्षण सांगून [एतत् गुहाहितत्वेन पंचकोशेषु प्रदर्शितम्-] हें 'गुहेंत राहणारें' या भावानें पांच कोशांमध्यें दाखविलें आहे.

प्रकाश:- - आत्मा व ब्रह्म हीं भिन्न तत्त्वें आहेत असें समजण्यास श्रुत्यादि प्रमाणें नसतांना तसें समजणें हेंच भ्रमाचें लक्षण होय. पूर्वोक्त श्रुतींत तर ब्रह्म, सत्य, ज्ञान व अनंतरूप आहे असें सांगून 'अशा प्रकारचें ब्रह्म पंचकोशरूप गुहेंत गुप्त आहे' असें स्पष्ट म्हटलें आहे. त्यावरून आत्मा व ब्रह्म भिन्न नाहींत असें स्पष्ट होतें. ॥६६॥

-आतां छान्दोग्यांतील दुसऱ्या एका श्रुतीचें पर्यालोचन केल्यानेंहि परोक्षज्ञानपूर्वक अपरोक्षज्ञान होतें, असेंच ठरतें, असें सांगतात -

पारोक्ष्येण विबुध्येन्द्रो य आत्मेत्यादिलक्षणात् ।
अपरोक्षीकर्तुमिच्छंश्चतुर्वारं गुरुं ययौ ॥६७

अन्वयार्थ - ['यः आत्मा' इत्यादिलक्षणात्-] 'यः आत्मा' इत्यादि श्रुतींत सांगितलेल्या लक्षणावरून [इंद्रः पारोक्ष्येण विबुध्य-] इंद्र त्यास परोक्षतः जाणून [अपरोक्षीकर्तुं इच्छन्-] अपरोक्षतः जाणण्याची इच्छा करणारा तो [चतुर्वारं गुरुं ययौ-] चार वेळ गुरूकडे गेला.

प्रकाश:- छान्दोग्योपनिषदाच्या आठव्या अध्यायांत इंद्र व विरोचन आत्मज्ञानाकरितां प्रजापतीकडे गेले व दोघांनाहि योग्यतेप्रमाणें भिन्न भिन्न आत्मज्ञान झालें अशी आख्यायिका आहे. तिच्यामध्यें प्रजापतीनें ''य आत्माऽपहतपात्मा विजरो विमृत्युर्विशोकः'' (छान्दो.) 'जो आत्मा पापशून्य, जरारहित, मरणधर्मातीत व शोकशून्य आहे' असें आत्म्याचें लक्षण सांगितलें आहे. तें ऐकतांच इंद्रास आत्म्याचें परोक्ष ज्ञान झालें, पण त्या परोक्ष ज्ञात आत्म्याचा साक्षात्कार झालेला नसल्यामुळें त्याकरिता इंद्र प्रजापतीकडे चार वेळ गेला. व एकशें एक वर्षें तप व विचार केल्यावर त्यास आत्मसाक्षात्कार झाला असें वर्णन आहे. त्यावरूनहि ''परोक्षज्ञानजन्य अपरोक्षज्ञान'' हाच सिद्धांत दृढ होतो. ॥६७॥

-आतां ऐतरेय श्रुतींतहि तसेंच सांगितलें आहे, असें दाखवितात -

आत्मावा इदमित्यादौ परोक्षं ब्रह्म लक्षितम्
अध्यारोपापवादाभ्यां प्रज्ञानं ब्रह्म दर्शितम् ॥६८

अन्वयार्थ - ['आत्मा वा इदं' इति आदौ ब्रह्म परोक्षं लक्षितं -] 'आत्मा वा इदं' असें म्हणून प्रथमत: ब्रह्माचें परोक्ष लक्षण सांगितलें [च अन्ते अध्यारोपापवादाभ्यां प्रज्ञानं ब्रह्म दर्शितम् -] व शेवटीं अध्यारोप आणि अपवाद यांच्या योगानें 'प्रज्ञान हेंच ब्रह्म आहे' असें दाखविलें.

प्रकाश:- ऋग्वेदाच्या ऐतरेयोपनिषदात आरंभी 'पूर्वीं प्रसिद्ध असें हें सर्व नामरूपात्मक जगत् एक आत्माच असतें-झालें. व्यापारयुक्त किंवा व्यापाररहित असें दुसरें कांहीं नव्हतें,' असें म्हणून ब्रह्माचें लक्षण सांगितलें आहे. पुढें "मी लोकांस उत्पन्न करावें असा त्यानें विचार केला." असा आरंभ करून परमात्म्याच्या ठिकाणीं जगाचा आरोप कसा होतो तें दाखविलें. पुढें त्याचा निषेध करून व गर्भवासादि दु:ख दाखवून वैराग्य उत्पन्न केल्यावर 'हा आत्मा कोण आहे, असा विचार करण्यास आरंभ केला आहे. व शेवटीं जगांत प्रज्ञानावांचून अन्य कोणतेंहि तत्त्व सांपडत नसल्यामुळें 'प्रज्ञानच ब्रह्म आहे' असें सिद्ध केलें आहे.' अर्थात् प्रज्ञानरूप आत्माच ब्रह्म आहे. असें येथेंहि व्यक्त होत असून परोक्षज्ञानपूर्वक अपरोक्षज्ञान होत असतें, असें स्पष्ट दाखविलें आहे. ॥६८॥

-हाच न्याय इतर श्रुतींना लागू आहे असें आतां सांगतात-

अवान्तरेण वाक्येन परोक्षा ब्रह्मधीर्भवेत् ।
सर्वत्रैव महावाक्यविचारादपरोक्षधी: ॥६९

अन्वयार्थ - [सर्वत्र एव अवांतरेण वाक्येन परोक्षा ब्रह्मधी:-] सर्वहि श्रुतींमध्ये अवांतर वाक्यानें परोक्ष ब्रह्मज्ञान [च महावाक्यविचारात् अपरोक्षधी: भवेत्-] व महावाक्यांच्या विचारानें अपरोक्ष ज्ञान होतें.

प्रकाश:- जेवढीं म्हणून उपनिषदें आहेत तेवढ्या सर्वांविषयीं हाच सामान्य नियम समजावा. अवांतर वाक्य म्हणजे महावाक्याहून इतर वाक्य व महावाक्य म्हणजे साक्षात् ब्रह्मात्मैक्यबोधक वाक्य होय. ॥६९॥

-'महावाक्यांच्या विचारामुळें ब्रह्मात्मसाक्षात्कार होतो' असें जें तुम्हीं वर म्हटलें आहे, तें संप्रदायाला सोडून आहे. कारण सिद्धांतलेश, सिद्धांतसूक्तिमंजरी इत्यादि ग्रंथकारांनीं 'आत्म्याचें श्रवण करावें' या श्रवणविधानाचा विचार करितांना 'मननानें अपरोक्ष ज्ञान होतें' असें विवरणकारांच्या मताचा आधार घेऊन सांगितलें आहे, असें कदाचित् कोणी म्हणेल म्हणून श्रीभारतीतीर्थ म्हणतात -

ब्रह्मापरोक्ष्यसिद्ध्यर्थं महावाक्यमितीरितम् ।
वाक्यवृत्तावतो ब्रह्मापरोक्ष्ये विमतिर्न हि ॥७०

अन्वयार्थ - [वाक्यवृत्तौ 'ब्रह्मापरोक्ष्यसिद्ध्यर्थं महावाक्यं' इति ईरितं अस्ति-] वाक्यवृत्तीमध्यें 'ब्रह्माचें अपरोक्षज्ञान सिद्ध होण्यासाठीं महावाक्य आहे' असें सांगितलें आहे, [अत: ब्रह्मापरोक्ष्ये विमति: न हि-] यास्तव ब्रह्माच्या अपरोक्षतेविषयीं मतभेद नाहीं.

प्रकाश:- श्रीमच्छंकराचार्यांनीं आपल्या वाक्यवृत्ति नामक ग्रंथांत ब्रह्माच्या साक्षात्काराकरितां महावाक्य आहे, म्हणजे त्याच्या विचारानेंच साक्षात्कार होत असतो; असें स्पष्टपणें म्हटलें आहे. व हें संप्रदायप्रवर्तक मुख्य आचार्यांचेंच म्हणणें असल्यामुळें त्याविषयीं मतभेद होणेंहि शक्य नाहीं. आतां मननाच्या योगानें साक्षात्कार होतो असें जें क्वचित् म्हटलेलें आढळतें, त्याचा तरी-महावाक्याच्या मननानें-म्हणजे विचारानेंच साक्षात्कार होतो-असा

अर्थ केला असतां मतभेदास जागाच राहात नाहीं. सारांश पूर्वोक्त गोष्ट सिद्ध आहे. ॥७०॥

-आतां वाक्यवृत्तींतील उपपादनाचा प्रकार तेथल्याच आठ श्लोकांचा अनुवाद करून सांगतात-

आलम्बनतया भाति योऽस्मत्प्रत्ययशब्दयोः ।
अन्तःकरणसंभिन्नबोधः स त्वम्पदाभिधः ॥७१

अन्वयार्थ- [यः अंतःकरणसंभिन्नबोधः-] जो अंतःकरणोपाधीक चिदात्मा [अस्मत्प्रत्ययशब्दयोः आलंबनतया भाति-] अहंप्रत्यय व अहंशब्द यांच्या आश्रयत्वानें भासतो, [सः त्वंपदाभिधः-] तो त्वंपदाचा वाच्य अर्थ होय.

प्रकाशः- 'अहं'- मी-असें जें प्रत्येकास वाटत असतें, तो 'अहंप्रत्यय' व 'अहं हा स्वतः शब्द'- या दोघांचा अंतःकरणोपाधिक चिदात्मा विषय होय. अर्थात् 'तत्त्वमसि' या वाक्यांतील 'त्वं' पदाचा तोच अर्थ आहे. म्हणजे घट हा पदार्थ जसा घट या शब्दाचा वाच्य असून घट हा शब्द त्याचा वाचक असतो, त्याप्रमाणें अंतःकरण ही ज्याला, उपाधि आहे असा चिदात्मा 'त्वं'- शब्दाचा वाच्य व स्वतः त्वं शब्द हा त्याचा वाचक होयः ॥७१॥

-आतां तत्पदाचा वाच्य अर्थ सांगतात -

मायोपाधिर्जगद्योनिः सर्वज्ञत्वादिलक्षणः ।
पारोक्ष्यशबलः सत्याद्यात्मकस्तत्पदाभिधः ॥७२

अन्वयार्थ - [यः मायोपाधिः जगद्योनिः सर्वज्ञत्वादिलक्षणः-] जो मायोपाधि, जगत्कारण, सर्वज्ञत्वादिलक्षणयुक्त [पारोक्ष्यशबलः सत्याद्यात्मकः-] परोक्षत्वविशिष्ट व सत्यादिरूप [सः तत्पदाभिधः अस्ति-] तो तत्पदाचा वाच्य अर्थ आहे.

प्रकाशः- ज्याची उपाधि माया आहे तो मायोपाधि. माया शुद्धसत्त्वप्रधान आहे व अनादि आहे. जो पदार्थ आपला धर्म दुसऱ्याच्या ठायीं आरोपित करितो तो त्या दुसऱ्या पदार्थाचा उपाधि होतो. जासवंदीच्या फुलाजवळ स्फटिकमणि नेला असतां तो लाल दिसूं लागतो. म्हणजे तें फूल आपला लाल रंग स्फटिकाच्या ठिकाणीं आरोपित करितें. आणि म्हणूनच जासवंदीचें फूल स्फटिकाचा उपाधि होतें. तशीच माया ही आपला धर्म आत्म्याच्या ठिकाणीं आरोपित करीत असल्यामुळें त्याचा उपाधि होय. आणि एवढ्याकरितांच त्यास मायोपाधि असें म्हणतात. जगद्योनि - उत्पत्तिशील जगाचें निमित्त व उपादान कारण ब्रह्म प्रकृतियुक्त होऊन जगाचें उपादान कारण. चैतन्यप्रधान होऊन निमित्त कारण होत असतें. मातीचा घट तयार करणारा कुंभार त्या घटाचें निमित्त कारण व माती उपादन कारण होय, हें बहुश्रुत वाचकांस ठाऊक आहेच. **सर्वज्ञत्वादिलक्षणः**-सर्वज्ञ, सर्वशक्ति, सर्वकर्मा, सर्वगंध, इत्यादि प्रकारच्या लक्षणभूत शब्दावरून ज्याचें ज्ञान होत असतें असा. **पारोक्ष्यशबलः**- नित्य अपरोक्ष व स्वप्रकाश असा जो प्रत्यगात्मा त्याच्याहून ईश्वर भिन्न आहे, असें समजणें हेंच त्यांचें शबलत्व आहे व त्यामुळेंच परोक्षत्वाच्या योगानें शबल असें त्यास म्हटलें आहे. ह्याप्रमाणें चार पदांनीं तत्पदार्थांचें तटस्थलक्षण सांगून आतां संक्षेपतः स्वरूपलक्षण सांगतात. **सत्याद्यात्मकः**- सत्य, ज्ञान, अनंत व आनंदरूप असा जो परमात्मा तोच 'तत्त्वमसि' या वाक्यांतील तत् पदाचा अर्थ होय. ॥७२॥

-ह्याप्रमाणें वाक्यांतील 'तत्' 'त्वं' या पदांचा अर्थ सांगून वाक्यार्थज्ञानासाठीं लक्षणेचा आश्रय करावा, असें सांगतात-

प्रत्यक्परोक्षतैकस्य सद्वितीयत्वपूर्णता ।
विरुध्येते यतस्तस्माल्लक्षणा संप्रवर्तते ॥७३

अन्वयार्थ - [यतः एकस्य प्रत्यक्परोक्षता-] ज्या अर्थीं एकाची प्रत्यक्ता व परोक्षता

[सद्वितीयत्वपूर्णता-] आणि सद्वितीयता व पूर्णता [विरुध्येते-] विरुद्ध आहे. [तस्मात् लक्षणा संप्रवर्तते-] त्या अर्थी लक्षणा प्रवृत्त होते.

प्रकाश:- पूर्वोक्त वाक्यांत असि हे तिसरें पद आहे व तें 'तत्' व 'त्वं' यांचें ऐक्य दाखवितें. म्हणजे व्यवहारांत जसा 'तूं रामा आहेस, मीच राम आहें', इत्यादि शब्दप्रयोग होतो, व त्यांतील तूं व रामा किंवा मी व राम यांचें ऐक्य 'आहेस' व 'आहें' यावरून व्यक्त होतें, त्याप्रमाणेंच येथेंहि प्रकार होतो. पण एकाच पदार्थाच्या ठायीं परस्पर विरुद्ध असे दोन धर्म राहणें शक्य नाहीं. तत् व त्वं हे दोन शब्द तर असि पदानें द्योतित होणाऱ्या एका वस्तूच्या ठायीं क्रमानें परोक्षत्व व प्रत्यक्त्व आणि पूर्णत्व व सद्वितीयत्व हे धर्म दाखवितात. यास्तव या वाक्याचा लक्षणेनें अर्थ केला पाहिजे. कारण जेथें वाक्याच्या तात्पर्याची अनुपपत्ति होते म्हणजे वाक्याचें तात्पर्य निर्दोषपणें जुळत नाहीं, तेथें लक्षणा प्रवृत्त होत असते. ॥७३॥

लक्षणा तीन प्रकारची असल्यामुळें त्यांतील कोणती लक्षणा येथें प्रवृत्त होते, तें आतां सांगतात-

तत्त्वमस्यादिवाक्येषु लक्षणा भागलक्षणा ।
सोऽयमित्यादिवाक्यस्थपदयोरिव नापरा ॥७४

अन्वयार्थ - ['स: अयं' इत्यादिवाक्यस्थपदयो: इव-] 'तो हा' इत्यादि वाक्यांतील दोन पदांप्रमाणें [तत्त्वमस्यादिवाक्येषु भागलक्षणा लक्षणा-] 'तत्त्वमसि' इत्यादि वाक्यामध्येंहि 'भागलक्षणा' नामक लक्षणा प्रवृत्त होते. [न अपरा-] दुसरी नाहीं.

प्रकाश:- 'तो हा देवदत्त' या वाक्यांतील तो व हा हीं दोन पदें परस्परविरोधी आहेत. कारण 'तो' या शब्दाचा अर्थ-दूरचा किंवा परोक्ष असा आहे व 'हा' याचा अर्थ जवळचा किंवा अपरोक्ष असा आहे. त्यामुळें त्या दोन्ही शब्दांचा देवदत्त नामक एका पुरुषाशीं अन्वय होऊ शकत नाहीं. यास्तव या स्थळीं भागत्याग किंवा जहदजहत् लक्षणेनें वाक्यार्थ करावा लागतो. पदांतील विरुद्ध धर्म सोडून देऊन समान धर्मांचा मुख्य व्यक्तीशीं अन्वय करणें, हीच जहदजहत् लक्षणा होय. तस्मात् 'सोऽयं' या वाक्यांत जशी भागलक्षणा करून वाक्यार्थ करितात त्याचप्रमाणें 'तत्त्वमसि' या स्थळींहि अर्थ करावा. कारण या वाक्यांत जहत् किंवा अजहत् यांपैकीं एकहि लक्षणा संभवत नाहीं. ॥७४॥

-'पण गाय आण' या वाक्यांत लक्षणावृत्तीवांचूनहि वाक्यार्थबोध होतो, तसाच येथें कां होऊं नये ?'

उत्तर-

संसर्गो वा विशिष्टो वा वाक्यार्थो नात्र संमत: ।
अखंडैकरसत्वेन वाक्यार्थो विदुषां मत: ॥७५

अन्वयार्थ - [अत्र विदुषां संसर्ग: वा विशिष्ट: वा वाक्यार्थ: न संमत:-] या स्थळीं विद्वानांस संसर्ग किंवा विशिष्ट वाक्यार्थ संमत नाहीं, [किंतु अखंडैकरसत्वेन वाक्यार्थ: मत:-] तर अखंड-एकरसत्वानें वाक्यार्थ संमत आहे.

प्रकाश:- 'गाईस आण.' या वाक्यांतील पदांच्या योगानें मुख्य अर्थाचाच बोध होतो व त्यामुळें त्यास संसर्गवाक्यार्थ म्हणतात. कारण ज्या शब्दांचा जो अर्थ पूर्वीं समजलेला होता, तोच प्रस्तुत स्थळींहि उपस्थित होत असल्यामुळें व त्याचा बाधहि होत नसल्यामुळें तो संसर्गवाक्यार्थ होय. निळें, मोठें व सुगंधि कमल या वाक्यांत निळें वगैरे तीन शब्द विशेषणरूप व त्यांनीं युक्त असें कमल विशेष्यरूप आहे. या वाक्याचा खरा अर्थ कमल एवढाच असून इतर शब्द त्यांमध्यें कांहीं विशेष्यता आणीत आहेत व त्यामुळें ह्या वाक्यार्थास विशिष्टवाक्यार्थ म्हणतात. पण 'तत्त्वमसि' या महावाक्यांत हे दोन्ही अर्थ संभवत नाहींत. त्यामुळें विद्वान् लोक अखंड व एकरसवस्तुरूपानें वाक्यार्थ

करितात. अखंडैकरसत्वेन:- स्वगत, सजातीय व विजातीय या तीन प्रकारच्या भेदांनीं रहित व प्रत्यगात्म्याहून निराळें नसलेलें असें ब्रह्म. ॥७५॥

-अखंड एकरसवाक्यार्थ कसा होतो, तो आतां दाखवितात -

प्रत्यग्बोधो य आभाति सोऽद्वयानन्दलक्षण: ।
अद्वयानन्दरूपश्च प्रत्यग्बोधैकलक्षण: ॥७६

अन्वयार्थ - [य: प्रत्यग्बोध: आभाति-] जो सर्वांच्या अंतर्यामीं राहणारा चिदात्मा भासतो [स: अद्वयानन्दलक्षण:-] तो अद्वय व आनंदलक्षण परमात्मा आहे; [च य: अद्वयानन्दरूप: परमात्मा-] आणि जो अद्वयानन्दरूप परमात्मा [स: प्रत्यग्बोधैकलक्षण: अस्ति-] तो प्रत्यग्बोधस्वरूपच आहे.

प्रकाश:- जो प्रत्यगात्मा तोच जीवात्मा व जीवात्मा तोच प्रत्यगात्मा असा व्यतिहार या श्लोकांत दाखविला आहे. असा व्यतिहार दाखविल्यानें ज्यांचें परमार्थत: ऐक्य आहे, अशा दोन वस्तूंतील भेद निश्चयपूर्वक नष्ट होतो. मांडूक्योपनिषदाच्या आठव्या मंत्रांतही 'ॐकाराच्या ज्या मात्रा तेच आत्म्याचे पाद व जे पाद त्याच मात्रा' असें म्हणून व्यतिहारपद्धतीनें प्रणव व त्याचा वाच्य ईश्वर यांचें ऐक्य दाखविलें आहे. प्रत्येक म्हणजे सर्वांतर्यामी चिदात्मा, तो पंचकोशाचा प्रकाशक आहे. अशा प्रकारें भासतो व तो सर्व अवस्थांचा साक्षी असल्यामुळें, निर्विकार आहे. कोणत्याहि प्राण्याला ह्याच्या इतकी दुसरी प्रियकर वस्तु नसल्यामुळें व हा अद्वयादि लक्षण असल्याचें श्रुति अनेक प्रकारें सांगत असल्यामुळें, हा परमात्माच आहे. त्याचप्रमाणें अद्वैत ब्रह्मलक्षण जो परमात्मा तोहि चिदानंदरूप प्रत्यगात्माच आहे. सारांश, निरुपाधिक जीवात्मा व निरुपाधिक ईश्वर यांचें वस्तुत: ऐक्यच होय. ॥७६॥

असें आत्म्याच्या अखंडत्वाचें ज्ञान झालें असतां काय होतें, तें आतां सांगतात-

इत्थमन्योन्यतादात्म्यप्रतिपत्तिर्यदा भवेत् ।
अब्रह्मत्वं त्वमर्थस्य व्यावर्तेत तदैव हि ॥७७॥
तदर्थस्य च पारोक्ष्यं यद्येवं किं तत: शृणु ।
पूर्णानंदैकरूपेण प्रत्यग्बोधोऽवतिष्ठते ॥७८॥

अन्वयार्थ - [इत्थं अन्योन्यतादात्म्यप्रतिपत्ति: यदा भवेत्-] ह्याप्रमाणें परस्परांचें ऐक्य आहे, असें ज्ञान जेव्हां होतें, [तदा एव हि त्वमर्थस्य अब्रह्मत्वं व्यावर्तेत-] तेव्हांच 'त्वं.' - पदार्थाचें अब्रह्मत्व निवृत्त होतें. [तदर्थस्य पारोक्ष्यं च निवर्तेत-] त्याचप्रमाणें 'तत्-' पदाचा लक्ष्यार्थ जो परमात्मा, त्याचें परोक्षत्वहि निवृत्त होतें. [यदि एवं तत: किं] पण असें झाल्यानें लाभ काय ? [शृणु-] सांगतों, ऐक. [प्रत्यग्बोध: पूर्णानंदैकरूपेण अवतिष्ठते-] प्रत्यग्बोध पूर्ण आनंद रूपानें अवशिष्ट राहतो.

प्रकाश:- प्रत्यगात्मा व परमात्मा यांचें परस्पर ऐक्य आहे असें जेव्हां ज्ञान होतें, जेव्हां त्वं पदाचा लक्ष्य अर्थ जो प्रत्यगात्मा, तो ब्रह्म नव्हे अशी जी मूढांची समजूत असते ती एकदम निवृत्त होते. कारण 'प्रत्येक शरीरांत जीवात्मा भिन्न आहे' हें मत केवळ तर्करूप व मूढपुरुषानुभवरूप आहे ! पण अंतर्वृत्ति ज्ञानी पुरुषांस जेव्हां त्या मताचा बाध होतो असें दिसतें, तेव्हां ते एक क्षणभरहि त्याचा स्वीकार करीत नाहींत. त्वं पदाच्या लक्ष्यार्थाचें अब्रह्मत्व व तत्पदाच्या लक्ष्यार्थाचें परोक्षत्व हीं दोन्हीं ऐक्यज्ञानानें निवृत्त होतात. पण असें झाल्यापासून लाभ तो कोणता अशी कोणी शंका विचारील; कारण, प्रत्यगात्मा ब्रह्मरूप आहे व परमात्मा

परोक्ष नाहीं, असें सिद्ध झाल्यापासून जर कांहीं लाभ असता, तर त्याची सिद्धि करण्यांत कांहीं प्रयोजन आहे असें म्हणतां आलें असतें. यास्तव ग्रंथकार सांगतात कीं पूर्वोक्त प्रकार घडून आल्यावर प्रत्यगात्मा पूर्ण आनंदरूप होऊन राहतो. अर्थात् परोक्षत्व, अब्रह्मत्व इत्यादि समजूतींबरोबर त्याचे दुसरेहि औपाधिक धर्म नष्ट होऊन जातात व तो कैवल्यावस्थेंत राहतो. म्हणजे त्यास येथेंच परम पुरुषार्थाची प्राप्ति होते. ॥७७-७८॥

-'अहोपण 'समयबलानें यथार्थ परोक्ष अनुभवाचें साधन आगम आहे,' हें आगमाचें लक्षण असतांना वाक्य अपरोक्ष ज्ञान उत्पन्न करणारें आहे, असें कसें म्हणतां ?' अशी आशंका घेऊन व 'हा शंकाकार सिद्धान्तज्ञानशून्य आहे,' असें समजून त्याचा उपहास करितात-

एवं सति महावाक्यात्परोक्षज्ञानमीर्यते ।
यैस्तेषां शास्त्रसिद्धान्तविज्ञानं शोभतेतराम् ॥७९

अन्वयार्थ - [एवं सति-] असें असतांना [यैः महावाक्यात् परोक्षज्ञानं ईर्यते-] जे महावाक्यापासून परोक्षज्ञान होते असें म्हणतात [तेषां शास्त्रसिद्धान्तविज्ञानं शोभतेतराम्-] त्यांचें शास्त्रसिद्धान्तविज्ञान फारच शोभतें !

प्रकाशः- महावाक्यापासून विचारानंतर अपरोक्ष ज्ञान कसें होतें तें एवढा वेळ सांगितलें. व तो सिद्धांत सप्रमाण सिद्ध केला असतांहि 'वाक्यापासून परोक्ष ज्ञानच होणें शक्य आहे. अपरोक्ष ज्ञान होणें शक्य नाहीं' असें जे म्हणतात, त्यांस आम्ही एवढेंच सांगतों कीं, तुमचें हें शास्त्रीय ज्ञान तुम्हांलाच शोभतें. तें तुमच्यापाशींच राहूं दे. इतरांना त्याचा कांहीं उपयोग नाहीं. कारण तुम्ही शास्त्रपरिचयशून्य आहां, असें ज्ञाते तुमच्या बोलण्यावरूनच ओळखतील व त्यामुळें ते तुमच्या वाऱ्यासहि उभे रहाणार नाहींत ॥७९॥

-'तुमचा सिद्धान्त राहूं दे. 'वाक्यावरून परोक्षज्ञान होतें' हें अनुमानानेंच सिद्ध होतें' अशी शंका घेऊन तिचें समाधान -

आस्तां शास्त्रस्य सिद्धान्तो युक्त्या वाक्यात्परोक्षधीः ।
स्वर्गादिवाक्यवन्नैवं दशमे व्यभिचारतः ॥८०॥

अन्वयार्थ - [शास्त्रस्य सिद्धान्तः आस्तां-] शास्त्राचा सिद्धान्त असो, [स्वर्गादिवाक्यवत् वाक्यात् परोक्षधीः इति युक्त्या सिद्धं-] पण स्वर्गादि वाक्याप्रमाणें वाक्यावरून परोक्षज्ञान होतें, असें अनुमानानें सिद्ध होतें [इति चेत् एवं न-] असें जर म्हणशील तर तें बरोबर नाहीं. [दशमे व्यभिचारतः-] कारण 'तूं दशम आहेस' या वाक्यांत त्या अनुमानाचा व्यभिचार होत असतो.

प्रकाश- वादी म्हणतो कीं, अनुमानावरून ही गोष्ट सिद्ध होते. कशी म्हणाल तर पहाः- वाक्य केवळ परोक्षज्ञानच करून देत असतें. कारण तें वाक्य आहे म्हणून. म्ह०-जें जें वाक्य तें तें परोक्षज्ञान करून देणारें- अशी व्याप्ति मिळत असल्यामुळें; याला उदाहरण स्वर्गकामो ज्योतिष्टोमेन यजेत म्ह. ज्याला स्वर्गाची इच्छा असेल त्यानें ज्योतिष्टोम यज्ञ करावा- या वाक्याप्रमाणें. या वाक्यावरून स्वर्गाविषयीं व स्वर्गाच्या साधनाविषयीं परोक्षज्ञान होत असतें. प्रत्यक्ष नव्हे. अर्थात् आमचें म्हणणें युक्तिसिद्ध आहे. असें बोलून वादी स्वस्थ झाला असतां सिद्धान्ती म्हणतात;- हें तुमचें अनुमान व्यभिचारि आहे. कारण 'तूंच दहावा आहेस' असें आप्तवचन ऐकतांच भ्रमिष्टास आपल्या दहावेपणाचा साक्षात्कार होत असल्याचें वर सविस्तर दाखविलें आहे. तस्मात् अनुमान दुष्ट (दोषयुक्त) आहे. ॥८०॥

-शिवाय-

स्वतोऽपरोक्षजीवस्य ब्रह्मत्वमभिवांच्छतः ।
नश्येत्सिद्धापरोक्षत्वमिति युक्तिर्महत्यहो ॥८१॥

अन्वयार्थ - [ब्रह्मत्वं अभिवाञ्छतः स्वतः अपरोक्षजीवस्य-] ब्रह्मत्वाची इच्छा करणाऱ्या व

स्वत: अपरोक्ष असलेल्या जीवाचें [सिद्धापरोक्षत्वं नश्येत् इति अहो महती युक्ति:-] पूर्वी सिद्ध असलेलें अपरोक्षत्वहि नष्ट होईल, ही खरोखर फारच मोठी युक्ति होय.

प्रकाश:- अनुमानाची कांस धरणाऱ्या वाद्याचा या व पुढच्या श्लोकांत उपहास केला आहे. जीव स्वत: अपरोक्ष आहे हें कोणासहि सांगण्याची आवश्यकता नाहीं. पण आपल्या कल्याणाकरितां जर त्यानें ब्रह्मभावाची इच्छा केली, तर त्याचें पहिलें स्वभावसिद्ध असलेलें अपरोक्षत्वहि नाहींसें होतें असें ज्या उत्तम युक्तीवरून ठरतें. तिची स्तुती करावी तितकी थोडीच होय ! ॥८१॥

-स्वत:च अपरोक्ष असलेल्या जीवानें परोक्ष होणें इष्टच आहे, म्हणून म्हणशील तर -

वृद्धिमिष्टवतो मूलमपि नष्टमितीदृशम् ।
लौकिकं वचनं सार्थं संपन्नं त्वत्प्रसादत: ॥८२॥

अन्वयार्थ - [वृद्धिं इष्टवत: मूलं अपि नष्टं-] व्याजाची इच्छा करणाराचें मुद्दलहि नष्ट झालें. [इति ईदृशं लौकिकं वचनं त्वत्प्रसादत: सार्थं संपन्नम्-] हें अशा प्रकारचें लौकिक वचन तुझ्या कृपेनें सार्थ झालें.

प्रकाश:- व्यवहारामध्यें 'सावकारानें कुळापासून उगीच कसें तरी व्याज ओढण्याची हाव धरूं नये, कारण तसें केल्यास एकादे वेळीं मुद्दलहि जाण्याची वेळ येते,' असें सुचविण्याकरितां प्रस्तुत म्हण प्रचलित झाली आहे. तिच्या अनुरोधानेंच हा तुझा सिद्धांत ठरला, असें सिद्धांती वाद्यास सांगत आहेत. कारण मोठ्या लाभाच्या आशेनें ब्रह्म होण्याची एकाद्यानें इच्छा करावी, व त्यांत प्रवृत्त होतांच त्याची सहज अपरोक्षताहि जावी ! पण हा न्यायाचा प्रकार नव्हे. ॥८२॥

-'अहोपण जीव सोपाधिक असल्यामुळें त्याचें अपरोक्षत्व युक्त आहे, पण निरुपाधिक ब्रह्माचें अपरोक्षत्व संभवत नाहीं,' अशी शंका-

अंत:करणसंभिन्नबोधो जीवोऽपरोक्षताम् ।
अर्हत्युपाधिसद्भावान्न तु ब्रह्मानुपाधित: ॥८३॥

अन्वयार्थ - [अंत:करणसंभिन्नबोध: जीव:-] बुद्धियुक्त चैतन्यच जीव होय. [उपाधिसद्भावात् अपरोक्षतां अर्हति-] उपाधि विद्यमान असल्यामुळें तो अपरोक्षतेस योग्य आहे. [किं तु ब्रह्म अनुपाधित: न अर्हति-] पण ब्रह्म उपाधिरहित असल्यामुळें अपरोक्षतेस योग्य नाहीं.

प्रकाश:- जीव कार्योपाधि आहे; ईश्वर कारणोपाधि आहे; व ब्रह्म निरुपाधिक आहे; असें श्रुति सांगत असल्यामुळें बुद्धियुक्त चैतन्य हाच जीव होय असें ठरतें. व त्यामुळें अपरोक्षत्व हा धर्म त्याचे ठायीं राहतो. पण ब्रह्म निरुपाधिक असल्यामुळें तें अपरोक्ष होऊं शकणार नाहीं. कारण अपरोक्षज्ञानास अंत:करणाची अत्यंत आवश्यकता आहे. ॥८३॥

-पण ब्रह्माचें निरुपाधित्व असिद्ध आहे, असें म्हणून समाधान करितात -

नैवं ब्रह्मत्वबोधस्य सोपाधिविषयत्वत: ।
यावद्विदेहकैवल्यमुपाधेरनिवारणात् ॥८४॥

अन्वयार्थ - [ब्रह्मत्वबोधस्य सोपाधिविषयत्वत:] ब्रह्मत्वज्ञान सोपाधिविषयक असल्यामुळें [च विदेहकैवल्यं यावत् उपाधे: अनिवारणात्-] व विदेह कैवल्य प्राप्त होईतों उपाधीचें निवारण करितां येत नसल्यामुळें [एवं न-] असें होत नाहीं.

प्रकाश:- जीवाचें जें ब्रह्मरूपताज्ञान आहे तें सोपाधिवस्तुविषयक असल्यामुळें त्याचा विषय जें ब्रह्म तेंहि सोपाधिक होय. कारण ज्ञेय सोपाधिक असल्यावांचून ज्ञान सोपाधिवस्तुविषयक होऊं शकणार नाहीं. व देहसंबंध असेपर्यंत अथवा विदेहमुक्तीचा लाभ होईतोंपर्यंत उपाधीचें निवारण होत नाहीं, असा विद्वानांचा अनुभव आहे. तस्मात् मी ब्रह्म आहें, हे ज्ञान व त्याचा विषय हीं दोन्हीं सोपाधिक आहेत ॥८४॥

'तर मग जीव व ब्रह्म यांच्या दोन विलक्षण उपाधि सांगणें भाग आहे,' अशी आशंका घेऊन सांगतात-

अंत:करणसाहित्यराहित्याभ्यां विशिष्यते ।
उपाधिर्जीवभावस्य ब्रह्मतायाश्चनान्यथा ॥८५

अन्वयार्थ - [जीवभावस्य च ब्रह्मताया: उपाधि:-] जीवभाव व ब्रह्मभाव यांची उपाधि [अंत:करण साहित्यराहित्याभ्यां विशिष्यते-] अंत:करणासह राहणें व त्याच्यावांचून असणें, या दोन कारणांनीं भिन्न होतें. [न अन्यथा-] दुसऱ्या कशानेंहि नाहीं.

प्रकाश:- अंत:करणासह राहणें हीच जीवत्वाची उपाधि व अंत:करणावांचून असणें हीच ब्रह्मत्वाची उपाधि होय. अर्थात्-अव्यावृत्ताननुगतं वस्तु ब्रह्मेति भण्यते । ब्रह्मार्थो दुर्लभोऽत्र स्याद् द्वितीये सति वस्तुनि ॥ या अद्वैत शास्त्रांत ब्रह्म शब्दाचा अर्थच दुर्लभ होईल-असें जें परमपूज्य सुरेश्वराचार्यांनीं म्हटलें आहे त्याचा भाव 'सर्व द्वैताच्या अभावानें युक्त असें चैतन्य म्हणजेच ब्रह्म होय,' असा ठरतो. व त्यामुळें प्रस्तुत श्लोकाशीं त्यांच्या वार्तिकाचा विरोध येत नाहीं. कारण चैतन्यानें अंत:करणावांचून असणें म्हणजे सर्व द्वैताभावानें युक्त असणेंच होय ॥८५॥

-'अहोपण, अंत:करणसंबंध भावरूप असल्यामुळें त्याला जीवोपाधित्व असो. पण अभावरूप अंत:करणराहित्याला ब्रह्मोपाधित्व कसें ?' उत्तर -

यथा विधिरुपाधि: स्यात्प्रतिषेधस्तथा न किम् ।
सुवर्णलोहभेदेन शृंखलात्वं न भिद्यते ॥८६॥

अन्वयार्थ - [यथा विधि: उपाधि: स्यात्-] जसा भावरूप अंत:करणसंबंध उपाधि होते, [तथा प्रतिषेध: न किं ?-] तसा अंत:करणवियोग उपाधि नाहीं का होणार ? [सुवर्णलोहभेदेन शृंखलात्वं न भिद्यते-] सुवर्ण व लोह यांच्या भिन्नत्वानें शृंखलात्वामध्यें भेद पडत नाहीं.

प्रकाश:- या श्लोकांत विधि म्हणजे भाव व प्रतिषेध म्हणजे अभाव असें समजावें. जसा भाव उपाधि होतो तसाच अभावहि होतो. यास्कांनीं जे सहा भावविकार सांगितले आहेत, त्यांत विनाशाची ही गणना आहे, व त्यावरून अभावहि उपाधि होऊं शकतो असें ठरतें. याविषयीं शृंखलेचा दृष्टांत येथें दिला आहे. शृंखला म्हणजे बेडी. ती ज्याच्या पायांत असेल त्याची गति मंद होणें हें तिचें कार्य होय. व तेवढें तिनें केलें कीं तिच्या स्वरूपाकडे कोणीहि पाहत नाहीं म्हणजे ती सोन्याची असो कीं चांदीची असो, कीं लोखंडाची असो; तिला पुरुषगतिनिरोधक शृंखलाच म्हणतात. पेशवाईत सखाराम बापूंस दोन तीन वेळ कैदेंत पडावें लागलें. व त्यांच्या पायांत नेहमीं चांदीची बेडी ठोकीत असत. पण तिचा त्यांना लोखंडाच्या बेडीपेक्षां कांहीं अधिक लाभ होत असेल, असें कोणी म्हणूं शकेल का ? तात्पर्य उपाधि कशीहि कां असेना, ती वस्तूमध्यें जोपर्यंत कांहीं तरी भेद पाडीत असते, तोंपर्यंत ती उपाधीच होय. ॥८६॥

-विधीप्रमाणें निषेधहि ब्रह्मबोधाचा उपाय आहे. त्यामुळें त्याला ब्रह्मोपाधित्व आहे, हें दृढ करण्यासाठीं विधि व निषेध या दोहोंनाहि ब्रह्मज्ञानाचें उपायत्व आचार्यांनीं सांगितलें आहे, असें दर्शवितात-

अतद्व्यावृत्तिरूपेण साक्षाद्विधिमुखेन च ।
वेदान्तानां प्रवृत्ति: स्याद्द्विधेत्याचार्यभाषितम् ॥८७॥

अन्वयार्थ - [अतद्व्यावृत्तिरूपेण-] ब्रह्माचे जे धर्म नव्हेत त्यांची व्यावृत्ति करून [च साक्षाद्विधिमुखेन-] व सत्यादि शब्दाचें साक्षात् विधान करून, [इति वेदान्तानां द्विधा प्रवृत्ति: स्यात्-] अशी वेदांतांची दोन प्रकारची प्रवृत्ति होतें, [इति आचार्यभाषितं अस्ति-] असें आचार्यांचें

वचन आहे.

प्रकाश- आचार्यांनी बृहद्वाक्यवृत्ति नामक ग्रंथामध्यें ही प्रस्तुत गोष्ट स्पष्टपणें सांगितली आहे. अतद्व्यावृत्ति इत्यादि - येथें जो पूर्वार्ध दिसत आहे तो स्वत: आचार्यकृत असून उत्तरार्ध श्रीभारतीतीर्थ मुनिप्रणीत आहे. अज्ञानादि जे ब्रह्माचे धर्म नव्हेत त्यांची 'नेति नेति' इत्यादि वाक्यांनीं निवृत्ति करणें ही वेदान्तींची निषेधरूप प्रवृत्ति व सत्यं, ज्ञानं, अनंतं, आनंदं, इत्यादि जे साक्षात् ब्रह्मस्वरूपाचें प्रतिपादन करणारे शब्द आहेत त्यांचा प्रयोग करणें, ही विधानरूप प्रवृत्ति होय. ह्या दोन्ही प्रकारच्या प्रवृत्तीनें ब्रह्मप्रतिपादन होत असतें. सारांश, हें आचार्यांचेंच मत असल्यामुळें संप्रदायास सोडून आहे, असें कोणासहि म्हणतां येणार नाहीं. ॥८७॥

-'वेदान्त म्ह० उपनिषदें अतदव्यावृत्तिरूपानें ब्रह्माचा बोध करितात, असें म्हटल्यास 'अहं-' शब्दाचा अर्थ जो कूटस्थ त्याचाहि त्याग करण्याचा प्रसंग येतो. कारण तोहि ब्रह्मभिन्न पदार्थ आहे आणि त्याचा त्याग केल्यावर 'अहं ब्रह्मास्मि' असें सामानाधिकरण्यानें ज्ञान उत्पन्न होऊं शकणार नाहीं,' अशी शंका घेऊन समाधान-

अहमर्थपरित्यागादहं ब्रह्मेति धी: कुत: ।
नैवमंशस्य हि त्यागो भागलक्षणयोदित: ॥८८॥

अन्वयार्थ-[अहमर्थपरित्यागात् अहं ब्रह्म इति धी: कुत:-] 'अहं' या शब्दाच्या अर्थाचा परित्याग केल्यामुळें 'अहं ब्रह्म' असें ज्ञान कोठून होणार ? असें तूं म्हणशील [न एवं-] पण तें बरोबर नाहीं. [हि भागलक्षणया अंशस्य त्याग: उदित:-] कारण भागलक्षणेनें अंशाचा त्याग करावा, असें पूर्वींच सांगितलें आहे.

प्रकाश:- ब्रह्माचें जे धर्म नव्हेत त्यांचा त्याग करावयाचा असें म्हटल्यास अहं शब्दाचा अर्थ जो कूटस्थ आत्मा त्याचाहि त्याग करावा लागणार व कूटस्थाचा त्याग केल्यावर 'मी ब्रह्म आहे' असें ज्ञान कसें होईल ? अशी येथें वादी शंका करीत आहे. पण सिद्धान्ती म्हणतात कीं, ही तुझी शंका अयुक्त आहे. कारण, जहदजहत् लक्षणेनें 'अहं' शब्दाचा जो अर्थ आहे त्यांतील जडांशाचा मात्र त्याग करावा, असें आम्ही पूर्वीं सांगितलें आहे. त्यामुळें कूटस्थाचा त्याग करण्याचा प्रसंग येत नसून त्याच्या शुद्ध स्वरूपाचें ब्रह्माशीं ऐक्य आहे, असें ज्ञान होणें शक्य आहे. ॥८८॥

-'अहं-' शब्दाच्या अर्थातील जडांशाचा त्याग केला असतां बोध कसा होतो, तें आतां येथें दाखवितात-

अंत:करणसंत्यागादवशिष्टे चिदात्मनि ।
अहं ब्रह्मेति वाक्येन ब्रह्मत्वं साक्षिणीक्ष्यते ॥८९॥

अन्वयार्थ - [अंत:करणसंत्यागात्-] अंत:करणाचा पूर्णपणें त्याग केल्यावर **[अवशिष्टे साक्षिणि चिदात्मनि-] अवशिष्ट राहिलेल्या साक्षी चिदात्म्याच्या ठिकाणीं ['अहं ब्रह्म' इति वाक्येन-] 'मी ब्रह्म आहें' या वाक्याच्या योगानें [ब्रह्मत्वं ईक्ष्यते-] ब्रह्मत्व पाहिलें जातें.**

प्रकाश- अहं शब्दाच्या अर्थांत अंत:करण हाच जडांश आहे; व तो जडांश असल्यामुळेंच आत्म्याचा धर्म नव्हे हें उघड आहे. यास्तव पूर्वोक्त लक्षणेनें त्याचा त्याग केला असतां अंत:करणावांचून राहणारें जें साक्षि चैतन्य तेंच ब्रह्म होय असा महा भाग्यवान् पुरुषास साक्षात्कार होतो. या साक्षात्काराचें निमित्त 'मी ब्रह्म आहें' हें महावाक्यच आहे. ॥८९॥

-'अहो पण केवल प्रत्यगात्मा स्वप्रकाश असल्यामुळें तो बुद्धिवृत्तीचा विषय होऊं शकत नाहीं,' अशी शंका घेऊन सांगतात-

स्वप्रकाशोऽपि साक्ष्येव धीवृत्त्या व्याप्यतेऽन्यवत् ।
फलव्याप्यत्वमेवास्य शास्त्रकृद्भिर्निवारितम् ॥९०॥

अन्वयार्थ- [साक्षी स्वप्रकाश: अपि-] साक्षी

स्वप्रकाश जरी असला, तरी [अन्यवत् धीवृत्त्या व्याप्यते एव-] घटादिकांप्रमाणें बुद्धिवृत्तीकडून व्यापिला जातोच.[शास्त्रकृद्भिः अस्य फलव्याप्यत्वं एव निवारितं अस्ति-] शास्त्रकारांनीं यांच्या फलव्याप्यतेचें मात्र निवारण केलें आहे.

प्रकाश- साक्षी चिदात्मा स्वयंप्रकाश आहे, हें खरें. पण अज्ञानकृत आवरणाचें निवारण करण्याकरितां बुद्धिवृत्तीची आवश्यकता आहे. व त्यामुळें तत्त्वमस्यादि वाक्यांच्या विचारानें उत्पन्न होणारी जी शेवटची शुद्ध बुद्धिवृत्ति ती या अवशिष्ट राहणाऱ्या साक्षी चैतन्यास व्यापून सोडते. कशी व्यापून टाकिते म्हणून कोणी म्हणेल, म्हणून भारतीतीर्थांनीं येथें 'अन्यवत्' असा दृष्टान्त दिला आहे. म्हणजे घटादि जड पदार्थांचें अज्ञानावरण नष्ट करून जशी बुद्धिवृत्ति त्यांस व्यापते, त्याप्रमाणें या साक्षीसहि ती व्यापते.

शंका- स्वप्रकाश आत्म्यासहि जर बुद्धि वृत्ति घटादिकांप्रमाणें व्यापित असेल, तर तो आत्मा घटादिकांप्रमाणे जड आहे, असें म्हणण्यास तरी काय हरकत आहे ?

समाधान - साक्षिलक्षण असें जें हें ब्रह्म आहे तें अंत:करणवृत्तिव्याप्य आहे. फलव्याप्य मात्र नाहीं. असें पूर्वींच्या सूत्रकारादि आचार्यांनीं म्हटलें आहे. फल म्हणजे अंत:करणवृत्तीमध्यें प्रतिबिंबित होणारा चिदाभास-त्याच्या योगानें घटादि जड पदार्थ व्यापिले जातात. म्हणून त्यास फलव्याप्य म्हटलें आहे. पण कूटस्थ आत्मा स्वप्रकाश असल्यामुळें त्याला हें फल व्यापित नाहीं. पण 'मी स्वप्रकाश ब्रह्म आहें' असें ज्ञान होण्यास बुद्धिवृत्तीची अपेक्षा आहे. यास्तव साक्षी आत्मा वृत्तिव्याप्य आहे व फलव्याप्य मात्र नाहीं; असा सिद्धांत ठरला. ॥९०॥

-आत्म्याच्या ठिकाणीं फलव्याप्तीचा अभाव आहे, हें दाखविण्यासाठीं अनात्म्याला वृत्तिव्याप्यत्व व फलव्याप्यत्वहि असतें, असें दाखवितात-

बुद्धितत्स्थचिदाभासौ द्वावपि व्याप्नुतो घटम् ।
तत्राज्ञानं धिया नश्येदाभासेन घट: स्फुरेत् ॥९१

अन्वयार्थ - [बुद्धितत्स्थचिदाभासौ द्वौ अपि घटं व्याप्नुत:-] बुद्धि व बुद्धिस्थ चिदाभास असे दोन्ही घटास व्यापितात. [तत्र धिया अज्ञानं नश्येत्-] त्यांतील बुद्धीच्या योगानें अज्ञान नष्ट होतें [च आभासेन घट: स्फुरते-] व आभासाच्या योगानें घट स्फुरतो.

प्रकाश- 'नैयायिकांच्या मताप्रमाणें पाहिलें असतां इंद्रियें व विषय यांच्या सन्निकर्षापासून होणारें ज्ञान प्रत्यक्ष; परामर्शापासून होणारें ज्ञान अनुमान; इत्यादि ठरतें, हें खरें, पण ती ज्ञानाची सामान्य व्याख्या आहे. व ज्ञानामध्यें सूक्ष्म व सूक्ष्मतर भेद असल्यामुळें ज्ञानविशेषस्थळींहि तीच लागू पडेल, असें म्हणणे अयुक्त होय' असा भाव मनामध्यें धरून श्रीभारतीतीर्थ म्हणतात-बुद्धिवृत्ति व बुद्धिवृत्तिस्थ चिदाभास हीं दोन्हीं जड विषयास व्यापतात. पण 'अशा प्रकारें दोन प्रकारच्या व्याप्तीचें ग्रहण करण्याचें कारण काय ?' असें कोणी विचारतील म्हणून उत्तरार्धांत त्याचें कारण सांगतात-प्रमाणभूत बुद्धिवृत्तीच्या योगानें ज्या पदार्थाशीं तिचा संयोग झाला असेल, त्या पदार्थाविषयींचें अज्ञान नष्ट होतें आणि त्या वृत्तींतील चैतन्याच्या आभासानें घटाचें स्फुरण होतें. कारण घट स्वत: जड असल्यामुळें त्याचें स्फुरण [भान] दुसऱ्या स्फुरणवान् पदार्थावांचून होणें शक्य नाहीं. यास्तव कोणत्याहि जड पदार्थाचें ज्ञान होण्यास बुद्धिवृत्ति व तिच्यांतील आभास यांचीं आवश्यकता आहे असें स्पष्ट झालें. ॥९१॥

-पण आतां आत्म्यामध्यें त्याहून वैलक्षण्य दाखवितात-

ब्रह्मण्यज्ञाननाशाय वृत्तिव्याप्तिरपेक्षिता ।

स्वयंस्फुरणरूपत्वान्नाभास उपयुज्यते ॥९२॥

अन्वयार्थ - [**अज्ञाननाशाय ब्रह्मणि वृत्तिव्याप्तिः अपेक्षिता-**] अज्ञानाच्या नाशार्थ ब्रह्माच्या ठिकाणीं वृत्तिव्याप्ति अपेक्षित आहे; [किं तु स्वयंस्फुरण-रूपत्वात् आभासः न उपयुज्यते-] पण तें स्वतः स्फुरणरूप असल्यामुळें तेथें आभासाचा कांहीं उपयोग नाहीं.

प्रकाशः- प्रत्यगात्मा व ब्रह्म यांचें ऐक्य आहे. अशा प्रकारचें जें ज्ञान तें स्वरूपाच्या अज्ञानामुळें आवृत्त झालेलें (झांकलेले) असतें; व त्या अज्ञानावरणाची निवृत्ति करण्यास्तव महावाक्याच्या योगानें उत्पन्न होणाऱ्या बुद्धिवृत्तीची अपेक्षा असते. यास्तव आत्मसाक्षात्कारास बुद्धिवृत्तीची अपेक्षा आहे. पण साक्षी स्वतः स्फुरणरूप असल्यामुळें जड पदार्थांप्रमाणें त्याच्या स्फुरणास चिदाभासाच्या उसन्या स्फुरणाची अपेक्षा नसते. जेथें जेथें बुद्धिवृत्ति जाते, तेथें तेथें तोंहि जातो हें खरें; पण त्याचा स्फुरणरूप पदार्थाच्या ठायीं कांहीं उपयोग होत नाहीं, असा याचा भावार्थ समजावा. ॥९२॥

-हाच सिद्धान्त दृष्टान्त देऊन विशद करितात-

चक्षुर्दीपावपेक्ष्येते घटादेर्दर्शने यथा ।
न दीपदर्शने किं तु चक्षुरेकमपेक्ष्यते ॥९३॥

अन्वयार्थ - [**यथा घटादेः दर्शने चक्षुर्दीपौ अपेक्ष्येते तथा दीपदर्शने न-**] **जशी घटादि पदार्थांच्या दर्शनास नेत्र व दीप या दोहोंची अपेक्षा असते तशी दीपदर्शनास नसते.** [**किं तु एकं चक्षुः अपेक्ष्यते-**] **तर एका चक्षूचीच अपेक्षा असते.**

प्रकाशः- अंधकारांत असलेले घटादि पदार्थ ज्याला पाहावयाचे असतात, तो दीप व नेत्र या दोन्ही साधनांची अपेक्षा करितो. कारण दिव्याच्या योगानें अंधकाराचा नाश झाल्यावर नेत्र पदार्थांस पाहूं शकतात. पण दिवा पाहांतांना तो अंधकारावृत नसल्यामुळें नुस्त्या डोळ्यांनींच त्याचें दर्शन होतें. व हाच प्रकार ब्रह्मज्ञानाविषयींहि समजावा. या दृष्टांतांतील नेत्र दीप व अज्ञान यांच्या ठायीं क्रमानें दार्ष्टांतिकांतील बुद्धिवृत्ति आभास व अस्फुरण घ्यावें म्हणजे कांहीं शंका राहणार नाहीं. ॥९३॥

-'अहोपण, चिदाभासानें युक्त असणें हा बुद्धि व बुद्धिवृत्ति यांचा स्वभावच आहे. त्यामुळें घटादिकांप्रमाणें ब्रह्मामध्येंहि फलव्याप्ति अवश्य होईल. तुम्हांला तिचें निवारण करितां येणार नाहीं,' अशी शंका घेऊन सांगतात-

स्थितोऽप्यसौ चिदाभासो ब्रह्मण्येकीभवेत्परम् ।
न तु ब्रह्मण्यतिशयं फलं कुर्याद्घटादिवत् ॥९४॥

अन्वयार्थ - [**असौ चिदाभासः स्थितः अपि ब्रह्मणि परं एकीभवेत्-**] **हा चिदाभास जरी वृत्तींत असला तरी तो ब्रह्मामध्यें अगदीं मिळून जातो.** [**तु घटादिवत् ब्रह्मणि अतिशयं फलं न कुर्यात्-**] **तो घटादि पदार्थांप्रमाणें ब्रह्माच्या ठिकाणीं अतिशयाख्या फल उत्पन्न करीत नाहीं.**

प्रकाशः- वृत्तीच्या बरोबर चिदाभासहि पदार्थापर्यंत जातो. पण स्वयंप्रकाश ब्रह्माच्या ठायीं त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. याला उदाहरण - मध्याह्नसमयीं प्रखर उन्हामध्यें जर कोणी एकादा दिवा लावून ठेविला, तर त्याचा त्या उन्हापुढें प्रकाश पडून तो उन्हाच्या ज्ञानास साह्य करील का ? कधींहि नाहीं. पण तेंच तो दीप अंधकार पसरला आहे, तेथें न्या. म्हणजे तो आपला प्रभाव कसा दाखवितो तें समजेल. अथवा आरशामध्यें सूर्याचें प्रतिबिंब घेऊन त्याचे किरण जेथें अंधकार आहे अशा एकाद्या अंधारकोठडींत पाडा; म्हणजे तें प्रतिबिंब अंधकारास हटवून तेथील पदार्थ व्यक्त करीत आहे असें तुम्हांस दिसेल. पण तेंच प्रतिबिंब सूर्याच्या समोर पाडा म्हणजे तें निस्तेज होऊन सूर्याच्या प्रखर प्रकाशांत मिळून गेलें आहे असें दिसेल त्याच्यामुळे सूर्यामध्यें काडीइतका तरी फरक पडला आहे असें तुम्हांस म्हणतां येणार

नाहीं. प्रस्तुत स्थळींहि हाच न्याय लागू होतो. म्हणजे ब्रह्माकार बुद्धिवृत्तीमध्येंहि स्वभावत: रहाणारा चिदाभास, ब्रह्माच्या समोर जातांच तदाकार होऊन जातो. व ब्रह्माच्या स्वरूपांत यत्किंचित्‌हि फरक पाडण्याचें त्याच्यामध्यें सामर्थ्य नसतें. ॥९४॥

-'अहोपण, ब्रह्माध्यें फलव्याप्ति नाहीं वृत्तिव्याप्ति आहे,' या तुमच्या म्हणण्याला प्रमाण काय ?' उत्तर -

अप्रमेयमनादिं चेत्यत्र श्रुत्येदमीरितम्‌ ।
मनसैवेदमाप्तव्यमिति धीव्याप्यता श्रुता ॥९५॥

अन्वयार्थ - **[अप्रमेयं अनादिं च इत्यत्र श्रुत्या इदं ईरितं अस्ति-] 'तें अप्रमेय व अनादि आहे,' या ठिकाणीं श्रुतीनें हें फलव्याप्तिराहित्य सांगितलें आहे. [तथा मनसा एव इदं आप्तव्यं इति धीव्याप्यता श्रुता अस्ति-] व 'मनानेंच तें ग्रहण करितां येण्यासारखें आहे' अशी श्रुतीनें त्याची बुद्धिव्याप्यता सांगितली आहे.**

प्रकाश:- अमृतबिंदू नामक उपनिषदामध्यें एक मंत्र आहे तो, असा:- 'निर्विकल्पमनंतं च हेतुदृष्टान्तवर्जितम्‌ । अप्रमेयमनादिं च यज्ज्ञात्वा मुच्यते बुध:' याचें तात्पर्य:-विकल्परहित, अनंत, हेतु व दृष्टान्त यांनीं शून्य, अप्रमेय व अनादि असें जें ब्रह्म, त्याचा साक्षात्कार झाला असतां ज्ञानी मुक्त होतो. या स्थळीं ब्रह्म प्रमाणशून्य असल्यामुळें फलव्याप्तिरहित आहे असें व्यक्त होते. त्याचप्रमाणें कठोपनिषदांत ''मनसैवेदमाप्तव्यं नेह नानास्ति किंचन'' असें वचन आहे. व त्याचा भावार्थ-मनानेंच हें ग्रहण करितां येण्यासारखें आहे. या सृष्टींत द्वैत मुळींच नाहीं- असा आहे. या वचनावरून महावाक्यजन्य शुद्ध बुद्धिवृत्तीच्या योगानें ब्रह्म व्याप्त होतें, असें ठरतें. ॥९५॥

-'आत्मानं चेद्विजा नीयात्‌' या मंत्रानें अपरोक्ष ज्ञान व शोकनिवृत्ति या जीवाच्या अवस्था सांगितल्या आहेत, असें ४८ व्या श्लोकांत म्हटलें आहे. पण त्या मंत्रांतील केवढ्या भागानें अपरोक्ष ज्ञान सांगितलें आहे, तें सांगतात-

आत्मानं चेद्विजानीयादयमस्मीति वाक्यत: ।
ब्रह्मात्मव्यक्तिमुल्लिख्य यो बोध:सोऽभिधीयते ॥९६

अन्वयार्थ - **['आत्मानं चेद्विजानीयादयमस्मि' इति वाक्यत:-] 'आत्मानं... अस्मि' या वाक्यावरून [ब्रह्मात्मव्यक्तिं उल्लिख्य य: बोध: जायते-] सत्यादिलक्षण ब्रह्मच आत्मा आहे, असें आत्मरूप जाणून जो बोध उत्पन्न होतो, [स: अनेन अभिधीयते-] तोच या वाक्यानें सांगितला जात आहे.**

प्रकाश:- श्रुतिवाक्यांचें श्रवण होऊन त्याविषयीं योग्य दिशेनें विचार केला असतां ब्रह्मात्मसाक्षात्कार होतो म्हणजे 'मीच ब्रह्म आहें' असें साधकास निश्चयपूर्वक समजतें. ह्याप्रमाणें होणारा जो वाक्यजन्य अपरोक्ष बोध, त्याचेंच या श्रुतीनें प्रतिपादन केलें आहे म्हणजे प्रस्तुत श्रुतीचा अशा प्रकारचा बोध, हाच अर्थ होय. ॥९६॥

-'तर मग वर सांगितल्याप्रमाणें एकदा महावाक्याचा विचार केल्यानेंच जर अपरोक्ष ज्ञान होत असेल तर बादरायणाचार्यांनीं 'आवृत्तिरस. कृदुपदेशात्‌'- ब्र. सू. ४. १. १- या सूत्रांत ज्याचें विधान केलें आहे तो श्रवणाचा अभ्यास अननुष्ठेय होईल म्ह० तो श्रवणाभ्यास करण्याची कांहीं आवश्यकता नाहीं, असें होईल' अशी आशंका घेऊन सांगतात-

अस्तु बोधोऽपरोक्षोऽत्र महावाक्यात्तथाऽप्यसौ ।
न दृढ: श्रवणादीनामाचार्यै: पुनरीरणात्‌ ॥९७

अन्वयार्थ - **[अत्र महावाक्यात्‌ अपरोक्ष: बोध: अस्तु-] या ब्रह्मात्मविषयामध्यें महावाक्यावरून अपरोक्ष बोध होवो [तथापि असौ दृढ: न भवति-]**

तरी पण तो दृढ होत नाहीं. [आचार्यैः श्रवणादीनां पुनः ईरणात्-] म्हणून आचार्यांनीं श्रवणादिकांचें पुनरपि विधान केलें आहे.

प्रकाश:- श्रीमत् वेदव्यास, श्रीमत् शंकराचार्य इत्यादि पूज्य व सर्वज्ञ पुरुषांनीं श्रवणादि मुख्य साधनांची पुनः पुनः आवृत्ति करण्याविषयीं जें सांगितलें आहे, तें वाक्यावरून एकदा झालेलें अपरोक्ष ज्ञान दृढ होण्याकरितां होय. कारण अपरोक्ष ज्ञान जर दृढ न झालें, तर अन्त्य कालीं इंद्रियादि व्याकुळ झालीं असतां इष्ट अन्त्य मति उत्पन्न होणार नाहीं; व त्यामुळें इष्ट सिद्ध होणार नाहीं; या ग्रंथाच्या द्वितीय प्रकरणाच्या १०६ व्या श्लोकामध्यें विद्यारण्यांनीं जे सांगितलें आहे कीं- 'त्यानें कोणत्याहि अवस्थेंत जरी प्राण सोडले तरी गेलेली भ्रांति पुनः येत नाहीं' त्यांच्याशीं ह्या श्लोकाचा विरोध आहे, असें कोणास वाटेल, परंतु तें बरोबर नाहीं; कारण बोध दृढ झाल्यावांचून भ्रांतीचा अत्यंत नाश होणें शक्य नाहीं. व जोपर्यंत तिचा सकारण नाश झाला नाहीं, तोंपर्यंत तिची सामग्री जमली असतां ती पुनः उत्पन्न होणार नाहीं, हें म्हणणेंहि युक्त नाहीं, तस्मात् ब्रह्मात्मैक्य बोध दृढ झाला पाहिजे. त्यावांचून परम पुरुषार्थाची प्राप्ति होणें कठिण आहे. ॥९७॥

-आचार्यांनीं प्रस्तुत विधान कोठें केलें आहे, असें कोणी विचारील म्हणून त्याचें बृहद्वाक्यवृत्तींतील एक वचन येथें देतात-

अहं ब्रह्मेति वाक्यार्थबोधो यावद्दृढीभवेत् ।
शमादिसहितस्तावदभ्यसेच्छ्रवणादिकम् ॥९८

अन्वयार्थ - ['अहं ब्रह्म' इति वाक्यार्थबोधः यावत् दृढीभवेत्-] 'मी ब्रह्म आहें' असा वाक्यार्थबोध जोंवर दृढ होई [तावत् शमादिसहितः सन् श्रवणादिकं अभ्यसेत्-] तोपर्यंत साधकानें शमादिकांनीं युक्त होऊन श्रवणादिकांचा अभ्यास करावा.

प्रकाश- ज्या व्युत्पन्न पुरुषांस शब्दार्थ समजूं लागतो, तेहि उदरभरणार्थ यावज्जीव श्रवणादिक करीत असतात. पण त्यांत त्यांचा हेतु अन्य असल्यामुळें त्यांचें फल मिळत नाहीं, यास्तव साधकानें शमादि संपन्न राहूनच ज्ञान दृढ होण्यास्तव श्रवणादिक करावें, असा याचा भावार्थ होय. प्र. ६-२८५ पहा ॥९८॥

-'अहोपण श्रुतिवाक्यरूप प्रमाणापासून उत्पन्न झालेलें ज्ञान अदृढ कां असतें ?' उत्तर-

बाढं सन्ति ह्यदार्ढ्यस्य हेतवः श्रुत्यनेकता ।
असंभाव्यत्वमर्थस्य विपरीता च भावना ॥९९

अन्वयार्थ - [हि श्रुत्यनेकता-] कारण श्रुतींची अनेकता, [अर्थस्य असंभाव्यत्वं-] त्यांच्या अर्थाचें असंभवनीयत्व [च विपरीता भावना-] व विपरीता भावना [इति अदार्ढ्यस्य हेतवः बाढं सन्ति-] असे अदृढतेचे अनेक हेतु निःसंशय आहेत.

प्रकाश- जरी साधकानें 'मी ब्रह्म आहें' इत्यादि वाक्यें ऐकलीं तरी श्रुतिअसंख्य असल्यामुळें व त्या परस्परविरुद्ध अर्थ प्रतिपादन करीत आहेत असें सामान्यतः वाटण्याचा संभव असल्यामुळें, वरील वाक्याविषयीं साधक साशंक होतो, हें अनिश्चयाचें पहिलें कारण. पूर्वोक्त वाक्यासारखीं वाक्यें जो अर्थ दाखवितात तो अलौकिक असल्यामुळें व्यावहारिक प्रत्यक्ष ज्ञानाच्या विरुद्ध आहे, असा भास होतो व त्यामुळें तो अर्थ असंभवनीय आहे असें तो म्हणतो, हें दुसरें; शिवाय, मी कर्ता, मी विद्वान्, इत्यादि प्रकारची विपरीत भावना तर बिचाऱ्या प्राण्याच्या मागें हात धुवून लागलीच आहे. सारांश, ज्ञान दृढ न होण्यास असे अनेक हेतू असल्यामुळें तें अपरोक्ष ज्ञान दृढ होण्यास्तव श्रवणादि साधनांची सतत आवृत्ति करीत असावें, असा याचा भावार्थ होय. ॥९९॥

-ह्याप्रमाणें अपरोक्ष ज्ञान दृढ न होण्याचीं तीन

कारणें आहेत, असें सांगून त्यांतील श्रुतिनानात्व या प्रथम कारणाची निवृत्ति होण्यासाठीं सतत श्रवण करावें, असें सांगतात-

शाखाभेदात्कामभेदाच्छ्रुतं कर्मान्यथान्यथा ।
एवमत्रापि मा शंकीत्यत: श्रवणमाचरेत् ॥१००

अन्वयार्थ - [शाखाभेदात् कामभेदात् कर्म अन्यथा अन्यथा श्रुतं-] **शाखाभेद व कामभेद यांच्या योगानें कर्म निरनिराळ्या प्रकारचें श्रुत आहे.** [एवं अत्र अपि इति मा शंकि इति अत: असौ श्रवणं आचरेत्-] **तसेंच येथेंहि असेल, अशी साधकास शंका येऊं नये म्हणून त्यानें श्रवण करावें.**

प्रकाश:- कर्मकांडामध्यें शाखाभेदप्रयुक्त व कामभेदप्रयुक्त भिन्न भिन्न कर्म सांगितलेलें आढळतें. तसाच प्रकार या ज्ञानकांडांत असल्यामुळें श्रुति भिन्न भिन्न उपदेश करीत आहे, असें साधकास वाटेल, पण तें बरोबर नाहीं. कारण कामना भिन्न भिन्न असल्यामुळें कर्म भिन्न भिन्न होणें साहजिक आहे. त्याचप्रमाणें शाखाभेदामुळेंहि कर्मामध्यें अंतर पडणें शक्य आहे. पण ज्ञानाची तशी गोष्ट नाहीं. कारण 'ज्ञान वस्तुतंत्र आहे. प्रमाणतंत्र नव्हे' असें भाष्यकारांनीं शारीरकांत म्हटलें आहे. यास्तव साधकानें श्रुतीच्या अनेकत्वामुळें उत्पन्न होणारा अनिश्चय घालविण्याकरितां वारंवार श्रवण करावें. ॥१००॥

-आतां श्रवण म्हणजे काय, तें सांगतात-

वेदान्तानामशेषाणामादिमध्यावसानत: ।
ब्रह्मात्मन्येव तात्पर्यमिति धी: श्रवणं भवेत् ॥१

अन्वयार्थ - [अशेषाणां वेदान्तानां आदिमध्यावसानत:-] सर्व वेदान्तांच्या उपक्रमोपसंहारादिकांचा विचार केला असतां, [ब्रह्मात्मनि एव तात्पर्यं इति धी: श्रवणं भवेत्-] **ब्रह्मात्म्यामध्येंच तात्पर्य आहे, अशी बुद्धी होणें, हेंच श्रवण होय.**

प्रकाश:- चारी वेदांचीं जीं उपनिषदें आहेत, त्या सर्वांचें तात्पर्य ब्रह्म व आत्मा यांच्या ऐक्यप्रतिपादनामध्यें आहे, असें उपक्रमोपसंहार, अभ्यास, फल इत्यादि तात्पर्यबोधक चिन्हांवरून ठरविणें हेंच श्रवण होय. याच्या योगानें श्रुति अनेक आहेत व त्या अनेक प्रकारचा बोध करीत आहेत, ही भावना नष्ट होते, आणि सर्व श्रुतींचें साक्षात् किंवा परंपरेनें ब्रह्मात्मैक्यामध्येंच तात्पर्य आहे, असा दृढ निश्चय होतो. ॥१०१॥

-पण अशा प्रकारचें हें श्रवण कोठें सांगितलेलें आहे तें आतां सांगतात-

समन्वयाध्याय एतत्सूक्तं धीस्वास्थ्यकारिभि: ।
तर्कै: संभावनाऽर्थस्य द्वितीयाध्याय ईरिता ॥२

अन्वयार्थ - [एतत् समन्वयाध्याये सूक्तं अस्ति-] **हें उत्तरमीमांसेच्या 'समन्वय'-नामक प्रथम अध्यायांत उत्तम प्रकारें सांगितलें आहे.** [द्वितीयाध्याये धीस्वास्थ्यकारिभि: तर्कै: अर्थस्य संभावना ईरिता-] **दुसऱ्या अध्यायांत बुद्धीचें समाधान करविणाऱ्या तर्कांच्या योगानें शास्त्रार्थाची संभावना सांगितली आहे.**

प्रकाश:- उत्तरमीमांसा म्हणजे वेदान्त शास्त्र. त्याचे चार अध्याय असून प्रत्येक अध्यायाचे चार पाद आहेत. प्रथम अध्यायास समन्वयाध्याय, दुसऱ्यास अविरोधाख्याध्याय, तिसऱ्यास साधनाध्याय व चवथ्यास फलाध्याय असें म्हणतात. पहिल्या अध्यायांत सर्व उपनिषद्वाक्यांचा समन्वय केला आहे. दुसऱ्यांत श्रुतिप्रोक्त अर्थ तर्कानेंहि सिद्ध होतो व त्याचा कोणत्याहि स्मृतीशीं विरोध नाहीं, असें दाखविलें आहे. तिसऱ्यांत वैराग्यादि साधनें व चौथ्यांत अनेकविध फल सांगितल आहे. यास्तव ज्याला पूर्वोक्त श्रवण पाहिजे असेल त्यानें समन्वयाध्यायाचा अभ्यास करावा. कारण श्रीमद्व्यास, श्रीमच्छंकराचार्य इत्यादि पूज्य पुरुषांनीं त्याचा तेथें उत्तम प्रकारें उल्लेख केला आहे. व दुसऱ्या अध्यायांत श्रुतिसिद्ध अर्थ संभवतो असें दाखविलें आहे. कारण अनेक तर्क करण्याचीच ज्यांस संवय

आहे त्यांच्या बुद्धीचें समाधान तर्कावांचून होणार नाहीं, असें जाणून पूर्वोक्त आचार्यांनींहि श्रुतीला अनुकूल असे तर्क करण्याची दिशा दाखविली आहे. सारांश, अशा प्रकारच्या ग्रंथावलोकनानें श्रुति अनेक प्रकार सांगत आहे, ही शंका निवृत्त होते. ॥१०२॥

-आतां पुढील दोन श्लोकांत विपरीत भावना व तिच्या निवृत्तीचा उपाय सांगतात -

बहुजन्मदृढाभ्यासाद्देहादिष्वात्मधीः क्षणात् ।
पुनः पुनरुदेत्येवं जगत्सत्यत्वधीरपि ॥३

अन्वयार्थ - [बहुजन्मदृढाभ्यासात् देहादिषु आत्मधीः क्षणात् उदेति-] अनेक जन्मांतील दृढ अभ्यासामुळें देहादिकांच्या ठिकाणीं तत्क्षणीं आत्मबुद्धि उत्पन्न होते. [एवं जगत्सत्यत्वधीः अपि पुनः पुनः उदेति-] त्याचप्रमाणें जगत् सत्य आहे, ही बुद्धिहि पुनः पुनः उत्पन्न होते.

प्रकाशः- विपरीत भावना दोन प्रकारची असते. एक साधनविपरीतभावना व दुसरी फलविपरीतभावना. व ही दोन प्रकारची भावनाच या श्लोकांत दाखविली आहे. देहच आत्मा आहे, त्याहून अन्य व देहादिकांचा चिन्मात्र साक्षी असा दुसरा कोणी नाहीं, असें वाटणें ही पहिली व हें द्वैतच सत्य आहे, ब्रह्मानंदलक्षण कैवल्य नव्हे, ही दुसरी भावना होय. ॥१०३॥

विपरीता भावनेयमैकाग्र्यात्सा निवर्तते ।
तत्त्वोपदेशात्प्रागेव भवत्येतदुपासनात् ॥४

अन्वयार्थ - [इयं विपरीता भावना सा ऐकाग्र्यात् निवर्तते-] ही विपरीत भावना आहे. ती ऐकाग्र्याच्या योगानें निवृत्त होते [एतत् तत्त्वोपदेशात् प्राक् एव उपासनात् भवति-] व हें ऐकाग्र्य तत्त्वोपदेशाच्या पूर्वींच उपासनेच्या योगानें होतें.

प्रकाशः- चित्ताच्या एकाग्रतेचा निर्देश श्रीविद्यारण्यांनीं द्वितीय प्रकरणाच्या ७२/७३ श्लोकांत केला आहे. चित्त एकाग्र झालें असतां पूर्वोक्त दोन्ही प्रकारची विपरीत भावना नष्ट होते. पण चित्ताचें ऐकाग्र्य कसें होईल ? असें कोणी विचारतील म्हणून ग्रंथकार सांगतात कीं, सगुण व निर्गुण ब्रह्म, दहर, प्रतीक इत्यादि ज्या अनेक प्रकारच्या उपासना आहेत, त्यांतील कोणतीहि एकादी उपासना करून तिच्या द्वारा चित्ताची एकाकार वृत्ति संपादन करण्याकरितां पुनः पुनः प्रयत्न केला असतां तत्त्वज्ञानाचा उपदेश होण्यापूर्वींच चित्तैकाग्र्य होतें. सारांश, चित्तैकाग्र्याच्या योगानें पूर्वोक्त विपरीत भावना नष्ट होतात. ॥१०४॥

-पण हें तुम्हांला कशावरून कळलें, म्हणून विचाराल तर सांगतों-

उपास्तयोऽत एवात्र ब्रह्मशास्त्रेऽपि चिन्तिताः ।
प्रागनभ्यासिनः पश्चाद्ब्रह्माभ्यासेन तद्भवेत् ॥५

अन्वयार्थ - [अतः एव अत्र ब्रह्मशास्त्रे अपि उपास्तयः चिन्तिताः-] एवढ्याकरितांच या ब्रह्मशास्त्रामध्येंहि उपासनांचा विचार केला आहे. [प्राग् अनभ्यासिनः पश्चात् ब्रह्माभ्यासेन तत् भवेत्-] जे पूर्वीं अभ्यास करीत नाहींत, त्यांच्या चित्ताचें ऐकाग्र्य मागून ब्रह्माभ्यासानें होतें.

प्रकाशः- या ब्रह्मशास्त्रामध्यें (शारीरकांत) तिसऱ्या अध्यायांत उपासनांचा विचार केला आहे. त्यावरून पूर्वोक्त प्रकार सिद्ध होतो, ब्रह्मज्ञानामध्यें प्रवृत्त होण्यापूर्वीं ज्यांनीं उपासना केलेली नसते त्यांच्या चित्ताचें ऐकाग्र्य तत्वोपदेशानंतर ब्रह्मज्ञानाच्या अभ्यासानें होतें. जीवन्मुक्तिविवेकांत असें सांगितलें आहे-विद्येचा अधिकारी दोन प्रकारचा असतो. ज्यानें उपासना केली आहे असा एक व ज्यानें ती केलेली नाहीं असा दुसरा. त्यांतील उपास्य देवतेचा साक्षात्कार होईतों उपासना करून जर अधिकारी पुरुष ज्ञानामध्यें प्रवृत्त झाला, तर त्याचा वासनाक्षय व मनोनाश दृढ झालेला असल्यामुळें ज्ञानानंतर त्याचा विद्वत्संन्यास व जीवन्मुक्ति हीं आपोआप सिद्ध होतात, व शास्त्रास मान्य असलेला असा हाच मुख्य अधिकारी होय. पण आज काल अशा प्रकारचे अधिकारी फारसे आढळत नाहींत.

प्राय:उपासना केल्यावांचून केवल उत्सुकतेनें विद्येमध्यें प्रवृत्त होणारेच फार. ते तात्कालिक वासनाक्षय व मनोनाश संपादन करून श्रवणादि साधनामध्यें निमग्न होतात. श्रवणादि साधनांचा दृढ अभ्यास झाल्यानें त्यांनाहि अज्ञानादिकांच्या नाशानंतर तत्त्वज्ञान होतें. व त्यास बाध करणाऱ्या अज्ञानादिकांची पुन: उत्पत्ति होत नसल्यामुळें तें ज्ञान पुनरपि शिथिलहि होत नाहीं; हें सर्व खरें. पण वासनाक्षय व मनोनाश यांविषयीं त्यांचा दृढ अभ्यास झालेला नसल्यामुळें प्रारब्धकर्मवशात् त्यांची वारंवार निवृत्ति होते. (म्हणजे वासना उत्पन्न होते व मन चंचल होतें.) व त्यामुळें ज्ञानानंतर वासनादि क्षयाविषयीं सतत प्रयत्न न केल्यास असल्या संन्याशांस जीवन्मुक्तीचा लाभ होत नाहीं. यास्तव आधुनिक संन्याशांस तत्त्वज्ञानानंतरहि ब्रह्मचिंतन सतत केलें पाहिजे. त्यावांचून त्यांच्या चित्ताचें ऐकाग्र्य होणार नाहीं. ॥१०५॥

- ब्रह्माभ्यासाचें स्वरूप-

तच्चिन्तनं तत्कथनमन्योन्यं तत्प्रबोधनम् ।
एतदेकपरत्वं च ब्रह्माभ्यासं विदुर्बुधा: ॥६

अन्वयार्थ - [तच्चिंतनं तत्कथनं अन्योन्यं तत्प्रबोधनं-] त्याचें चिंतन, त्याचें वर्णन, परस्पर त्याचाच उपदेश, [च एतदेकपरत्वं बुधा: ब्रह्माभ्यासं विदु:-] व ह्याप्रमाणें केवल त्याच्यामध्येंच तल्लीन होऊन राहणें, यास ज्ञानीं ब्रह्माभ्यास असें म्हणतात.

प्रकाश- एकांतांत बसून गुरुमुखानें ज्याचें श्रवण झालें आहे, अशा ब्रह्माचेंच चिंतन करणें, त्याचेंच कीर्तन करीत असणें, बरोबरीचा कोणी भेटला असतां एकमेकांस त्याचाच बोध करणें व ह्याप्रमाणे केवल ब्रह्ममय होऊन राहणें, हाच ब्रह्माभ्यास होय. म्हणजे ज्याप्रमाणें एकादा विषयी पुरुष विषयमय होऊन जातो व त्यास त्या इष्ट विषयापुढें दुसरें कांहीं सुचत नाहीं, त्याचप्रमाणें साधकानें ब्रह्ममय होऊन राहावें व अन्नादि अति अवश्य पदार्थहि नीरस आहेत असें समजावें. ही अवस्था प्राप्त झाली असतां जरी तो संन्यासकाळीं दुसऱ्या प्रकारचा (गौण) अधिकारी असला, तरी ज्ञानानंतर उत्तम सिद्ध होतो. म्हणजे त्याच्या चित्तानें निश्चल ऐकाग्र्य होतें. ॥१०६॥

-केवल ब्रह्मपर कसें व्हावें, तें विशद करण्यासाठीं श्रुतीचा अनुवाद करितात-

तमेव धीरो विज्ञाय प्रज्ञां कुर्वीत ब्राह्मण: ।
नानुध्यायाद्बहूञ्छब्दान्वाचो विग्लापनं हि तत् ॥७

अन्वयार्थ - [धीर: ब्राह्मण: तं एव विज्ञाय प्रज्ञां कुर्वीत-] धीर मुमुक्षूनें त्यालाच जाणून चित्तैकाग्र्य करावें. [बहून् शब्दान् न अनुध्यायात्-] पुष्कळ शब्दांचें अध्ययन करूं नये. [हि तत् वाच: विग्लापनं अस्ति-] कारण बहुत अध्ययन वाणीला श्रांत करितें.

प्रकाश:- धीर:- ब्रह्मचर्यादिकांच्या योगानें युक्त. ब्राह्मण:- ब्रह्म होण्याची इच्छा करणारा मुमुक्षु. तं एव- अखंड आत्म्यालाच; विज्ञाय-नि:संशय साक्षात्कार करून घेऊन, प्रज्ञां कुर्वीत-ब्रह्म व आत्मा यांचें ऐक्य आहे अशा प्रकारच्या ज्ञानाच्या प्रवाहानें भरलेलें चित्ताचें ऐकाग्र्य संपादन करावें. उगीच अनेक शब्द घोकीत बसू नये. कारण असंख्य शब्दांचें स्मरण केल्यानें मन थकतें व असंख्य शब्द घोकीत बसल्यानें वाणी थकते. यास्तव एकाच तत्त्वाचें सतत अनुसंधान करीत राहावें. ह्याविषयीं काण्व श्रुति म्हणते 'पाण्डित्यं निर्विद्य बाल्येन तिष्ठासेत् पाण्डित्यं बाल्यंच निर्विद्याथ मुनिरमौनंच मौनंच निर्विद्याथ ब्राह्मण: ।' ॥१०७॥

-याप्रमाणें ऐकाग्र्याचें प्रतिपादन करणारी श्रुति सांगून स्मृतिहि सांगतात-

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जना: पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥८

अन्वयार्थ - [अनन्या: चिंतयन्त: ये जना मां

पर्युपासते -] अनन्य होऊन चिंतन करणारे जे लोक माझी उपासना करितात, [तेषां नित्याभियुक्ताना योगक्षेमं अहं वहामि-] त्या नित्य योग्यांचा योगक्षेम मी चालवितो.

प्रकाश:- अन्यन्या:- मी ब्रह्म आहें असें समजून व मद्रूप होऊन जें माझें चिंतन करितात व पर्युपासते सर्व काल माझीच उपासना करितात, त्या माझ्या स्वरूपांत तल्लीन होऊन राहणाऱ्या माझ्या भक्तांचा योगक्षेम कसा चालेल याविषयीं मी काळजी वाहातों. योग - जें प्राप्त नाहीं त्याची प्राप्ति व क्षेम - जें प्राप्त आहे त्याचें रक्षण. हा श्लोक भगवद्गीतेंतील आहे हें बहुश्रुत वाचकांच्या ध्यानांत येईलच. ॥१०८॥

-या श्रुति-स्मृतिवचनांचें तात्पर्य -

इति श्रुतिस्मृती नित्यमात्मन्येकाग्रतां धिय: ।
विधत्तो विपरीताया भावनाया:क्षयाय हि ॥९

अन्वयार्थ - [इति श्रुतिस्मृती-] अशा ह्या श्रुति व स्मृति [विपरीताया: भावनाया: क्षयाय हि-] विपरीत भावनेच्या क्षयाकरितां [आत्मनि धिय: एकाग्रतां नित्यं विधत्त:-] आत्म्याच्या ठिकाणीं बुद्धीच्या एकाग्रतेचें नित्य विधान करितात.

प्रकाश - दोन प्रकारच्या विपरीत भावनेचा क्षय होण्यास्तव चित्ताचें ऐकाग्र्य संपादिलें पाहिजे असें जें पूर्वीं म्हटलें होतें, तेंच येथें श्रुति व स्मृति यांचें प्रमाण देऊन दृढ केलें आहे. ॥१०९॥

-'देहादिकच आत्मा आहे व द्वैत सत्य आहे, या समजुतीला विपरीत भावना म्हणण्याचें कारण काय ?' उत्तर -

यद्यथा वर्तते तस्य तत्त्वं हित्वाऽन्यथात्वधी:
विपरीता भावना स्यात्पित्रादावरिधीर्यथा ॥११०

अन्वयार्थ - [यत् यथा वर्तते तस्य तत्त्वं हित्वा अन्यथात्वधी: विपरीता भावना स्यात्-] जें जसें असतें त्याचें तें तत्त्व सोडून त्याविषयीं अन्यथा बुद्धि करणें ही विपरीत भावना होय. [यथा पित्रादौ अरिधी:-] अशी पिता, माता इत्यादिकांच्या ठिकाणीं शत्रुबुद्धि.

प्रकाश- शिंप, दोरी इत्यादि पदार्थ शिंप, दोरी इत्यादि प्रकारचेच असतात. अर्थात् तेंच त्यांचें तत्त्व होय. पण तें सोडून त्यांविषयीं रजत, सर्प इत्यादि कल्पना करणें ही विपरीत भावना होय. तसेंच पिता, माता इत्यादि पुत्राचे शत्रु नव्हेत हें कोणीहि सांगेल, पण त्यांच्या ठायीं कृतघ्नपणें शत्रुत्वाची कल्पना करणें, हा अन्यथाभाव होय व त्यामुळें ती विपरीत भावना आहे. ॥११०॥

-आता हें लक्षण आत्म्याच्या ठिकाणीं योजून दाखवितात.-

आत्मा देहादिभिन्नोऽयं मिथ्या चेदं जगत्तयो:
देहाद्यात्मत्वसत्यत्वधीर्विपर्ययभावना ॥११

अन्वयार्थ - [अयं आत्मा देहादिभिन्न:-] हा आत्मा देहादिकांहून भिन्न आहे [च इदं जगत् मिथ्या -] व हें जगत् मिथ्या आहे [तयो: देहाद्यात्मत्वसत्यत्वधी: विपर्ययभावना अस्ति-] पण यांच्या ठिकाणीं देहादिरूपत्वबुद्धि व सत्यत्वबुद्धि करणें हीच विपरीत भावना आहे.

प्रकाश- शास्त्र व आत्मानुभवी पुरुष यांच्या दृष्टीनें पाहिलें असतां आत्मा देहाहून भिन्न व हें जग मिथ्या आहे, असें नि:संशय समजतें. अर्थात् तीच वस्तुस्थिति होय. पण शास्त्रादिकांच्या दृष्टीनें न पाहतां जो या मायिक दुष्ट दृष्टीनें पहातो, त्यास देह हाच आत्मा व जग सत्य आहे असें भान होतें. आत्मा व जग यांविषयीं हीच विपरीत भावना होय. जगांतील बहुतेक प्राणी हिच्या तडाख्यात सांपडलेले असतात व त्यामुळें आत्म्याचे यथार्थ ज्ञान ज्याला झालें आहे असा महापुण्यवान् पुरुष क्वचितच आढळतो. नाहींच म्हटलें तरी चालेल. ॥१११॥

-पूर्वी-श्लो. १०४-ती ऐकाग्र्यानें निवृत्त होते, असें जें सामान्यत: सांगितलें होतें तेंच आतां विशेष रूपानें सांगतात-

तत्त्वभावनया नश्येत्साऽतो देहातिरिक्तताम् ।
आत्मनो भावयेत्तद्वन्मिथ्यात्वं जगतोऽनिशम् ॥१२

अन्वयार्थ - [सा तत्त्वभावनया नश्येत्-] ती विपरीत भावना तत्त्वचिंतनानें नष्ट होते, [अत: आत्मन: देहातिरिक्ततां तद्वत् जगत: मिथ्यात्वं अनिशं भावयेत्-] यास्तव आत्म्याची देहादि व्यतिरिक्तता व जगाचें मिथ्यात्व यांची सतत भावना करावी.

प्रकाश:- विपरीत भावनेच्या नाशाचा उपाय यथार्थ भावना होय. यास्तव आत्मा देहाहून भिन्न, नित्य, चिद्घन व आनंदमय आहे अशी व जगत् कांहीं काल भासणारें व त्यामुळेंच मिथ्या आहे अशी भावना केल्यानें पूर्वोक्त भावना नष्ट होणें शक्य आहे, म्हणून तिचा नाश व्हावा अशी ज्याची इच्छा असेल, त्यानें आत्मा व जगत् याविषयीं यथार्थ भावना सतत करीत राहावें. ॥११२॥

-पण जपादिकांप्रमाणें त्या भावनेला कांहीं विशेष नियमांची अपेक्षा आहे, कीं नाहीं, असा प्रश्न -

किं मंत्रजपवन्मूर्त्तिध्यानवद्वाऽऽत्मभेदधी: ।
जगन्मिथ्यात्वधीश्चात्रव्यावर्त्या स्यादुतान्यथा ॥१३

अन्वयार्थ - [आत्मभेदधी: च जगन्मिथ्यात्वधी:-] आत्मभेदबुद्धि व जगन्मिथ्यात्वबुद्धि [मंत्रजपवत् किंवा मूर्तिध्यानवत् व्यावर्त्या स्यात्-] मंत्राच्या जपाप्रमाणें किंवा मूर्तींच्या ध्यानाप्रमाणें नियमानें केली पाहिजे [उत अन्यथा-] कीं त्याहून निराळ्या प्रकारानें ?

प्रकाश:- प्रात:संध्येची उपासना करीत असतां प्रतिदिनी हजार जप करावा. असा मंत्राच्या जपाविषयीं नियम आढळतो. त्याचप्रमाणेंच या पूर्वोक्त भानवेची अमुक वेळ भावना करावी असा कांहीं नियम आहे कीं काय ? तसेंच पतंजलींनीं योगदर्शनांत अंत:करणाची एकाग्रता करण्याविषयीं नियम सांगितला आहे. व इतर भक्तिप्रधान ग्रंथांत रोज पहाटे ब्राह्ममुहूर्तावर उठून भगवानाचें ध्यान करण्याविषयीं सांगितलेलें असतें. त्याप्रमाणें ही भावनाहि करणें अवश्य आहे कीं कसें ? किंवा हिला कांहीं नियमच नाहीं ? हा सर्व श्लोक प्रश्नरूप आहे, व भावना कोणत्या प्रकारें करावी हें सर्वांस समजावें हा त्याचा उद्देश आहे. ॥११३॥

-त्याचें फल दृष्ट असल्यामुळें त्याला कोणत्याहि नियमाची अपेक्षा नाहीं, असें सांगतात-

अन्यथेति विजानीहि दृष्टार्थत्वेन भुक्तिवत् ।
बुभुक्षुर्जपवद्भुंक्ते न कश्चिन्नियत: क्वचित् ॥१४

अन्वयार्थ - [भुक्तिवत् दृष्टार्थत्वेन अन्यथा इति विजानीहि-] भोजनाप्रमाणें याला दृष्टार्थत्व असल्यामुळें 'अन्य प्रकारें' असें समज, [जपवत् कश्चित् बुभुक्षु: नियत: सन् क्वचित् न भुंक्ते-] एखादा पुरुष नियमयुक्त होऊन जपादिक कर्में जशीं करतो, तसा अति भुकेलेला पुरुष नियमयुक्त होऊन केव्हांच भोजन करीत नाहीं.

प्रकाश:- भोजनाचें तृप्ति हें फल दृष्ट आहे. दृष्ट म्हणजे अनुभवास येणारें. भोजनाबरोबर क्षुधानिवृत्ति होऊन अंतरात्म्याची तृप्ति कशी होत असते, हें सर्वांस ठाऊक आहे. आत्म्याच्या यथार्थ ज्ञानाचें व अनुसंधानाचेहि असेंच दृष्ट फल आहे. व त्यामुळें त्याच्याविषयीं जपाप्रमाणें व ध्यानाप्रमाणें नियम नाहींत. ज्या कर्माचें अदृष्ट फल असतें त्याच्याकरितां विशेष नियम पाळावे लागतात. आतां भोजनाविषयींहि शास्त्रानें नियम सांगितलेले आहेत हें खरें पण ते उपासमार झाल्यामुळें व्याकूळ होऊन पडलेल्या मनुष्याकरितां नव्हेत. कारण अन्न पुढें असतां तो नियमांचें उल्लंघन करूनहि तें खाऊन टाकण्यास कमी

करणार नाहीं. व तरीहि तृप्ति हें भोजनाचे फल त्यास मिळेल. यास्तव ज्या कर्माचें दृष्ट फल असतें, त्यास नियम नकोत. हें येथें सिद्ध झालें. ॥११४॥

-याचाच अधिक विस्तार करितात -

अश्नाति वा न वाऽश्नाति भुंक्ते वा स्वेच्छयान्यथा ।
येन केन प्रकारेण क्षुधामपनिनीषति ॥१५

अन्वयार्थ - [अश्नाति वा-] तो अन्न असलें तर खातो [न अश्नाति वा-] नसलें तर खात नाहीं; [अन्यथा स्वेच्छया भुंक्ते-] किंवा अन्य प्रकारें आपल्या इच्छेप्रमाणें भोजन करितो. [एवं येन केन प्रकारेण क्षुधां अपनिनीषति-] तात्पर्य कोणत्या तरी उपायानें तो क्षुधा घालविण्याची इच्छा करितो.

प्रकाश:- भोजनाचा प्रकार जपादिकांहून अगदीं भिन्न आहे. कारण मनुष्य अन्न असलें तर खातो,नसलें तर अन्य कामांत आपलें मन लावून तो आपला वेळ घालवितो. किंवा सकाळीं, दुपारीं, रात्रीं किंवा निजून, बसून, उठून इत्यादि प्रकारें अथवा नक्तादि शास्त्रोक्त व्रतें करून भोजन करितो. म्हणजे भोजन करण्यांत प्राण्यांची क्षुधानिवृत्ति हाच एक उद्देश असतो व तो कसेंहि जरी भोजन केलें तरी साधतो. तसेंच प्रस्तुत दार्ष्टांतिकांतहि दृष्टफलक आत्मभावना कशीहि जरी केली, तरी तिचा निश्चित परिणाम अवश्य होतोच. ॥११५॥

-पण जपादिकांची स्थिति तशी नाहीं-

नियमेन जपं कुर्यादकृतौ प्रत्यवायत: ।
अन्यथाकरणेऽनर्थ: स्वरवर्णविपर्ययात् ॥१६

अन्वयार्थ - [नियमेन जपं कुर्यात्-] नियमानें जप करावा [अकृतौ प्रत्यवायत:] कारण तो नियमानें न केल्यास प्रत्यवाय लागतो [अन्यथा करणे स्वरवर्णविपर्ययात् अनर्थ:-] व तो अविहित प्रकारानें केल्यास स्वर, वर्ण इत्यादिकांचा विपर्यय होत असल्यामुळें मोठा अनर्थ ओढवतो.

प्रकाश:- प्रात:कालीं व संध्याकालीं सावित्रीमंत्राचा हजार जप करावा, तो सूर्याभिमुख उभें राहून करावा; स्नान केल्यावांचून करूं नये; इत्यादि जे जपाचे अनेक नियम आहेत ते न पाळल्यास मोठा दोष लागत असतो. बरें ज्याच्यापासून दोष लागण्याची एवढी भीति, तें कर्म मुळींच न केलें तर? असें कोणी म्हणेल, पण तें बरोबर नाहीं. कारण नित्यकर्म मुळींच न करण्यापासून लागणारा दोष तर फारच मोठा आहे. यास्तव नित्य कर्म अवश्य करावें. व तें अन्यथा (अशास्त्रीय प्रकारें) होणार नाहीं याविषयीं काळजी घ्यावी. कारण पाणिनीय शिक्षेमध्ये मंत्र म्हणतांना भलभलतेच स्वर किंवा वर्ण म्हटल्यास किंवा मुळींच न म्हटल्यास मोठा अनर्थ ओढवतो असें सांगितलें आहे. सारांश जप, ध्यान इत्यादि कर्म अदृष्टफलक असल्यामुळें त्यांच्याकरितां नियम आहेत व ते यथाशक्ति अवश्य पाळलेच पाहिजेत ''मन्त्रो हीन:स्वरतो वर्णतो वा मिथ्याप्रयुक्तो न तमर्थमाह । स वाग्वज्रो यजमानं हिनस्ति यथेन्द्रशत्रु: स्वरतोऽपराधांत् ॥ हें वचन लक्ष्यात ठेवावें ॥११६॥

-'अहोपण, क्षुधा प्रत्यक्ष पीडा देणारी असल्यामुळें तिच्या निवृत्तीसाठीं अनियमानें भोजन करावें, हें म्हणणे ठीक आहे. पण विपरीत भावना प्रत्यक्ष पीडा देणारी नाहीं. यास्तव तिची निवृत्ति करणारें ध्यान अदृष्ट फलासाठीं-पारलौकिक फलासाठीं नियमानें करणेंच उचित आहे,' अशी आशंका घेऊन सांगतात-

क्षुधेव दृष्टबाधाकृद्विपरीता च भावना ।
जेया केनाप्युपायेन नास्त्यत्रानुष्ठिते: क्रम: ॥१७॥

अन्वयार्थ - [च विपरीता भावना क्षुधा इव दृष्टबाधाकृत् अस्ति-] विपरीत भावनाहि क्षुधेप्रमाणें प्रत्यक्ष पीडा करणारी आहे. [अत: सा केन अपि

उपायेन जेया-] यास्तव ती कोणत्या तरी उपायानें जिंकलीच पाहिजे. [अत्र अनुष्ठितेः क्रमः नास्ति-] येथें अनुष्ठानाचा क्रम नाहीं.

प्रकाशः- देहास आत्मा समजणें व जग नित्य आहे असा आग्रह धरणें, हीच विपरीत भावना होय. हें पूर्वीं स्पष्टपणें सांगितलें आहेच. ही भावना अति दुःखदायी आहे. व त्यामुळें भुकेप्रमाणेंच तिची पीडा प्रत्यक्ष आहे. आतां ही विपरीत भावनाच दुःख देते असें जरी प्राकृत मनुष्यांना कळत नाहीं, तरी, दुःख होतें, हा व्यवहार बरा नव्हे, इत्यादि त्यांना वाटतेंच. व कारणाचें ज्ञान नसलें म्हणजे तें नाहीसें होतें, असाहि कोठें नियम नाहीं. यास्तव अंतर्ज्ञानी माहात्म्यांनीं निश्चित केलेल्या सिद्धांताचाच अंगीकार करणें उचित होय. तात्पर्य, विपरीत भावनेचें भुकेप्रमाणें दृष्ट फल आहे. व तें दुःखरूप असल्यामुळें कोणत्याहि उपायानें त्याला हटविलेंच पाहिजे. त्याविषयीं विशेष असा कोणताहि नियम करितां येण्यासारखा नाहीं. ॥११७॥

-तर मग तिला जिंकण्याचा उपाय तरी सांगा ? उत्तर -

उपायः पूर्वमेवोक्तस्तच्चिन्ताकथनादिकः ।
एतदेकपरत्वेऽपि निर्बंधो ध्यानवन्न हि ।।१८

अन्वयार्थ - [तच्चिन्ताकथनादिकः उपायः पूर्वं एव उक्तः-] त्याचें चिंतन, त्याचें कथन, इत्यादि उपाय पूर्वीं-श्लो.१०६-सांगितला आहे. [एतदेकपरत्वे अपि ध्यानवत् निर्बंधः न हि अस्ति-] त्यांत तदेकपरत्व जरी सांगितलें आहे, तरी ध्यानाप्रमाणें त्याविषयींहि निर्बंध नाहीं.

प्रकाशः- पूर्वीं एकशें सहाव्या श्लोकांत विपरीत भावनेचा नाश करणारा उपाय सांगितलेला आहे. व तो-सततततत्त्वानुसंधान-हाच आहे. आतां या पूर्वोक्त श्लोकांत केवल तत्पर होऊन राहण्याविषयींहि सांगितलें आहे, हें खरें. पण ध्यानाप्रमाणें त्याला विशेष असा कांहीं निर्बंध आहे, असें समजूं नये. ध्यानास कोणता निर्बंध आहे, हें पुढच्या श्लोकांतच स्पष्ट होणार आहे. यास्तव येथें विस्तार करीत नाहीं. ॥११८॥

-'अहोपण, केवल ध्येयाचें चिंतन करणें, हेंच ध्यानाचें स्वरूप आहे, त्यांत निर्बंध कशाचा ?' उत्तर -

मूर्तिप्रत्ययसांतत्यमन्यानन्तरितं धियः ।
ध्यानं तत्रातिनिर्बंधो मनसश्चंचलात्मनः ।।१९

अन्वयार्थ - [धियः अन्यानन्तरितं मूर्तिप्रत्ययसांतत्यं ध्यानं-] बुद्धीचें अन्य प्रत्ययाच्या योगानें अव्यवहित असें जें मूर्तिविषयक प्रत्ययाचें सातत्य तेंच ध्यान होय. [तत्र चंचलात्मनः मनसः अतिनिर्बंधः-] ध्यानाचें वेळीं चंचल मनाला एका ध्येयामध्यें बांधून ठेवतांना मोठा उपरोध होतो.

प्रकाशः- ज्या ध्येय पदार्थांचें ध्यान कर्तव्य असेल त्याच्या ठायीं अन्य प्रत्ययशून्य अशा बुद्धीचें तद्रूपतेनें सतत राहणें म्हणजे एका ध्येयावांचून अंतःकरणांत दुसरें कशाचेंहि स्फुरण न होणें हेंच ध्यान होय. पण मन अति चंचल असल्यामुळें त्याच्या निरोधाकरितां मोठीच खटपट करावी लागते. म्हणजे अरण्यामध्यें आजन्म स्वैर फिरण्याची ज्यांना संवय झालेली असते, अशा हत्तीसारख्या प्राण्यांस पकडण्याकरिता जशी अश्रांत मेहनत करावी लागते, तशीच या असंख्य जन्म स्वैर प्रचार करावयास संवकलेल्या मनाचा निरोध करण्याकरितांहि अश्रांत मेहनत करावी लागून, अकल्पित युक्त्या योजाव्या लागतात. या श्लोकांत सगुण पदार्थांचेंच ज्ञान होणें शक्य आहे, हें सुचविण्याकरितां मूर्ति हा शब्द योजला आहे. ॥११९॥

-मन अति चंचल आहे, याविषयीं गीतावाक्याचें प्रमाण-

चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् ।
तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ।।१२०

अन्वयार्थ - [हे कृष्ण, मन: चंचलं, प्रमाथि, बलवत् च दृढं अस्ति हि-] हे भगवन्, मन हें चंचल, व्याकूल करणारें, समर्थ व दृढ आहे, हें प्रसिद्धच आहे. [तस्य निग्रहं वायो: इव सुदुष्करं अहं मन्ये-] यास्तव त्याचा निग्रह करणें वायूच्या मोटेप्रमाणें अति दुर्घट आहे, असें मी समजतों.

प्रकाश- हें भगवद्गीतेंतील (६-३४) वाक्य आहे, हें गीतेचा नित्यपाठ करणारांस अवगत आहेच. साहाव्या अध्यायांत भगवानानें अर्जुनास मनाचा निरोध करण्याविषयीं उपदेश केला असतां अर्जुनानें ही शंका विचारिली आहे. व वायूची मोट बांधणें जितकें कठिण तितकेंच किंवा त्याहून कांकणभर अधिक कठिण असें हें संयमन आहे, असें आपलें मत दिलें आहे. हरिणादि प्राणी अति चंचल असतात, पण त्यांचाहि निग्रह करितां येतो. तसाच या चंचल मनाचाहि निग्रह करितां येईल असें कोणास वाटेल, म्हणून अर्जुनानें आपल्या वाक्यांत मनास तीन विशेषणें दिलीं आहेत. **प्रमाथि**-पुरुषास व्याकुळ करून सोडणारें, किंवा त्यास कामी बनवून विवेकशून्य करणारें; **बलवत्**-अति समर्थ, ज्याचा निग्रह करितां येणें शक्य नाहीं. **दृढ**-ज्या विषयामध्यें ते आसक्त झालें असेल तेथून त्याला काढून घेतां येणें अशक्य आहे, व त्यामुळेंच तें वज्रासारखें दृढ होय. ॥१२०॥

-मनाचा निग्रह करणें अति कठिण आहे, याविषयीं वसिष्ठवाक्याचेंहि प्रमाण देतात-

अप्यब्धिपानान्महत: सुमेरून्मूलनादपि ।
अपि वह्न्यशनात्साधो विषमश्चित्तनिग्रह: ॥२१

अन्वयार्थ - [हे साधो, महत: अब्धिपानात् अपि-] हे साधो, मोठ्या समुद्राच्या प्राशनाहूनहि, [सुमेरून्मूलनात् अपि-] सूमेरू पर्वताच्या उन्मूलनाहूनहि [वह्न्यशनात् अपि-] व अग्निभक्षणाहूनहि [चित्तनिग्रह: विषम: अस्ति-] हा चित्तनिग्रह कठिण आहे.

प्रकाश:- हें वाक्य योगवासिष्ठांतील असून तें रामास उद्देशून श्रीवसिष्ठांनीं उच्चारिलेलें आहे. अगस्तिमुनीनें सात समुद्रांचें प्राशन केलें; असें पौराणिक वचन आहे. यास्तव प्रलयकालीं सर्व सृष्टि जलमय होऊन जो एक अपार समुद्र होत असतो त्याचें प्राशन करणें कठीण आहे हें सुचविण्याकरितां महत: हे विशेषण प्रवृत्त झाले आहे. पण सृष्टीकालीं विधाता तें सर्व जल शोषून टाकीत असतो असाहि निर्देश आहे. यास्तव जलप्राशनाहूनहि जरा कठिण दृष्टान्त देतात. देवांचें वसतिस्थान असा जो सुवर्ण पर्वत त्याला कोसळून पाडणें हें तर पूर्वकृत्याहूनहि कठिण आहे. कारण सर्व सृष्टि जलमय झाल्यावरहि सुमेरु जलांत बुडून राहतो असा पुष्कळ स्थळीं उल्लेख आढळतो. पण श्रीरामानें शिवधनुष्याच्या भंगसमयीं त्यालाहि खालीं पाडिलें, असा क्वचित् आधार मिळतो. यास्तव त्याहूनहि कठिण अशा अग्निभक्षणाचा निर्देश केला. पण भगवान् कृष्णानें अग्नीहि गिळून टाकिल्याचें प्रसिद्ध आहे. यास्तव श्रीवसिष्ठ म्हणतात कीं, पूर्वोक्त तीन कठिण कृत्यांहूनहि चित्तजय अति कठिण आहे. व खरोखरच वस्तुस्थिति अशी असल्यामुळें सिद्ध पुरुष दुर्मिळ झाले आहेत. आम्हां कलीयुगांतील पुरुषांच्या नशिबीं अशा सज्जनांचें दर्शन नाहींच म्हटलें तरी चालेल. ॥१२१॥

पण या प्रकृत ब्रह्माभ्यासामध्यें ध्यानाहून वैषम्य दाखवितात-

कथनादौ न निर्बंध: शृंखलाबद्धदेहवत् ।
किंत्वनंतेतिहासाद्यैर्विनोदो नाट्यवद्धिय: ॥२२

अन्वयार्थ- [श्रृंखलाबद्धदेहवत् कथनादौ निर्बंध: न-] श्रृंखलेनें देह बद्ध झाला असतां जसा गतीला उपरोध होतो तसा कथनादिकांमध्यें होत नाहीं. [किं

तु नाट्यवत् धियः अनंतेतिहासाद्यैः विनोदः भवति-] उलट नाट्याप्रमाणें बुद्धीची अनेक इतिहासादिकांच्या योगानें विनोद होतो.

प्रकाश:- जो कैदेंत पडलेला असतो, त्यानें पळून जाऊं नये म्हणून त्याच्या हातापायांत बेड्या ठोकलेल्या असतात, त्यामुळें त्याचा देह परतंत्र व कोणतीहि क्रिया करण्याविषयीं असमर्थ झालेला असतो. पण हा आत्मचिंतनादि करणारा पुरुष दृष्टांतांतील कैद्याप्रमाणें प्रतिबद्ध झालेला नसतो. त्यामुळें त्याला आत्मचिंतन, आत्मकथन, एकमेकांस आत्मबोध, इत्यादि प्रकार स्वतंत्रपणें व स्वेच्छेप्रमाणें करितां येतात. **शंका**- अहो, पण त्याला जर कांहींच निर्बंध नाहीं असें म्हटलें तर आपण होऊन त्रास सोसण्यास व आत्मकथनादि करण्यास तो कसा प्रवृत्त होईल ? कारण त्यांतसुद्धां कष्ट आहेत. व कोणीहि स्वतंत्र पुरुष आपण होऊन क्लेश सहन करण्यास तयार होईल अशी आशा करणें व्यर्थ आहे. **समाधान** - ही गोष्ट खरी आहे. पण आत्मकथनादि क्रिया करितांना साधकास मुळीं कष्टच होत नाहींत. उलट त्यांचें मन त्या कथनादिकांमध्यें तल्लीन होऊन राहातें. अर्थात् इतिहासादिकांच्या कथनानें त्यांच्या मनास कष्ट न होतां तें अधिक प्रसन्न होतें. ॥१२२॥

-'अहोपण, कथनादिकांनीं सुद्धां तदेकपरत्वाचा विघात होतो,' म्हणून म्हणाल तर सांगतों-

चिदेवात्मा जगन्मिथ्येत्यत्र पर्यवसानतः ।
निदिध्यासनविक्षेपो नेतिहासादिभिर्भवेत् ॥२३

अन्वयार्थ - ['चित् एव आत्मा जगत् मिथ्या' इति अत्र पर्यवसानतः--] इतिहासादिकांचे 'चैतन्यच आत्मा व जगत् मिथ्या' या सिद्धान्तामध्यें पर्यवसान होत असल्यामुळें [इतिहासादिभिः निदिध्यासनविक्षेपः न भवेत्-] **इतिहासादिकांच्या योगानें निध्यिसनामध्यें विक्षेप होत नाहीं.**

प्रकाश:- गेल्या श्लोकांत इतिहासादिकांच्या योगानें चित्तविनोद होतो म्हणून सांगितलें आहे. यास्तव, इतिहासादिकांमुळें निदिध्यासनांत विक्षेप कसा होत नाहीं तेंच येथें मुख्यतः सांगावयास पाहिजे आहे. हें मनांत आणून ग्रंथकार म्हणतात;- तत्त्वज्ञानामध्यें मनोरंजनार्थ कथानकांची योजना करून ज्यामध्यें तत्त्वज्ञान सुलभ केलेलें असतें, त्या ग्रंथास इतिहासग्रंथ असें म्हणतात. बृहद्योगवासिष्ठ, मोक्षधर्म, सूतसंहिता, इत्यादि ग्रंथ या इतिहासग्रंथांचीं उत्कृष्ट उदाहरणें होत. अशा प्रकारच्या ग्रंथाचें परिशीलन केल्यानें चैतन्यच आत्मा व जग मिथ्या (कांहीं वेळ टिकणारें) आहे, असेंच ज्ञान होत असल्यामुळें तें निधिध्यासनामध्यें (तदेकपरत्वामध्यें) विक्षेप उत्पन्न करीत नाहीं. व रमणीय कथांच्या योगानें ते ग्रंथ परिपूर्ण असल्यामुळें त्यांच्या परिशीलनापासून किंवा त्यांचें सतत व्याख्यान केल्यानेंहि कथकास कष्ट होत नाहींत. कोणतीहि अप्रिय क्रिया करितांना कष्ट होतात व प्रिय कर्म एकसारखें करीत असलें तरी त्यापासून शीण वाटत नाहीं, ही गोष्ट बहुतेक सर्वांच्या अनुभवाची आहे. ॥१२३॥

-'अहोपण, इतिहासादिकांचा जर अंगीकार केला तर कृष्यादिकांचीहि प्रसक्ति होईल' अशी आशंका घेऊन सांगतात-

कृषिवाणिज्यसेवादौ काव्यतर्कादिकेषु च ।
विक्षिप्यते प्रवृत्त्या धीस्तैस्तत्त्वस्मृत्यसंभवात् ॥२४

अन्वयार्थ - [कृषि-वाणिज्य-सेवादौ-] शेतकी, व्यापार, सेवा इत्यादि यांच्यामध्यें [च काव्यतर्कादिकेषु प्रवृत्त्या-] व काव्य, तर्कशास्त्र इत्यादिकांमध्यें प्रवृत्ति केल्यानें [धीः विक्षिप्यते-] बुद्धि विक्षिप्त होते. [तैः तत्त्वस्मृत्यसंभवात्-] त्यामुळें त्यांच्या योगानें तत्त्वाचें स्मरण होणें असंभवनीय आहे.

प्रकाश:- ज्याला ज्या कर्माची संवय झालेली असते त्याला तें प्रिय वाटत असतें, असा अबाधित अनुभव आहे व त्यामुळे मनुष्यास सेवेसारखीं साक्षात् नरकरूप

कर्मेंहि प्रिय वाटतात हें खरें; पण तशा प्रकारच्या कर्मांत प्रवृत्त झाल्यानें बुद्धि विक्षिप्त होत असते. व तत्त्वाचें स्मरण न झाल्यामुळें तसें होणें साहजिकहि आहे. पण इतिहासादिकामध्यें तत्त्वाचें विस्मरण होत नसून उलट त्याच्या योगानें तत्त्वस्मरण सतत होऊं लागतें. सेवादिकर्मांच्या योगानें जसें मन विक्षिप्त होतें. तसेंच तें काव्यें, तर्क इत्यादि मनास कलुषित करणाऱ्या ग्रंथसमूहाच्या परिशीलनानेंहि होतें. यास्तव त्यांचाहि सर्वथैव त्याग करावा. ॥१२४॥

-'अहोपण,सेवा इत्यादि कर्मे करीत असतांना जसें तत्त्वाचें विस्मरण होतें, तसें भोजनादि करितांनाहि होणें शक्य आहे. तेव्हां सततानुसंधान सुटूं नये म्हणून सेवादिकांप्रमाणें भोजनाचाहि त्याग करावयास पाहिजे!' उत्तर-

अनुसंदधतैवात्र भोजनादौ प्रवर्तितुम् ।
शक्यतेऽत्यंतविक्षेपाभावादाशु पुनः स्मृतेः ॥२५

अन्वयार्थ - **[अनुसंदधता एव भोजनादौ प्रवर्तितुं शक्यते-] अनुसंधान करणाऱ्या पुरुषाला तें करीत असतांनाच भोजनादिकांमध्यें प्रवृत्त होतां येतें, [कुतः पुनः आशु स्मृते; अत्यंतविक्षेपाभावात्-] कारण पुनरपि लागलेंच स्मरण होत असल्यामुळें अत्यंत विक्षेप होऊं शकत नाहीं.**

प्रकाशः- शरीर हें सर्व धर्मानुष्ठानाचें आद्य साधन आहे. यास्तव त्याचें रक्षण केलेंच पाहिजे. व तें तर भोजनावांचून होणें शक्य नाहीं. भोजनाप्रमाणेंच मलविसर्जनादि कृत्येंहि शरीरसंक्षणाचीं साधनें होत. तसेंच ब्राह्मणादि वर्णास उचित अशीं नित्य कर्मेंहि निदान लोकसंग्रहार्थ अवश्य होत. 'नित्य कर्मांचा संन्यास होत नाहीं' असें भगवद्वचनहि आहे. यास्तव भोजनादि अवश्य कर्मे सोडून चालणार नाहीं. शिवाय हीं कर्मे आत्मानुसंधान करीत असतांनाहि होऊं शकतात. व जरी कदाचित् अशा समयीं क्षणभर आत्म्याचें विस्मरण झाल तरी पुनरपि तत्काल त्याचें स्मरण होत असल्यामुळें तीं कर्मे सेवा इत्यादि कर्मांप्रमाणें आत्मानुसंधानांत दृढ विक्षेप करूं शकत नाहींत. यास्तव भोजनादि कर्मे सोडून अनर्थांत पडण्याची कोणाहि मुमुक्षूस आवश्यकता नाहीं. ॥१२५॥

-अहोपण, त्या वेळीं विक्षेपाचा अभाव जरी असला तरी तत्त्वाची विस्मृति झाल्यामुळें पुरुषार्थाची हानि होईल !' उत्तर -

तत्त्वविस्मृतिमात्रान्नानर्थः किं तु विपर्ययात् ।
विपर्येतुं न कालोऽस्ति झटिति स्मरतः क्वचित् ॥२६

अन्वयार्थ - **[तत्त्वविस्मृतिमात्रात् अनर्थः न भवति-] केवल तत्त्वाच्या विस्मरणामुळेंच अनर्थ ओढवत नाहीं; [किं तु विपर्ययात् भवति-] तर तत्त्वाचा विपर्यास केल्यामुळें तो ओढवतो. [झटिति स्मरतः विपर्येतुं क्वचित् कालः न अस्ति-] पण लागलेंच तत्त्वस्मरण करणाऱ्या पुरुषाला तत्त्वाचा विपर्यास करण्यास अवकाशच मिळत नाहीं.**

प्रकाशः- क्वचित् (एकादे वेळीं) तत्त्वानुसंधान सुटल्यास फार तर निदिध्यासनाचा विच्छेद होईल. यापलीकडे कांहीं हानि होत नाहीं. पण तत्त्वाचा विपर्यास केल्यानें मोठ्या अनर्थांत पडावें लागतें. यास्तव विपर्यास न होतां भोजनादि अवश्य कर्मे करीत असतांना जर नुस्तें तत्त्वाचें विस्मरणच होत असले तर तें पतकरेल. आतां तत्त्वाचें विस्मरण झाल्यानंतर हळुहळू विपर्यासहि होईल, असें कदाचित् तूं म्हणशील. पण तें बरोबर नाहीं. कारण, भोजनादिकर्मांचा काल अगदीं थोडा असतो. सतत तत्त्वानुसंधान करणें हा साधकाचा जवळ जवळ स्वभावच झालेला असतो. त्यामुळें तो जरी क्षणभर तत्त्वास विसरला, तरी त्यास त्याची लागलीच स्मृति होते व तो पुनः भोजनादि करीत असतांच तत्त्वानुसंधान करूं लागतो. अर्थात् विस्मृतीनंतर कांहीं वेळानें होणारा जो विपर्यास त्यास

अवकाशच मिळत नाहीं. ॥१२६॥

-'मग हाच न्याय काव्यतर्कादि ग्रंथांच्या अभ्यासाला कां लागू करीत नाहीं ?' उत्तर -

तत्त्वस्मृतेरवसरो नास्त्यन्याभ्यासशालिनः ।
प्रत्युताभ्यासघातित्वाद्बलात्तत्त्वमुपेक्ष्यते ॥२७

अन्वयार्थ - [अन्याभ्यासशालिनः तत्त्वस्मृतेः अवसरः नास्ति-] तर्कादि अन्य शास्त्रांचा अभ्यास करणाऱ्याच्या तत्त्वस्मृतीस अवकाश मिळत नाहीं [प्रत्युत तत्त्वं अभ्यासघातित्वात् बलात् उपेक्ष्यते-] उलट तत्त्वस्मरण त्या अभ्यासाला विघातक असल्यामुळें तें बलात्कारानें उपेक्षिलें जातें.

प्रकाश- तर्क, व्याकरण, काव्य इत्यादि शास्त्रें मनास विकारयुक्त करीत असतात. पण त्यापासूनहि सामान्यतः विद्यानंद होत असल्यामुळें विद्यार्थी मनापासून त्याचा अभ्यास करूं लागतो. व ह्याप्रमाणें एकदा तो आवडीनें त्यांत प्रवृत्त झाला कीं त्यास तत्त्वानुसंधान करण्यास फुरसत मिळेनाशी होते. कारण व्यावहारिक अनेक कृत्यें केल्यावर जो कांहीं थोडाफार अवकाश मिळेल, तो त्या प्रियशास्त्राच्या परिशीलनांत घालविण्याकडे त्याच्या मनाचा कल झालेला असतो. तर्कादिशास्त्राचें अध्ययन करणारांकडून तत्त्वानुसंधान न होण्याचें हें एक कारण. व दुसरें असें कीं, तत्त्वानुसंधान व तर्कादिशास्त्रें यामध्यें मोठा विरोध आहे. कारण स्वतः तत्त्व हेंच शास्त्राभ्यासाचा विघात करीत असतें. म्हणजे अनात्मविषयक शास्त्राचें अध्ययन करणें हें केवल श्रमदायी आहे; विद्वत्तेचा अभिमान वाढविणारें आहे; व त्यामुळें मुख्य लाभापासून दूर नेणारें आहे, असें साधकास शिकवितें. यास्तव अन्यशास्त्रामध्यें अथवा व्यवहारामध्यें ज्यांची रुचि असते, ते या तत्त्वाचा मुद्दाम त्याग करितात. व्यवहारपटू आईबाप आपला पुत्र ईश्वरभक्त किंवा धार्मिक होत आहे असें समजल्यास कसे कष्टी होत असतात, हें सामान्यतः कोठेंहि पाहावयास मिळण्यासारखें आहे. तर्कव्याकरणादि शास्त्रांत निष्णात असलेले गुरुहि आपल्या शिष्याच्या मनांत रूपावलीच्या प्रथम पाठाबरोबरच तत्त्वानुसंधानाच्या द्वेषाचें बीज पेरून ठेवीत असतात, असा प्रस्तुत लेखकाचा तरी निदान अनुभव आहे. सारांश, इतर शास्त्रांत गढून गेलेल्या लोकांच्या हातून तत्त्वानुसंधान होणें शक्य नाहीं. ॥१२७॥

-'तत्त्वानुसंधानाच्या विरोधी असलेला सर्व वाग्व्यापार त्याज्यच आहे, याविषयीं श्रुतीचें प्रमाण -

तमेवैकं विजानीथ ह्यन्या वाचो विमुञ्चथ ।
इति श्रुतं तथाऽन्यत्र वाचो विग्लापनं त्विति ॥२८॥

अन्वयार्थ - [तं एव एकं विजानीथ हि अन्याः वाचः विमुञ्चथ इति-] 'त्याच एका आत्म्याला जाणा व दुसऱ्या वाचा-वाचेचे विषय टाका' असें व [तथा अन्यत्र तु वाचः विग्लापनं इति श्रुतम्-] त्याचप्रमाणें दुसऱ्या स्थळीं 'तें तर वाणीस शिणविणारें आहे' असें श्रुतीनें सांगितलें आहे.

प्रकाश- या श्लोकांत ''नानुध्यायाद्बहूञ्शब्दान्वाचो विग्लापनं हि तत् ।'' व ''तमेवेकंजानथ आत्मानमन्या वाचो विमुंचथ'' असें यजुर्वेद व आथर्वण वेद यांतील श्रुतींचें प्रमाण दिलें आहे. त्या दोन्ही श्रुतींचें तात्पर्य - ज्यांत तत्त्वानुसंधान नाहीं असें इतर अध्ययन सोडावें, कारण तें वाणीस केवळ शीण देत असतें-असें आहे. ॥१२८॥

-'अहोपण, तुम्ही तत्त्वानुसंधानातिरिक्त भोजनादि क्रिया जशा सोडीत नाहीं, तसें इतर शास्त्रांचें अध्ययनहि करावें,' असा आग्रह धरणाऱ्या वाद्याला म्हणतात-

आहारादि त्यजन्नैव जीवेच्छास्त्रान्तरं त्यजन् ।
किं न जीवसि येनैवं करोष्यत्र दुराग्रहम् ॥२९

अन्वयार्थ - [आहारादि त्यजन् न एव जीवेत्-]

आहारादि सोडणारा जिवंत रहाणार नाहीं. [शास्त्रान्तरं त्यजन् त्वं न जीवसि किं-] पण इतर (अनात्म) शास्त्रांचा अभ्यास न करणारा तूं जिवंत रहात नाहींस कीं काय ? [येन अत्र एवं आग्रहं करोषि-] म्हणून याविषयीं एवढा दुराग्रह करीत आहेस ?

प्रकाश:- आहारादि अत्यंत अवश्य कृत्यांविषयीं शास्त्रानें जी अनुज्ञा दिली आहे त्यांत कांहीं तात्पर्य आहे. व तर्कादिकांच्या अभ्यासाचा जो निषेध केला आहे तोहि सहेतुक आहे, कसा म्हणून विचारशील तर सांगतों:- शरीरसंरक्षणार्थ अत्यंत अवश्य अशीं जीं भोजनादि कृत्यें आहेत तीं न केल्यास मरणच येईल. यास्तव शास्त्रानें त्याला अनुज्ञा दिली आहे. पण शास्त्राभ्यासाची तशी स्थिति नाहीं. त्यावांचूनहि मनुष्य जिवंत राहून आत्मानुसंधान करूं शकतो. आत्मानुसंधानापासून मिळणारें फल शास्त्राभ्यासापासून मिळणाऱ्या फलापेक्षां किती तरी पटीनें अधिक आहे. ज्यांचें फल क्षुद्र आहे, अशा एकाद्या कृत्यापासून मनुष्याला सोडवून त्याच्यापेक्षां हजारों पटीनें अधिक फल ज्यामध्यें मिळत असेल. अशा एकाद्या कृत्यांत त्यास प्रवृत्त करणें हें पाप आहे, असें व्यवहारांतहि कोणी समजत नाहीं. यास्तव शास्त्रानें जो तर्कादि निरुपयोगी शास्त्रांच्या यावज्जीव अभ्यासाचा निषेध केला आहे, तो योग्यच होय. बरें पण तुझा तरी शास्त्राभ्यासाविषयीं एवढा आग्रह कां ? त्यावांचून तुला जिवंत राहतां येत नाहीं का ? ॥१२९॥

-'तर मग जनकादि तत्त्वज्ञानी राज्यपरिपालनादिकांत कसे प्रवृत्त झाले ?' अशी शंका व समाधान -

जनकादेः कथं राज्यमिति चेद्दृढबोधतः ।
तथा तवापि चेत्तर्कं पठ यद्वा कृषिं कुरु ॥१३०

अन्वयार्थ - [जनकादेः राज्यं कथं इति चेत् ? दृढबोधतः-] जनकादिकांनीं राज्य कसें केलें ? असें जर विचारशील तर दृढ बोधामुळें केलें [तथा तव अपि चेत् तर्हि तर्कं पठ यद्वा कृषिं कुरु-] तसाच जर तुलाहि दृढबोध झाला असेल तर तूं तर्क शीक, कीं शेतकी कर.

प्रकाश:- जनकादि महात्मे सामान्य ज्ञानी नसून महाज्ञानी होते, तें तुलाहि मान्य आहे. यास्तव ते विधिनिषेधातीत होते असेंहि म्हणतां येण्यासारखें आहे. ते श्रेष्ठ पुरुष असल्यामुळें लोकसंग्रहार्थ त्यांना कर्म कर्तव्य होतें, म्हणून आम्ही असें म्हणतों कीं, आत्मसाक्षात्कार दृढ झाला असतां शरीरेंद्रियांच्या योगानें होणाऱ्या कोणत्याहि कर्माचा परिणाम अंतःस्थितीवर होत नाहीं व त्यामुळेंच जनकादिकांचें राज्यादि कर्म त्यांच्या तत्त्वानुसंधानास विघातक होत नसे. तूंहि जर त्या स्थितीस पोंचलेला असशील तर तर्काचें अध्ययन कर किंवा शेतांत जाऊन शेती कर. मग शास्त्राचें कांहीं म्हणणें नाहीं. तात्पर्य, दृढ बोध होईतों विधिनिषेध प्रवृत्त होत असतात. ॥१३०॥

-'अहोपण, संसार असार आहे, असें जाणणाऱ्या तत्त्ववेत्त्यांची त्यांत प्रवृत्ति कशी होईल ?' उत्तर -

मिथ्यात्ववासनादार्ढ्ये प्रारब्धक्षयकांक्षया ।
अक्लिश्यन्तः प्रवर्तन्ते स्वस्वकर्मानुसारतः ॥३१

अन्वयार्थ - [मिथ्यात्ववासनादार्ढ्ये सति प्रारब्धक्षयकांक्षया-] मिथ्यात्ववासना दृढ झाली असतां प्रारब्धकर्माचा क्षय व्हावा म्हणून [अक्लिश्यन्तः स्वस्वकर्मानुसारतः प्रवर्तन्ते-] खिन्न न होतां ज्ञानी आपापल्या कर्मानुरूप प्रवृत्त होतात.

प्रकाश:- सर्व जग परमार्थतः मिथ्या आहे, अशी दृढ भावना झाली असतां वस्तुतः ज्ञान्याची कोणत्याहि बऱ्या वाईट कृत्यांत प्रवृत्ति होणें शक्य नाहीं. पण प्रारब्धकर्माचा भोगावांचून क्षय होणें अशक्य असल्यामुळें तीं क्षीण व्हावीं म्हणून तदनुरूप ज्ञानी पुरुष कर्मांमध्यें प्रवृत्त होतो, पण अज्ञानी प्राकृतांप्रमाणें तो पापकर्माचें अनिष्ट फल भोगीत असतां खिन्न किंवा

सुकृतांचें इष्ट फल भोगीत असतां प्रसन्न होत नाहीं. अथवा कोणतीहि प्रवृत्ति कष्टकर असते, हें जरी खरें आहे, तरी या पूर्वोक्त ज्ञान्यास प्राक्तन कर्माप्रमाणें प्रवृत्ति करीत असतां, कोणत्याहि प्रकारचे कष्ट होत नाहींत. ॥१३१॥

-'असें जर आहे, तर ज्ञान्याची अनाचारामध्येंहि प्रवृत्ति होईल' उत्तर -

अतिप्रसंगो मा शंक्य: स्वकर्मवशवर्तिनाम् ।
अस्तु वा केन शक्येत कर्म वारयितुं वद ॥३२

अन्वयार्थ - [स्वकर्मवशवर्तिनां अतिप्रसंग: मा शंक्य:-] आपल्या कर्मांच्या अधीन होऊन राहणाऱ्या ज्ञान्यांचा अतिप्रसंग होईल अशी शंका करणें योग्य नव्हे; [वा स: अस्तु-] किंवा ती होईना ? [कर्म केन वारयितुं शक्येत ? वद-] कर्माचें निवारण करण्यास कोण समर्थ आहे ? सांग.

प्रकाश:- धर्माच्या योगानेंहि ज्ञान होतें असा सिद्धांत आहे. अर्थात् अनेक जन्मार्जित सुकृतानेंच कोणत्याहि साधकास ज्ञान होत असतें, असें म्हटलें पाहिजे. मग अशा पुण्यवान् पुरुषाच्या हातून अनाचार होईल की शंका योग्य होईल का ? कधींहि नाहीं. श्रीसुरेश्वराचार्यादि सर्व आचार्यांनीं "अधर्माजायतेऽज्ञानं यथेष्टाचरणं तत: । धर्मकार्ये कथं तत्स्याद्यत्र धर्मोऽपि नेष्यते" वगैरे "ज्याचें यथेष्टाचरण होत असेल तो ज्ञानीच नव्हे" असें म्हटलें आहे व व्यवहारांतहि अशा ज्ञानाभिमानी पुरुषांची छि: थु: होत असते, असा सर्वत्र अनुभव आहे. तस्मात् अनाचार हें अज्ञानाचें लक्षण असून सदाचार हेंच ज्ञानाचें लक्षण होय. अथवा कांहीं प्रबल दुष्कृत्यांमुळें जर एकाद्याचें अशुद्ध वर्तन होत असलें, तर त्याचें निवारण करण्यास कोण समर्थ आहे? कारण कर्माचें निवारण होणें अशक्य आहे, पण त्या अशुद्ध वर्तनामुळें साधकाच्या ज्ञानास कांहीं तरी बाध आल्यावांचून रहाणार नाहीं. ॥१३२॥

-'प्रारब्धकर्मांचें जर कोणाच्यानेंहि उल्लंघन करवत नाहीं, तर ज्ञानी व अज्ञानी यांच्यामध्यें फरक तो काय?' उत्तर -

ज्ञानिनोऽज्ञानिनश्चात्र समे प्रारब्धकर्मणि ।
न क्लेशो ज्ञानिनो धैर्यान्मूढ: क्लिश्यत्यधैर्यत: ॥३३

अन्वयार्थ - [अत्र ज्ञानिन: च अज्ञानिन: प्रारब्धकर्माणि समे सति-] येथें ज्ञानी व अज्ञानी या दोघांनाहि प्रारब्धकर्म सारखेंच असतांना [ज्ञानिन: धैर्यात् न क्लेश: मूढ: तु अधैर्यत: क्लिश्यति-] ज्ञान्याला धैर्यामुळें क्लेश होत नाहींत व अज्ञानी अधैर्यामुळें क्लेश भोगितो.

प्रकाश:- प्रारब्धकर्माचें उल्लंघन कोणीहि करीत नाहीं; हें तर खरेंच. पण ज्ञानी व अज्ञानी यांच्या समजुतींत फरक असल्यामुळें त्याच्या स्थितींतहि फरक पडतो. ज्ञानी पुरुष प्रारब्धकर्माचें फल भोगीत असतांना होणारे क्लेश धैर्यानें सहन करितो. व अज्ञानी अधीर असल्यामुळें क्लेशांच्या योगानें व्याकुळ होतो. ॥१३३॥

-'याविषयीं दृष्टान्त-

मार्गे गंत्रोर्द्वयो: श्रान्तौ समायामप्यदूरताम् ।
जानन्धैर्याद्द्रुतं गच्छेदन्यस्तिष्ठति दीनधी: ॥३४

अन्वयार्थ - [मार्गे गंत्रो: द्वयो: श्रांतौ समायां अपि-] मार्गानें जाणाऱ्या दोघांना श्रम जरी सारखेच झालेले असले तरी [अदूरतां जानन् धैर्यात् द्रुतं गच्छेत्] आपलें इष्टस्थळ जवळ आहे असें जाणणारा धैर्यानें त्वरित जातो. [अन्य: तु दीनधी: सन् तिष्ठति-] व दुसरा तसें न जाणणारा दीन होऊन मध्येंच बसतो.

प्रकाश:- दोन वाटसरू एका विवक्षित गांवास जात असतां चालतांना दोघेहि सारखेच थकतात. किंवा दोघांनाहि सारखीच वाट चालावयाची असल्यामुळें त्यापासून होणारे श्रम सारखेच असतात. पण आपणांस ज्या गांवीं जावयाचें आहे तो आतां येथून अगदीं

जवळ आहे, असें जो जाणत असतो तो वाटेंत बसत नाहीं. तर तसाच तिडकेनें पुढें जातो. व ज्याला गांव जवळ आहे हें ठाऊक नसतें तो बिचारा बसत बसत हाय, हाय करीत अजून किती लांब जावयाचें आहे कोण जाणे, असें म्हणत रस्त्यांतच रहातो. म्हणजे दोघांच्या समजुतीमध्यें फरक असल्यामुळें क्लेशांमध्येंहि फरक पडतो हें निर्विवाद होय. ॥१३४॥

-याप्रमाणें प्रथम श्लोकांत प्रतिपादनार्थ घेतलेल्या श्रुतीच्या पूर्वार्धाचें प्रतिपादन करून आतां उत्तरार्धाचें व्याख्यान आरंभितात -

साक्षात्कृतात्मधी: सम्यगविपर्ययबाधित: ।
किमिच्छन्कस्य कामाय शरीरमनुसंज्वरेत् ॥३५

अन्वयार्थ - [सम्यक् साक्षात्कृतात्मधी:-] **जिला उत्तम प्रकारें आत्मसाक्षात्कार झाला आहे अशी बुद्धि ज्याला आहे [च अविपर्ययबाधित:-] व जो विपर्ययानें बाधित झालेला नाहीं, असा ज्ञानी [किं इच्छन् कस्य कामाय शरीरं अनुसंज्वरेत्-] कशाची इच्छा करून कोणाच्या कामाकरितां शरीराविषयीं दु:खी होईल?**

प्रकाश:- आत्मानुभवानें पूर्णअशी ज्याची बुद्धि आहे, व ज्याला मी 'देह आहें' किंवा 'मी दु:खी आहें' किंवा 'मी शहाणा आहें' अशा प्रकारचा विपरीत बोध कधीच होत नाहीं, तो शरीर दु:खी होतांच 'मी दु:खी आहें' इत्यादि प्रकारें समजून कशाकरितां ताप भोगील ? ताप भोगण्याचें कारणच नष्ट झाल्यामुळें त्याला तो भोगावा लागणार नाहीं, हें उघड आहे. आत्म्याच्या अज्ञानामुळें प्राणी 'देहादिकच मी आहे' अशी भावना करितो; नंतर देहादिरूप आत्म्याच्या उणीवा भरून काढण्याकरितां अनेक इच्छा करून अनेक प्रकारें दु:ख भोगीत असतो; असा अबाधित नियम आहे. पण आत्मसाक्षात्कार ज्याला झालेला असतो, त्याला स्वत:मध्यें कोणतीच उणीव भासत नसल्यामुळें तो कशाचीहि इच्छा करीत नाहीं व दु:खीहि होत नाहीं. ॥१३५॥

-या श्रुतीच्या उत्तरार्धाचें तात्पर्य असें -

जगन्मिथ्यात्वधीभावादाक्षिप्तौ काम्यकामुकौ ।
तयोरभावे संताप: शाम्येन्नि:स्नेहदीपवत् ॥३६

अन्वयार्थ - [जगन्मिथ्यात्वधीभावात् काम्यकामुकौ आक्षिप्तौ स्त:-] **जगत् मिथ्या आहे अशी बुद्धि झाल्यामुळें काम्य पदार्थ व कामुक प्राणी या दोहोंविषयींहि आक्षेप केला आहे [च तयो: अभावे संताप: नि:स्नेहदीपवत् शाम्येत्-] व त्यांचा असंभव झाला असतां तैलरहित दीपाप्रमाणें संताप शांत होतो.**

प्रकाश:- या जाग्रत् सृष्टीचा इतर अवस्थेंत बाध होत असतो, यास्तव तो जाग्रदवस्थेंत बाधित होणाऱ्या स्वप्नसृष्टीप्रमाणें बाध्य आहे; असा एकदा सूक्ष्म विचाराच्या योगानें निश्चय झाला कीं, काम्य विषय व कामुक भोक्ता यांची स्थितिच होत नाहीं. म्हणजे त्या निश्चयी पुरुषांच्या व्यवहारांत त्यांना थाराच मिळत नाहीं. कारण जगाच्या सत्यत्वावर त्यांचें अस्तित्व असतें. आणि जगच मिथ्या ठरल्यावर त्यांची स्थिति कशी होणार ? असो; भोग्य आणि भोक्ता यांचा एकदा अशा प्रकारें बाध झाला कीं, त्यांच्याकरितां होणारा संतापहि आपोआप नष्ट होतो. म्हणजे दिव्यांतील तेल संपलें असतां जसा तो दिवा आपोआप विझतो, त्याप्रमाणें संतापास पुष्टि देणारे विषयादि बाधित झाले असतां तोहि बाधित होतो. ॥१३६॥

-'अहोपण, काम्याच्या अभावीं कामनेचाहि अभाव होतो, असा अनुभव कोठें आहे ?' उत्तर -

गंधर्वपत्तने किंचिन्नैंद्रजालिकनिर्मितम् ।
जानन्कामयते किंतु जिहासति हसन्निदम् ॥३७

अन्वयार्थ - [गंधर्वपत्तने इदं ऐंद्रजालिकनिर्मितं

इति जानन् किंचित् न कामयते-] गंधर्वनगरांतील हें सर्व वस्तुजात मायेनें उत्पन्न केलेलें आहे, असें जाणणारा पुरुष त्याची इच्छा करीत नाहीं. [किंतु हसन् सन् जिहासति-] परंतु त्या वस्तूस पाहून हंसणारा तो तिचा त्याग करण्याची इच्छा करितो.

प्रकाश:- गंधर्व ही देवता आहे ज्याची अशा मंत्राच्या योगानें गारुड्यानें क्षुब्ध केलेल्या मायेनें निर्माण केलेल्या नगरांत, त्याचा खेळ पाहणाऱ्या लोकांस अनेक पदार्थ दिसतात. पण ते सर्व मायिक आहेत असें त्यांस निश्चयानें ठाऊक असल्यामुळें ते त्यांतील एकाद्याचीहि इच्छा करीत नाहींत. तर उलट 'हें सर्व कपट आहे' असें जाणून ते आश्चर्यपूर्वक हंसतात व त्याचा अव्हेर करण्याची इच्छा करितात. म्हणजे मनोरंजनार्थ जरी ते त्याच्याकडे पहात असले, तरी त्यांचा भोग घेण्याची इच्छा करीत नाहींत. व त्यामुळें त्यांच्यापासून त्यांना संतापहि होत नाहीं. ॥१३७॥

-आतां हाच दृष्टान्त दार्ष्टान्तिकाचे ठिकाणीं योजितात-

आपातरमणीयेषु भोगेष्वेवं विचारवान् ।
नानुरज्यति किंत्वेतान्दोषदृष्ट्या जिहासति ।।३८

अन्वयार्थ - [एवं आपातरमणीयेषु भोगेषु विचारवान् व अनुरज्यति-] त्याचप्रमाणें सकृद्दर्शनीं रमणीय वाटणाऱ्या भोगांमध्यें विचारवान् आसक्त होत नाहीं. [किंतु दोषदृष्ट्या एतान् जिहासति-] तर दोषदृष्टीनें त्यांस सोडण्याची इच्छा करितो.

प्रकाश:- पात म्हणजे विनाश (म्ह. विचारजन्य बाध). तो होईतो रमणीय वाटणारे असे जे माळा, चंदन, स्त्रिया इत्यादि विषय त्यांच्याठायीं विवेकी पुरुष कधींच अनुरक्त होत नाहीं. तर ते नाशिवंत आहेत, बंधोत्पादक आहेत, दु:खदायी आहेत इत्यादि त्यांच्या ठिकाणच्या दोषांकडे दृष्टि देऊन त्यांचा अव्हेर करण्याची इच्छा करितो. ॥१३८॥

-विषयांतील दोषांचें दर्शन कसें करावें, तें स्वत: ग्रंथकार सांगतात-

अर्थानामर्जने क्लेशस्तथैव परिपालने ।
नाशे दु:खं व्यये दु:खं धिगर्थान्क्लेशकारिण: ।।३९

अन्वयार्थ - [अर्थानां अर्जने क्लेश:-] विषयांचें अर्जन करीत असतांना क्लेश, [तथा एव परिपालन क्लेश:-] तसेंच त्यांचें रक्षण करतांनाहि क्लेश; [नाशे दु:खं-] नाश झाला असतां दु:ख, [व्यये दु:खं-] क्षय होऊं लागला असताहि दु:ख, [अत: क्लेशकारिण: अर्थान् धिक्-] यास्तव त्या क्लेशकारी विषयांस धिक्कार असो !

प्रकाश:- विषयसंपादन करणें अति कष्टकर आहे. त्यांचें संरक्षण तर त्याहूनहि बिकट आहे. त्यांचा नाश झाला असतां दु:खास पारावार नाहींसा होतो. त्यांचा कांहीं निमित्तांच्या योगानें क्षय होऊं लागला असतांहि अपरिमित दु:ख सहन करावें लागतें. तस्मात् अशा प्रकारच्या सतत दु:ख देणाऱ्या विषयांस धिक्कार असो ! असें ह्या श्लोकाचें तात्पर्य होय. हा श्लोक बृहद्योगवासिष्ठांतील आहे. व उत्तम अधिकाऱ्यानें विषयांचें ठायीं दोषदर्शन कसें करावें हें यांत सांगितलें आहे. ॥१३९॥

-आतां कांहीं विषयांचें अशुभत्व दाखवितात-

मांसपांचालिकायास्तु यंत्रलोलेऽगपंजरे ।
स्नाय्वस्थिग्रंथिशालिन्या: स्त्रिया: किमिव शोभनम् ।।४०

अन्वयार्थ - [स्नाय्वस्थिग्रंथिशालिन्या: तु मांसपांचालिकाया: स्त्रिया:-] स्नायु, अस्थि, ग्रंथि इत्यादिकांनीं युक्त अशी जी मांसाची पुतळी स्त्री तिच्या [यंत्रलोले अंगपंजरे किं शोभनं इव अस्ति-] कळसूत्री बाहुलीप्रमाणें चंचल असलेल्या शरीरांत सुंदर-पवित्र असें काय आहे ? कांहीं नाहीं.

प्रकाश:- पांचालिका-पुतळी, किंवा

वस्त्रादिकांच्या योगानें तयार केलेली बाहुली. यंत्रलोले कळसूत्री बाहुलींप्रमाणें गारुडी कळ दाबून प्रेरणा करील त्याप्रमाणें चेष्टा करणाऱ्या; **अंगपंजरे**-अंगरूप पिंजऱ्यांत. पिंजरा जसा पोपटास बद्ध करून ठेवितो, त्याचप्रमाणें पुरुषाच्या मनास स्त्रीशरीर बद्ध करीत असतें. पंजरे हा योग्य शब्द येथें घातला आहे. स्नायु - शिरा. अस्थि -हाडें. ग्रंथि - स्तनादि मांसाचे गोळे. सारांश, ह्या अमंगल पदार्थांनीं भरलेल्या स्त्रीशरीरांत सुंदरता ती कोठें राहाणार ? स्त्री शरीरांस पाहून पुरुष अति लंपट होत असल्यामुळें त्यांचीच येथें विशेषत: निंदा केली आहे. बाकी स्त्री व पुरुष या उभयतांचींहि शरीरें सारखींच. हा श्लोकहि योगवासिष्ठांतलाच आहे. ॥१४०॥

सारांश -

एवमादिषु शास्त्रेषु दोषा: सम्यक् प्रपंचिता: ।
विमृशन्ननिशं तानि कथं दु:खेषु मज्जति ॥४१

अन्वयार्थ - [एवमादिषु शास्त्रेषु दोषा: सम्यक् प्रपंचिता: सन्ति-] **इत्यादि या अशा प्रकारच्या शास्त्रांमध्यें दोष उत्तम प्रकारें सविस्तर दाखविले आहेत.** [तानि अनिशं विमृशन् दु:खेषु कथं गज्जति-] **त्या शास्त्रांचें सतत परिशीलन करणारा पुरुष दु:खामध्यें कसा मग्न होईल ?**

प्रकाश:- 'त्वङ्मांसरक्तबाष्पाम्बु पृथक्कृत्वा विलोचने । समालोक्य रम्यं चेत् किं मुधा परिमुह्यसि ॥' 'न वै स्त्रैणानि सख्यानि सन्ति सालावृकाणां हृदयान्येता:' (शाकल) ... दुर्गन्धे नि:सारेऽस्मिन् शरीरे किं कामोपभागै:' (मित्रायणीय) वगैरे. ह्या प्रकारेंच श्रुतिस्मृतिपुराणांमध्यें अनेक स्थळीं विषयांची विस्तृत निंदा आढळते. व त्यामुळें शास्त्राचें परिशीलन करणाऱ्या पुरुषांच्या विषयप्रवृत्तीस प्रतिबंध होतो. कारण ज्याला विषय दु:खमय आहेत असें समजतें, तो त्यांस आलिंगन देण्याची इच्छा कधीं तरी करील काय ? ॥१४॥

-विषय दोषयुक्त आहेत असें समजल्यावर मनुष्यांना त्यांच्या भोगाची इच्छा होत नाहीं, याविषयीं युक्तिसहित दृष्टान्त देतात-

क्षुधया पीड्यमानोऽपि न विषं ह्यत्तुमिच्छति ।
मिष्टान्नध्वस्ततृड् जानन्नामूढस्तज्जिघत्सति ॥४२

अन्वयार्थ - [क्षुधया पीड्यमान: अपि विषं अत्तुं न हि इच्छति-] **क्षुधेनें व्याकुल होणारा पुरुषहि विष खाण्याची इच्छा करीत नाहीं, हें प्रसिद्ध आहे.** [अमूढ: मिष्टान्नध्वस्ततृट् जानन् तत् न जिघत्सति-] **मग मिष्टान्नाच्या योगानें ज्याची क्षुधा शांत झाली आहे, असा विवेकी पुरुष समजून-उमजून तें खाण्याची इच्छा करीत नाहीं, हें काय सांगावें.**

प्रकाश - एकाद्याचे प्राण क्षुधेने व्याकुळ होऊन जरी शरीर सोडून जाऊं लागले, तरी विष खाऊन क्षुधा शांत करून घ्यावी असें तो कधींहि मनांत आणीत नाहीं व आणणारहि नाहीं. कारण विष खाल्ल्यानें प्राणरक्षण होणें शक्य नाहीं असें त्याला ठाऊक असतें. ही सामान्य मनुष्याची गोष्ट झाली. व बुभुक्षित सामान्य मनुष्यहि जर विष खाऊन जीव वांचविण्याचें मनांत आणीत नाहीं तर मिष्टान्न भोजनांच्या योगानें तृप्त झालेला शाहाणा मनुष्य तें खाईल हें संभवतें तरी का ? कधींच नाहीं. तात्पर्य, विषय विषरूप आहेत असें ज्याला निश्चयपूर्वक कळून चुकलें आहे, असा साधकहि जर त्यांस मोठ्या निग्रहानें सोडूं शकतो, तर आत्मसाक्षात्कार झाल्यामुळें ज्यांची नि:सीम तृप्ति झाली आहे, तो त्यांच्याकडे ढुंकूनहि पहाणार नाहीं हें काय सांगावें ? ॥१४२॥

-प्रारब्धकर्म अति प्रबल असल्यामुळें ज्ञान्यासहि भोगेच्छा होईल, अशी शंका घेऊन समाधान करितात -

प्रारब्धकर्मप्राबल्याद्भोगेष्विच्छा भवेद्यदि ।
क्लिश्यन्नेव तदाऽप्येष भुंक्ते विष्टिगृहीतवत् ॥४३

अन्वयार्थ - [यदि प्रारब्धकर्मप्राबल्यात् भोगेषु इच्छा भवेत्-] **जरी प्रारब्ध कर्माच्या प्राबल्यामुळें**

भोगांविषयीं इच्छा झाली [तदा अपि एष: विष्टि-गृहीतवत् क्लिश्यन् एक भुंक्ते-] तरीहि हा ज्ञानी वेठीस धरलेल्या बेगाऱ्याप्रमाणें कष्टी होऊनच भोग भोगितो.

प्रकाश - प्रारब्धकर्म अति प्रबल आहे. यास्तव ज्ञानी त्यांचें उल्लंघन करूं शकत नाहीं. व त्यामुळें जरी त्यास इच्छा होत असली तरी तो इष्ट भोगांचा उपभोग घेत असतांना फार कष्टी होतो. कसा कष्टी होतो, याविषयीं दृष्टान्त-एखादा सरकारी अधिकारी यावयाचा असतां त्याचें काम करण्याकरितां कांहीं नोकर नाखुषीनें पकडले जातात, व सरकारपुढें इलाज नाहीं असें समजून मोठ्या दु:खानें ते काम करीत असतात. हा प्रकार मोठ्या शहरांपेक्षां खेड्यापाड्यांतून विशेष पाहावयास सांपडतो. सारांश या दृष्टान्ताप्रमाणें ज्ञानी पुरुष मोठ्या असंतोषानें विषयसेवन करीत असतात. ।।१४३।।

-'पण हें कशावरून कळतें ?' उत्तर -

भुंजाना वा अपि बुधा: श्रद्धावन्त: कुटुंबिन: ।
नाद्यापि कर्म नश्छिन्नमिति क्लिश्यन्ति संततम् ।।४४

अन्वयार्थ - [श्रद्धावन्त: कुटुंबिन: वा बुधा: भुंजाना: अपि-] श्रद्धावान् ज्ञानी गृहस्थ प्रारब्धकर्मामुळें प्राप्त झालेले भोग भोगीत असतांनाहि [न: कर्म अद्यापि न छिन्नं इति संततं क्लिश्यन्ति-] 'आमचें कर्म अजून नष्ट झालें नाहीं' असें म्हणून सतत कष्टी होत असतात.

प्रकाश:- कोणी ज्ञानी असो, कीं श्रद्धायुक्त होऊन यथाशास्त्र आश्रमाचरण करणारा असो, त्याला कर्म भोगावेंच लागतें. पण तो कर्मभोगांस कंटाळलेला असतो व त्यामुळें एखाद्या अनर्थांत पडलेल्या सज्जनाप्रमाणें ''देवा, मी यांतून केव्हां बरें मुक्त होईन?'' असें त्यांतील प्रत्येक प्रतिक्षणी म्हणत असतो. तात्पर्य; त्यांना उत्तम भोगांपासून प्राकृताप्रमाणें सुख न होता उलट दु:ख होत असतें. व त्यामुळें ते त्यांतून सुटण्याची वाट पाहात असतात. ।।१४४।।

-'अहोपण, तत्त्ववेत्यांना असा संसारसंताप होणें अयोग्य आहे. कारण त्यामुळें ज्ञान व्यर्थ होण्याचा प्रसंग येतो.' उत्तर -

नायं क्लेशोऽत्र संसारताप: किं तु विरक्तता ।
भ्रांतिज्ञाननिदानो हि ताप: सांसारिक: स्मृत: ।।४५

अन्वयार्थ - [अयं क्लेश: संसारताप: न किं तु अत्र विरक्तता अस्ति-] हा क्लेश संसारताप नव्हे, तर संसाराविषयीं विरक्ति आहे. [हि सांसारिक: ताप: भ्रांतिज्ञाननिदान: स्मृत:-] कारण संसाराचा जो ताप असतो, त्याचें कारण भ्रांतिज्ञान असतें असें सांगितलें आहे.

प्रकाश:- संसारांत जो संताप होत असतो, तो भ्रममूलक ज्ञानामुळें होतो. म्हणजे वस्तुत: आत्मा नित्य व त्याहून इतर सर्व अनित्य, असा खरा प्रकार असतांनाहि त्याच्या विपरीत समजूत करून घेऊन जो संसार करूं लागतो, त्यास पदोपदीं दु:ख भोगावें लागतें. यास्तव सांसारिक संतापाचें कारण भ्रमज्ञान (विपरीत भावना) आहे हें उघड होय. ज्ञानी पुरुषाचा भ्रम तर पूर्वींच कधीं निघून गेलेला असतो. व त्यामुळें त्यास संताप होण्याचें कारणच राहात नाहीं. यास्तव पूर्वश्लोकांत दाखविलेला जो असंतोष तें वैराग्य होय, असेंच म्हणणें युक्त आहे. ।।१४५।।

-'पण हा क्लेश विवेकमूलक आहे, कीं अविवेकमूलक आहे, हें कशावरून कळणार ?' उत्तर -

विवेकेन परिक्लिश्यन्नल्पभोगेन तृप्यति ।
अन्वथाऽनंतभोगेपि नैव तृप्यति कर्हिचित् ।।४६

अन्वयार्थ - [विवेकेन परिक्लिश्यन् पुरुष: अल्पभोगेन तृप्यति-] विवेकाच्या योगानें अतिशय खिन्न होणारा पुरुष थोड्याशा भोगानेंच तृप्त होतो.

[अन्यथा अनंतभोगे अपि स: कर्हिचित् न तृप्यति एव-] नाहीं तर असंख्य भोग भोगूनहि तो कधींच तृप्त होत नाहीं.

प्रकाश:-ज्ञानी पुरुषास जो सांसारिक भोगांचा कंटाळा आलेला असतो, तो विवेकामुळें होय. कारण तसें जर नसतें, तर भोगसमयीं त्यास क्लेश झाले नसतें. व उलट प्राकृताप्रमाणें तो विषयांत निमग्न होऊन राहता. पण वस्तुस्थिति तशी आढळत नाहीं. विवेकी पुरुष दु:ख व सुख या दोघांनाहि थोड्याशा अवकाशांतच कंटाळतो असा सर्वत्र अनुभव आहे. यास्तव विवेकजन्य संताप म्हणजे विरक्तीच होय हें निर्विवाद झालें ॥१४६॥

-'अहोपण, विवेक्याप्रमाणें अविवेक्याचीहि भोगानेंच तृप्ति होते. तेव्हां विवेक हें कांहीं तृप्तीचें कारण नव्हे :' उत्तर -

न जातु काम: कामानामुपभोगेन शाम्यति
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ॥४७

अन्वयार्थ - **[काम: कामानां उपभोगेन न जातु शाम्यति-] विषयतृष्णा इष्ट विषयांच्या उपभोगानें कधींहि शांत होत नाहीं. [किं तु हविषा कृष्णवर्त्मा इव भूय: एव अभिवर्धते-] तर हविर्भागाच्या योगानें जसा अग्नि त्याप्रमाणें ती अधिकच वाढते.**

प्रकाश:- या श्लोकांत मनुमहाराजांनीं सामान्य सिद्धान्त सांगितला आहे. कोणी जर म्हणेल कीं तृष्णेची शांति करण्यास्तव इष्ट विषयांचा एकदा मनमुराद भोग घेऊन नंतर त्यांस मी सोडीन; तर तें अशक्य आहे. कारण अग्नीवर तुपासारख्या उत्तेजक पदार्थाची धार धरिल्यास तो जसा विझत नाहीं व उलट अधिकच प्रदीप्त होतो, त्याप्रमाणें विषयांच्या अधिकाधिक सेवनानें विषयतृष्णा अधिकाधिक वाढत जाते. यास्तव विवेकजन्य विरक्तीच्या योगानें तृष्णानिरोध करणें हाच एक विषयांतून सुटण्याचा उपाय आहे. मनु. २-९४ पहा ॥१४७॥

-विषयांचें स्वरूप ओळखून विवेकपूर्वक त्यांचा भोग घेतला असतां थोडक्यांत तृप्ति होते, असें आतां दृष्टान्त देऊन व्यक्त करितात-

परिज्ञायोपभुक्तो हि भोगो भवति तुष्टये ।
विज्ञाय सेवितश्चोरो मैत्रीमेति न चोरताम् ॥४८

अन्वयार्थ - [यथा चोर: विज्ञान सेवित: मैत्रीं एति न चोरताम्-] ज्याप्रमाणें चोरास ओळखून त्याची संगति केली असतां तो मित्र होतो-चोरत्वास प्राप्त होत नाहीं. [तथा परिज्ञाय उपभुक्त: भोग: तुष्टये भवति-] त्याप्रमाणें जाणून ज्यांचा भोग घेतला आहे असा विषयोपभोग तृप्तीला कारण होतो.

प्रकाश:- व्यवहारांत चोराची संगति करावयाची असल्यास त्याचें खरें स्वरूप ओळखून जो त्याची संगति धरितो, त्याला त्याच्यापासून कोणत्याहि प्रकारें इजा पोचत नाहीं; तर उलट तो त्याचा जणुकाय हितकर्ता मित्र होतो. म्हणजे मी ज्याच्याशीं संगती करीत आहे तो भला मनुष्य नसून महा लबाड व चोर आहे असें समजल्यावर कोणीहि झाला तरी आपल्या वस्तूविषयीं सावध रहातो. व त्यामुळें त्यास चोराच्या संगतीचें कडू फल चाखावें लागत नाहीं. तसेंच विषय कोणत्या योग्यतेचे आहेत हें ज्यास समजतें व त्यांचें खरें स्वरूप ओळखून जो त्यांचा भोग घेतो, तो अगदीं थोड्या अवकाशांत तृप्त होतो. ॥१४८॥

-'अहोपण, कामना हा मनाचा स्वभावच आहे. तेव्हां अल्पभोगानें तृप्ति कशी होईल ?' उत्तर -

मनसो निगृहीतस्य लीलाभोगोऽल्पकोऽपि य: ।
तमेवालब्धविस्तारं क्लिष्टत्वाद्बहु मन्यते ॥४९

अन्वयार्थ - [निगृहीतस्य मनस: अल्पक: अपि य: लीलाभोग:-] निरुद्ध मनाचा जो अल्प असाहि

सहजसिद्ध भोग [तं एव क्लिष्टत्वात् अलब्धविस्तारं बहु मन्यते-] त्यासच मन क्लेशयुक्त झाल्यामुळें अनंत संकल्परूप न होतां बहु मानतें.

प्रकाश:- पूर्वोक्त रीत्या ऐक्यानुसंधान केल्यामुळें मन निरुद्ध होतें. म्हणजे मिथ्या विषयांविषयीं जें त्याचें चांचल्य तें नष्ट होतें. व मन निश्चल झाल्यावर प्रयत्नावांचून (यदृच्छेनें) प्राप्त होणारा जो थोडासाहि भोग त्याला मिळतो, तोच पुष्कळ आहे असें त्यास वाटतें. म्हणजे सर्वदा एकांतवासांत राहण्याची ज्याला संवय झाली आहे, त्यास जर्शी दहा पांच पळें कोणाची उपाधि झाली असतांहि ती फार मोठी वाटते, तसाच हा प्रकार होतो. कारण निश्चल मनास अल्प भोगापासून कष्ट होतात व त्यामुळें तें प्राकृतांच्या मनाप्रमाणें अनेक संकल्पांच्या योगानें विस्तृत होत नाहीं. ॥१४९॥

-निगृहीत मनाची अल्प भोगानेंहि तृप्ति होते, याविषयीं दृष्टान्त -

बद्धमुक्तो महीपालो ग्राममात्रेण तुष्यति ।
परैर्न बद्धो नाक्रांतो न राष्ट्रं बहु मन्यते ॥१५०

अन्वयार्थ - [बद्धमुक्त: महीपाल: ग्राममात्रेण तुष्यति-] ज्याला पूर्वीं बद्ध करून नंतर मुक्त केलें आहे असा राजा केवल एका गांवानेंच संतुष्ट होतो [किं तु परै: न बद्ध: न अपि आक्रांत: राष्ट्रं बहु न मन्यते-] पण ज्याला शत्रूंनीं बद्धहि केलें नाहीं व ज्यावर त्यांनीं आक्रमणहि केलें नाहीं तो सर्व राष्ट्रहि पुष्कळ आहे, असें समजत नाहीं.

प्रकाश:- शत्रूनें ज्यास पराजित करून आपल्या अंकित केलें आहे व कैद्याप्रमाणें अटकेंत टाकलें आहे असा एकादा अभागी राजा शत्रूनें कृपा करून सोडून देऊन त्याला एकादा लहानसा गांव जरी दिला तरी प्रसन्न होतो. कारण सर्वस्व जेथे नष्ट झालें होतें तेथें एकादा गांवहि कांहीं थोडा नव्हे. पण तेंच एकाद्या भाग्यवान् न निष्कंटक सार्वभौम राज्याचा उपभोग घेणाऱ्या राजास त्याचें विस्तृत राज्यहि थोडेंच वाटतें. याला अगदीं आधुनिक दृष्टांत पाहिजे असल्यास जगावर साम्राज्य चालविण्याची इच्छा बाळगणाऱ्या तीन बड्या राष्ट्रांकडे पहा ॥१५०॥

-'अहोपण, तुम्ही वर - १४३ व्या श्लोकांत ज्ञानी पुरुषालाहि प्रारब्धकर्मामुळें इच्छा होते, असें म्हटलेंत, पण तें अयोग्य आहे. कारण इच्छेचा विघात करणारें विवेकज्ञान असतांना तिची उत्पत्तिच संभवत नाहीं,' अशी शंका-

विवेके जाग्रति सति दोषदर्शनलक्षणे ।
कथमारब्धकर्मापि भोगेच्छां जनयिष्यति ॥५१॥

अन्वयार्थ - [दोषदर्शनलक्षणे विवेके जाग्रति सति -] अहोपण, दोषनिरीक्षणरूप विवेक जागृत असतांना [आरब्धकर्म अपि भोगेच्छां कथं जनयिष्यति-] प्रारब्ध कर्म तरी भोगाविषयीं इच्छा कशी उत्पन्न करील ?

प्रकाश:- विषय हे दोषी आहेत असा त्यांच्याविषयीं नित्य विचार करून त्यांच्या दोषांचें निरीक्षण करावयास लागलें असतां भोगेच्छा हळू हळू कमी होते व विवेक पूर्ण झाला कीं, ती समूळ नष्ट होते असा नियम आहे. तेव्हां दोषदर्शनरूप विवेक जागत असतां प्रारब्धकर्म भोगेच्छा कशी उत्पन्न करील ? कारण ती अविवेकामुळें होणारी आहे, असें तुम्हीहि हजार वेळा सांगितलें आहे. प्रारब्धकर्मामध्यें असें काय मोठें सामर्थ्य आहे कीं ज्याच्या योगानें तें विवेकासहि हटवून आपलें कार्य करितें ? ॥१५१॥

-दोषदर्शन विवेक असतांनाहि इच्छेचा जन्म संभवतो. कारण प्रारब्धकर्म नानाप्रकारचें असतें, असें वरील शंकेचें समाधान सांगतात-

नैष दोषो यतोऽनेकविधं प्रारब्धमीक्ष्यते ।
इच्छाऽनिच्छा परेच्छा च प्रारब्धं त्रिविधं स्मृतम् ॥५२

अन्वयार्थ - [यत: अनेकविधं प्रारब्धं ईक्ष्यते

अत: एष: दोष: न अस्ति-] ज्याअर्थी अनेक प्रकारचें प्रारब्ध उपलब्ध होतें त्याअर्थी हा दोष येत नाहीं. [इच्छा, अनिच्छा व परेच्छा इति त्रिविधं प्रारब्धं स्मृतं अस्ति-] इच्छा, अनिच्छा व परेच्छा असें तीन प्रकारचें प्रारब्ध सांगितलेलें आहे.

प्रकाश:- प्रारब्धकर्म जर एकाच प्रकारचें असतें तर पूर्वोक्त शंका सयुक्तिक झाली असती; व विवेक विद्यमान असतां भोगेच्छा उत्पन्न होणें दुर्घट झालें असतें. पण वस्तुस्थिति तशी नाहीं. कारण प्रारब्धकर्म परस्परविरोधि असें अनेक प्रकारचें फल देत असतें, असें आढळतें. व त्यामुळें तें कर्मच अनेकविध आहे असा निश्चय होतो. शास्त्रज्ञांनीं इच्छाप्रारब्ध, अनिच्छाप्रारब्ध व परेच्छाप्रारब्ध असें त्रिविध प्रारब्धकर्म सांगितलें आहे. या प्रत्येकाचें स्पष्टीकरण यापुढें मूळ ग्रंथांतच होणार असल्यामुळें त्याचा येथें विस्तार करीत नाहीं. ॥१५२॥

-इच्छाप्रारब्ध कोणतें तें सांगतात -

अपथ्यसेविनश्चोरा राजदाररता अपि ।
जानन्त एव स्वानर्थमिच्छन्त्यारब्धकर्मत: ॥५३

अन्वयार्थ - [अपथ्यसेविन: चोरा: राजदाररता: अपि-] कुपथ्य करणारे, चोर व राजस्त्रीशीं रत होणारेहि [जानन्त: एव आरब्धकर्मत: स्वानर्थं इच्छन्ति-] परिणाम जाणत असतांनाहि प्रारब्धकर्मामुळें आपल्या अनर्थाची इच्छा करितात.

प्रकाश:- रोग्यास कुपथ्य केल्यास मरावें लागेल हें ठाऊक असतें, चोरास दुसऱ्याचीं घरें फोडल्यास कैदेंत पडावें लागेल हें ठाऊक असतें, राजाच्या स्त्रीशीं अयोग्य संबंध करणारास ही गोष्ट राजास समजली असतां आपल्या मस्तकाचे तुकडे उडतील हें ठाऊक असतें, तरी ते त्या त्या अनर्थकर कृत्यांत प्रवृत्त होतात. या स्वेच्छाप्रवृत्तीचें कारण 'इच्छा' प्रारब्धच होय; असें म्हणावें लागतें. कारण त्यावांचून शाहाण्याच्या हातून अशीं कृत्यें होणें शक्य नाहीं. भीमानें विषमिश्रित मोदक भक्षण करणें, श्रीकृष्णानें लोणी चोरणें, चंद्रानें गुरुस्त्रीशीं गमन करणें, इत्यादि इच्छाप्रारब्धाचीं पौराणिक उदाहरणें होत. ॥१५३॥

-'अपथ्यसेवनादिकांविषयींची इच्छा हें प्रारब्धफल कसें ?' उत्तर -

न चात्रैतद्वारयितुमीश्वरेणापि शक्यते ।
यत ईश्वर एवाह गीतायामर्जुनं प्रति ॥५४

अन्वयार्थ - [च अत्र ईश्वेरण अपि एतत् वारयितुं न शक्यते-] आणि या लोकीं ईश्वराच्या हातूनहि याचें निवारण होणें शक्य नाहीं. [यत: गीतायां अर्जुनं प्रति ईश्वर: एव आह-] कारण गीतेमध्यें अर्जुनाला ईश्वरानेंच तसें सांगितलें आहे.

प्रकाश:- मोठा सामर्थ्यवान् पुरुषहि या इच्छेच्या मूलभूत प्रारब्धाचें निवारण करण्यास समर्थ नाहीं. फार काय, पण साक्षात् भगवन्तांनींहि अर्जुनास असेंच सांगितलें आहे. ॥१५४॥

-भगवन्ताचें मूळ वाक्यच येथें घेतात-

सदृशं चेष्टते स्वस्या: प्रकृतेर्ज्ञानवानपि ।
प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रह: किं करिष्यति ॥५५

अन्वयार्थ - [ज्ञानवान् अपि स्वस्या: प्रकृते: सदृशं चेष्टते-] विवेकीहि आपल्या प्रकृतीप्रमाणें चेष्टा करितो [भूतानि प्रकृतिं यान्ति-] सर्व भूतें स्वभावावर जातात. [निग्रह: किं करिष्यति-] तेथें माझा किंवा अन्य कोणाचा नियम काय करणार ?

प्रकाश:- पूर्वकर्माप्रमाणें बनलेल्या आपल्या स्वभावाचें अतिक्रमण ज्ञान्यासहि करितां येत नाहीं. सृष्टींत जेवढीं स्थिरचर भूतें आहेत तेवढीं सर्व आपापल्या स्वभावानुरूप कर्मे आचरीत असतात. व त्यामुळें कोणताहि नियम किंवा इंद्रियनिग्रह प्रकृतीस स्ववश करूं शकत नाहीं. गीतेच्या तिसऱ्या अध्यायांत हा श्लोक आहे हें गीतापाठकास सहज समजेल. ॥१५५॥

-तीव्र प्रारब्ध अपरिहार्य आहे, याविषयीं आणखी एका वचनाची संमति -

अवश्यंभाविभावानां प्रतीकारो भवेद्यदि ।
तदा दु:खैर्न लिप्येरन्नलरामयुधिष्ठिरा: ॥५६

अन्वयार्थ - [यदि अवश्यंभाविभावानां प्रतीकार: भवेत्-] अवश्य होणाऱ्या दु:खादिकांना जर प्रतीकार करितां आला असता, [तदा नल-राम-युधिष्ठिरा: दु:खै: न लिप्येरन्-] तर नल, राम व युधिष्ठिर दु:खांनीं लिप्त झाले नसते.

प्रकाश:- प्रारब्धकर्मामुळें प्राप्त होणाऱ्या भोगांस अवश्य होणारे भोग असें म्हणतात. कारण त्यांचा कोणत्याहि उपायानें निरास होत नाहीं. व तो जर होणें शक्य असतें, तर नलासारखे ज्ञानी, समर्थ व दूरदर्शी राजे अनर्थात कां पडले असते ? या श्लोकांत ज्या तीन सत्पुरुषांचा निर्देश केला आहे, त्यांतील पहिला व तिसरा द्यूतामुळें असह्य व्रिपत्तींत पडला व मधला श्रीराम सुवर्णमृगाच्या मागें लागल्यामुळें संकटांत पडला. पण त्या सर्वांनाहि आपण ज्या कृत्यांत प्रवृत्त होत आहों तें संकटाचें माहेरघर आहे असें समजण्याइतकें ज्ञान होतें. परंतु दैवयोगामुळें त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. अर्थात् दैवगति अनुल्लंघनीय आहे. ॥१५६॥

-प्रारब्ध जर असें अपरिहार्य असेल तर त्याचा परिहार करण्यास असमर्थ असलेल्या ईश्वराला ईश्वरत्वच नाहीं, असें म्हणण्याचा प्रसंग येतो, अशी शंका घेऊन म्हणतात-

न चेश्वरत्वमीशस्य हीयते तावता यत: ।
अवश्यंभाविताऽप्येषामीश्वरेणैव निर्मिता ॥५७

अन्वयार्थ - [यत: एषां अवश्यंभाविता अपि ईश्वरेण एव निर्मिता-] ज्याअर्थीं यांचें अवश्यंभावित्वहि ईश्वरानें निर्माण केलें आहे, [तत: तावता ईश्वरस्य ईश्वरत्वं न हीयते-] त्याअर्थीं तेवढ्यामुळें ईश्वराचें ईश्वरत्व नाहींसें होत नाहीं.

प्रकाश:- प्रारब्धकर्माचें उल्लंघन ईश्वरासहि करितां येत नाहीं, हें खरें, पण 'प्राण्याच्या अफाट संचित कर्मांतील हें इतकेंच या जन्माचें कारण आहे' असें तरी ठरविणारा ईश्वरच होय कीं नव्हे ? मग झालें तर; एवढा ज्याचा अधिकार आहे, त्याला एकाद्या न्यायी राजाप्रमाणें आपल्याच नियमांचें उल्लंघन न करितां आल्यास त्यापासून त्याच्याकडे हीनत्व येत नसून उच्चत्व येतें. प्रत्यक्ष श्रीरामचंद्रांनीं पत्नीवियोग (भृगुशापामुळें) सहन केला हें येथें उदाहरण घ्यावें. ॥१५७॥

-याप्रमाणें इच्छाप्रारब्धाचें वर्णन करून अनिच्छाप्रारब्धाच्या वर्णनास आरंभ करितात-

प्रश्नोत्तराभ्यामेवैतद्गम्यतेऽर्जुनकृष्णयो: ।
अनिच्छापूर्वकं चास्ति प्रारब्धमिति तच्छृणु ॥५८

अन्वयार्थ - [अर्जुनकृष्णयो: प्रश्नोत्तराभ्यां एव-] अर्जुनाचा प्रश्न व श्रीकृष्णाचें उत्तर यांवरूनच [अनिच्छापूर्वकं प्रारब्धं अस्ति इति एतत् अवगम्यते-] अनिच्छाप्रारब्ध आहे, असें समजतें [तत् शृणु-] कसें तें ऐक.

प्रकाश:- अनिच्छा प्रारब्ध आहे ही गोष्ट कृष्णार्जुनसंवादरूप प्रमाणाच्याद्वाराच सिद्ध करण्याकरितां स्वामी येथें आरंभ करीत आहेत. ॥१५८॥

श्रीभद्भगवद्गीतेच्या तिसऱ्या अध्यायांत अर्जुनानें श्रीकृष्णास असा प्रश्न केला आहे -

अथ केन प्रयुक्तोयं पापं चरति पूरुष: ।
अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजित: ॥५९

अन्यार्थ - [हे वार्ष्णेय-] हे वृष्णिकुलोत्पन्ना ! [अयं पूरूष:-] हा पुरुष [केन प्रयुक्त: सन्-] कोणाकडून प्रेरित होत्साता [अनिच्छन् अपि बलात् नियोजित: इव-] इच्छा नसतांनाहि बलात्कारानेंच कोणीं प्रेरित केल्याप्रमाणें [पापं चरति-] पापाचरण

करितो ?

प्रकाश:- इच्छेवांचून कोणाचीहि कोणत्याहि कामांत प्रवृत्ति होत नाहीं, असा सामान्य नियम आहे. पण इच्छा नसतांना बलात्कारानें जसें एकाद्यास कांहीं करावयास लावावें त्याप्रमाणें प्राण्यास त्याच्या त्याच्या इच्छेविरुद्ध पाप करावयास कोण लावतो ? असा या प्रश्नाचा भावार्थ समजावा. ॥१५९॥

-यावर भगवानांचे उत्तर -

काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भव: ।
महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ॥१६०

अन्वयार्थ - [एष: काम: क्रोध: अपि एष: एव-] हा काम आहे. क्रोधहि हाच [अयं महाशन: महापाप्मा, रजोगुणसमुद्भव: अस्ति-] हा मोठा अधाशी व महापापी काम रजोगुणापासून उत्पन्न झालेला आहे. [एनं इह वैरिणं विद्धि-] याला या लोकीं वैरी समज.

प्रकाश:- मनुष्याची पापामध्ये प्रवृत्ति करविणारा काम आहे. काम म्हणजे विषयाभिलाष. यास जरा कोठें प्रतिबंध झाला कीं हा लागलाच क्रोध होतो. याची तृप्ति कधींच होत नाहीं. व त्यामुळें हा महापापी आहे. याची उत्पत्ति रजोगुणापासून होते. या लोकीं हा काम म्हणजे एक मोठा शत्रू आहे असें प्रत्येकानें समजलें पाहिजे. ॥१६०॥

-'तर मग पुरुषाला प्रवृत्त करणारे कामक्रोधच झाले, अनिच्छाप्रारब्ध नव्हे.' अशी शंका घेऊन अनिच्छाप्रारब्धच त्याचें प्रवर्तक आहे, याविषयीं भगवद्वाक्याचाच अनुवाद करितात-

स्वभावजेन कौन्तेय निबद्ध: स्वेन कर्मणा ।
कर्तुं नेच्छसि यन्मोहात् करिष्यस्यवशोऽपि तत् ॥६१

अन्वयार्थ - [हे कौंतेय, स्वभावजेन स्वेन कर्मणा निबद्ध: त्वं-] हे कुंतीपुत्रा, स्वभावापासून उत्पन्न झालेल्या आपल्या कर्माच्या योगानें अत्यंत बद्ध झालेला तूं [यत् मोहात् कर्तुं न इच्छसि-] मोहामुळें जें करण्याची इच्छा करीत नाहींस [तत् अवश: अपि करिष्यसि-] तेंच त्या स्वभावाच्या अधीन होऊनहि करशील.

प्रकाश:- बा अर्जुना, प्रारब्धप्राप्त कर्मामुळें परतंत्र झालेला जो तूं त्या इच्छेविरुद्धहि आचरण करावें लागेल, कारण तूं स्वतंत्र नाहींस. जे स्वतंत्र असतात तेच कांहीं करण्यास, न करण्यास, किंवा काय हवें तें करण्यास समर्थ असतात. ॥१६१॥

-आतां परेच्छाप्रारब्धाचें वर्णन करितात-

नानिच्छन्तो न चेच्छन्त: परदाक्षिण्यसंयुता: ।
सुखदु:खे भजन्त्येतत्परेच्छापूर्वकर्म हि ॥६२

अन्वयार्थ - [न अनिच्छन्त:-] निरीच्छ आहेत असेंहि नाहीं, [न च इच्छन्त:-] व इच्छा करितात असेंहि नाहीं, [किं तु परदाक्षिण्यसंयुता: सुखदु:खे भजन्ति-] पण दुसऱ्याच्या भिडेनें प्रेरित होत्साते कोणी दु:ख व सुख भोगितात, [एतत् परेच्छापूर्वकर्म हि-] हेंच परेच्छाप्रारब्ध कर्म होय.

प्रकाश:- कोणी इच्छेच्या आधीन होऊन पाप करितात व कोणी विषयाभिलाषानें प्रेरित होत्साते इच्छेविरुद्ध पापाचरण करितात, असें पूर्वीं सांगितलें आहे. पण परेच्छाप्रारब्धामध्यें यांतील एकहि प्रकार होत नाहीं. तर दुसऱ्या कोणत्या सामर्थ्यामुळें जीवास सुखदु:ख भोगावें लागतें. याविषयीं हरिश्चंद्र राजाचें उत्तम उदाहरण आहे. कारण वसिष्ठांच्या अनुग्रहामुळें त्यास सुख व विश्वामित्राच्या क्रोधामुळें अत्यंत क्लेश झाले हें सुप्रसिद्ध आहे. ॥१६२॥

-'अहोपण, तत्त्ववेत्त्यालाहि इच्छा होते, असें जर मानलें तर 'किं इच्छन्०' या श्रुतीशीं विरोध येतो ?' उत्तर-

कथं तर्हि किमिच्छन्नित्येवमिच्छा निषिध्यते ।
नेच्छानिषेध: किं त्विच्छाबाधो भर्जितबीजवत् ॥६३

अन्वयार्थ - [कथं तर्हि 'किमिच्छन्' इत्येवं इच्छा निषिध्यते-] तर मग 'कशाची इच्छा करून' इत्यादि प्रकारें इच्छेचा निषेध कसा केला जात आहे ? उत्तर - [अयं इच्छानिषेध: न-] हा इच्छेचा निषेध नव्हे. [किं तु भर्जितबीजवत् इच्छाबाध: अस्ति-] तर भाजलेल्या बीजाप्रमाणें तिचा बाध आहे.

प्रकाश:- श्रुतीमध्यें 'किमिच्छन्' असें जें म्हटलें आहे त्यावरून इच्छेचा निषेध केला आहे असें म्हणतां येणार नाहीं. कारण तो साक्षात् निषेध नसून केवळ आक्षेप आहे. आक्षेपामध्यें निषेधार्थी उत्तर गुप्त असतें हें खरें; पण तो प्रत्यक्ष निषेध नसल्यामुळें त्याचा अन्य तऱ्हेनेंहि अर्थ होतो. यास्तव या आक्षेपाचें तात्पर्य निषेधामध्यें नसून इच्छेच्या नियमित प्रवृत्तीचा बाध करण्यांत आहे. म्हणजे जीवन्मुक्त पुरुषाची इच्छा भाजलेल्या बीजाप्रमाणें आपलें संपूर्ण कार्य करण्यास असमर्थ असते व त्यामुळें ती प्राकृत पुरुषाच्या इच्छेप्रमाणें मुख्य प्रवृतीस कारण होत नाहीं, असा याचा गूढ अर्थ समजावा. ॥१६३॥

-संक्षेपत: सांगितलेल्या अर्थाचाच विस्तार करितात-

भर्जितानि तु बीजानि सन्त्यकार्यकराणि च ।
विद्विदिच्छा तथेष्टव्याऽसत्त्वबोधान्न कार्यकृत् ॥६४

अन्वयार्थ - [यथा भर्जितानि बीजानि अकार्यकराणि सन्ति-] ज्याप्रमाणें भाजलेलीं बीजें अंकूर उत्पन्न करीत नाहींत [तथा विद्वदिच्छा एष्टव्या-] त्याप्रमाणें विद्वानाची इच्छा समजावी; [सा असत्त्वबोधात् न कार्यकृत्-] म्हणजे ज्याची इच्छा करावयाची, तो पदार्थ असत् आहे असें समजल्यामुळें ती आपलें कार्य करावयास समर्थ नसते.

प्रकाश:- भाजलेलें कोणतेंहि बीज अंकुर उत्पन्न करूं शकत नाहीं. कारण त्यास अग्नीचा संस्कार झाल्यामुळें त्याची अंकुरोत्पादक शक्ति नष्ट होत असते. ज्याला आत्मसाक्षात्कार झाला आहे, अशा पुरुषाच्या विषयतृष्णेचीहि तीच अवस्था होते. म्हणजे तिला ज्ञानरूप अग्नीचा संस्कार झाल्यामुळें तीहि बीजाप्रमाणें नि:सत्त्व होते. म्हणूनच भगवान् श्रीकृष्णांनीं गीतेंत 'ज्ञानाग्नि: सर्वकर्माणि भस्मसात् कुरुते- म्ह. ज्ञानाग्नि सर्व कर्में प्रारब्धेतर भस्म करून सोडतो' असें म्हटलें आहे. तात्पर्य ज्याची मी इच्छा करीत आहे, तो विषय असत्य (कांहीं काल भासणारा) आहे, असें समजल्यावर सहजच ती इच्छा आपले अर्थरूप कार्य करण्यास समर्थ होत नाहीं. ॥१६४॥

-तर मग विद्वानाच्या इच्छेचा अंगीकार करण्यांत तरी काय अर्थ आहे. कारण तिचें फल कांहींच नाहीं !' उत्तर -

दग्धबीजमरोहेऽपि भक्षणायोपयुज्यते ।
विद्वदिच्छाऽप्यल्पभोगं कुर्यान्न व्यसनं बहु ॥६५

अन्वयार्थ - [दग्धबीजं अरोहे अपि भक्षणाय उपयुज्यते-] भाजलेलें बीज जरी न उगवलें तरी खाण्याच्या उपयोगीं असतें. [तथा विद्वदिच्छा अपि अल्पभोगं कुर्यात् बहु व्यसनं न कुर्यात्-] तशीच विद्वानाची इच्छाहि अल्पभोग देते, पण फार दु:ख देत नाहीं.

प्रकाश:- भाजलेल्या धान्याचें शेत उगवत नाहीं, तथापि त्याला जसें कोणी टाकून देत नाहीं; तर त्याचा क्षुधानिवृत्तीकडे उपयोग करितात, त्याप्रमाणें विद्वानाची प्रारब्धकर्मजन्य इच्छा त्यास संसाररूपी अनर्थांत पाडण्याविषयीं जरी समर्थ नसली तरी अल्पभोगाच्या योगानें त्याच्या प्रारब्धाचा क्षय करण्यास समर्थ असते. यास्तव आम्ही तिचा अंगीकार करितों ॥१६५॥

-'अहोपण, कर्मच भोगद्वारा व्यसनहि उत्पन्न

करील !' उत्तर -

भोगेन चरितार्थत्वात्प्रारब्धं कर्म हीयते ।
भोक्तव्यसत्यताभ्रांत्या व्यसनंतत्र जायते ।।६६

अन्वयार्थ - [प्रारब्धं कर्म भोगेन चरितार्थत्वात् हीयते-] प्रारब्धकर्म भोगाच्या योगानें कृतकार्य होत असल्यामुळें भोगानंतर क्षीण होतें. [च तत्र भोक्तव्यसत्यताभ्रांत्या व्यसनं जायते-] पण त्या भोग्याविषयीं सत्यताभ्रम झाल्यामुळें दुःख होतें.

प्रकाशः- भोगाचें निमित्त प्रारब्ध आहे. यास्तव तें जीवास सुख, दुःख व त्याचें अधिष्ठान देह हीं देतें व एवढें केलें कीं, त्याचें काम संपलें. प्रारब्धकर्म याच्या पलीकडे कांहींएक करण्यास समर्थ नसतें. त्यामुळें ज्ञान्यास सुख, दुःख व त्यांना अनुरूप असा देह यांची प्राप्ति जरी प्रारब्धामुळें होत असली तरी त्यांच्या योगानें प्राकृताप्रमाणें त्यांस अनर्थांत पडावें लागत नाहीं. कारण ज्यांचा भोग घ्यावयाचा आहे ते पदार्थ नित्य आहेत असें समजल्यामुळेंच साधारण प्राण्यांस अनर्थ प्राप्त होत असतो. तस्मात् भोगांचा परिहार जरी कोणालाहि करितां न आला तरी भोग्य पदार्थ अनित्य आहेत अशा दृढभावनेच्या योगानें ज्ञानी अनर्थांत पडत नाहीं. ।।६६।।

-आतां व्यसनाला कारण होणारा भ्रम सांगतात

मा विनश्यत्वयं भोगो वर्धतामुत्तरोत्तरम् ।
मा विघ्नाः प्रतिबध्नन्तु धन्योऽस्म्यस्मादिति भ्रमः ।।६७

अन्वयार्थ - [अयं भोगः मा विनश्यतु-] हा भोग नष्ट न होवो. [किं तु उत्तरोत्तरं वर्धताम्-] तर उत्तरोत्तर याची वृद्धि होवो. [विघ्नाः मा प्रतिबध्नन्तु-] विघ्न यास प्रतिबंध न करोत. [अस्मात् अहं धन्यः अस्मि-] याच्या योगानेंच मी धन्य आहें, [इति भ्रमः भवति-] असा भ्रम होतो.

प्रकाशः- बहुतेक सर्व प्राण्यांस भोग सत्य आहेत असा नकळत भ्रम कसा होतो तें येथें दाखविलें आहे. सांप्रतकालीं वेदांत शास्त्राचें अवलंबन करून "सर्व मिथ्या आहे" असें म्हणणारे व लोकांस तसा उपदेश करणारे विद्वान पुष्कळ आढळतात. पण ते सर्व भ्रमिष्ट असतात असें त्यांच्या स्वतःच्या आचरणावरूनच कसें ओळखावें, हें जर कोणास शिकावयाचें असेल तर त्यांना या श्लोकाचें पुष्कळ साह्य होईल. सारांश, या श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणे ज्याची ज्याची भावना असेल तो तो प्रत्यक्ष ब्रह्मदेव असला तरी भ्रान्तच होय. ।।१६७।।

-प्रसंगतःच त्याच्या परिहाराचा उपायहि सांगतात-

यदभावि न तद्भावि भावि चेन्न तदन्यथा ।
इति चिंताविषघ्नोऽयं बोधो भ्रमनिवर्तकः ।।६८

अन्वयार्थ - [यत् अभावि तत् न भावि-] जें न होणारें तें होणार नाहीं [भावि चेत् तत् न अन्यथा-] व जें होणार असेल तें चुकणार नाहीं, [इति चिंताविषयः अयं बोधः भ्रमनिवर्तकः अस्ति-] अशा प्रकारचा हा चिंतारूपी विषाचा नाश करणारा बोध भ्रमाचें निवारण करणारा आहे.

प्रकाशः- प्रारब्धकर्म दुर्लंघ्य असल्यामुळें त्याचें निवारण कोणत्याहि उपायानें होणार नाहीं. असें ज्यास पूर्णपणें समजलेलें असतें तो "माझें कल्याण कधीं होईल; मी या यातनेंतून कधीं सुटेन !" इत्यादि प्रकारें चिंता करून त्या चिंतारूपी अग्नींत जळून जात नाहीं. यास्तव अशा प्रकारचा बोधच भ्रमाचें निरसन करणारा आहे, यांत कांहीं शंका नाहीं. ।।१६८।।

-अहोपण ज्ञानी व अज्ञानी असे दोघेहि जर एकसारखेच भोग भोगीत असतात तर एकानें अनर्थांत पडूं नये व दुसऱ्यानें पडावें असें कां ?'

समेऽपि भोगे व्यसनं भ्रांतो गच्छेन्न बुद्धवान् ।
अशक्यार्थस्य संकल्पाद्भ्रांतस्य व्यसनं बहु ।।१६९

अन्वयार्थ - [भोगे समे अपि भ्रांतः व्यसनं गच्छेत् न बुद्धवान्-] भोग एकसारखाच असतांनाहि भ्रांत मनुष्य संकटांत पडतो व ज्ञानी पडत नाहीं. [अशक्यार्थस्य संकल्पात् भ्रांतस्य बहु व्यसनं भवति-] कारण, अशक्य गोष्टींचा संकल्प केल्यामुळें भ्रांताला अनेक संकटें भोगावीं लागतात.

प्रकाश:- ज्याला आत्मसाक्षात्कार झालेला नाहीं, व जो जीव, जगत् इत्यादि सर्व नित्य आहे असें मानीत असतो, त्याला भ्रांत असें म्हटलें आहे. व त्याच्यावर अनेक संकटें येऊन पडत असतात, कारण तो जी कधींहि न होणारी गोष्ट ती व्हावी अशी इच्छा करीत असतो. पण ज्याला आत्मसाक्षात्कार झाला आहे, व त्यामुळें जो हें सर्व अनात्मजात असत् आहे, असें जाणत असतो, त्यास पूर्वोक्त प्राकृताप्रमाणें संकटांत पडावें लागत नाहीं. तात्पर्य; हे भोग्य पदार्थ कधींहि नष्ट न व्हावेत, व मीहि अजरामर होऊन राहावें, असा विचार करणें हेंच अनर्थाचें मूळ आहे. ।।१६९।।

-तर मग तत्त्वज्ञान्यास भोगांचा अनुभव कस कसा होतो ? असें कोणी विचारील म्हणून श्रीभारतीतीर्थ म्हणतात:-

मायामयत्वं भोगस्य बुद्ध्वाऽऽस्थामुपसंहरन् ।
भुंजानोऽपि न संकल्पं कुरुते व्यसनं कुत: ।।१७०

अन्वयार्थ - [भोगस्य मायामयत्वं बुद्ध्वा-] भोग मायामय आहेत असें जाणून [आस्थां उपसंहरन् ज्ञानी-] त्यांच्या विषयींची प्रीति कमी करणारा ज्ञानी [भुंजानः सन् अपि संकल्पं न कुरुते-] भोग जरी भोगीत असला, तरी संकल्प करीत नाहीं. [व्यसनं कुत:-] मग त्याला व्यसन कोठचें !

प्रकाश:- सर्व जग मिथ्या आहे असें एकदा निश्चयपूर्वक समजलें कीं ज्ञानी पुरुष विषयांविषयींची प्रीति सोडतो व ते विषयच अप्रिय झाल्यामुळें तो त्यांचा भोग मोठ्या नाखुषीनें घेतो. अर्थात् विषयोपभोग त्यास इतरांप्रमाणें आनंद देत नाहींत. व त्यामुळें ते मला पुष्कळ दिवस मिळावे असें तो मनांतहि आणीत नाहीं. मग त्याच्यावर विषयामुळें संकट कसें ओढवणार ।।१७०।।

-'अहोपण, भोग मायामय आहेत असें जरी कळलें, तरी भोगांपासून तात्कालिक सुख होणारच ! तेव्हां त्यांवरील आस्था कमी कशा करितां येणार ?' उत्तर -

स्वप्नेन्द्रजालसदृशमचिंत्यरचनात्मकम् ।
दृष्टनष्टं जगत्पश्यन् कथं तत्रानुरज्यति ।।७१

अन्वयार्थ - [स्वपद्रजालसदृशं अचिन्त्यरचनात्मकं दृष्टनष्टं जगत् पश्यन्-] स्वप्न व इंद्रजाल यांप्रमाणें असणारें, ज्याची रचना अचिन्त्य आहे व जें क्षणभंगुर आहे, अशा जगास पहाणारा ज्ञानी [तत्र कथं अनुरज्यति-] त्यामध्यें कसा बरें अनुरक्त होईल?

प्रकाश:- अद्वैत शास्त्रामध्यें भिन्न योग्यतेच्या अधिकाऱ्यांकरितां दोन वाद प्रचलित आहेत. एक 'दृष्टिसृष्टीवाद' व दुसरा 'सृष्टिदृष्टिवाद;' हे दोन्ही वाद सर्व आचार्यास मान्य आहेत. यांतील प्रथम वादांत एक दृश्यसत्ता व दुसरी दृक्सत्ता अशा दोन सत्ता मानिल्या आहेत व त्यांतील पहिली प्रातिभासिक सत्ता व दुसरी पारमार्थिक सत्ता होय असें म्हटलें आहे. दृश्य सत्ता म्हणजे ज्ञात होणाऱ्या पदार्थाची सत्ता व दृक्सत्ता म्हणजे स्वरूपभूत ज्ञानाची सत्ता होय. सत्ता तीन प्रकारची असते. एक पारमार्थिक, दुसरी व्यावहारिक व तिसरी प्रातिभासिक किंवा प्रातीतिक. जिचा तिन्हीं कालीं बाध होत नाहीं ती 'पारमार्थिक' सत्ता होय. जशी ब्रह्मसत्ता. जिचा केवल जागृतीरूप व्यवहारांत बाध होत नाहीं, पण स्वप्न, सुषुप्ति, मूर्छा व समाधि या अवस्थेंत बाध होतो, ती व्यावहारिक सत्ता होय. जशी घटसत्ता. अधिष्ठानाचें यथार्थ ज्ञान झालें असतां,

जी नष्ट होत असते ती 'प्रातिभासिक' अथवा प्रातीतिक सत्ता होय; जशी शुक्तीच्या ठायीं भासलेल्या रजताची सत्ता. व्यावहारिकसत्तायुक्त जे पदार्थ असतात, त्यांची खरी खरी निवृत्ति केवल एका आत्मसाक्षात्कारावस्थेंत मात्र होत असते. त्यामुळें ते सर्वहि पदार्थ प्रातिभासिक सत्तायुक्तच आहेत. कारण त्यांचें अधिष्ठान जें ब्रह्म त्याचें ज्ञान झालें असतां ते सर्व बाधित होत असल्यामुळें पूर्वोक्त प्रातिभासिक सत्तेचें लक्षण यांच्या ठायींहि आहे. म्हणून दृष्टिसृष्टिवादाच्या दृष्टीनें येथें स्वप्नाचा दृष्टांत दिला आहे. सृष्टिदृष्टि वादामध्यें शुक्तीवर भासणाऱ्या रुप्याच्या प्रातिभासिक सत्तेहून ब्रह्मावर भासणारी आकाशादिकांची सत्ता भिन्न मानली आहे व त्यामुळें जग व्यावहारिक सत्तायुक्त आहे, असें म्हणावें लागतें. या वादाच्या दृष्टीनें इंद्राजालाचा दृष्टान्त दिला आहे. कारण स्वप्नादि भासापेक्षां मंत्राच्या योगानें क्षुब्ध झालेल्या मायेच्या योगानें भासणारें गंवर्धनगर कांहींसे निराळ्या प्रकारच्या सत्तेनें युक्त असतें. असो, जग हें स्वप्न व इंद्रजालाप्रमाणें आहे हें सिद्ध करण्याकरितां येथें अचिन्त्यरूप व दृष्टनष्ट असे दोन हेतु दिले आहेत. या जगाची रचना कोणीं, केव्हां व कशी केली, याविषयीं केवळ विचारहि करितां येत नाहीं. श्रीमच्छंकराचार्यांनींहि शारीरिक भाष्यांत "मनसाप्यचिंत्यरचनारूपस्य" म्हणजे "मनानें अचिन्त्य अशी रचना हेंच रूप आहे ज्याचें" असें या जगाला विशेषण दिलें आहे. दृष्टनष्टं म्हणजे विजेप्रमाणें दिसतें न दिसतें तो नष्ट होणारें अर्थात् क्षणभुंगर. सारांश; अशा प्रकारच्या जगाकडे पाहणारा पुरुष त्याच्या ठायीं आसक्त कसा बरें होईल ? ॥१७१॥

-'अहोपण, हें जगत् स्वप्न, इंद्रजाल यांसारखें आहे, असें ज्ञान झाल्यावर आसक्ति राहणार नाहीं, हें खरें, पण तें ज्ञानच कसें होणार ?' उत्तर -

स्वस्वप्नमापरोक्ष्येण दृष्ट्वा पश्यन् स्वजागरम् ।
चिंतयेदप्रमत्तः सन्नुभावनुदिनं मुहुः ॥७२

अन्वयार्थ - [स्वस्वप्नं आपरोक्ष्येण दृष्ट्वा स्वजागरं पश्यन्-] आपलें स्वप्न साक्षात् पाहून आपली जाग्रदवस्था पाहणाऱ्या पुरुषानें [अप्रमत्तः सन् उभौ अपि अनुदिनं मुहुः चिंतयेत्-] सावधान मनानें त्या उभयतांविषयीं नित्य वारंवार चिंतन करावें.

प्रकाशः- स्वप्न व जाग्रद् या दोन्ही अवस्थांचा द्रष्टा एकच आहे हें पूर्वींच सिद्ध झालें आहे. यास्तव ग्रंथकार येथें म्हणतात कीं आपलें स्वप्न प्रत्यक्षपणें पाहून आपली जाग्रदवस्था पाहणाऱ्या पुरुषानें सूक्ष्म विचार करावा. म्हणजे त्यास - दोन्ही अवस्था परस्पर व्यावृत्त होणाऱ्या आहेत, व यास्तव दोन्ही मिथ्या आहेत-असें समजेल. याच गोष्टींचें त्यानें चिंतन करावें, म्हणजे पुनरपि स्वप्नापेक्षां जाग्रत् ही निराळ्या प्रकारची अवस्था आहे-असा भ्रम होणार नाहीं. ॥१७२॥

-पण असा भ्रम न झाल्यापासून तरी काय लाभ आहे ? असें कोणी म्हणेल म्हणून भारतीतीर्थ म्हणतात-

चिरं तयोः सर्वसाम्यमनुसंधाय जागरे ।
सत्यत्वबुद्धिं संत्यज्य नानुरज्यति पूर्ववत् ॥७३

अन्वयार्थ - [तयोः सर्वसाम्यं चिरं अनुसंधाय-] त्या दोन्ही अवस्थांचें सर्वप्रकारें साम्य आहे असें चिरकाल अनुसंधान करून [जागरे सत्यत्वबुद्धिं संत्यज्य-] व जाग्रदवस्थेविषयीं जी सत्यताबुद्धि तिचा पूर्णपणें त्याग करून [असौ पूर्ववत् तस्मिन् न अनुरज्यति-] हा पूर्वींप्रमाणें जाग्रदवस्थेंत आसक्त होत नाहीं.

प्रकाशः- पूर्व श्लोकाच्या विरणांत सांगितल्याप्रमाणें दोन्ही अवस्था एकसारख्याच आहेत.

वस्तुत: त्यांच्यामध्यें कोणत्याहि प्रकारचा फरक नाहीं. दीर्घकाल चिंतन केलें असतां, जाग्रदवस्था खरी आहे, हिचा कधींहि बाध होणें शक्य नाहीं, अशा प्रकारची जी सामान्यबुद्धि ती नष्ट होते, व ही अवस्थासुद्धा स्वप्नाप्रमाणें क्षणभंगुर आहे, असा दृढ निश्चय होतो. असें झालें असतां, जाग्रत् हें सत्य आहे अशी जेव्हां समजूत होती, त्या वेळीं जसा हा पुरुष तिच्या ठायीं आसक्त होऊन राहात होता तसा आतां आसक्त होत नाहीं; तिच्या विषयींची प्रीति सर्वथैव टाकितो. या दोन्ही अवस्था जर एकमेकांसारख्याच आहेत तर त्या भिन्न कां भासतात? असा जर कोणास संशय असला, तर त्यानें या ग्रंथाच्या प्रथम प्रकरणाचा 'तथा स्वप्नेऽत्र' हा चवथा श्लोक पहावा. ॥१७३॥

-'प्रपंच मिथ्या आहे, हें ज्ञान व विषय सत्य आहेत, या दृष्टीनेंच होणारा भोग, यांचा परस्पर विरोध आहे. तेव्हां प्रपंच मिथ्या आहे, असें ज्ञान झालें असतां भोगाची सिद्धि कशी होणार ! उत्तर -

इंद्रजालमिदं द्वैतमचिंत्यरचनात्वत: ।
इत्यविस्मरतो हानि: का वा प्रारब्धभोगत: ॥७४

अन्वयार्थ - [इदं द्वैतं अचिन्त्यरचनात्वत: इंद्र जालं अस्ति इति अविस्मरत:-] हें द्वैत, त्याची रचना अचिन्त्य असल्यामुळें इंद्रजाल आहे, हें न विसरणाऱ्या विद्वानाची [प्रारब्धभोगत: का वा हानि:-] प्रारब्धभोगाच्या योगानें कोणती हानि होणार ?

प्रकाश:- जीव व ईश्वर यांचा भेद, जीवांचपरस्पर भेद, जीव व जगत् यांचा भेद, इत्यादि भेदांनीं युक्त असें हें द्वैत, गारुडाप्रमाणें मिथ्यात्वशालि आहे. कारण त्याच्या रचनेविषयीं नुस्तें मननहि करितां येत नाहीं. व जें जें अशा प्रकारें अचिन्त्य असतें, तें तें गौडबंगाल असतें, असा नियम आहे, असें अनुमान करून त्याच्या द्वारा होणाऱ्या ज्ञानाला न विसरतां जर कोणी प्रारब्धभोग भोगीत असला तर त्यापासून त्याची काय हानि होणार आहे ? - एकाच समयीं दोन वृत्ति उत्पन्न होऊं शकत नाहींत. -हें तार्किकांचें मत आहे. व तें अनुभवाच्या (व श्रुतीच्याहि) विरुद्ध असल्यामुळें वेदान्त्यांस मान्य नाहीं. कारण माझ्या पायाला एका सुंदर स्त्रीनें स्पर्श केला आहे व त्यामुळें मला सुख होत आहे, नेत्रांनीं तिचें मुखकमल पाहून माझ्या मनास आल्हाद वाटत आहे, मनामध्यें 'हरि हरि' असें ईश्वरचिंतन करीत असल्यामुळें माझा अंतरात्मा या समयीं फार तृप्त होत आहे; पण मस्तकामध्यें जरा वेदना होत असल्यामुळें मला किंचित् अस्वस्थता वाटत आहे, अशा एकाच कालीं अनेक वृत्ति उत्पन्न होत असतात, असें आपण पाहतों. तस्मात् जग म्हणजे एक गौडबंगाल आहे, ही समजूत व प्रारब्धप्राप्त भोग यांचें एकाच कालीं अस्तित्व होऊं शकतें. ॥१७४॥

त्यांचें भिन्नविषयत्वच दाखवितात-

निर्बंधस्तत्त्वविद्याया इंद्रजालत्वसंस्मृतौ ।
प्रारब्धस्याग्रहो भोगे जीवस्य सुखदु:खयो: ॥७५

अन्वयार्थ - [तत्त्वविद्याया: इंद्रजालत्वसंस्मृतौ निर्बंध:-] तत्त्वज्ञानाचा इंद्रजालतेच्या स्मरणाविषयीं आग्रह आहे, [प्रारब्धस्य तु जीवस्य सुख-दु:खयो: भोगे आग्रह:-] व प्रारब्धाचा जीवाच्या सुख-दु:खभोगांविषयीं आग्रह आहे.

प्रकाश:- सर्व द्वैत इंद्रजालरूप आहे असें नित्य ध्यानांत ठेवणें हेंच तत्त्वविद्येचें कार्य आहे. ती याच्यापेक्षां अन्य कांहीं इच्छित नाहीं. तसेंच प्रारब्धकर्म हें जीवास दु:खादि भोग देण्याविषयींच प्रयत्न करीत असतें. सुखादु:खादि भोगांहून दुसरें कोणतेंहि काम करण्याची त्याची इच्छा नसते. अर्थात् तत्त्वज्ञान व प्रारब्ध यांचा विषय एक नसल्यामुळें त्यांच्यामध्यें परस्पर विरोध येत नाहीं. सारांश, एकाच कालीं ह्या दोन्ही वृत्ति अंत:करणांत राहूं शकतात. ॥१७५॥

-अर्थात् -

विद्यारब्धे विरुध्येते न भिन्नविषयत्वत: ।
जानद्भिरप्यैन्द्रजालविनोदो दृश्यते खलु ॥७६

अन्वयार्थ - [भिन्नविषयत्वत: विद्यारब्धे न विरुध्येते-] विषय भिन्न असल्यामुळें आत्मज्ञान व प्रारब्धकर्म यांच्यामध्यें विरोध नाहीं. [जानद्भि:अपि ऐंद्रजालविनोद: दृश्यते खलु-] हें इंद्रजाल आहे, असें जाणणारेहि त्याचा चमत्कार पहात असतात, हें प्रसिद्ध आहे.

प्रकाश:- ज्ञान व प्रारब्धकर्म यांमध्यें विरोध नसतो. याविषयीं अनुभवरूप दृष्टांत देतात. गारुडी किंवा जादुगार जो खेळ करून दाखवीत असतो तो सर्व मिथ्या आहे असें जाणत असतांनाहि मोठमोठे लोक त्याच्याकडे मोठ्या आश्चर्यानें पाहात असतात असें आम्ही नेहमीं पाहतों. प्रस्तुत शतकामध्येंहि दारोदार भीक मागत हिंडणाऱ्या गारुड्यांचा अनादर करणारे ज्ञानीहि नाटकगृहांत जादू करणाऱ्या गारुड्याच्या मागें कसे लागतात, हें बहुतेक सर्वांस ठाऊक आहेच. ॥१७६

-आत्मज्ञान व प्रारब्ध यांच्यामध्येंहि विरोध आला असता, पण तो केव्हां ?-

जगत्सत्यत्वमापाद्य प्रारब्धं भोजयेद्यदि ।
तदा विरोधी विद्याया भोगमात्रान्न सत्यता ॥७७

अन्वयार्थ - [यदि प्रारब्धं जगत्सत्यत्वं आपाद्य भोजयेत्-] जर प्रारब्ध कर्म जगत् सत्य आहे असें ठरवून मग भोग भोगवितें, [तदा तत् विद्याया: विरोधी स्यात्-] तर तें विद्येच्या विरोधी झालें असतें. [किं तु भोगमात्रात् सत्यता न भवति-] पण केवल भोगामुळें जगाचें सत्यत्व ठरत नाहीं.

प्रकाश:- प्रारब्धकर्म प्राण्यास केवळ भोग देण्याचें सोडून जग सत्य आहे, असें जर शिकवूं लागतें, तर मात्र तें - जग मिथ्या आहे व आत्माच सत्य आहे - या तत्त्वज्ञानाच्या विरोधि आहे असें झालें असतें. पण तें हा असा अव्यापारेषु व्यापार करीत नाहीं, शिवाय केवळ भोग होत असल्यामुळें जग सत्य आहे, असेंहि ठरणें शक्य नाहीं. ॥१७७॥

-'अहोपण, मिथ्या पदार्थांच्या योगानें सुखदु:खानुभव येतो, याविषयींहि दृष्टान्त नाहीं,' म्हणून म्हणाल तर सांगतो-

अनूनो जायते भोग; कल्पितै: स्वप्नवस्तुभि: ।
जाग्रद्वस्तुभिरप्येवमसत्यैर्भोग इष्यताम् ॥७८

अन्वयार्थ - [कल्पितै: स्वप्नवस्तुभि: अनून: भोग: जायते-] संकल्परूप अशा स्वप्नांतील वस्तूंच्या योगानेंहि पूर्ण भोग होतो. [एवं असत्यै: अपि जाग्रद्वस्तुभि: भोग: इष्यताम्-] त्याचप्रमाणें असत्य अशा जाग्रदवस्थेंतील वस्तूंच्या योगानेंहि भोग होतो, असें समजावें.

प्रकाश:- मिथ्या पदार्थांच्या योगानें भोग होणें शक्य नाहीं असें वाद्याचें म्हणणें होतें व त्याचें समाधान करण्याकरितां हा श्लोक प्रवृत्त झाला आहे. स्वप्नांत भासणारे पदार्थ व्यावहारिक सत्य नाहींत, तर ते केवळ स्वप्न पाहणाऱ्या पुरुषाच्या कल्पनारूप आहेत; हें उघड आहे. पण असल्या मनोमय पदार्थांच्या योगानेंहि स्वप्न पाहणाऱ्यास सुखदु:खादि भोग मिळतात. व ते जागृतींतील भोगांहून कमी असतात असेंहि नाहीं. तेव्हां सत्य पदार्थांवांचून भोग होत नाहींत, हें म्हणणें व्यर्थ आहे. सारांश, स्वप्नाप्रमाणेंच जागृतींतहि असत्य पदार्थांच्या योगानेंच प्राण्यांस भोग घडतात असें समजणें निर्दोष आहे. ॥१७८॥

-प्रारब्ध कर्म जसे विद्याविरोधी नाहीं, तशी विद्याहि प्रारब्धकर्मविरोधी नाहीं, असें सांगतात-

यदि विद्याऽपह्नुवीत जगत्प्रारब्धघातिनी ।
तदा स्यान्न तु मायात्वबोधेन तदपह्नव: ॥७९

अन्वयार्थ - [यदि विद्या जगत् अपह्नुवीत तदा सा प्रारब्धघातिनी स्यात्-] जर विद्या जगाचा बाध करती तर ती प्रारब्धघातिनी झाली असती. [किं तु मायात्वबोधेन तदपह्नव: न भवति-] पण जगत्

मायामय आहे या ज्ञानानें त्याचा बाध होत नाहीं.

प्रकाश:- रज्जूच्या ठायीं भासलेल्या सर्पाचा रज्जुज्ञानानें निषेध झाला असतां जसा सर्वथैव बाध होतो, तसा जर आत्मज्ञानाच्या योगानें जगाचा बाध होता तर आत्मज्ञान प्रारब्धाचा घात करणारें आहे, असें आम्ही नि:शंकपणें म्हटलें असतें. पण जग मायामय आहे एवढ्या बोधानें त्याचा रज्जूवर भासलेल्या सर्पाप्रमाणें बाध होत असतो, असा कोणाचाहि अनुभव नाहीं व शास्त्रहि असें सांगत नाहीं. एवढ्याकरितां व्यावहारिक सत्ता प्रातिभासिक सत्तेहून निराळी मानिली आहे. आतां मुंडकादिश्रुतीमध्यें 'सर्व कर्में' असें जें म्हटलें आहे त्याचा अर्थ भाष्यकारांनीं प्रारब्धकर्मावांचून इतर अनेकजन्मकृत संचितकर्में व ज्ञानानंतर घडणारीं क्रियमाण कर्मे असा केला आहे. तेव्हां सर्व शब्दामुळें त्यांत प्रारब्धाचा अंतर्भाव होतो, असें म्हणतां येत नाहीं. ॥१७९॥

-याचाच अधिक विस्तार -

अनपह्नुत्य लोकास्तदिंद्रजालमिदं त्विति ।
जानन्त्येवानपह्नुत्य भोगं मायात्वधीस्तथा ॥१८०

अन्वयार्थ - [लोका: तत् अनपह्नुत्य इदं तु इंद्रजालं इति यथा जानन्ति एव-] लोक त्या इंद्रजालरूपाचें निरसन न करितां 'हें इंद्रजाल आहे' असें ज्याप्रमाणें जाणतातच [तथा भोगं अनपह्नुत्य मायात्वधी: भवति-] त्याप्रमाणें भोगांचा निरास न करितां जगत् मायामय आहे, अशी बुद्धि होते.

प्रकाश:- जादुगार जादू करून कांहीं विचित्र सृष्टि निर्माण करितो, व पुनरपि तिचा उपसंहार करणेंहि त्याच्याच हातीं असतें. त्यामुळें त्याच्याकडे जे पाहात असतात ते जरी हें सर्व गौडबंगाल आहे, खरें नव्हे, असें जाणत असले, तरी त्यांना त्याचा निरास करितां येत नाहीं. त्याचप्रमाणें जग मिथ्या आहे असें जरी ज्ञान झालें तरी ईश्वरानें निश्चित केलेल्या प्रारब्धामुळें प्राप्त होणाऱ्या दु:खादि साक्षात्काराचा निरास कोणाहि जीवास करितां येत नाहीं. सारांश, भोग्यपदार्थरूप जगाचा अपलाप जरी न झाला, तरी तें मायामय आहे असें ज्ञान होणें शक्य आहे ॥१८०॥

-'ज्या अवस्थेंत याला सर्व आत्माच झाला त्या अवस्थेंत तो कोणत्या साधनानें काय पाहणार' - बृ. भा. अ. २. ४. ही श्रुति द्रष्टा, दर्शन व दृश्य यांचा अभाव सांगते. त्यामुळें उत्पन्न होणारी विद्या जगाचा बाध करीलच ! तेव्हां विद्वानाला भोग कसा होणार अशी श्रुतीच्या आधारानें पुढील दोन श्लोकांत शंका घेतात -

यत्र त्वस्य जगत्स्वात्मा पश्येत्कस्तत्र केन किम् ।
किं जिघ्रेत् किं वदेद्वेति श्रुतौ तु बहु घोषितम् ॥८१

अन्वयार्थ - [यत्र तु जगत् अस्य स्वात्मा भवति-] ज्या वेळीं जगत् ह्या पुरुषाचा स्वात्मा होतो, [तत्र क: केन किं पश्येत् किं जिघ्रेत् किं वदेत् वा-] त्यावेळीं कोण कशाच्या योगानें काय पाहणार ? काय हुंगणार ? व काय बोलणार ? [इति श्रुतौ तु बहु घोषितम् अस्ति-] असा श्रुतीमध्यें तर पुष्कळ घोष केला आहे.

प्रकाश:- आत्म्याहून अन्य, सर्व मिथ्या आहे व आत्माच सर्वांचें अधिष्ठान असल्यामुळें तें आत्मरूपच आहे, असें कोणत्याहि पुरुषास साक्षात् ज्ञान होतें, तेव्हां आत्म्याहून भिन्न असें कांहींच नसल्यामुळें त्याला द्वैतविषयक ज्ञान होणें शक्य नसतें. कारण कर्ता, कर्म, करण इत्यादि क्रियेचीं साधनें आहेत; पण ऐक्यज्ञानानें त्या सर्वांचाच लय झाल्यावर ज्ञानरूप क्रिया कशी होणार ? 'कथं स पुरुष: पार्थ कं घातयति हन्ति कम् ?' म्हणजे, अर्जुना, तो पुरुष कोणास कसा मारील व कोणास कसा मारवील ? अशी स्मृतिहि आहे. तस्मात् या श्रुतीस्मृतींप्रमाणें पाहिलें असतां आत्मज्ञान्यास

जगाचें भान होणें शक्य नाहीं. ॥१८१॥

**तेन द्वैतमपह्नुत्य विद्योदेति न चान्यथा ।
तथा च विदुषो भोगः कथं स्यादिति चेच्छृणु ॥८२**

अन्वयार्थ - [तेन द्वैतं अपह्नुत्य विद्या उदेति च न अन्यथा इति सिद्धं-] तस्मात् द्वैताचा निरास करून विद्या उत्पन्न होते, त्यावांचून नाहीं, हें सिद्ध झालें [तथा च विदुषः भोगः कथं स्यात् इति चेत् शृणु-] तेव्हां विद्वानाचा भोग कसा होणार ? असें जर म्हणशील तर ऐक.

प्रकाश:- श्रुतीनें असा घोष केलेला असल्यामुळें द्वैताचा निषेध झाल्यावांचून आत्मसाक्षात्कार होत नाहीं, असें ठरले. अर्थात् विद्वानास भोग घडणें शक्य नाहीं. वाद्याचें हें सर्व म्हणणें ऐकून घेऊन सिद्धान्ती म्हणतात कीं, तूं ज्या श्रुतीचा निर्देश केला आहेस ती श्रुति जीवन्मुक्त पुरुषाविषयीं नाहीं. कारण स्वतः सूत्रकारांनींच तिचा अन्य विषय दाखविला आहे. कोणता व कोठें म्हणून म्हणशील तर सांगतों ऐक ॥१८२॥

-सूत्रकार ह्याविषयीं काय म्हणतात ते ऐक -

**सुषुप्तिविषया मुक्तिविषया वा श्रुतिस्त्विति ।
उक्त स्वाप्ययसंपत्त्योरितिसूत्रे ह्यतिस्फुटम् ॥८३**

अन्वयार्थ - [स्वाप्ययसंपत्त्योः इति सूत्रे-] 'स्वाप्ययसंपत्त्योः०' - ब्र. सू. अ. ४. पा. ४ सूत्र १६. - या सूत्रांत [श्रुतिः सु सुषुप्तिविषया मुक्तिविषया वा इति हि अति स्फुटं उक्तम्-] प्रस्तुत श्रुति निद्राविषयक किंवा मुक्तिविषयक आहे, असें अति स्पष्टपणें सांगितलें आहे.

प्रकाश:- स्वाप्यय० (४-४-१६) इत्यादि सूत्राचा अर्थ असा:- तत् केन कं विजानीयात् इत्यादि श्रुतीचा अर्थ क्वचित् सुषुप्तितर व क्वचित् मुक्त अवस्थापर लागतो. कारण प्रत्यक्ष श्रुतीनेंच तसें व्यक्त केलें आहे. यास्तव पूर्वोक्त व तशाच प्रकारच्या दुसऱ्याहि विशेष विज्ञानाचा बाध करणाऱ्या श्रुति सुषुप्ति व विदेहमुक्तावस्थापर लागत असल्यामुळें द्वैताचा निषेध झाल्यावांचून जीवनमुक्तावस्था प्राप्त होणें शक्य नाहीं. असें म्हणणें अयोग्य आहे. ॥१८३॥

-ती श्रुति सुषुप्त्यादि अवस्थांना उद्देशून नाहीं; असें म्हटल्यास कोणता दोष येतो, तें सांगतात-

**अन्यथा याज्ञवल्क्यादेराचार्यत्वं न संभवेत् ।
द्वैतदृष्टावविद्वत्ता द्वैतादृष्टौ न वाग्वदेत् ॥८४**

अन्वयार्थ - [अन्यथा याज्ञवल्क्यादेः आचार्यत्वं न संभवेत्-] असें जर न मानलें तर याज्ञवल्क्यादि आचार्यांचें आचार्यत्वच संभवणार नाहीं. [द्वैतदृष्टौ अविद्वत्ता च द्वैतादृष्टौ वाक् न वदेत्-] कारण द्वैत पाहिल्यास त्यांची अविद्वत्ता सिद्ध होणार व न पाहिल्यास त्यांची वाणीच बोलूं शकणार नाहीं.

प्रकाश:- जो जो म्हणून मुक्त झाला, मग तो जीवन्मुक्त असो कीं विदेह मुक्त असो, त्याला द्वैताचें भान होता कामा नये, असें जर म्हटलें तर याज्ञवल्क्यासारखे ब्रह्मनिष्ठ पुरुष जनकादिकांसारख्या उत्तम मुमुक्षूंचे आचार्य झालें, हें म्हणणें संभवत नाहीं. कारण त्यांना द्वैतमय जगाचें भान होत होतें; असें जर मानलें, तर ते अविद्वान् होते व त्यामुळें गुरु होण्यास अपात्र होते असें म्हणावें लागेल. बरें, ते ज्ञानी होते व त्यामुळें द्वैताचें त्यांस भानच होत नव्हतें असें जर म्हणावें तर त्यांचा प्रसिद्ध वाद, जनकाचें आचार्यत्व पत्करून त्यास केलेला उपदेश, इत्यादि संभवत नाहीं; शिवाय ज्ञानी होणें म्हणजे सर्व व्यवहारास मुकणेंच होय, असें जर मानलें, तर गुरुशिष्यपरंपरेचा विच्छेद झाल्यामुळें ज्ञानसंप्रदाय अव्याहत चालणें शक्य नाहीं. तात्पर्य, आम्ही म्हटल्याप्रमाणें पूर्वोक्त श्रुतींचा अर्थ न केल्यास अनेक अनिष्ट प्रसंग येतात. ॥१८४॥

-'आचार्यत्व-अवस्थेंत असलेल्या याज्ञवल्क्यादिकांना ज्ञान झालें होतें, पण अपरोक्ष नव्हतें. कारण त्यावेळीं त्यांना द्वैताची प्रतीति येत

होती. निर्विकल्पसमाधींत द्वैतप्रतीतीचा अभाव असतो यास्तव तीच अपरोक्ष विद्या होय.' अशी शंका -

निर्विकल्पसमाधौ तु द्वैतादर्शनहेतुत: ।
सैवापरोक्षविद्येति चेत्सुषुप्तिस्तथा न किम् ।।८५

अन्वयार्थ - [निर्विकल्पसमाधौ तु द्वैतादर्शन-हेतुत:-] निर्विकल्पसमाधीमध्यें द्वैताचें अभान होत असल्यामुळें [सा एव अपरोक्षविद्या इति चेत्-] तीच अपरोक्षविद्या होय, असें जर म्हणाल तर [सुषुप्ति: तथा न किम्-] सुषुप्ति तशी नाहीं काय ?

प्रकाश:- सर्व विकल्परहित अशी जी निर्विकल्प समाधि तिच्यामध्यें द्वैताची प्रतीति होणें अशक्य आहे व त्यामुळें तीच अपरोक्ष विद्या होय असें जर म्हटलें, तर सुषुप्तीमध्येंहि द्वैताची प्रतीति होत नसल्यामुळें तीहि अपरोक्ष विद्या होय असें म्हणावें लागेल. पण तें सिद्धान्ताच्या विरुद्ध आहे. यास्तव केवल द्वैताची अप्रतीति एवढाच एक आत्मसाक्षात्काराविषयीं हेतु घेऊन न बसतां अन्यहि कांहीं गोष्टी पाहिल्या पाहिजेत. त्यावांचून विस्तृत शास्त्राची एकवाक्यता निर्दोषपणें होणार नाहीं. ''याज्ञवल्क्यादिकांचें आचार्यत्व संभवत नाहीं; म्हणून श्रुतीचा कांहीं तरी अर्थ करणें चांगलें नाहीं. यापेक्षां परोक्षज्ञानसमयीं आचार्य होऊन त्यांना उपदेश केला, व अपरोक्ष ज्ञानकाळीं श्रुतीनें सांगितल्याप्रमाणें त्यांनाहि द्वैताचें अभानच झालें, अशी कल्पना करणें जास्त सयुक्तिक दिसतें. शिवाय कठोपनिषदाच्या 'यदा पंचावतिष्ठन्ते' इत्यादि श्रुतीमध्यें ज्या अवस्थेंत बुद्धीसह सर्व ज्ञानेंद्रियांचे व्यापार बंद होतात, त्या अवस्थेस परमगति असें म्हणतात- असें सांगितलें आहे. भगवद्गीतेंतहि असा उल्लेख आहे. असंप्रज्ञात समाधीचें वर्णन करितांना श्रीपातंजलींनींहि 'ऋतंभरा तत्रप्रज्ञा' या समाधि- पादस्थ सूत्रांत 'विकल्परहित सत्यवस्तूचा आश्रय करणारी' असें योग्याच्या बुद्धीचें वर्णन केलें आहे. तस्मात् ज्ञानरूप जी निर्विकल्पसमाधि तिच्यामध्यें द्वैतभान होणें शक्य नाहीं.'' इत्यादि प्रकारें शंका घेऊन ग्रंथकार तिचें निरसन वरीलप्रमाणें करितात: ।।१८५।।

-या अतिप्रसंगाच्या परिहाराची शंका-

आत्मतत्त्वं न जानाति सुप्तौ यदि तदा त्वया ।
आत्मधीरेव विद्येति वाच्यं न द्वैतविस्मृति: ।।८६

अन्वयार्थ - [यदि सुप्तौ आत्मतत्त्वं न जानाति-] गाढ निद्राकालीं आत्मतत्त्व जाणत नाहीं असें जर म्हणशील [तदा त्वया आत्मधी: एव विद्या इति वाच्यं-] तर आत्मसाक्षात्कार हीच विद्या होय, असेंच म्हणणें तुला योग्य आहे [न द्वैतविस्मृति:-] द्वैताचें विस्मरण म्हणजे आत्मज्ञान, असें म्हणणें योग्य नाहीं.

प्रकाश:- सुषुप्तीमध्यें द्वैताचें विस्मरण होतें पण आत्मसाक्षात्कार होत नाहीं, हें सुप्रसिद्ध आहे. त्यामुळें सुषुप्ती ज्ञानावस्था नव्हे असें एकदा म्हटलें कीं लागलेंच द्वैताच्या विस्मरणाचा व आत्मसाक्षात्काराचा कांहीं संबंध नाहीं असेंहि कबूल करावें लागतें. कारण जेथें जेथें आत्मसाक्षात्कार आहे, तेथें तेथें द्वैताचें विस्मरण अशी व्याप्ति (साहचर्य) दिसत नाहीं. पण उलट जेथें जेथें आत्मसाक्षात्कार तेथें तेथें आत्मज्ञान अशी मात्र व्याप्ति मिळते. तस्मात् आत्मा व अनात्मा यांचा विवेकपूर्वक जो आत्मसाक्षात्कार तीच आत्मविद्या होय. ।।१८६।।

'अहोपण, द्वैतदर्शनाचा अभाव व आत्मज्ञान अशीं दोन्हीं मिळून एक विद्या होते, त्यांतील एकेकाला विद्यात्व नाहीं,' अशी शंका घेऊन समाधान -

उभयं मिलितं विद्या यदि तर्हि घटादय: ।
अर्धविद्याभाजिन: स्यु: सकलद्वैतविस्मृते: ।।८७

अन्वयार्थ - [यदि उभयं मिलितं विद्या-] जर दोन्हीं मिळून विद्या असें म्हटलें, [तर्हि घटादय: सकलद्वैतविस्मृते: अर्धविद्याभाजिन: स्यु:-] तर घटादि सर्व जड पदार्थहि द्वैताला विसरत

असल्यामुळें अर्ध्या विद्येस पात्र होतील.

प्रकाश:- या श्लोकांत विचार न करितां कांहींतरी बोलणाऱ्या वाद्याची थट्टा केली आहे. द्वैताचें विस्मरण व आत्मसाक्षात्कार या दोघांस मिळून विद्या म्हटलें तर काय होईल ? असें वाद्याचें म्हणणें आहे. पण त्यावर सिद्धान्ती म्हणतात कीं, द्वैताचें विस्मरण हेंहि एक विद्येचें अंग आहे. असें जर म्हटलें, तर जेथें जेथें द्वैतविस्मरण आढळेल तेथें तेथें अर्धी विद्या आहे, असेहि म्हणावें लागेल. व त्यामुळें दगडासारखें पदार्थहि अर्धे ज्ञानी आहेत असें होईल. ।।१८७।।

-शिवाय या पक्षीं समाधिमान् पुरुषांना जडासारखें पुरतें अर्धें ज्ञानहि नसतें, असें म्हणावें लागतें, असा उपहास करितात-

मशकध्वनिमुख्यानां विक्षेपाणां बहुत्वत: ।
तव विद्या तथा न स्याद्धटादीनां यथा दृढा ।।८८

अन्वयार्थ - [मशकध्वनिमुख्यानां विक्षेपाणां बहुत्वत:-] चिलटांचा आवाज इत्यादि असंख्य विक्षेप असल्यामुळें [घटादीनां विद्या यथा दृढा अस्ति तथा तव न स्यात्-] घटादिकांची विद्या जशी दृढ असते तशी तुझी असणार नाहीं.

प्रकाश:- जड पदार्थांस विक्षेप होणें मुळींच अशक्य असल्यामुळें त्यांचें द्वैताचें विस्मरण जितकें दृढ होऊन राहील, तितकें तुझें होणार नाहीं. कारण तूं द्वैताचें विस्मरण व्हावें म्हणून ज्या ज्या एकांत स्थळीं जाऊन बसशील, तेथें तेथें चिलटें, पिसा, अंत:करणांतील गूढ संस्कार इत्यादिकांच्या योगानें तुझ्या चित्तास विक्षेप होईल. अर्थात् तुझें द्वैतविस्मरण दगडाच्या द्वैतविस्मरणाइतकें दृढ होणार नाहीं; व त्यामुळें दगडाप्रमाणें तूं अर्धा ज्ञानीहि नाहींस, असें म्हणावें लागेल. ।।१८८।।

-'तर मग आत्मज्ञान हीच विद्या आहे. द्वैतविस्मृति ही विद्या नव्हे', असें वादी कबूल करतो व त्याला सिद्धान्ती आशीर्वाद देतात-

आत्मधीरेव विद्येति यदि तर्हि सुखी भव ।
दुष्टचित्तं निरुंध्याच्चेन्निरुंद्धि त्वं यथासुखम् ।।८९

अन्वयार्थ - [यदि आत्मधी: एव विद्या इति वदसि तर्हि सुखी भव-] आतां जर 'आत्मसाक्षात्कार हीच विद्या' असें म्हणत असशील, तर आम्ही तुला 'सुखी हो' असा आशीर्वाद देतो. [दुष्टचित्तं निरुंध्यात् चेत् त्वं तत् यथासुखं निरुंद्धि-] 'पण दुष्ट चित्ताचा निरोध करावयास पाहिजे,' असें जर म्हणत असलास तर तूं त्याचा खुशाल निरोध कर.

प्रकाश:- ज्ञानी पुरुष अज्ञान्यांशीं जे वाद करीत बसतात, त्यांत अज्ञान्यांनीं आपले दुष्ट विचार सोडून सज्ञानी व्हावें, असा त्यांचा हेतु असतो. पण प्राण्यांचे पूर्व संस्कार बलवत्तर असल्यामुळें त्यांना नेहमींच यश येतें असें नाहीं; पण जेव्हां एकादे वेळीं यश येतें, तेव्हां त्यांना समाधान वाटणें साहजिक आहे. तोच प्रकार या श्लोकांत दाखविला आहे. आमचें श्रेष्ठ मत जर तुला मान्य होत असेल, तर तूं आनंदानें या जगांत वास कर. म्हणजे या मताच्या अवलंबनानें तुला जगामध्यें दु:ख आहे असें भानहि होणार नाहीं. हा आशीर्वाद होय. आतां दुष्टचित्ताचें दमन करण्याकरितां त्याचा निरोध केलाच पाहिजे. एवढाच जर तुझा हट्ट असला तर चित्तनिग्रह आम्हांसहि मान्य असल्यामुळें तो करण्याविषयीं आमची तुला पूर्ण अनुज्ञा आहे. तात्पर्य विद्येचा द्वैतविस्मरणाशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध नाहीं. आतां द्वैताचें विस्मरण जर दैववशात् होत असले तर तें दुधांत साखर पडल्याप्रमाणेंच असल्यामुळें आम्हांस मान्य आहे. ।।१८९।।

-कारण -

तदिष्टमेष्टव्यमायामयत्वस्य समीक्षणात् ।
इच्छन्नप्यज्ञवन्नेच्छेत्किमिच्छन्निति हि श्रुतम्
।।१९०

अन्वयार्थ - [अस्माकं तत् इष्टं एव-] आम्हांला तें इष्टच आहे. [एष्टव्यमायामयत्वस्य समीक्षणात्-] अद्वितीय आत्मज्ञानासाठीं इष्टच असलेलें जें जगाचें मायामयत्व तें चित्तनिरोधसमयीं साक्षात् अनुभवास येत असल्यामुळें तें आम्हांला इष्ट आहे. याप्रमाणें 'किमिच्छन्०' या मंत्रांशाच्या इष्ट अर्थाचें उपपादन करून त्याचा उपसंहार करितात [इच्छान् अपि अयं अज्ञवत् न इच्छेत्-] ज्ञानी जरी इच्छा करीत असला तरी अज्ञाप्रमाणे इच्छा करीत नाहीं. [अत: 'किमिच्छन्' इति हि श्रुतं-] म्हणून 'किं इच्छन्' असें श्रुत आहे.

प्रकाश:- चित्ताचे दोष नाहींसें व्हावेत हें आम्हांसहि इष्ट आहे; कारण त्यावांचून जग मायामय आहे हें चांगलेसें समजणार नाहीं. व तें समजल्यावांचून अद्वितीय आत्म्याचा साक्षात्कार होणार नाहीं. एकदा आत्मसाक्षात्कार झाला कीं मग प्रारब्धाधीन होऊन जरी ज्ञानी इच्छा करीत असला, तरी ती अज्ञ पुरुषाच्या इच्छेप्रमाणें तीव्र असणार नाहीं. तात्पर्य; पूर्वोक्त श्रुतीनें 'किमिच्छन्' या पदांनीं प्रस्तुत प्रकारच सुचविला आहे. ॥१९०॥

-असाच श्रुत्यर्थ सांगण्याचे कारण -

रागो लिंगमबोधस्य सन्तु रागादयो बुधे ।
इति शास्त्रद्वयं सार्थमेवं सत्यविरोधत: ।।९१

अन्वयार्थ - [एवं सति-] श्रुतीचा असाच, अभिप्राय मानला असतां ['रागो लिंगमबोधस्य' च 'सन्तु रागादयो बुधे'-] 'राग-आसक्ति हें अज्ञानाचें चिह्न आहे' व 'ज्ञानी-पुरुषामध्यें राग खुशाल असोत' इति शास्त्रद्वयं अविरोधत: सार्थं स्यात्-] अशीं दोन्ही शास्त्रवचनें अविरोधानें सार्थ होतात.

प्रकाश:- वार्तिककारांनीं नैष्कर्म्यसिद्धिनामक ग्रंथांत विषयाभिलाष हें अज्ञानाचें चिन्ह होय असें म्हटलें आहे. त्याचें मूलवचन असें आहे:-

रागो लिंगमबोधस्य चित्तव्यायामभूमिषु ।
कुत: शाद्वलता तस्य यस्याग्नि: कोटरे तरो: ।।१ ।।

अर्थ:- चित्ताचा, शब्दादि, विषयांविषयीं अभिलाष असणें, हेंच अज्ञानाचें चिन्ह आहे. ज्या तरूच्या ढोलीमध्यें अग्नि आहे, त्याला हिरवेपणा कोठून असणार ? ॥१॥

या वचनावरून ज्याच्या हृदयांत अति अभिलाष तो अज्ञानी असें स्पष्ट होतें. पण बृहदारण्यक भाष्यावरील वार्तिकांत असे एक वार्तिक आढळतें-

शास्त्रार्थस्य समाप्तेश्च मुक्ति: स्यात्तावत्ता मिते: ।
रागादय: सन्तु कामं न तद्भावोऽपराध्यति
।।१५३९ ।।

अर्थ- मिति म्हणजे महावाक्यापासून होणारें ज्ञान; त्याच्या योगानें शास्त्रार्थाची समाप्ति झाल्यामुळें मुक्ति होते. मग ज्ञान्यामध्यें राग खुशाल असोत. त्यांचें अस्तित्व मुक्तीस बाध करीत नाहीं. ॥१५३९॥

या वचनांत ज्ञानी पुरुषाचे ठायीं जरी अभिलाष असला तरी चालेल, असेंहि स्पष्ट म्हटलें आहे. हीं दोन्हीं वचनें एकाच ग्रंथकाराचीं असल्यामुळें व तो ग्रंथकार साधारण मनुष्य नसून श्रीमच्छंकाराचार्यांचा पट्टशिष्य श्रीसुरेश्वराचार्य असल्यामुळें अननुसंधानामुळें असा प्रमाद घडला असेल असेंहि म्हणण्याची सोय नाहीं. अर्थात् त्या दोन्हीं वचनांचा अविरोध दाखविला पाहिजे व तो आम्ही केलेल्या व्यवस्थेनेंच सिद्ध होत आहे. ॥९१॥

-याप्रमाणें 'किमिच्छन्' याचा अभिप्राय सांगून आतां 'कस्य कामाय' या शब्दांचा अभिप्राय सांगतात-

जगन्मिथ्यात्ववत्स्वात्मासंगत्वस्य समीक्षणात् ।
कस्य कामायेति वचो भोक्त्रभावविवक्षया ।।९२

अन्वयार्थ - [जगन्मिथ्यात्ववत् स्वात्मासंगत्वस्य समीक्षणात्-] जगाच्या मिथ्यात्वाप्रमाणें

आत्माहि असंग आहे, असें पूर्णपणें समजल्यामुळें [भोक्त्रभावविवक्षया 'कस्य कामाय' इति वचः अस्ति-] भोक्त्याचा अभाव होतो हें सांगण्याकरितां 'कस्य कामाय' म्हणजे कोणाच्या कामाकरितां हें वचन आहे.

प्रकाश:- जग क्षणिक आहे व त्यामुळें तें इंद्रजालाप्रमाणें व स्वप्नाप्रमाणें आसक्ति ठेवण्यास अयोग्य आहे, असें अनेक श्रुति व सांख्यादि शास्त्रें सांगत असल्यामुळें आत्मा असंग आहे असें ज्ञान झालें असतां आत्मा भोक्ता आहे हें म्हणणेंच अयुक्त ठरतें. हा खरा प्रकार सांगण्याकरितांच 'कोणाच्या कामाकरिता' असें श्रुतीनें म्हटलें आहे. ॥९२॥

-'अहोपण, आत्म्याच्या भोक्तृत्वाचा निषेध त्याच्या प्राप्तीवांचून होऊं शकत नाहीं. आत्मा असंग आहे, त्यामुळें त्याच्या ठिकाणीं भोक्तृत्वाची प्राप्तिच नाहीं. तेव्हां श्रुति त्याचा निषेध कसा करणार ?' अशी आशंका घेऊन 'आत्म्याचें भोक्तृत्व अनुभवसिद्ध आहे' अशा आशयानें त्याचा अनुवाद करणाऱ्या श्रुतीचा अर्थतः निर्देश करितात-

पतिजायादिकं सर्वं तत्तद्भोगाय नेच्छति ।
किंत्वात्मभोगार्थमिति श्रुतावुद्घोषितं बहु ॥९३

अन्वयार्थ - [पतिजायादिकं सर्वं तत्तद्भोगाय न इच्छति-] पति, पत्नी, इत्यादि सर्व त्यांच्या त्यांच्या भोगाकरितां त्यांची इच्छा करीत नाहींत [किंतु आत्मभोगार्थं इति श्रुतौ बहु उद्घोषितम्-] तर आपल्या भोगाकरितां त्यांची त्यांची इच्छा करितात असें श्रुतींत पुष्कळ ठिकाणीं स्पष्टपणें सांगितलें आहे.

प्रकाश:- बृहदारण्यकांत "पतीच्या कामाकरितां पति प्रिय होत नाहीं; तर स्वतःच्या कामाकरितां तो प्रिय होत असतो" इत्यादि प्रकारें परोपरीनें प्रस्तुत गोष्टीचें विवेचन केलें आहे. व त्यावरून आत्मा भोक्ता आहे, असें स्पष्ट होतें. व हें श्रुतीनें केलेलें वर्णन सांख्यशास्त्रानुकूलहि आहे. ॥९३॥

-याप्रमाणें आत्म्याचें भोक्तृत्व प्रदर्शित करून त्याचा बाध करण्यासाठीं भोक्त्याविषयीं विकल्प करितात-

किं कूटस्थश्चिदाभासोऽथ वा किंवोभयात्मकः ।
भोक्ता तत्र न कूटस्थोऽसंगत्वाद्भोक्तृतां व्रजेत्
॥९४

अन्वयार्थ - [भोक्ता किं कूटस्थः अथवा चिदाभासः किंवा उभयात्मकः-] भोक्ता कूटस्थ, अथवा चिदाभास कीं उभयरूप ? [तत्र कूटस्थः असंगत्वात् भोक्तृतां न व्रजेत्-] यांपैकी कूटस्थ असंगत्वामुळें भोक्ता होऊं शकत नाहीं.

प्रकाश:- आत्मा भोक्ता आहे असें जें तूं म्हणत आहेत तें बरोबर नाही कारण केवल आत्मा भोक्ता आहे एवढें म्हटल्यानेंच त्याची सिद्धि होणें शक्य नाहीं. यास्तव आम्ही तुला असें विचारतों कीं भोक्ता कोण ? कूटस्थ भोक्ता, कीं जीव भोक्ता, कीं कूटस्थ व चिदाभास मिळून भोक्ता ? यांतील कूटस्थ तर भोक्ता होऊं शकणार नाहीं. कारण तो असंग आहे. जो असंग असतो तो भोक्ता होणें शक्य नाहीं. कारण असंगत्व व भोक्तृत्व यांचा परस्पर विरोध आहे. ॥९४॥

-भोक्तृत्व व असंगत्व यांच्यामध्यें विरोध कसा येतो ? म्हणून जर विचारशील तर सांगतों-

सुखदुःखाभिमानाख्यो विकारो भोग उच्यते ।
कूटस्थश्च विकारी चेत्येतन्न व्याहतं कथम् ॥९५

अन्वयार्थ - [सुखदुःखाभिमानाख्यः विकारः भोगः इति उच्यते-] सुखदुःखाभिमानसंज्ञक जो विकार तोच भोग होय, असें म्हटलें आहे. [तथा च कूटस्थः च विकारी च इति एतत् वचः कथं न व्याहतम्-] तेव्हां 'कूटस्थ व विकारी' हें वचन व्याहत कसें होणार नाहीं ?

प्रकाश:- भोग म्हणजे काय ? मी सुखी आहें, दु:खी आहें, इत्यादि प्रकारें सुखादिकांच्या ठायीं अभिमान ठेवणें हाच भोग होय. पण तो अभिमानरूप असल्यामुळें विकार आहे. व कूटस्थ या शब्दाचा अर्थ 'निर्विकार' असा आहे. तेव्हां आत्मा कूटस्थ व भोक्ता (म्हणजे विकारयुक्त) आहे असें म्हटल्यास त्या म्हणण्यावर व्याघात हा दोष कसा बरें येणार नाहीं ? ॥१९५॥

-बरें, विकारी जो चिदाभास त्याला भोक्तृता आहे असें म्हणावें तर तेंहि बरोबर नाहीं. कारण -

विकारिबुद्ध्यधीनत्वादाभासे विकृतावपि ।
निरधिष्ठानविभ्रांति: केवला न हि तिष्ठति ॥९६

अन्वयार्थ - [विकारीबुद्ध्यधीनत्वात् आभासे विकृतौ अपि-] विकार पावणाऱ्या बुद्धीच्या अधीन असल्यामुळें आभासाच्या ठिकाणीं जरी विकार होत असला तरी, [केवला निरधिष्ठानविभ्रांति: न हि तिष्ठति-] अधिष्ठानावांचून केवल भ्रांति कधींच राहूं शकत नाहीं.

प्रकाश:- चिदाभास विकारी आहे यांत काहीं शंका नाहीं. कारण तो बुद्धिरूप उपाधींच्या अधीन असतो. म्हणजे आरशांत दिसणारें कोणत्याहि पदार्थाचें प्रतिबिंब जसें आरशाच्या आधीन असतें, त्याचप्रमाणें प्रतिबिंबरूप असा हा चिदाभास बुद्धीच्या आधीन असतो. स्वत: बुद्धी तर विकार पावणारी आहे. कारण अनेक वृत्ति हाच तिचा विकार होय. दृष्टान्तांतील उपाधिभूत् आरसा हालविला असतां किंवा वाकडा केला असतां, पदार्थाच्या समोरून काढून घेतला असतां किंवा तो अगदीं स्थिर धरिला असतां, जसें त्यांतील प्रतिबिंब क्रमानें हालूं लागतें; वांकडें होतें; नाहींसें होतें, किंवा निश्चल होतें, त्याचप्रमाण बुद्धिमध्यें जसा जसा विकार होतो, तसा तसा तो चिदाभासाच्या ठायींहि येतो. यास्तव, तो विकार आहे असें म्हणणें वावगें नाहीं. पण चिदाभास ही स्वत: भ्रांति असल्यामुळें ती अधिष्ठानावांचून कोणत्याहि अवस्थेंत राहूं शकत नाहीं. चिदाभास ही भ्रांती कशी असें जर विचाराल तर सांगतों;-बुद्धि स्वत: जड आहे. तेव्हां चैतन्य हा तिचा धर्म नव्हे, हें उघड आहे. पण तो तिचा धर्म असल्यासारखा भास होतो. अर्थात् तो भ्रम होय; यथार्थ ज्ञान नव्हे. शिवाय चैतन्याभास या नांवामध्येंच भ्रमरूप अर्थ आहे. सारांश भ्रमरूप चिदाभास जरी विकार असला, तरी स्वतंत्र नाहीं व त्यामुळें तो भोक्ता होऊं शकत नाहीं. ॥१९६॥

तेव्हां आतां तिसरा पक्ष राहिला, असें सांगतात -

उभयात्मक एवातो लोके भोक्ता निगद्यते ।
तादृगात्मानमारभ्य कूटस्थ: शेषित: श्रुतौ ॥९७

अन्वयार्थ - [अत: लोके उभयात्मक: एव भोक्ता निगद्यते-] यास्तव व्यवहारामध्यें कूटस्थ व चिदाभास असा उभयात्मकच भोक्ता आहे, असें म्हणतात. [तादृगात्मानं आरभ्य श्रुतौ कूटस्थ: शेषित: अस्ति-] तसल्या आत्म्याचा अनुवाद करून श्रुतीमध्यें कूटस्थाला पृथक् करून दाखविलें आहे.

प्रकाश:- केवळ कूटस्थ भोक्ता आहे असें किंवा केवळ चिदाभास भोक्ता आहे, असें म्हणणें अयुक्त होय. हें गेल्या दोन श्लोकांत सांगितलें व त्यामुळें एक तिसरा पक्ष अवशिष्ट राहिला. कूटस्थ व चिदाभास हा उभयरूप भोक्ता आहे असे म्हणणें व्यवहारिक रीत्या खरें आहे, पण परमार्थिक दृष्ट्या सत्य नाहीं. कारण बृहदारण्यकांत सर्व अनात्मजाताचें निरसन करून एकट्या कूटस्थ आत्म्यास मात्र राखिलें आहे. त्यावरून चैतन्यरूप आत्मा मात्र सत्य व तदितर सर्व असत्य (कांहीं काल भासणारें) असें सिद्ध होतें. तस्मात् परमार्थत: भोक्ता कोणी नाहीं. ॥१९७॥

त्या बृहदारण्यकवाक्याचाच अर्थ संक्षेपत:

सांगतात-

आत्मा कतम इत्युक्ते याज्ञवल्क्यो विबोधयन् ।
विज्ञानमयमारभ्यासंगं तं पर्यशेषयत् ॥९८

अन्वयार्थ - [आत्मा कतम: इति उक्ते सति--] 'आत्मा कोणता' असें जनकानें विचारिलें असतां [याज्ञवल्क्य: विबोधयन् सन् विज्ञानमयं आरभ्य तं असंगं पर्यशेषयत्-] याज्ञवल्क्य त्यास उपदेश करीत होत्साता विज्ञानमयापासून आरंभ करून सर्वांचें निरसन केल्यावर त्यांनीं त्या असंग आत्म्यास अवशिष्ट ठेविलें.

प्रकाश:- या कार्यकारणसमूहरूप शरीरांत जे अनेक पदार्थ आहेत, त्यांतील आत्मा कोणता ? असा जनकानें प्रश्न केला असतां त्याच्या याज्ञवल्क्य नामक ब्रह्मनिष्ठ गुरूनें विज्ञानमयादि सर्वांचा निरास करून म्हणजे यांतील एकहि आत्मा नव्हे असें सांगून, सर्व अनात्मजाताचा बाध केल्यावर बाधाची सीमा होऊन राहणारा कूटस्थच असंग व शुद्ध आत्मा आहे, असा त्यास बोध केला. बृहदरण्यकाच्या चवथ्या अध्यायाच्या तिसऱ्या ब्राह्मणाच्या सहाव्या मंत्रांत प्रस्तुत प्रश्नोत्तर आहे. तस्मात् हें आमचें सांगणें कल्पित आहे, असें कोणी समजू नये. ॥१९८॥

-याप्रमाणें बृहदारण्यकांतील असंग, आत्मपरिशेषाचा प्रकार दाखवून ऐतरेयादि इतर श्रुतींतीलहि तो प्रकार दाखवितात-

कोऽयमात्मेत्येवमादौ सर्वत्रात्मविचारत: ।
उभयात्मकमारभ्य कूटस्थ: शेष्यते श्रुतौ ॥९९

अन्वयार्थ - [क: अयं आत्मा इति एवं आदौ-] 'कोऽयमात्मा०' इत्यादि प्रकारें प्रथमत: [सर्वत्र आत्मविचारात: उभयात्मकं आरभ्य श्रुतौ कूटस्थ: शेष्यते-] सर्व ठिकाणीं आत्मविचारानें उपाधिरूप आत्म्यापासून आरंभ करून श्रुतीमध्यें शेवटीं कूटस्थाचा परिशेष दाखविला आहे.

प्रकाश:- ज्याची आम्हांस साक्षात् उपासना करावयाची आहे, तो हा आत्मा कोण ? अशा अर्थाची श्रुति ऐतरेयोपनिषदाच्या. अगदीं आरंभींच आहे. व या सर्व खंडांत आत्माविषयीं विचार करून शेवटीं 'प्रज्ञानं ब्रह्में' असें ठरविलें आहे. असेंच दुसऱ्याहि अनेक श्रुतींमध्यें वर्णन आहे. तस्मात् परमार्थत: आत्मा असंग व अभोक्ता आहे व उभयात्मक भोक्ता असें जें म्हणणें आहे, तें व्यावहारिक म्हणजे परमार्थत: मिथ्याच आहे, असें म्हणणें दृढ झालें. ॥१९९॥

-'तर मग जीवाला 'मी खरा भोक्ता आहें' असें कसें वाटतें ?' असें कोणी विचारील, म्हणून सांगतात-

कूटस्थसत्यतां स्वस्मिन्नध्यस्यात्माविवेकत: ।
तात्त्विकीं भोक्तृतां मत्वा न कदाचिज्जिहासति ॥२००

अन्वयार्थ - [आत्मा अविवेकत: कूटस्थसत्यता स्वस्मिन् अध्यस्य-] **आत्मा अविवेकामुळें कूटस्थाच्या सत्यतेचा आपल्या ठिकाणीं अध्यास करून [भोक्तृतां तात्त्विकीं मत्वा-] व भोक्तेपणा खरा आहे असें मानून [भोगं कदाचित् न जिहासति-] भोगाला सोडण्याची मुळींच इच्छा करीत नाहीं.**

प्रकाश:- हा सर्व स्वाज्ञानाचा खेळ आहे. आत्म्याचें यथार्थ ज्ञान नसल्यामुळें त्याचें सत्यत्व जीव आपल्याकडे घेतो. पण हा त्याचा मोठाच अपराध आहे. व त्यामुळेंच त्याला संसाररूपी प्रायश्चित भोगावें लागतें. 'मी सत्य आहें' असा एकदा भ्रम झाला कीं आपला भोक्तेपणाहि सत्यच आहे, असें त्यास वाटतें व तदनंतर भोगांचा त्याग करणें म्हणजे प्राणास संकट होय, अस वाटणें साहजिक आहे. सारांश, आत्म्याचें यथार्थ ज्ञान नसणें हेंच या सर्व अनर्थाचें कारण आहे. ॥२००॥

-'तर मग 'आत्मसु कामाय०' इत्यादि वाक्यांत भोगाला आत्मशेषत्व कसें सांगितलें आहे ?' अशी आशंका घेऊन 'भोगाला कूटस्थआत्मशेषत्व आहे,'

असें श्रुतीकडून सांगितलें जात नसून लोकप्रसिद्ध उभयात्मकभोक्तृशेषत्वच सांगितलें जात आहे,' असें सांगतात-

भोक्ता स्वस्यैव भोगाय पतिजायादिमिच्छति ।
एष लौकिकवृत्तान्त: श्रुत्या सम्यगनूदित: ।।१

अन्वयार्थ - [भोक्ता स्वस्य एव भोगाय पतिजायादिं इच्छति-] भोक्ता आपल्याच भोगाकरितां पति, स्त्री इत्यादिकांची इच्छा करितो. [इति एष: लौकिकवृत्तान्त: श्रुत्या सम्यक् अनूदित:-] हा लौकिकवृत्तान्त श्रुतीनें उत्तम प्रकारें सांगितला आहे.

प्रकाश:- बृहदारण्यकस्थ प्रस्तुत श्रुति लौकिकवृत्तान्त सांगत आहे. तेव्हां त्यावरून भोक्ता नित्य आहे, अशी कल्पना करणें व्यर्थ होय. ॥२०१॥

-'पण श्रुतीनें लौकिक मिथ्या स्थितीचा अनुवाद कशाकरितां केला आहे ?' अशी आशंका गेऊन 'भोक्त्यामध्येंच प्रेमाचें विधान करण्यासाठीं' असें समाधान सांगतात-

भोग्यानां भोक्तृशेषत्वान्मा भोग्येष्वनुरज्यताम् ।
भोक्तर्येव प्रधानेऽतोऽनुरागं तं विधित्सति ।।२

अन्वयार्थ - [भोग्यानां भोक्तृशेषत्वात् भोग्येषु मा अनुरज्यताम्-] भोग्य जे विषय ते भोक्त्याच्या उपभोगाचे उपाय - साधनें असल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं प्रीति ठेवूं नये, [अत: प्रधाने भोक्तरि एव तं अनुरागं विधित्सति-] तर मुख्य जो भोक्ता त्याच्याच ठिकाणीं ती प्रीति करावी, असें विधान करण्याची इच्छा श्रुति करीत आहे.

प्रकाश:- विषय भोगांचीं साधनें आहेत. व साधनें मुख्य नसतात असा सामान्य नियम आहे. यास्तव त्यांचा भोग घेणाराच मुख्य होय हें निर्विवाद आहे. तरी प्रत्येक साधकानें गौण पदार्थाच्या ठायीं प्रीति न ठेवितां नेहमीं आत्म्याच्या ठायींच ती ठेवावी. कारण तोच मुख्य भोक्ता आहे. जीव मुख्य भोक्ता नव्हे. वस्तुत: आत्मा भोक्ताहि नव्हे, हें खरें; पण प्रौढवादाचा अंगीकार करून येथें त्यास भोक्ता म्हटलें आहे. सारांश, प्राकृतांची विषयाच्या ठायीं जी प्रीति असते, तीच तेथून काढून आत्म्याच्या ठायीं लावावी, असें पूर्वोक्त श्रुतीस सांगावयाचे आहे. ॥२०२॥

-याविषयीं पुराणवाक्याचेंहि प्रमाण देतात-

या प्रीतिरविवेकानां विषयेष्वनपायिनी ।
त्वामनुस्मरत: सा मे हृदयान्माप सर्पतु ।।३

अन्यार्थ - [हे माप, अविवेकानां विषयेषु या अनपायिनी प्रीति: अस्ति सा त्वां अनुस्मरत: मे हृदयात् सर्पतु-] हे लक्ष्मीपते, आत्मज्ञानशून्य पुरुषांची विषयांमध्यें जी दृढ प्रीति असते, ती प्रीति तुझें चिंतन करणाऱ्या माझ्या हृदयांतून जावो.

प्रकाश:- हें प्रल्हादाचें वचन आहे. व ''विषयी लोकांचे ठायीं जशी दृढ विषयप्रीति असते, तशीच ती माझे ठायींहि आहे. पण, हे प्रभो, मी तुझें सतत चिंतन करीत असतों. यास्तव ती दुष्ट विषयप्रीति माझ्या अंत:करणांतून निघून जावो.'' अशी त्यानें या श्लोकांत ईश्वराची प्रार्थना केली आहे. याचा कोणी (माऽपसर्पतु असा पाठ स्वीकारून) असाहि अर्थ करितात:- अज्ञानी लोकांची विषयांचें ठायीं जशी दृढ प्रीति असतें, तशीच माझी तुझे ठायीं आहे, यास्तव हे प्रभो, तुझें चिंतन करणाऱ्या माझ्या हृदयांतून ती नाहींशीं न होवो. अर्थात् ती सतत अशीच राहो. ॥२०३॥

-'पुराणांत जरी तसें म्हटलें असलें तरी प्रकृत श्रुतीशीं त्याचा काय संबंध ?' उत्तर -

इति न्यायेन सर्वस्माद्भोग्यजाताद्विरक्तधी: ।
उपसंहृत्य तां प्रीतिं भोक्तर्येनं बुभुत्सते ।।४

अन्वयार्थ - [इति न्यायेन सर्वस्मात् भोग्यजातात् विरक्तधी:-] या न्यायानें सर्व भोग्य-

जातापासून ज्याची बुद्धि विरक्त झाली असा तो पुरुष [तां प्रीतिं भोक्तरि उपसंहृत्य एनं बुभुत्सते-] त्या प्रीतीचा भोक्त्याच्या ठिकाणीं उपसंहार करून आत्म्यास जाणण्याची इच्छा करितो.

प्रकाश:- या पुराणोक्त न्यायानें स्त्री पुत्रादि सर्व भोग्य पदार्थाविषयीं ज्याची बुद्धि विरक्त झाली आहे असा भाग्यशाली पुरुष विषयप्रीतीचा भोक्त्याच्या ठायीं लय करून म्हणजे प्रीतीचा सर्व ओघ भोक्त्याकडे वळवून त्या मुख्य भोक्त्यासच जाणण्याची दृढ इच्छा करितो. पूर्वोक्त सर्व विवेचनाचें हें फल होय. ॥२०४॥

-याप्रमाणें आत्म्यामध्येंच प्रेमाचा उपसंहार केला असतां काय निष्पन्न होतें, तें सदृष्टान्त सांगतात-

स्रक्‌चंदनवधूवस्त्रसुवर्णादिषु पामर: ।
अप्रमत्तो यथा तद्वन्न प्रमाद्यति भोक्तरि ॥२०५

अन्वयार्थ - [पामर: स्त्रक्-चंदन वधू वस्त्र सुवर्णादिषु यथा अप्रमत्त: भवति-] प्राकृत मनुष्य पुष्पमाला, चंदन, स्त्री, वस्त्रें, सुवर्ण इत्यादिकांविषयीं जसा सावधान असतो, [तद्वत् मुमुक्षु: भोक्तरि न प्रमाद्यति-] तसाच मुमुक्षु भोक्त्याविषयीं सावधान राहतो.

प्रकाश:- सामान्य मनुष्य विषयरूप वस्तूंविषयीं कसा सावध असतो हें कोठेंहि पहावयास मिळण्यासारखें आहे. तो डोळ्यांत तेल घालून अहोरात्र इष्ट वस्तूंचें रक्षण करीत असल्याचें विचारी मनुष्यास सहज दिसतें. व अशा मनुष्याची व्यवहारांत प्रौढीहि होत असते. या प्राकृतांप्रमाणें मुमुक्षुहि मुख्य भोक्ता जो आत्मा त्याच्याविषयीं सदा सावध असतो. व एक क्षणभरहि त्यास विसरत नाहीं. सारांश, आत्म्याचें अनवधान न होणें हेंच पूर्वोक्त प्रीतीचें स्वरूप होय. ॥२०५॥

-त्याच्या अनवधानाचा अभावच अनेक दृष्टान्तांनीं स्पष्ट करितात -

काव्यनाटकतर्कादीनभ्यस्यति निरंतरम् ।
विजिगीषुर्यथा तद्वन्मुमुक्षु: स्वं विचारयेत् ॥६

अन्वयार्थ - [यथा विजिगीषु: काव्य-नाटक-तर्कादीन् निरंतरं अभ्यस्यति-] जसा प्रतिवाद्यास जिंकण्याची इच्छा करणारा पुरुष काव्य, नाटक, तर्क इत्यादिकांचा सतत अभ्यास करितो [तद्वत् मुमुक्षु: स्वं विचारयेत्-] त्याप्रमाणें मुमुक्षूनें आत्म्याचा विचार करावा.

प्रकाश:- पंडितांच्या सभेमध्यें बसून ज्याला इतरांस निरुत्तर करावयाचें असतें, त्यास काव्यादि शास्त्रांचा अभ्यास निरंतर करावा लागतो, हें सर्व प्रसिद्ध आहे. त्या बिचाऱ्यास भोजनादि अवश्य कर्मांत जाणारा कालहि व्यर्थ गेला, असें वाटत असतें. मुमुक्षुनेंहि कालाविषयीं अशीच काळजी वाहावी; एक क्षणहि फुकट जाऊं न देतां सतत आत्मचिंतन करीत राहावें. या श्लोकांत मुमुक्षूनें आत्मचिंतन सतत करें करावें, हें व्यवहारांतील उत्तम विद्यार्थ्यांच्या दृष्टान्तानें व्यक्त केलें आहे. ॥२०६॥

-म्हणून मुमुक्षूनें श्रद्धा बाळगावी -

जपयागोपासनादि कुरुते श्रद्धया यथा ।
स्वर्गादिवाञ्छया तद्वच्छ्रद्दध्यात्स्वे मुमुक्षया ॥७

अन्वयार्थ - [यथा स्वर्गादिवाञ्छया जपयागोपासनादि श्रद्धया कुरुते-] ज्याप्रमाणें वैदिक स्वर्गादिकांच्या इच्छेनें जप, यज्ञ, उपासना इत्यादि मोठ्या श्रद्धेनें करितो [तद्वत् मुमुक्षया स्वे श्रद्दध्यात्-] त्याप्रमाणें यानें मुक्त होण्याच्या इच्छेनें आत्म्याच्या ठिकाणीं श्रद्धा ठेवावी.

प्रकाश:- जसा एकादा स्वर्गाची इच्छा करणारा पुरुष गायत्र्यादि मंत्रांचा उपांशु किंवा मानसिक जप, चतुर्मास्यादि याग, संध्यावंदनादिरूप ध्यान व त्याचप्रमाणें स्वर्गप्राप्ति करून देणारे दुसरेहि अनेक उपाय मोठ्या आस्थेनें करितो, त्याप्रमाणें मुमुक्षूनेंहि

आत्म्याच्या ठायीं पूर्ण आस्था ठेवावी. आत्म्याच्या साक्षात्कारानें मोक्ष खचित मिळेल असा दृढ विश्वास ठेविणें, हीच आत्म्याविषयींची आस्था होय. ॥२०७॥

-योग्याच्या दृष्टान्तानें स्पष्ट करितात-

चित्तैकाग्र्यं यथा योगी महायासेन साधयेत् ।
अणिमादिप्रेप्सयैवं विविच्यात् स्वं मुमुक्षया ॥८

अन्वयार्थ - [यथा योगी अणिमादिप्रेप्सया महायासेन चित्तैकाग्र्यं साधयेत्-] ज्याप्रमाणें योगी अणिमादि सिद्धींच्या इच्छेनें मोठ्या प्रयासानें चित्ताचें ऐकाग्र्य संपादन करितो, [एवं मुमुक्षया स्वं विविच्यात्-] त्याप्रमाणें मुमुक्षूनें मुक्त होण्याच्या इच्छेनें आत्मविवेचन करावें.

प्रकाश:- अणिमादि अष्टसिद्धि प्राप्त व्हाव्या म्हणून योगी शरीरास कसा कष्ट देत असतो, हें सर्वश्रुत आहे. मुमुक्षूस तसे कष्ट करण्याचें जरी फारसें कारण नसलें तरी आत्मविवेचनार्थ कांहीं मुख्य शारीरिक नियम त्यासहि पाळावे लागतातच. यास्तव ते पाळून साधकानें आत्मानात्मविवेक करावा. असो, अनात्मविषयक सर्व कायिक, वाचिक व मानसिक व्यापार सोडून मुमुक्षूनें तत्त्वज्ञान दृढ होण्यास्तव अद्वैतात्मपर होऊन राहावें, असें या तिन्हीं श्लोकांतील दृष्टान्तांचें तात्पर्य होय. ॥२०८॥

-पण यांच्या सतत अभ्यासानें कोणतें फल मिळतें, तें सांगतात-

कौशलानि विवर्धन्ते तेषामभ्यासपाटवात् ।
यथा तद्वद्विवेकोऽस्याप्यभ्यासाद्विशदायते ॥९

अन्वयार्थ - [यथा तेषां अभ्यासपाटवात् कौशलानि विवर्धन्ते-] ज्याप्रमाणें त्यांची काव्यादिकांच्या अभ्यासपटुत्वामुळें कुशलता वाढते. [तद्वत् अस्य अपि विवेक: अभ्यासात् विशदायते-] त्याप्रमाणें याचाहि विवेक अभ्यासामुळें विशद होतो.

प्रकाश:- सतत दीर्घकाल अभ्यास केल्यामुळें जिंकण्याची इच्छा करणारा, स्वर्गाची इच्छा करणारा इत्यादि तो तो पुरुष आपापल्या विषयांमध्यें जसा निपुण होऊन जातो, त्याप्रमाणें हा आत्मानात्मविवेकीहि सतत अभ्यासामुळें तत्त्वविवेचनांत तरबेज होऊन जातो. म्हणजे द्वैत-असत्य आहे व अद्वैत सत्य आहे, हें त्याच्या हाडीं खिळून जातें. ॥२०९॥

-विशद विवेकज्ञानाचें फल -

विविंचता भोक्तृतत्त्वं जाग्रदादिष्वसंगता ।
अन्वयव्यतिरेकाभ्यां साक्षिण्यध्यवसीयते ॥२१०

अन्वयार्थ - [अन्वयव्यतिरेकाभ्यां भोक्तृतत्त्वं विविंचता -]अन्वय व व्यतिरेक यांच्या योगानें भोक्त्याच्या यथार्थस्वरूपाचें विवेचन करणाऱ्या पुरुषाकडून [जाग्रदादिषु साक्षिणि असंगता अध्यवसीयते-] जाग्रदादि अवस्थांमध्यें साक्षीच्या ठिकाणीं असणाऱ्या असंगतेचा निश्चय केला जातो.

प्रकाश:- अन्वय व व्यतिरेक म्हणजे काय हें पहिल्या भागांतच स्पष्ट करून दाखविलें आहे. विवेक करितांना या दोन उपायांचा चांगला उपयोग होतो. यांच्या योगानें भोक्त्यांचें एकदा यथार्थ स्वरूप समजलें कीं जाग्रत्, स्वप्न, सुषुप्ति, मूर्च्छा, मरण व समाधी या अवस्थेमध्यें साक्षी असंगच असतो असा साधकास दृढ बोध होतो. व त्यामुळें तो सृष्टि, स्थिति व प्रलय या कालींहि असंगच असला पाहिजे, असेंहि अबाधित अनुमान होतें. सारांश, दीर्घकाल अभ्यास केल्यामुळें विवेक स्पष्ट झाला असतां हा प्रस्तुत अवर्णनीय लाभ होतो. ॥२१०॥

-अन्वयव्यतिरेक दाखवितात-

यत्र यद्दृश्यते द्रष्ट्रा जाग्रत्स्वप्नसुषुप्तिषु ।
तत्रैव तन्नेतरत्रेत्यनुभूतिर्हि संमता ॥११

अन्वयार्थ - [द्रष्ट्रा जाग्रत्स्वप्नसुषुप्तिषु यत्र यत् दृश्यते-] साक्षीकडून जाग्रत्, स्वप्न व सुषुप्ति यांतील ज्या अवस्थेंत जें पाहिलें जातें, [तत् तत्र एव न

इतरत्र-] तें त्या अवस्थेंतच असतें. दुसऱ्या अवस्थेंत नसतें. [इति अनुभूतिः संमता हि-] हा अनुभव सर्वसंमत आहे; हें प्रसिद्ध आहे.

प्रकाशः- साक्षी हा, देहादि साधनें व विषय हीं निरनिराळ्या अवस्थेंत निरनिराळीं पाहतो. म्हणजे जाग्रतींतील देह व घर, स्त्री, पुत्र, मित्र, द्रव्य इत्यादि भिन्न व स्वप्नांतील भिन्न. त्यांची एकाच अवस्थेंत कधीं पुनः प्रतीति नाहीं. सुषुप्तींत तर या दोन्ही अवस्थांहून अगदीं विलक्षण असाच कांहीं अनुभव येतो. व त्याचीहि दुसऱ्या कोणत्याहि अवस्थेंत प्रतीति येत नाहीं, शिवाय हा प्रकार अप्रसिद्ध आहे, असेंहि नाहीं; कारण तो आबालवृद्धांस ठाऊक आहे. पण साक्षी आत्म्याची स्थिति तशी नाहीं. तो प्रत्येक अवस्थेंमध्यें त्या त्या अवस्थेंतील निरनिराळ्या पदार्थांस पाहात असतो. तस्मात् आत्म्याचें सर्वदा अस्तित्व आणि अवस्था व त्यांतील विषय यांचें कांहीं काल अस्तित्व सिद्ध झालें. व त्यामुळें आत्मा असंग, नित्य व केवल साक्षी आहे, असें आणि अवस्थादि अनात्मजात जड, अनित्य इत्यादि धर्मयुक्त आहे असेंहि ठरलें. ॥२११॥

केवल अनुभवच नव्हे तर याविषयीं आगमहि आहे, अशा आशयानें-बृहदारण्यकांतील 'स यत्तत्र किंचित्पश्यति,' व 'स वा एष एतस्मिन्' हीं दोन वाक्यें अर्थतः घेतात- बृ. भा. अ. ४. ३. १५. पहा. -

स यत्तत्रेक्षते किंचित्तेनानन्वागतो भवेत् ।
दृष्ट्वैव पुण्यं पापं चेत्येवं श्रुतिषु डिंडिमः ॥१२

अन्वयार्थ - [सः तत्र यत् किंचित् ईक्षते तेन अनन्वागतः भवेत्-] तो तेथें जें कांहीं पाहतो त्यानें अननुगत असाच दुसऱ्या अवस्थेंत जातो, [पुण्यं च पापं च दृष्ट्वा एव-] पुण्य वा पाप केवल पाहूनच-पुनः पूर्वोक्त रीतीनें परत जागृतींत येतो [इति एवं श्रुतिषु डिण्डिमः अस्ति-] इत्यादि प्रकारें श्रुतीमध्यें घोष केला आहे.

प्रकाशः- या श्लोकांत दोन श्रुतीचा निर्देश केला, आहे व त्या दोन्ही बृहदारण्यकांतील आहेत. वस्तुतः प्रस्तुत उपनिषदाच्या चवथ्या अध्यायाच्या तिसऱ्या ब्राह्मणाचा जो पंधरावा मंत्र आहे, त्यांतच हीं दोन्हीं वाक्यें आहेत. पण येथें प्रथमार्धांत ज्याचा निर्देश केला आहे, तें वाक्य पूर्वोक्त ब्राह्मणाच्या पंधराव्या व सोळाव्या मंत्राचाहि उत्तरार्ध आहे. यास्तव टीकाकारांनीं या दोन श्रुति आहेत असें म्हटलें आहे, असें वाटतें. असो; या दोन्ही वाक्यांचें तात्पर्य असें:- हा कूटस्थ आत्मा त्या स्वप्नावस्थेमध्यें जें कांहीं पाहतो त्याच्याशीं संबद्ध होत नाहीं. कारण हा पुरुष असंग आहे. तो हा पुरुष या निद्रावस्थेंत रममाण होऊन व विहार करून, पुण्य व पाप यांस केवल पाहून, पुनरपि नेहमींप्रमाणें यथास्थान स्वप्नावस्थेंकरितां (स्वप्नावस्थेंत) धांवतो. या सर्व प्रकरणाचा सारांश- कूटस्थ आत्मा कोणत्याहि अवस्थेंत घडणाऱ्या पुण्यपापानें लिप्त होत नाहीं असा आहे. ॥२१२॥

-भोक्तृतत्त्वाचें विवेचन करणाऱ्या दुसऱ्या श्रुतींचा निर्देश करितात -

जाग्रत्स्वप्नसुषुप्त्यादिप्रपंचं यत्प्रकाशते ।
तद्ब्रह्माहमिति ज्ञात्वा सर्वबंधैः प्रमुच्यते ॥१३

अन्वयार्थ - [यत् जाग्रत्स्वप्नसुषुप्त्यादिप्रपंचं प्रकाशते-] जें जाग्रत् स्वप्न, सुषुप्ति इत्यादि प्रपंचास प्रकाशित करितें, [तत् ब्रह्म अहं इति ज्ञात्वा सर्वबन्धैः प्रमुच्यते-] तें ब्रह्म मी आहें, असें जाणून मुमुक्षु सर्व बंधांपासून सर्वथा मुक्त होतो.

प्रकाशः- जाग्रत्, स्वप्न इत्यादि अवस्था हाच प्रपंच होय. कारण प्रपंच म्हणजे विस्तार. केवल आत्म्यास आपली कैवल्यावस्था सोडून निरनिराळ्या अवस्थेंत पडावें लागणें हा त्याचा विस्तारच होय. पण असंग आत्म्याशीं त्याचा कांहीं संबंध नसतो. तो केवल अवस्थामय प्रपंचाचा द्रष्टा आहे. यास्तव श्रुति म्हणते

कीं जो कोणी यति प्रपंचप्रकाशक ब्रह्मच मी आहें, असें निश्चयपूर्वक जाणतो, तो प्रमातृत्व, कर्तृत्व इत्यादि सर्व बंधांपासून मुक्त होतो. ॥२१३॥

-अमृतबिंदूपनिषदाचेंहि प्रमाण देतात-

एक एवात्मा मंतव्यो जाग्रत्स्वप्नसुषुप्तिषु ।
स्थानत्रयव्यतीतस्य पुनर्जन्म न विद्यते ॥१४

अन्वयार्थ - [जाग्रत्स्वप्नसुषुप्तिषु एक: एव आत्मा मन्तव्य:-] जाग्रत्, स्वप्न व सुषुप्ति यांमध्यें एकच आत्मा मानणें युक्त आहे. [एवं स्थानत्रय-व्यतीतस्य पुनर्जन्म न विद्यते-] याप्रमाणें तिन्ही अवस्थांहून पृथक केलेल्या आत्म्याला पुनर्जन्म नाहीं.

प्रकाश:- जाग्रतादि तिन्ही अवस्थांचा साक्षी आत्मा एकच आहे असें ज्ञान झालें असतां तो या अवस्थांहून भिन्न आहे असें सहजच समजतें. व अशी ज्यांची दृढ समजूत झाली आहे, त्याला, पुनर्जन्माचे कारणच नष्ट झाल्यामुळें, तो घ्यावा लागत नाहीं. ॥२१४॥

-कैवल्योपनिषदाचेंच आणखी एक वाक्य -

त्रिषु धामसु यद्भोग्यं भोक्ता भोगश्च यद्भवेत् ।
तेभ्यो विलक्षण: साक्षी चिन्मात्रोऽहं सदाशिव: ॥१५

अन्वयार्थ - [त्रिषु धामसु यत् भोग्यं य: भोक्ता य: च भोग: भवेत्-] तीन अवस्थांमध्यें जें भोग्य, जो भोक्ता व जो भोग असतो [तेभ्य: विलक्षण: य: साक्षी चिन्मात्र: सदाशिव: स: एव अहं अस्मि-] त्या सर्वांहून विलक्षण असा जो साक्षी व चिन्मात्र सदाशिव तोच मी आहें.

प्रकाश:- त्रिषु धामस-जाग्रत्, स्वप्न व सुषुप्ति या अवस्थांमध्यें. भोग्यं-स्थूलरूप, सूक्ष्मरूप, व आनंदरूप. भोक्ता-विश्व, तैजस, प्राज्ञ. भोग:- स्थूलादि भोग्याचा अनुभव. तेभ्य:- तीन स्थानें, स्थूलादि त्रिविध भोग्य व विश्वादि तीन प्रकारचा भोक्ता याहून अगदीं भिन्न धर्मांनीं युक्त असा चिन्मात्र व सर्वदा शुभ परमात्मा मीच आहें-असा ज्याला साक्षात्कार होतो, तो पुनरपि संसारपरंपरेंत पडत नाहीं. ॥२१५॥

-ह्याप्रमाणें विवेचन करून आत्मतत्त्व असंग आहे, असा निश्चय झाला असतां भोक्तृत्व कोणाला आहे, तें सांगतात-

एवं विवेचिते तत्त्वे विज्ञानमयशब्दित: ।
चिदाभासो विकारी यो भोक्तृत्वं तस्य शिष्यते ॥१६

अन्वयार्थ - [एवं तत्त्वे विवेचिते सति-] ह्याप्रमाणें तत्त्वाचें विवेचन केलें असतां [य: विकारी विज्ञानमयशब्दित: चिदाभास:-] जो विकारी विज्ञानमयसंज्ञक चिदाभास [तस्य भोक्तृत्वं शिष्यते-] त्याची भोक्तृता, असें ठरतें.

प्रकाश:- तत्त्वाचें यथार्थ स्वरूप समजल्यानंतर तें भोक्ता आहे असें कोणीहि म्हणत नाहीं. व त्यामुळें चिदाभासच भोक्ता होय असें कबूल करावें लागतें. कारण भोक्ता विकारी असावा लागतो व विज्ञानमय तें ज्याला नांव आहे तो चिदाभास तसा असल्यामुळें त्याला भोक्ता म्हटल्यांवाचून गत्यंतर नाहीं. ॥११६॥

अहोपण, चिदाभासाच्या भोक्तृत्वाचा अंगीकार केल्यास 'कस्य कामाय' हें वचन भोक्त्याचा अभाव सांगण्याच्या इच्छेनें आहे, हें पूर्वोक्त वचन बाधित होते' अशी आशंका घेऊन सांगतात-

मायिकोऽयं चिदाभास: श्रुतेरनुभवादपि ।
इंद्रजालं जगत्प्रोक्तं तदन्त:पात्ययं यत: ॥१७

अन्वयार्थ - [श्रुते: अनुभवात् अपि अयं चिदाभास: मायिक:-] श्रुति व अनुभव या दोहोंवरूनहि हा चिदाभास मायिक ठरतो. [यत: जगत् इंद्रजालं प्रोक्तं अत: तदन्त:पाती अयं मिथ्याभूत: एव-] ज्या अर्थीं जगत् इंद्रजाल आहे असें स्पष्टपणें सांगितलेलें आहे, त्या अर्थीं त्यामध्यें अंतर्भूत होणारा हाहि मिथ्याच होय.

प्रकाश: - 'माया, ही जीव व ईश्वर यांस चैतन्या-

भासानें करिते' अशी श्रुति आहे व भोक्ता त्रिपुटींमध्यें येतो, असा अनुभव आहे आणि त्यावरून हा विकारी चिदाभास मिथ्या आहे, असें निश्चित होतें. शिवाय ज्याअर्थीं जगत् इंद्रजालरूप आहे असें एकदा ठरून गेलें आहे, व ह्या चिदाभासाचाहि त्यामध्यें अंतर्भाव होत आहे, त्याअर्थीं तोहि इंद्रजालरूप आहे हें उघड होतें. ॥१७॥

-जगाप्रमाणें हा विनाशी असल्याचा अनुभव येत असल्यामुळेंहि मिथ्या आहे, असें सांगतात.

विलयोऽप्यस्य सुप्त्यादौ साक्षिणा ह्यनुभूयते ।
एतादृशं स्वस्वभावं विविनक्ति पुन: पुन: ॥१८

अन्वयार्थ - [सुप्त्यादौ अस्य अपि विलय: साक्षिणा अनुभूयते हि-] **सुषुप्ति, समाधि इत्यादि अवस्थांमध्यें याचाहि लय साक्षीकडून अनुभविला जातो, हें प्रसिद्धच आहे.** [तत: एतादृशं स्वस्वभावं पुन: पुन: विविनक्ति-] **तदनंतर तो अशा प्रकारचें आपलें स्वरूप पुन: पुन: भिन्नत्वानें जाणतो.**

प्रकाश:- ज्याचा ज्याचा म्हणून बाध होतो तें तें मिथ्या असा नियम आहे; व या चिदाभासाचा सुषुप्तींत लय होत असतो हें साक्षी नित्य पाहतो. अर्थात् चिदाभास मिथ्या आहे. पण कूटस्थ असंग असल्यामुळें कोणताहि जरी विवेक झाला, तरी तो चिदाभासकृतच असणार, हें उघड आहे. व ह्याकरितांच ग्रंथकार म्हणतात कीं, अशी वस्तुस्थिति असल्यामुळें चिदाभास अशा प्रकारच्या आपल्या वास्तविक स्वरूपांचें वारंवार विवेचन करितो. म्हणजे कूटस्थाहून माझें स्वरूप भिन्न आहे, असें वारंवार जाणतो. ॥१८॥

-याप्रमाणें -

विविच्य नाशं निश्चित्य पुनर्भोगं न वांछति ।
मुमूर्षु: शायितो भूमौ विवाहं कोऽभिवांछति ॥१९

अन्वयार्थ - [विविच्य नाशं निश्चित्य पुन: भोगं न वाञ्छति-] **असा विवेक करून व आपल्या नाशाचा निश्चय करून तो पुनरपि भोगाची इच्छा करीत नाहीं.** [भूमौ शायित: क: मुमूर्षु: विवाहं अभिवाञ्छति-] **अहो, ज्याला भूमीवर काढलें आहे असा मरावयास टेंकलेला कोणता मनुष्य विवाहाची इच्छा करणार आहे !**

प्रकाश:- कूटस्थ व चिदाभास यांची भिन्नता समजली व चिदाभासरूप मी नाशिवंत आहें असें एकदा निश्चयपूर्वक समजलें, कीं प्राणी भोगांची इच्छा करीनासा होतो. उघडच आहे कीं जो मरावयास टेकला आहे व अंतकाल अगदीं जवळ आल्यामुळें ज्याला भूमीवर काढलें आहे, असा कोणी तरी आपल्या लग्नाची इच्छा करील काय ? कधींहि करणार नाहीं. अथवा ज्याला फांसावर चढवावयाचें आहे व त्याची वेळहि ठरली आहे. असा एकादा पुरुष आपल्याला राहाण्याकरितां एक उत्तम घर बांधावयास पाहिजे, अशी नुस्ती कल्पना तरी कुणी करील काय ? कधींहि करणार नाहीं. तसाच प्रकार या चिदाभासाचा होतो. ॥१९॥

-फार काय पण -

जिन्हेति व्यवहर्तुं च भोक्ताऽहमिति पूर्ववत् ।
छिन्ननास इव न्हीत: क्लिश्यन्नारब्धमश्नुते ॥२०

अन्वयार्थ - ['अहं भोक्ता' इति पूर्ववत् व्यवहर्तुं जिन्हेति-] **मी भोक्ता आहें' असें पूर्वीप्रमाणें म्हणण्यास तो लाजतो.** [च छिन्ननास: इव न्हीत: क्लिश्यन् सन् आरब्धं अश्नुते-] **व ज्याचें नाक कापलें आहे, अशा एखाद्या मनुष्याप्रमाणें लज्जित व कष्टी होऊन तो प्रारब्धकर्माचा भोग भोगितो.**

प्रकाश:- पूर्ववत्- ज्या वेळीं कूटस्थ व स्वस्वरूप यांतील भेद समजलेला नव्हता, त्या वेळीं जसा हा भोक्ता समजत होता तसा-विवेकानंतर समजत नाहीं. कारण 'मी भोक्ता आहें' हें माझें म्हणणें चुकीचें आहे, असें एकदा समजल्यामुळें पुन: तसें म्हणण्याची त्यास लाज

वाटते. तर मग, प्रारब्ध कर्मामुळें प्राप्त होणारे भोग तो कसे भोगितो ? असें कोणी विचारील म्हणून ग्रंथकार म्हणतात. ज्याप्रमाणें एकादा अपराधी लाजत लाजत व मोठ्या दु:खानें व्यवहार करितो, त्याप्रमाणें हा नाइलाज म्हणून मोठ्या कष्टानें भोग भोगितो. म्हणजे त्या भोगांपासून त्यास सुख होत नसून उलट असह्य दु:ख होत असतें. ॥२२०॥

आतां ज्ञानानंतर साक्षीला भोक्तृत्व नाहीं, हें कैमुतिकन्यायानें सांगतात -

यदा स्वस्यापि भोक्तृत्वं मन्तुं जिन्हेत्ययं तदा ।
साक्षिण्यारोपयेदेतदिति कैव कथा वृथा ॥२१॥

अन्वयार्थ - [यदा अयं स्वस्य अपि भोक्तृत्वं मंतुं जिन्हेति-] ज्या वेळीं हा आपलेंहि भोक्तृत्व मानण्यास लाजतो, [तदा एलत् साक्षिणि आरोपयेत् इति वृथा का एव कथा -] तेव्हां तो ते साक्षीच्या ठिकाणीं आरोपित करील ही व्यर्थ आशा कशाला पाहिजे ?

प्रकाश:- चिदाभास जरी स्वत: विकांति आहे, तरी त्याला विवेकामुळें मी भोक्ता आहें असें म्हणण्याची लाज वाटते. आपल्यामध्यें योग्यता असूनहि जर तो प्रस्तुत अधिकार आपल्याकडे घेऊं शकत नाहीं. तर ज्याच्यामध्यें विकारित्व नसल्यामुळें भोक्ता होण्याची योग्यताच नाहीं, त्याला तो उगीचच 'तूं भोक्ता आहेस' असें कसें म्हणेल ॥१२१॥

-हाच उक्त अर्थ श्रुत्यारूढ करितात-

इत्यभिप्रेत्य भोक्तारमाक्षिपत्यविशंकया ।
'कस्य कामायेति तत: शरीरानुज्वरो न हि ॥२२

अन्वयार्थ - [इति अभिप्रेत्य 'कस्य कामाय' इति श्रुति:-] अशा अभिप्रायानें 'कस्य कामाय' हें श्रुतिवाक्य [भोक्तारं अविशंकया आक्षिपति-] भोक्त्याविषयीं नि:शंकपणें आक्षेप करीत आहे. [तत: शरीरानुज्वर: न हि-] भोक्त्याचाच अभाव झाल्यावर शरीरामुळें होणारी पीडा आपोआपच नाहींशी होते.

प्रकाश:- सूक्ष्म दृष्टया पाहूं लागलें असतां कूटस्थहि भोक्ता नव्हे व चिदाभासहि खरा भोक्ता नव्हे असें ठरतें. म्हणून 'कस्य कामाय' म्हणजे कोणाच्या कामाकरितां हें श्रुतिवाक्य भोक्त्याचें निराकरण करीत आहे. अहो, मुळीं भोक्ताच जर कोणी नाहीं, तर त्याच्याकरितां शरीरास होणारा ताप तरी कोठून असणार ? कारण शरीरास जी प्रयत्नादिकामुळें पीडा होत असते, ती त्यांत राहाणाऱ्या भोक्त्याच्या तृष्णापूर्तिकरितां होत असते, हें उघड आहे. ॥२२२॥

-तत्त्वेवत्त्याला शरीरानुज्वर नाहीं, हें दाखविण्या-साठीं शरीरभेद व त्या प्रत्येक भेदांतील संतापाचें अस्तित्व दाखवितात-

स्थूलं सूक्ष्मं कारणं च शरीरं त्रिविधं स्मृतम् ।
अवश्यं त्रिविधोऽस्त्येव तत्र तत्रोचितो ज्वर:॥२३

अन्वयार्थ - [स्थूलं, सूक्ष्मं च कारणं इति शरीरं त्रिविधं स्मृतं-] स्थूल, सूक्ष्म व कारण असें शरीर तीन प्रकारचें आहे. - तत्त्ववि. श्लो. १७-२८ [तत्र तत्र उचित: त्रिविध: ज्वर: अवश्यं अस्ति एव-] त्या त्या शरीरांत योग्य असा तीन प्रकारचा संताप अवश्य आहे.

प्रकाश:- स्थूलादि संज्ञक तीन शरीरें कशीं उत्पन्न झालीं आहेत व तीं कोणतीं हें पूर्वार्धातील तत्त्वविवेकाख्य प्रथम प्रकरणांतच स्पष्ट होऊन गेलें आहे. तीन शरीरें असल्यामुळें, त्या त्या शरीरास योग्य असा त्रिविध संताप होणेंहि साहजिक आहे. व त्याचा यापुढें विस्तार व्हावयाच्या असल्यामुळें येथे अधिक स्पष्टीकरण करीत नाहीं. ॥२२३॥

-स्थूल शरीरांतील ज्वर सांगतात-

वातपित्तश्लेष्मजन्यव्याधय: कोटिशस्तनौ ।
दुर्गंधित्वकुरूपत्वदाहभंगादयस्तथा ॥२४

अन्वयार्थ - [वातपित्तश्लेष्मजन्यव्याधय:-]

वात, पित्त व कफ यांपासून होणाऱ्या व्याधि [तथा दुर्गंधित्व-कुरूपत्व-दाह-भंगादय:- कोटिश: तनौ सन्ति-] त्याचप्रमाणें दुर्गंधित्व, कुरूपत्व, दाह, भंग, इत्यादि असंख्य पीडा शरीरामध्यें होतात.

प्रकाश: - वात, पित्त व कफ हे तीन दोष स्थूल शरीरांत असतात व त्यांच्या वैषम्यामुळें शरीरास पीडा होते. त्याचप्रमाणें स्थूल देहाची उर्जा न ठेवल्यामुळें किंवा कांहीं व्याधींमुळें त्यास दुर्गंध सुटत असतो, पीनसासारख्या किंवा चाळपुळीसारख्या रोगामुळें शरीर विद्रूप होणें; अग्नीच्या संसर्गामुळें तें जळणें; हात, पाय इत्यादि अवयव तुटणें; इत्यादि प्रकारच्या असंख्य पीडा या स्थूल शरीरास होतात. ॥२२४॥

-आतां सूक्ष्म शरीरांतील ज्वर कोणते तें सांगतात-

कामक्रोधादय: शांतिदांत्याद्या लिंगदेहगा: ।
ज्वरा द्वयेऽपि बाधन्ते प्राप्त्याऽप्राप्त्या नरं क्रमात् ॥२५

अन्वयार्थ - **[कामक्रोधादय: शांतिदांत्याद्या: लिंगदेहगा: ज्वरा: सन्ति-] कामक्रोधादिक व शांति, दांति इत्यादिक सूक्ष्मशरीरस्थ ज्वर आहेत, कामशांत्यादिकांच्या ज्वरत्वाचें उपपादन- [द्वये अपि क्रमात् प्राप्त्या अप्राप्त्या च नरं बाधन्ते-] हे दोन्ही प्रकारचे ज्वर क्रमानें प्राप्ति व अप्राप्ति यांच्या योगानें मनुष्यास पीडा करितात.**

प्रकाश:- काम, क्रोध, लोभ इत्यादि दुष्ट विकार व शांति, दान्ति, तितिक्षा, क्षमा, इत्यादि सात्त्विक विकार अंत:करणांत राहणारे आहेत. सर्व इंद्रियें आणि प्राण यांसह अंत:करणच सूक्ष्म शरीर होय. आणि म्हणूनच हे सर्व ज्वर सूक्ष्म शरीरांतील आहेत, असें येथें म्हटलें आहे. कामादि दुष्ट विकार संताप देत असतात हें सर्वांस ठाऊक आहे. पण शांतीसारख्या सात्विक वृत्तींपासून संताप कसा होत असतो, हें अप्रसिद्ध असल्यामुळें ग्रंथकार म्हणतात, कीं, कामादि दुष्ट विकारांची उत्पत्ति झाली असतां व शांतिसारख्या वृत्तींची प्राप्ति झाली नसतां सूक्ष्म शरीरास असह्य पीडा होते. अर्थात् त्या दोन्ही प्रकारच्या वृत्ति सूक्ष्म शरीरास पीडा देणाऱ्या आहेत. ॥२२५॥

-कारण शरीरांतील ज्वर छान्दोग्य श्रुतींत सांगितला आहे, असें सांगतात.

स्वं परं च न वेत्त्यात्मा विनष्ट इव कारणे ।
आगामिदु:खबीजं चेत्येतदिंद्रेण दर्शितम् ॥२६

अन्वयार्थ - **[कारणे विनष्ट: इव आत्मा स्वं परं च न वेत्ति-] कारणदेहांत जणूं काय नाहींसा झालेला आत्मा स्वत:ला व दुसऱ्याला जाणत नाहीं [च एतत् आगामिदु:खबीजं इति इंद्रेण दर्शितम्-] व हें दुसऱ्या दिवशीं भोगावयास लागणाऱ्या दु:खाचें बीज आहे, असें इंद्रानें गुरूंस दाखविलें.**

प्रकाश:- "न हिखल्वयमेव संप्रत्यात्मानं जानात्यय महमस्मीति" (छा. ८-११-१) या मंत्राचा वरील श्लोकांत निर्देश आहे. इंद्र आत्मज्ञानार्थ प्रजापतीकडे गेला. व प्रजापतींनीं सांगितल्याप्रमाणें विचार करीत असतां त्याला प्रस्तुत प्रकार आढळला. गाढ निद्रावस्थेंत जो अनिर्वचनीय अनुभव येतो, तोच आत्मा होय, असें त्यास प्रथम वाटलें होतें. पण विचारानंतर "सुषुप्तींत तर आपलें व दुसऱ्याहि कशाचे भान होत नाहीं उलट स्वप्न व जाग्रत् या दोन अवस्थेंत भासणाऱ्या चैतन्याचा नाश (कारणामध्यें लय) झाल्यासारखें वाटतें. पण हीच अवस्था पुनरपि जाग्रतींत आणून प्राण्यास दु:ख देणारी आहे. यास्तव या अवस्थेंमध्यें मला कांहीं एक फल दिसत नाहीं." अशी त्याची खात्री झाली. व त्यानें तो सर्व प्रकार आपल्या गुरूस निवेदन केला. तात्पर्य, कारण - अवस्थेंतील ज्वराची जरी सर्वांस प्रतीति नसली, तरी विवेक्यास त्याची प्रतीति येते. अर्थात् तो आहे, यांत शंका नाहीं. ॥२२६॥

-याप्रमाणें तिन्ही शरीरांतील ज्वर सांगून त्यांचें

अपरिहार्यत्व सांगतात-

एते ज्वरा: शरीरेषु त्रिषु स्वाभाविका मता:
वियोगे तु ज्वरैस्तानि शरीराण्येव नासते ॥२७

अन्वयार्थ - [त्रिषु शरीरेषु एते ज्वरा: स्वाभाविका: मता:-] तिन्ही शरीरांत हे ज्वर स्वाभाविक मानिलेले आहेत. [अत: ज्वरै: वियोगे तु तानि शरीराणि एव न आसते-] यास्तव ज्वरांशीं यांचा जर वियोग झाला तर तीं शरीरेंच नाहींशीं होतात.

प्रकाश:- स्वभावभूत जे धर्म असतात त्यांचा व धर्मीचा कधींच वियोग होत नाहीं:- ज्याप्रमाणें अग्नि या धर्माचा दाहशक्ति हा धर्म स्वभावभूत आहे. यास्तव अग्नीतून दाहशक्ति निघून गेल्यास त्याचें अग्नित्वहि नाहींसें होतें. या न्यायानें त्रिविध ज्वर शरीराचे स्वभाविक धर्म आहेत. त्यामुळें ते नाहींसे झाल्यास शरीराचाहि नाश होईल हें उघड आहे. तस्मात् शरीराचें रक्षण करून ज्वरांचा प्रतीकार करितां येणें शक्य नाहीं. ॥२२७॥

-याविषयीं दृष्टान्त -

तंतोर्वियुज्येन्न पटो बालेभ्य: कम्बलो यथा ।
मृतो घटस्तथा देहो ज्वरेभ्योऽपीति दृश्यताम् ॥२८

अन्वयार्थ - [यथा तंतो: पट: वा बालेभ्य: कम्बल: अथ वा मृद: घट: न वियुज्येत्-] ज्याप्रमाणें तंतूपासून पट, किंवा केंसापासून धाबळी, अथवा मृत्तिकेपासून घट वियुक्त होत नाहीं [तथा ज्वरेभ्य: अपि देह: न वियुज्येत् इति दृश्यताम्--] त्याप्रमाणें ज्वरांपासून देह वियुक्त होत नाहीं, असें समजावें.

प्रकाश:- सुताचे धागे हें वस्त्राचें उपादान कारण आहे, लोंकरीचे केंस धाबळीचें उपादान कारण आहे व माती मातीच्या भांड्याचें उपादान कारण आहे. यास्तव त्यांचा वियोग होणें शक्य नाहीं. कारण उपादनाचा नाश झाल्यावर कार्य एक क्षणभरहि राहूं शकत नाहीं. व हाच न्याय ज्वर व देह यांच्या ठायीं लागू पडतो. देहाचें उपादानकारण ज्वरच आहे, हें कशावरून अशी एक शंका येथें येते. पण त्याचें थोडक्यांत समाधान असें आहे कीं, धर्माधर्मजन्य फल भोगण्याकरितांच देह निर्माण झालेला असल्यामुळें व प्राण्याची प्रवृत्ति प्राय: पापकर्माकिडेच असल्यामुळें त्याचें फलभूत दु:खच देहाचें कारण आहे. अर्थात् कारणभूत ज्वर व शरीर यांचा वियोग होणें शक्य नाहीं. अच्युतरायांच्या पाठाप्रमाणें मी येथें अन्वयादि लिहिला आहे, बहुतेक छापील पुस्तकांत 'वियुज्येत' असा पाठ आढळतो, पण तो अपपाठ आहे, असें प्रस्तुत पंडितांनीं स्पष्ट म्हटलें आहे. शिवाय वियुज्येन्न असा पाठ घेतल्यानें अर्थहि चांगला लागतो. ॥२२८॥

-आतां कूटस्थाच्या ठिकाणीं ज्वराचा अभाव दाखविण्याची इच्छा करणारे ग्रंथकार प्रथम चिदाभासाचे ठिकाणीं ज्वराभाव दाखवितात-

चिदाभासे स्वत: कोऽपि ज्वरो नास्ति यतश्चित:
प्रकाशैकस्वभावत्वमेव दृष्टं न चेतरत् ॥२९

अन्वयार्थ - [चिदाभासे स्वत: क: अपि ज्वर: न अस्ति-] चिदाभासाच्या ठिकाणीं स्वत: कोणत्याहि प्रकारचा ज्वर नाहीं. [यत: चित: प्रकाशैकस्वभावत्वं एव दृष्टं-] कारण चैतन्याचें केवल प्रकाशरूपत्वच अनुभवास येतें, [च इतरत् न दृष्टम्-] दुसरें कांहीं अनुभवास येत नाहीं.

प्रकाश:- चिदाभासरूप जीव पीडा भोगीत असल्यासारखा दिसतो हें खरें, पण तो त्याचा स्वभाव नव्हे. तर केवल पूर्वोक्त त्रिविध देहांशीं संबंध झाल्यामुळें त्यांच्या ठिकाणच्या ज्वरांचा यास संसर्ग होतो, खरोखर जर पाहिलें तर चैतन्याचा मुख्य स्वभाव प्रकाश हाच आहे. त्याहून अन्य एकादा स्वभाव असेल असें जर म्हणावें, तर तसा अनुभव येत नाहीं. चैतन्य व त्याचा आभास यांच्या अवस्थेंत जरी भिन्नता असली, तरी त्यांच्या धर्मांत अंतर पडत नाहीं. याला सूर्य व त्याचें प्रतिबिंब, मुख व त्याचें प्रतिबिंब इत्यादि लोक दृष्टांत आहेत. सारांश, प्रकाश हाच चैतन्याचा

एक स्वभाव असल्यामुळें त्याच्या अभासाचा ज्वराशीं नित्यसंबंध आहे, असें म्हणणें अयुक्त होय. ॥२२९॥

-आणि ज्वराचा चिदाभासाशींहि जर संबंध नाहीं तर कूटस्थाशीं कसा असेल, असें आतां म्हणतात-

चिदाभासेऽप्यसंभाव्या ज्वराः साक्षिणि का कथा ।
एवमप्येकतां मेने चिदाभासो ह्यविद्यया ॥३०

अन्वयार्थ - [यदा चिदाभासे अपि ज्वराः असंभाव्याः तदा साक्षिणि का कथा-] जेव्हां चिदाभासाचे ठिकाणींहि ज्वर संभवत नाहींत, तेव्हां साक्षीची काय कथा ? [एवं अपि चिदाभासः अविद्यया एकतां मेने हि-] पण असें जरी आहे, तरी **चिदाभास अनादि व भावरूप अविद्येच्या योगानें एकता मानूं लागतोच.**

प्रकाशः- पूर्व श्लोकांत ज्वराचा व चिदाभासाचा संबंध नाहीं, हें स्पष्टपणें दाखविलें आहे. व चिदाभासाशींहि जर त्यांचा संबंध होत नाहीं, तर कूटस्थ जो साक्षी त्याच्याशीं त्याचा संबंध होईल हें नांव कशास पाहिजे ? मग असें जर आहे, तर मी अति दुःखी आहें, इत्यादि प्रकारें प्राण्यास अनुभव कसा येतो ? असें कोणी विचारील म्हणून श्रीभारतीतीर्थ त्याचें उत्तर देऊन ठेवितात- वस्तुस्थिति जरी अशी आहे तरी चिदाभास अनादि अविद्येच्या योगानें जड चैतन्य यांचें ऐक्य मानितो, व त्यामुळें 'मी दुःखी आहें' इत्यादि प्रकारें अनुभव येतो; पण तो भ्रम होय. कारण विचारानंतर त्याचा बाध होत असल्याचें ब्रह्मनिष्ठ पुरुष सांगत आहेत. ॥२३०॥

-'एकत्व मानतो' या संक्षेपतः सांगितलेल्या अर्थाचाच विस्तार -

साक्षिसत्यत्वमध्यस्य स्वेनोपेते वपुस्त्रये ।
तत्सर्वं वास्तवं स्वस्य स्वरूपमिति मन्यते ॥३१

अन्वयार्थ- [चिदाभासः स्वेन उपेते वपुस्त्रये **साक्षिसत्यत्वं अध्यस्य-] चिदाभास आपल्यासह तीन शरीरांचे ठिकाणीं साक्षीच्या सत्यत्वाचा अध्यास करून [तत् सर्व स्वस्य वास्तवं स्वरूपं इति मन्यते-] तें सर्व आपलें वास्तविक रूपच आहे, असें** मानतो.

प्रकाशः- चिदाभास हा अध्यासाचा कर्ता होय. कारण त्याच्या मिथ्या आग्रहामुळें किंवा खोट्या समजुतीमुळेंच जड व चैतन्य यांचें आरोपित ऐक्य होऊन त्यास अनर्थांत पडावे लागतें. तो स्वतः आभास असल्यामुळें जरी कांहीं काल प्रतीत होणारा असतो, तरी स्वतःचें खरें स्वरूप विसरून गेल्यामुळें तो कूटस्थाचें सत्यत्व आपल्या व स्वसंबद्ध शरीरांच्या ठायीं आरोपित करितो. खोटी भावना करणें म्हणजेच आरोप करणें होय. यासच 'अध्यास' म्हणतात. याच्या योगानें चिदाभास, तीन शरीरें, ज्वर, संसार इत्यादि माझें वास्तविक स्वरूप आहे, असें मानितो. ॥२३१॥

-असें भ्रांतिज्ञान झालें असतां काय होतें, तें सांगतात-

एतस्मिन् भ्रांतिकालेऽयं शरीरेषु ज्वरत्स्वथ ।
स्वयमेव ज्वरामीति मन्यते हि कुटुंबिवत् ॥३२

अन्वयार्थ - [अयं एतस्मिन् भ्रांतिकाले शरीरेषु ज्वरत्सु-] हा चिदाभास ह्या भ्रांतिसमयीं शरीरें पीडायुक्त झालीं असतां [अथ स्वयं एव ज्वरामि-] मीच पीडित झालों आहें, [इति हि कुटुंबिवत् मन्यते-] असें एखाद्या प्रसिद्ध कुटुंबी गृहस्थाप्रमाणें मानितो.

प्रकाशः- पूर्वोक्त प्रकारें एकदा दृढ अध्यास झाला कीं चिदाभास आपली योग्यता व आपणास केवढ्या श्रेष्ठत्वाचा आश्रय आहे हें विसरून जाऊन शरीरें प्रारब्धकर्माप्रमाणें दुःखी झालीं कीं मीच दुःखी आहें, व तीं कांहीं निमित्तानें सुखी झालीं कीं मीच सुखी आहे, असें मानूं लागतो. आपल्याहून अगदीं भिन्न अशा वस्तूंचे धर्म त्याला आपल्या ठायीं कसें मानितां

येतील? असा कोणी प्रश्न करील ह्मणून ग्रंथकार ह्मणतात कीं एकाद्या कुटुंब्याप्रमाणें तो दुसऱ्याचें धर्म आपल्या ठायीं मानितो. जसा प्राकृत व्यवहारपटु आपल्याहून अगदीं निराळ्या अशा स्त्री, पुत्रादि वस्तूंच्या दुःखानें दुःखी व त्यांच्या सुखानें सुखी होतो, तसाच हाहि शरीरादि अगदीं भिन्न पदार्थांच्या पीडेनें पीडित होतो. श्रीमच्छंकराचार्यांनीं शारीरकाच्या आरंभीं अध्यास- भाष्यांत हाच दृष्टान्त दिला आहे. ॥२३२॥

-पूर्वोक्त दृष्टान्तच विशद करितात-

पुत्रदारेषु तप्यत्सु तपामीति वृथा यथा ।
मन्यते पुरुषस्तद्वदाभासोऽप्यभिमन्यते ॥३३

अन्वयार्थ - [यथा पुरुषः पुत्रदारेषु तप्यत्सु अहं तपामि इति वृथा एव मन्यते-] ज्याप्रमाणें एखादा पुरुष पुत्र, स्त्री इत्यादि दुःखी झालीं असतां 'मी दुःखी आहें' असें उगीचच मानतो; [तद्वत् आभासः अपि अभिमन्यते-] त्याप्रमाणें आभासहि 'मी दुःखी' इत्यादि अभिमान धरितो.

प्रकाशः- वस्तुतः पुत्रादिकांच्या दुःखाचा याला यत्किंचित्‌हि प्रत्यय येणें शक्य नसतें. पण हीं माझीं आहेत, असें खोटेंच समजल्यामुळें त्याला त्यांच्या दुःखांचें नुस्तें अनुमान करूनच दुःखी व्हावें लागतें. पण जीं माझीं नव्हेत असें तो मानितो, त्यांना तशाच किंवा त्याहून हजारोपट अधिक जरी वेदना होत असल्या तरी त्याला त्याचें थोडेहि वाईट वाटत नाहीं, असें आपण नित्य पाहतों. व त्यावरून ममत्वरूप अध्यासच या सर्व दुःखाचें कारण आहे असें ठरतें. ॥२३३॥

-याप्रमाणें अविवेकदशेंत चिदाभासाचा भ्रांतीनें संताप प्रदर्शित करून विवेकदशेंत त्याचा अभाव दाखवितात-

विविच्य भ्रांतिमुज्झित्वा स्वमप्यगणयन्सदा ।
चिंतयन्साक्षिणं कस्माच्छरीरमनुसंज्वरेत् ॥३४

अन्वयार्थ - [विविच्य, भ्रांतिं उज्झित्वा, सदा स्वं अपि अगणयन् च साक्षिणं चिंतयन्-] विवेक करून, भ्रांति सोडून व सर्वदा आपलीहि गणना न करणारा आणि साक्षीचें चिंतन करणारा साधक [शरीरं अनु कस्मात् संज्वरेत्-] शरीराच्या मागोमाग कशाकरितां दुःखी होईल ?

प्रकाशः- विविच्य - कूटस्थ चिदाभास व शरीरें हीं भिन्न आहेत असें जाणून, भ्रांति- शरिरादि सर्व माझेंच रूप आहे ह्या २३१ व्या श्लोकांत दाखविलेल्या भ्रांतीस. स्वं०-- अगणयन् - कूटस्थाहून भिन्न असा मी कोणी पदार्थ आहें असें कधींहि न समजणारा. कस्मात्- शरीराच्या पीडेमुळें पीडित होण्याचें कारणच न राहिल्यामुळें. साक्षीचें अहोरात्र चिंतन करणारा पुरुष अनात्म्याच्या दुःखामुळें दुःखी होणार नाहीं. ॥२३४॥

-भ्रांतिज्ञान हें संतापाचें कारण आहे व तत्त्वज्ञान संतापाभावाचें कारण आहे, हें दृष्टान्तानें स्पष्ट करितात -

अयथावस्तुसर्पादिज्ञानं हेतुः पलायने ।
रज्जुज्ञानेऽहिधीध्वस्तौ कृतमप्यनुशोचति ॥३५

अन्वयार्थ - [अयथावस्तुसर्पादिज्ञानं पलायने हेतुः-] मिथ्याभूत सर्पादिकांचें ज्ञान पळण्यास कारण होतें. [रज्जुज्ञाने च अहिधीध्वस्तौ सत्यां कृतं अपि अनुशोचति-] पण रज्जुज्ञान होऊन सर्पभ्रांति नष्ट झाली असतां पळाल्याबद्दलहि तो कष्टी होतो.

प्रकाशः- मंद अंधकारामध्यें रज्जू पडलेली असावी व त्याच रस्त्यानें कोणी जात असावा. आणि इतक्यांत रज्जूकडे त्याची दृष्टि जाऊन तिचें ययार्थज्ञान न व्हावें व तो मोठा भुजंग आहे, असें त्यास वाटावें. मग काय विचारतां ! तो बिचारा प्राणाच्या आशेनें पळत सुटेल ! त्याचें हृदय धडधड उडू लागेल. व त्याचें क्षणभर भानहि उडेल. पण इतक्यांत जर कोणी ती दोरी आहे असें जाणणाऱ्यानें त्याला तिच्या यथार्थरूपाचा प्रत्यय आणून

दिला तर भ्रमानें भासलेल्या सर्पाची तात्काळ निवृत्ति होईल व 'अरेरे ! मी व्यर्थ घाबरलों व जीव घेऊन पळालों' असें तो खिन्न होऊन म्हणेल, हें उघड आहे. तसाच प्रकार या चिदाभासाच्या भ्रमाचाहि होतो. म्हणजे विवेकानंतर 'अरेरे! मी उगीच या अनात्मभूत शरीराकरितां आजपर्यंत कष्ट भोगीत होतो.' असें त्यास वाटून फार दु:ख होतें. ॥२३५॥

-साक्षिणं सदा चिन्तयन्' असें जें वर - श्लो. २३४-म्हटलें होतें तेंच दृष्टान्तानें स्पष्ट करितात-

मिथ्याभियोगदोषस्य प्रायश्चित्तप्रसिद्धये ।
क्षमापयन्निवात्मानं साक्षिणं शरणं गत: ॥३६

अन्वयार्थ - [मिथ्याभियोगदोषस्य प्रायश्चित्त-प्रसिद्धये-] मिथ्या आरोपरूप जो हा दोष त्याचें प्रायश्चित्त करण्याकरितां [साक्षिणं आत्मानं क्षमापयन् इव-] साक्षी आत्म्याची जणूं काय क्षमा मागणारा असा होत्साता चिदाभास [शरणं गत: भवति-] त्याला शरण जातो.

प्रकाश:- अनादि अविद्येमुळें चिदाभासानें साक्षीच्या ठायीं जो कर्तृत्वादि रूप आरोप केला होता, त्याचे प्रायश्चित्त भोगण्याकरितां त्या आरोपास अयोग्य असलेल्या साक्षी आत्म्याची क्षमा मागून जणुं काय त्यास प्रसन्न करण्याकरितां तो त्यास शरण जातो, असा या सर्व श्लोकाचा भावार्थ आहे. एकाद्या भल्या मनुष्यावर आपण खोटाच कांहीं आरोप केल्यास व ती आपली मोठी चूक आहे असें समजल्यास पापाच्या भीतीनें जसें आपण त्याच्यापुढें नम्र होऊन त्याची क्षमा करण्याविषयीं प्रार्थना करितों, तसाच हा चिदाभास साक्षीपुढें लीन होऊन व त्याची सतत चिंतनरूप क्षमा मागून त्यास प्रसन्न करण्याची खटपट करितो. ॥२३६॥

त्याविषयींच आणखी एक दृष्टान्त -

आवृत्तपापनुत्यर्थं स्नानाद्यावर्त्यते यथा ।
आवर्तयन्निव ध्यानं सदा साक्षिपरायण: ॥३७

अन्वयार्थ - [यथा आवृत्तपापनुत्त्यर्थं स्नानादि आवर्त्यते-] ज्याप्रमाणें पुष्कळ वेळ घडलेल्या पापाच्या नाशार्थ स्नानादिकांची आवृत्ति केली जाते, [तथा अयं ध्यानं आवर्तयन् इव-] त्याप्रमाणें हा जणुंकाय ध्यानाची आवृत्तिच करणारा चिदाभास, [सदा साक्षिपरायण: भवति-] सर्वदा साक्षिपरायण होतो.

प्रकाश:- ज्याच्या हातून अनेक वेळ पाप घडलें असतें, त्याला त्याची निवृत्ति होण्यास्तव प्रायश्चित्तहि पुष्कळ करावे लागते. प्रायश्चित्ताचे प्राजापत्यादि अनेक प्रकार आहेत व त्यांचे प्रत्याम्नाथहि अनेक आहेत. त्यांत केंस वाळेपर्यंत उघड्या जागेंत उभें राहून तीर्थांत बारा वेळ स्नान करणें- हाहि एक आहे, व त्याला उद्देशून हा येथील निर्देश आहे. तात्पर्य; अपराधानुरूप प्रायश्चित सांगितलेलें असतें. व त्याप्रमाणेंच हा साधकहि साक्षीच्या ठायीं कर्तृत्वादि खोटाच आरोप केल्यामुळें जणूं काय प्रायश्चित्तार्थ त्याचें सतत चिंतन करीत असतो. व तो प्रसन्न व्हावा म्हणून त्याची अनन्यभावानें अनुसंधानरूप सेवा करितो. ॥२३७॥

-याप्रमाणें दृष्टान्तांनीं साक्षिपरत्वाचें वर्णन करून तो स्वगुणप्रख्यापन करण्यास कसा लाजतो तेंहि सदृष्टान्त सांगतात-

उपस्थकुष्ठिनी वेश्या विलासेषु विलज्जते ।
जानतोऽग्रे तथा भास: स्वप्रख्यातौ विलज्जते ॥३८

अन्वयार्थ - [उपस्थकुष्ठिनी वेश्या यथा जानत: अग्रे विलासेषु विलज्जते-] जिच्या गुह्यस्थानीं कोड आहे अशी वेश्या जशी जाणत्या पुरुषापुढें विलासप्रसंगीं लाजते, [तथा अयं आभास: स्वप्रख्यातौ विलज्जते-] त्याप्रमाणें हा चिदाभास आपल्या प्रख्यातीविषयीं लाजतो.

प्रकाश:- वेश्या स्त्रिया बहुतकरून निर्लज्ज असतात कारण अनेक पुरुषांशीं संबंध झाल्यामुळें त्यांची नैसर्गिक लज्जा नष्टच झालेली असते असें म्हटलें तरी चालेल. पण जिच्या गुह्यस्थानीं कोड असतें, ती आपलें वर्म ज्याला ठाऊक आहे अशा पुरुषापुढें नट्टेपट्टे, हावभाव, इत्यादि करून आपल्या स्वरूपाची प्रौढी मिरविण्यास (विलास करण्यास) लाजते, हा दृष्टांत होय. व त्याप्रमाणेंच आभासहि आपल्यामध्यें मोठा दोष आहे असें समजून आल्यावर मी कर्ता आहें, विद्वान आहें, सुंदर आहें, श्रीमंत, आहें, इत्यादि प्रकारें खोटीच प्रौढी मिरविण्यास लाजतो. कारण असें समजणें ही मोठीच चूक आहे, हें त्यास पूर्णपणें ठाऊक असतें. ॥२३८॥

-आतां 'तीन शरीरांहून मी अगदीं पृथक्विलक्षण आहें' असें ज्याला ज्ञान झालें त्या चिदाभासाला तीन शरीरांचें आपल्याशीं तादात्म्य आहे असा भ्रम होत नाहीं, याविषयीं दृष्टान्त -

गृहीतो ब्राह्मणो म्लेच्छै: प्रायश्चित्तं चरन्पुन: ।
म्लेच्छै: संकीर्यते नैव तथाभास: शरीरकै: ॥३९

अन्वयार्थ - [म्लेच्छै: गृहीत: ब्राह्मण:-] म्लेच्छांनीं ज्याला धरिलें आहे असा ब्राह्मण [प्रायश्चित्तं चरन् पुन: म्लेच्छै: न संकीर्यते एव-] प्रायश्चित्त करीत होत्साता जसा म्लेच्छांशीं संसर्ग करीत नाहीं, [तथा आभास: शरीरकै: न संकीर्यते-] त्याप्रमाणें चिदाभास क्षुद्र शरीरांशीं मिळून जात नाहीं.

प्रकाश:- बलात्कार करून म्लेच्छांनीं ज्यास भ्रष्ट केलें आहे असा एकादा ब्राह्मण त्यांच्या हातांतून सुटला असतां आपल्या शुद्ध्यर्थ प्रायश्चित करितो व त्यानंतर पुनरपि त्यांच्या तावडींत सापडूं नये म्हणून फार सावध होऊन राहतो, व त्यामुळें दुष्ट म्लेच्छ त्यास पुन: भ्रष्ट करूं शकत नाहीं, त्याचप्रमाणें ज्याला आत्मा व अनात्मा यांचें यथार्थ ज्ञान झालें आहे व आजपर्यंत कूटस्थावर मी भलताच आरोप करीत होतों असा ज्याला आपला अपराध समजला आहे व त्याच्या निरसनार्थ जो कूटस्थाची क्षमा मागूं लागलेला आहे, अशा चिदाभासास म्लेच्छस्थानीय शारीरक ज्वर दूषित करूं शकत नाहींत. ॥२३९॥

-चिदाभास आपल्या अपराधाच्या निवृत्ती करितांच कूटस्थाला शरण जातो असें नाहीं, तर त्यामुळें मोठें फल मिळणारें असल्यामुळेंहि त्याला कूटस्थाचा आश्रय करावा लागतो, असें सिंहावलोकन न्यायानें सदृष्टान्त सांगतात-

यौवराज्ये स्थितो राजपुत्र: साम्राज्यवाञ्छया ।
राजानुकारी भवति तथा साक्ष्यनुकार्ययम् ॥२४०

अन्वयार्थ - [यौवराज्ये स्थित:-] यौवराज्यावर स्थित झालेला राजपुत्र [साम्राज्यवाञ्छया यथा राजानुकारी भवति-] साम्राज्याच्या इच्छेनें जसा राजाचें अनुकरण करितो [तथा अयं साक्ष्यनुकारी भवति-] तसा हाहि साक्षीचा अनुकारी होतो.

प्रकाश:- राजपुत्रास राजाच्या तंत्रानें वागण्यास साम्राज्याचा लोभ कारण होतो, व या चिदाभासास अनर्थापासून सुटका व्हावी हा लोभ सुटल्यामुळे साक्षीच्या तंत्रानें वागावें लागतें. तात्पर्य, मोठ्याच्या तंत्रानें वागण्यांत सर्वदा लाभच होत असतो. ॥२४०॥

-'युवराजाला राजाचें अनुकरण केल्यानें साम्राज्यफल मिळतें पण साक्षीचें अनुकरण केल्यानें तसें कांहीं फल दिसत नाहीं, मग चिदाभास त्याला कां अनुसरतो ?' उत्तर-

यो ब्रह्म वेद ब्रह्मैव भवत्येव इति श्रुति: ।
श्रुत्वा तदेकचित्त: सन्ब्रह्म वेत्ति न चेतरत् ॥४१

अन्वयार्थ - [य: ब्रह्म वेद स: ब्रह्म एव भवति इति श्रुति: श्रुत्वा-] जो ब्रह्माला जाणतो तो ब्रह्मच होतो यांत कांहीं शंका नाहीं, ही श्रुति ऐकून [तदेकचित्त: सन् ब्रह्म वेत्ति च न इतरत्-] व तदेकचित्त होऊन-त्यामध्येंच चित्त लावून तो

ब्रह्मालाच जाणतो. दुसरें कांहीं जाणत नाहीं.

प्रकाश:- ब्रह्माचा साक्षात्कार झाला असतां स्वत: तो ज्ञानीच ब्रह्म होतो. असें श्रुतीचें प्रतिज्ञारूप वचन ऐकून साक्षात्काराकरितां प्रयत्न करणाऱ्या मुमुक्षूंस योग्य समयीं फल मिळतें. श्रुतीवर विश्वास ठेवून येणेंप्रमाणें प्रयत्न न करणारास आत्मसाक्षात्काररूप फल मिळत नाहीं, सारांश; अनुत्तम फलाकरितां राजपुत्रस्थानीय चिदाभास कूटस्थाच्या तंत्रानें वागतो. ॥२४१॥

-अहोपण, 'ब्रह्मज्ञानाच्या योगानें ब्रह्मप्राप्ति झाली असता चिदाभासाचाच नाश होत असल्यामुळें तो आपल्याच नाशाला प्रवृत्त कसा होईल ?' उत्तर -

देवत्वकामा ह्यग्न्यादौ प्रविशन्ति यथा तथा ।
साक्षित्वेनावशेषाय स्वविनाशं स वाञ्छति ॥४२

अन्वयार्थ - [देवत्वकामा: यथा अग्न्यादौ प्रविशन्ति हि-] देवत्वाची इच्छा करणारे पुरुष अग्न्यादिकांमध्यें प्रवेश करितात, हें प्रसिद्ध आहे [तथा स: साक्षित्वेन अवशेषाय स्वविनाशं वाञ्छति-] त्याप्रमाणें हा चिदाभास साक्षिरूपानें राहण्याकरितां आपल्या विनाशाची इच्छा करितो.

प्रकाश:- मोठ्या लाभाकरितां थोडीशी हानि सहन करण्यास प्राणिमात्र तयार होत असतो. पतीबरोबर सहगमन करणें, भागीरथींत देहाचें विसर्जन करणें, हिमालयादि पर्वतांच्या शिखरावर जाऊन तेथून भृगुपात म्ह. विधीनें कडेलोट करून घेणें, इत्यादि स्वविघातक कृत्येंहि मनुष्य स्वर्गलोकांकरिता जशीं करितो त्याचप्रमाणें हा चिदाभास कूटस्थरूप होऊन राहण्याकरितां आपला नाश करून घेत असतो. बौद्धांचा वादांत पराजय करणाऱ्या कुमारिलभट्टांनीं अग्नींत प्रवेश केला हें प्रसिद्ध आहेच. ॥२४२॥

- 'अहोपण तत्त्वज्ञानानें आभासत्व जर जात असेल तर तत्त्ववेत्त्यांना जीव कसें म्हणतां येईल ?' उत्तर -

यावत्स्वदेहदाहं स नरत्वं नैव मुञ्चति ।
यावदारब्धदेहं स्यान्नाभासत्वविमोचनम् ॥४३

अन्वयार्थ - [स: यावत्स्वदेहदाहं नरत्वं न मुञ्चति एव-] अग्नींत प्रविष्ट झालेला तो मनुष्य आपला देह जळून भस्म होईतों मनुष्यपणा सोडीत नाहींच [तता यावदारब्धदेहं आभासत्वविमोचनं न स्यात्-] त्याप्रमाणें प्रारब्ध देह असेपर्यंत चिदाभासत्वाचीहि निवृत्ति होत नाहीं.

प्रकाश:- जरी स्वर्गाच्या इच्छेनें एकाद्यानें अग्नींत प्रवेश केला व देह जळूं लागल्यामुळें त्यानें प्राण सोडिले, तरी देहाची आकृति असेपर्यंत त्याचें मनुष्यत्व नाहींसें होत नाहीं, तर त्याचा पूर्ण दाह होऊन भस्म होईतों "अग्नींत प्रवेश केलेल्या या मनुष्याचें हें मस्तक, हा उजवा हात, ही डावी मांडी" इत्यादि प्रकारें पाहणारास ज्ञान होतें. त्याचप्रमाणें चैतन्यरूप व संसारदु:खशून्य होण्याकरिता जरी चिदाभासानें कूटस्थामध्यें विचारद्वारा प्रवेश केला, तरी प्रारब्धकर्माचें फल भोगण्याकरितां निर्माण झालेल्या देहाचा पात होईतों त्याची आभासत्वापासून सुटका होत नाहीं. ॥२४३॥

-'अहोपण, भोक्तृत्वादि भ्रम उत्पन्न करणाऱ्या अज्ञानाची निवृत्ती झालेली असल्यामुळें पुन: भोगाची अनुवृत्ति कशी होते किंवा 'मी मनुष्य आहें' अशी विपरीत प्रतीति कशी येते ?' अशी आशंका घेऊन दृष्टान्तप्रदर्शनानें त्याची संभावना दाखवितात-

रज्जुज्ञानेऽपि कंपादि: शनैरेवोपशाम्यति ।
पुनर्मंदांधकारे सा रज्जु: क्षिप्तोरगीभवेत् ॥४४

अन्वयार्थ - [रज्जुज्ञाने अपि कंपादि: शनै: एव उपशाम्यति-] रज्जुज्ञान जरी झालें तरी कंपादि हळूहळूच नष्ट होतो [च मंदान्धकारे क्षिप्ता सा रज्जु: पुन: उरगीभवेत्-] व मंद अंधकारांत टाकलेली ती दोरी पुनरपि सर्परूप भासते.

प्रकाश:- प्रथम दोरीचें ज्ञान न झाल्यामुळें हा मोठा भुजंग आहे असें वाटावें व त्यामुळें हातपाय थरथर कापूं लागलेले असावेत पण इतक्यांत "अरे ती दोरी आहे. उगीच कां भितोस ?" असें म्हणून कोणीं तिला उचलून दाखवावें; तरी सुद्धां अंगाचा कंप दोरीला पाहतांच नाहींसा होत नाहीं, तर तो कांहीं वेळानें नाहींसा होतो, असा अनुभव आहे. **शंका:**- हें जरी खरें असलें तरी त्याला पुन: सर्पाची भ्रांति होणार नाहीं. कारण ती दोरी थोड्याशा अंधकारांत तशीच पडून राहिल्यास पुनरपि त्यास सर्पासारखी भासणें शक्य आहे. सारांश भ्रमाची निवृत्ति झाली तरी त्याचें अनर्थरुपी कार्य तत्काल नष्ट होत नाहीं. ॥२४४॥

-आतां हाच प्रकार दार्ष्टांतिकाचे ठिकाणीं योजून दाखवितात -

एवमारब्धभोगोऽपि शनै: शाम्यति नो हठात् ।
भोगकाले कदाचित्तु मर्त्योऽहमिति भासते ।।४५

अन्वयार्थ - [एवं आरब्धभोग: अपि शनै: शाम्यति नो हठात् -] त्याप्रमाणें आरब्धकर्मप्राप्त भोगहि हळूहळू शांत होतो, एकदम होत नाहीं. [तु कदाचित् भोगकाले अहं मर्त्य: इति भासते-] पण केव्हां केव्हां भोगसमयीं 'मी मर्त्य आहें' असा भास होतोच.

प्रकाश:- एवं-पूर्व श्लोकांत दिलेल्या दृष्टान्ता-प्रमाणें. सारांश; बाधित रज्जुसर्पाची जशी पुन: प्रतीति होते, त्याचप्रमाणें 'मी भोक्ता नाहीं. मी वस्तुत: कूटस्थरूप आहें व त्यामुळेंच असंग आहें.' असा जरी चिदाभासास प्रत्यय आला तरी व्यवहारदशेंत एकादे वेळीं 'मी भोक्ता आहें;' असा त्यास चुकून भ्रम होतो. एवढ्याकरितांच परमपूज्य वार्तिककारांनीं "जीवन्मुक्तिस्तावदस्ति प्रतीतेर्द्वैतच्छाया तत्र चास्ति-प्रतीते: । द्वैतच्छायारक्षणायास्ति लेशस्तस्मिन्नर्थे स्वात्मभूति: प्रमाणम् ।।" "ज्ञानानंतर जीवन्मुक्ति तर आहेच पण द्वैताचा प्रतिभासहि नाहींसा होत नाहीं याविषयीं अनुभव हेंच एक प्रबल प्रमाण आहे" असें म्हटलें आहे. ॥२४५॥

-'अहोपण, मी मनुष्य आहें, अशी भावना पुन: उदय पावल्यास तत्त्वज्ञानाचा बाध होईल !' उत्तर -

नैतावताऽपराधेन तत्त्वज्ञानं विनश्यति ।
जीवन्मुक्तिव्रतं नेदं किंतु वस्तुस्थिति: खलु ।।४६

अन्वयार्थ - [एतावता अपराधेन तत्त्वज्ञानं न विनश्यति -] एवढ्याशा अपराधामुळें तत्त्वज्ञान नष्ट होत नाहीं. [इदं जीवन्मुक्तिव्रतं न-] कारण हें जीवन्मुक्तिव्रत नव्हे, [किंतु वस्तुस्थिति: खलु अस्ति-] तर खरोखर वस्तुस्थिति आहे.

प्रकाश:- एकादे वेळीं 'मी मर्त्य आहे' असें वाटल्यामुळें तत्त्वज्ञान्याच्या तत्त्वज्ञानाचा बाध होईल असें म्हणणें युक्त नव्हे. कारण जीवन्मुक्ति हें कांहीं व्रत नव्हे कीं ज्याचें अग्निहोत्राप्रमाणें यावज्जीव अनुष्ठान घडल्यासच फल मिळतें. ॥२४६॥

-'रज्जुसर्पादि दृष्टान्तांत विपरीत ज्ञानाची निवृत्ति झाली असतांहि त्याच्या कंपादि कार्याची अनुवत्ति होते, हें खरें, पण 'तूं दहावा आहेस' या दृष्टान्तांत वाक्यविचारजन्य ज्ञानानें भ्रमनिवृत्ति झाल्यावर त्याच्या कार्याची अनुवृत्ति कोठें होते ?' उत्तर -

दशमोऽपि शिरस्ताडं रुदन्बुद्ध्वा न रोदिति ।
शिरोव्रणस्तु मासेन शनै: शाम्यति नो तदा ।।४७

अन्वयार्थ - [शिरस्ताडं रुदन् दशम: अपि बुद्ध्वा न रोदिति -] मस्तक बडवून रडणारा दहावाहि 'मी दहावा आहें' असें समजल्यावर रडत नाहीं. [तु शिरोव्रण: मासेन शनै: शाम्यति तदा नो-] पण मस्तकास पडलेली खोंक हळू हळू

महिन्यानें बरी होते. ती तत्काल बरी होत नाहीं.

प्रकाश:- भ्रमाची जरी निवृत्ति झाली तरी त्या भ्रमामुळें झालेली पीडा तत्काळ नाहींशी होत नाहीं. तर तिची निवृत्ति होण्यास योग्य कालाची अपेक्षा असते. लौकिक भ्रमाची काय गोष्ट सांगावी ! **शिरोव्रण:**- दहावा नदींत बुडून मृत झाला असें निश्चियानें वाटलें असतां तो त्याच्याकरितां जमिनीवर मस्तक हापटतो व त्यामुळें त्याच्या कपाळास खोंक पडते. पुढें पूर्वीं वर्णन केल्याप्रमाणें आप्तवचनावरून जरी त्याच्या 'दहावा मेला' या भ्रमाची निवृत्ति झाली, तरी त्याबरोबर त्याच्या मस्तकावरील खोंक बरी होत नाहीं, असा या अर्धांचा भावार्थ आहे. ॥२४७॥

-'अहोपण, ज्ञानानंतरहि संसाराची अनुवृत्ति झाल्यास जीवन्मुक्तीला पुरुषार्थत्व कोठचें ?' उत्तर -

दशमामृतिलाभेन जातो हर्षो व्रणव्यथाम् ।
तिरोघत्ते मुक्तिलाभस्तथा प्रारब्धदु:खिताम् ॥४८

अन्वयार्थ - [दशमामृतिलाभेन जात: हर्ष: व्रणव्यथां यथा तिरोधत्ते-] 'दहावा मेला नाहीं' असें समजल्यामुळे उत्पन्न झालेला हर्ष व्रणापासून होणाऱ्या पीडेला जसा झांकून टाकितो [तथा मुक्तिलाभ: प्रारब्धदु:खितां तिरोधत्ते-] त्याप्रमाणें मुक्तीचा लाभ प्रारब्धदु:खास आच्छादित करितो.

प्रकाश:- हर्ष दु:खास व दु:ख हर्षास हटवीत असतें. दहावा जीवंत आहे असें समजतांच त्याच्या विषयींचें दु:ख नष्ट होतें व मस्तकावरील व्रणाचें दु:खहि मागें पडतें. हा दृष्टांत होय व याप्रमाणेंच जीवन्मुक्तिचा लाभ झाला असतां त्या आनंदापुढें प्राय: प्रारब्धप्राप्त दु:खाचा भासहि होत नाहीं. ॥२४८॥

-जीवनमुक्ति हें कांहीं व्रत नव्हे, असें पूर्वी श्लो. ४६ - सांगितलें, त्याचा आशय सांगतात-

व्रताभावाद्यदाऽध्यासस्तदा भूयो विविच्यताम् ।
रससेवी दिने भुंक्ते भूयो भूयो यथा तथा ॥४९

अन्वयार्थ - [यथा रससेवी दिने भूय: भूय: भुंक्ते -] ज्याप्रमाणें रस सेवन करणारा मनुष्य एकाच दिवशीं वारंवार भोजन करितो, [तथा व्रताभावात् यदा अध्यास: तदा भूय: विविच्यताम्-] त्याप्रमाणें हें व्रत नसल्यामुळें जेव्हां अध्यास होतो, तेव्हां पुन: विवेक करावा.

प्रकाश:- भोजनापासून काय लाभ होतो हें ज्याला ठाऊक आहे, असा तृप्तीचा अनुभव घेणारा मनुष्य क्षुधा लागतांच भोजन करितो. अमुक वेळां खावयाचेंच मग भूक असो वा नसो, असें तो म्हणत नाहीं - हें जसें, त्याप्रमाणेंच जीवन्मुक्ति हें जरी व्रत नव्हे, म्हणजे अग्निहोत्राप्रमाणें किंवा एकादशीप्रमाणें त्या त्या कालीं झालेंच पाहिजे, न झाल्यास कर्ता प्रत्यवायी होतो - असें जरी नाहीं, तरी ज्या ज्या वेळीं अध्यास होतो, त्या त्या वेळी त्याच्या निवृत्त्यर्थ विवेक करावा. सारांश, जीवन्मुक्तीपासून होणाऱ्या आनंदाचा जेव्हां जेव्हां बाध होईल, तेव्हां तेव्हां चिदाभास, तीन शरीरें व कूटस्थ यांचा विवेक करावा. असें केल्यानें आनंदाचा भंग होईल ही भीति राहात नाहीं. ॥२४९॥

-'आत्मसाक्षात्कारानेंहि निवृत्त न होणाऱ्या प्रारब्धकर्मफलाची निवृत्ति कोणत्या उपायानें होईल !' या शंकेचें दृष्टान्तपूर्वक उत्तर -

शमयत्यौषधेनायं दशम: स्वं व्रणं यथा ।
भोगेन शमयित्वैतत्प्रारब्धं मुच्यते तथा ॥२५०

अन्वयार्थ - [यथा अयं दशम: स्वं व्रणं औषधेन शमयति-] ज्याप्रमाणें हा दहावा आपला व्रण औषधाच्या योगानें बरा करितो, [तथा भोगेन एतत् प्रारब्धं शमयित्वा मुच्यते-] त्याप्रमाणें भोगाच्या योगानें हें प्रारब्ध क्षीण करून त्यापासून साधक मुक्त होतो.

प्रकाश:- मस्तक बडवून घेतल्यामुळें पडलेली खोंक औषधोपचारानें जशी बरी होते, त्याप्रमाणें भोगाच्या योगानें प्रारब्धकर्माचा क्षय करून साधक जन्ममरणपरंपरेंतून मुक्त होतो. ॥२५०॥

- या प्रकरणाच्या ४८ व्या श्लोकांत 'आत्मानं चेत्' ही श्रुति अपरोक्षज्ञान व शोकनिवृत्ति या जीवाच्या दोन अवस्था सांगते, असें सांगितलें होतें. त्याचें व्याख्यान करून झाल्यावर आतां येथें त्याचा उपसंहार करितात व जीवाच्या सातव्या तृप्तिरूप अवस्थेच्या वर्णनास आरंभ करितात-

किमिच्छन्निति वाक्योक्त: शोकमोक्ष उदीरित: ।
आभासस्य ह्यवस्थैषा षष्ठी तृप्तिस्तु सप्तमी ।।५१

अन्वयार्थ - **[किमिच्छन् इति वाक्योक्त: शोकमोक्ष: उदीरित:-]** 'कशाची इच्छा करणार' या वाक्यामध्यें सांगितलेला शोकमोक्ष एवढा वेळ सांगितला. **[एषा हि आभासस्य षष्ठी अवस्था -]** ही आभासाची सहावी अवस्था आहे. **[तृप्ति: तु सप्तमी-]** व तृप्ति ही सातवी.

प्रकाश:- ह्या प्रकरणाच्या अठ्ठाविसाव्या श्लोकांत आत्म्याच्या ठिकाणीं कोणत्या अवस्था होतात तें दाखविलें आहे. त्यांतील शोकमोक्षनामक जी सहावी अवस्था तिचें प्रतिपादन ''किमिच्छन्'' इत्यादि श्रुतीच्या उत्तरार्धात केलें आहे. एकशें छत्तिसाव्या श्लोकापासून येथपर्यंत त्याच अवस्थेचें स्पष्टीकरण या ग्रंथांत केलें आहे. आणि आतां यापुढें चिदाभासाची सातवी अवस्था जी तृप्ति, तिचें व्याख्यान प्रस्तुत प्रकरणाच्या समाप्तीपर्यंत व्हावयाचें आहे. ।।२५१।।

-अपरोक्ष ज्ञानानें होणारी तृप्ति निरंकुश आहे अशी प्रतियोगिप्रदर्शन पुर:सर प्रतिज्ञा करितात-

सांकुशा विषयैस्तृप्तिरियं तृप्तिर्निरंकुशा ।
कृतं कृत्यं प्रापणीयं प्राप्तमित्येव तृप्यति ।।५२

अन्वयार्थ - [विषयै: तृप्ति: सांकुशा-] विषयांच्या योगानें होणारी तृप्ति प्रतिबंधयुक्त असते [च इयं तृप्ति: निरंकुशा अस्ति-] व ही तृप्ति निरंकुश आहे. [यत: कृत्यं कृतं, प्रापणीयं प्राप्तं इति एव तृप्यति-] कारण जें करावयाचें होतें, तें केलें व जें प्राप्त करून घेण्यासारखें होतें, तें प्राप्त करून घेतलें, असें म्हणूनच तो तृप्त होतो.

प्रकाश:- जोंपर्यंत प्राप्त करून घ्यावयाचें असतें किंवा कर्तव्य असतें तोंपर्यंत मनुष्याच्या चित्तास समाधान होणें शक्य नाहीं. पण विवेकजन्य साक्षात्कारानंतर जी तृप्ति होते ती कर्तव्यादिकांचा सर्वथैव अभाव झाल्यानंतर होत असल्यामुळें प्रतिबंधरहित असते. विषयांपासून जी क्षणिक तृप्ति होते, ती एका विषयाचा भोग संपतांच दुसऱ्याविषयीं उत्पन्न होणाऱ्या कामनेच्या योगानें कुंठित होत असल्यामुळे प्रतिबंधयुक्त किंवा सांकुश असते. ।।२५२।।

- कृत-कृत्यत्वाचेंच उपपादन -

ऐहिकामुष्मिकव्रातसिद्ध्यै मुक्तेश्च सिद्धये ।
बहु कृत्यं पुराऽस्याभूत्तत्सर्वमधुना कृतम् ।।५३

अन्वयार्थ - **[ऐहिकामुष्मिकव्रातसिद्ध्यै च मुक्ते: सिद्धये -]** ऐहिक व पारलौकिक सिद्धीकरितां आणि मुक्तीच्या सिद्ध्यर्थ **[असा पुरा बहु कृत्यं अभूत्-]** याला पूर्वीं पुष्कळ कर्तव्य होतें. **[तत् सर्वं अधुना कृतम् -]** पण आतां तें सर्व संपूर्ण झालें आहे.

प्रकाश:- तत्त्वज्ञानापूर्वी विद्वानास धनधान्यादि इष्ट वस्तूंच्या प्राप्त्यर्थ व रोगादि अनिष्ट वस्तूंच्या निवृत्त्यर्थ, शेतकी, व्यापार, सेवा इत्यादि कर्तव्य होतें; स्वर्गादि उत्तम लोकांची प्राप्ति व्हावी म्हणून यज्ञ, उपासना इत्यादि कर्तव्य होतें; व मोक्षसाधन जें ज्ञान त्याच्या सिद्धीकरितां श्रवणादि कर्तव्य होतें; पण ज्ञान झाल्यावर सांसारिक फलाची इच्छाच नष्ट झाल्यामुळें व ब्रह्मानंदाची प्राप्ति झाल्यामुळें तें सर्व कर्तव्य केल्याप्रमाणेंच झालें. सारांश, आत्मसाक्षात्कारानंतर ज्ञानी कृतकृत्य होत असतो. ।।२५३।।

-याप्रमाणें कृतकृत्यतेचें उपपादन करून तत्फलभूत तृप्ति दाखवितात -

तदेतत्कृतकृत्यत्वं प्रतियोगिपुर:सरम् ।
अनुसंदधदेवायमेवं तृप्यति नित्यश: ।।५४

अन्वयार्थ - [तत् एतत् कृतकृत्यत्वं प्रतियोगिपुर:सरं अनुसंदधत् एव अयं -] त्या ह्या कृतकृत्यतेचें, तिच्या विरोधी भावनेसह अनुसंधान करणारा असा हा, [एवं नित्यश: तृप्यति -] अशा प्रकारें नित्य तृप्त होतो.

प्रकाश:- ज्या कृतकृत्यतेचा गेल्या दोन श्लोकांत उल्लेख केला आहे, तिचें सतत अनुसंधान करणारा पुरुष सर्वदा तृप्त राहतो. पण केवळ कृतकृत्यतेचें अनुसंधान करण्यापेक्षां तिच्या विरोधी जें जें असेल, त्याचें त्याचें प्रथम चिंतन करून नंतर या कृतकृत्यतेचें अनुसंधान केल्यास निश्चल तृप्ति प्राप्त होते. अनुसंधान कसें करावें इत्यादि प्रकार मूळ ग्रंथांतच स्पष्ट होणारा असल्यामुळें त्याचा येथें विस्तार करण्याची गरज नाहीं. ॥२५४॥

-आतां त्या पूर्वोक्त अनुसंधानानेंच वर्णन -

दु:खिनोऽज्ञा: संसरन्तु कामं पुत्राद्यपेक्षया ।
परमानंदपूर्णोऽहं संसरामि किमिच्छया ॥५५

अन्वयार्थ - [अज्ञा: पुत्राद्यपेक्षया दु:खिन: कामं संसरन्तु-] अज्ञ पुरुष पुत्रादिकांच्या अपेक्षेनें दु:खी होत्साते खुशाल संसारांत पडोत. [परमानन्दपूर्ण: अहं किमिच्छया संसरामि-] परमानन्दानें परिपूर्ण असलेला मी कोणत्या इच्छेनें संसारांत पडूं ?

प्रकाश - जे विवेकहीन असतात त्यांस विषयांची प्राप्ति न झाल्यास फार दु:ख होतें. विवाह करूनहि पुत्र न झाल्यास सामान्य मनुष्य मनांत किती झुरत असतो, हें अशा एकाद्या अभाग्याकडे पाहूनच समजण्यासारखें आहे. दशरथ पुत्राकरितां किती कष्टी होत असे हें रामायण ज्यांनीं वाचलें असेल त्यांस ठाऊकच असेल. प्रसिद्ध बाणभट्टांच्या कादंबरींतहि चंद्रापीडाच्या पित्याची व मातेची पुत्राकरितां काय अवस्था झाली होती हें चांगलें दाखविलें आहे. तात्पर्य पुत्र नसणें हें एक मोठें अभाग्याचें लक्षण आहे - असें व्यावहारिक मानीत असतात. व तें एका दृष्टीनें खरेंहि आहे. त्यामुळें त्यांना पुत्रकामेष्टीसारखीं कर्में व नवस करावीं लागतात आणि या जन्मीं तीं सफल न झाल्यास उत्तरजन्म घ्यावा लागतो. त्यांतहि त्यांच्या पोषणादिकांकरितां अनेक बरी वाईट कर्मे करावी लागतात. पुढें त्यांचीं फळें भोगण्याकरितां पुन: जन्म मिळतो. व अशी अव्याहत परंपरा चालते. पण ज्याला स्वरूपाची प्राप्ति झालेली असते, तो कशाचीहि अपेक्षा करीत नाहीं. तर उलट 'मी परमानंदरूप व परिपूर्ण असल्यामुळें मला कशाची इच्छा असणार ? व इच्छाच नसल्यामुळें मी जन्ममरणपरंपरेंत तरी कशासाठीं पडूं ?' असा तो विचार करितो !

- स्वर्गादिकांसाठीं कर्मानुष्ठान करणाऱ्या लोकांहून आपलें वैलक्षण्य-

अनुतिष्ठन्तु कर्माणि परलोकयियासव: ।
सर्वलोकात्मक: कस्मादनुतिष्ठामि किं कथम् ॥५६

अन्वयार्थ - [परलोकयियासव: कर्माणि अनुतिष्ठन्तु-] ज्यांना परलोकीं जाण्याची इच्छा असेल त्यांनीं कर्माचें खुशाल अनुष्ठान करावें. [सर्वलोकात्मक: अहं किं कथं कस्मात् अनुतिष्ठामि-] पण सर्व लोकरूपच असा मी कशाचें, कसें व कशाकरितां अनुष्ठान करूं ?

प्रकाश:- ज्यांना स्वर्गादि उत्तम लोक हवे असतील त्यांनीं अग्निहोत्र, दर्शपूर्णमास, चातुर्मास्य, ज्योतिष्टोम, इत्यादि यज्ञ, जप, तप इत्यादि खुशाल करावें. मला त्यांची मुळींच गरज नाहीं, कारण मी स्वत: सर्वलोकमय आहें व त्यामुळें मला कर्म करून लोकप्राप्ति करून घ्यावयाची इच्छा नाहीं. ज्याला जी वस्तु प्राप्त झालेली नसते, तिच्या प्राप्तीचीच तो इच्छा करीत असतो. ॥२५६॥

-'अहोपण, स्वार्थासाठीं जरी प्रवृत्ति नको असली तरी ती परार्थ कां होऊं नये ?''

उत्तर -

व्याचक्षतां ते शास्त्राणि वेदानध्यापयन्तु वा ।
येऽत्राधिकारिणो मे तु नाधिकारोऽक्रियत्वत: ।।५७

अन्वयार्थ - [ये अत्र अधिकारिण: सन्ति ते शस्त्राणि व्याचक्षतां-] जे त्यांत अधिकारी असतील त्यांनीं शास्त्रांचें व्याख्यान करावें, [वा वेदान् अध्यापयन्तु-] किंवा वेदांचें अध्यापन करावें. [मे तु अक्रियत्वत: अधिकार: न अस्ति-] मी अक्रिय असल्यामुळें मला त्यांचा अधिकार नाहीं.

प्रकाश:- ज्ञानी विधिनिषेधातीत असल्यामुळें त्याचा व्याख्यान, अध्यापन इत्यादि कर्मांमध्येंहि अधिकार नंसतो. यास्तव ज्याचा त्याविषयीं अधिकार असेल त्यांनीं ते खुशाल करावें. मी मात्र त्या भानगडींत पडणार नाहीं. ।।२५७।।

-'अहोपण, स्वदेहभरणासाठीं भिक्षा मागून आणणें, परलोकासाठीं स्नानादिक करणें, या क्रिया आपण करीत आहां असें दिसतें !' उत्तर -

निद्राभिक्षे स्नानशौचे नेच्छामि न करोमि च ।
द्रष्टारश्चेत्कल्पयन्ति किं मे स्यादन्यकल्पनात् ।।५८

अन्वयार्थ - [निद्राभिक्षे स्नानशौचे अहं न इच्छामि च न करोमि-] निद्रा, भिक्षा, स्नान, शौच इत्यादिकांची मी इच्छा करीत नाहीं व वस्तुत: करीतहि नाहीं. [द्रष्टार: कल्पयन्ति चेत् अन्यकल्पनात् मे किं स्यात्-] आतां मजकडे पाहणारे जर मजवर त्यांचा आरोप करीत असले, तर ते करीनात. दुसऱ्यांच्या आरोपानें मला काय होणार ?

प्रकाश:- आपल्याविषयीं कोणी वाईट बोलत असल्यास किंवा शंका घेत असल्यास त्यांस उत्तर देत बसूं नये. मात्र आपल्या मनाशीं आपल्या निर्दोषीपणाविषयीं निर्णय करून ठेवावा. सत्याचें मोठें पाठबळ असतें. कोणी एकाद्यावर भलताच आरोप करीत असला व तो खरोखर दोषी नसला, तर तो मोठ्या धैर्यानें- माझ्या हातून हा अपराध झालेला नाहीं. तुला मजवर आरोप करावयाचाच असला तर तर तो खुशाल कर - असें म्हणेल. हें जसें, त्याचप्रमाणें - केवळ भिक्षाटणच काय पण निद्रा, स्नान, मूत्रपुरीषोत्सर्गसमयीं करावें लागणारें शौच, इत्यादि देह असेपर्यंत अवश्य घडणारीं कर्मेंहि करण्याची मी इच्छा करीत नाहीं व असंग असल्यामुळें तीं मी करीत नाहीं. आतां माझ्या देहाकडे पाहून ज्यांना मजवर त्यांचा आरोपच करावयाचा असेल, त्यांनीं तो खुशाल करावा. असें म्हणून विवेक्यानें शांत होऊन बसावें. ज्याला खरोखरीच आत्मानात्मविवेक झाला असेल त्याचाच असा दृढ निश्चय होणार, हें उघड आहे. नाहींपेक्षां चोरी केलेली असूनहि मी 'चोरी केली नाहीं' असें म्हणणाऱ्या ठगाच्या हृदयाप्रमाणें, विवेकहीन असूनहि पूर्वोक्त शब्द उच्चारणाऱ्याचें हृदय आंतल्या आंत थरथर कांपत राहणार हें ठरलेंच आहे. कलियुगांत असल्या वेदान्त्यांस ऊत येईल असें आमच्या सर्वज्ञ मुनींनीं पूर्वींच भविष्य करून ठेविलें आहे. ।।२५८।।

- दुसऱ्यांच्या कल्पनेनें कांहीं बाध होत नाहीं, याविषयीं दृष्टान्त -

गुंजापुंजादि दह्येत नान्यारोपितवह्निना ।
नान्यारोपितसंसारधर्मानेवमहं भजे ।।५९

अन्वयार्थ - [यथा अन्यारोपितवह्निना गुंजापुंजादि न दह्येत-] ज्याप्रमाणे दुसऱ्यांनी आरोपित केलेल्या अग्नीच्या योगाने गुंजांचा ढीग कोणास जाळीत नाहीं, [एवं अन्यारोपितसंसारधर्मान् अहं न भजे-] त्याप्रमाणें दुसऱ्यांनीं आरोपित केलेल्या संसारधर्मांचें मी सेवन करीत नाहीं.

प्रकाश:- एकाद्या घरावर दुरून गुंजांचा ढीग पाहून हा अग्नि आहे असें जरी कोणी म्हटलें, तरी तो जसा त्या घरास जाळीत नाहीं, त्याप्रमाणें दुसऱ्यांनीं 'मी कर्मी आहे' असें जरी म्हटलें तरी माझ्या दृष्टीनें स्नान, भिक्षा, निद्रा इत्यादि कर्मेंच नसल्यामुळें तीं मला बद्ध करूं शकत नाहीं. ।।२५९।।

- पण दुसऱ्या फलाची इच्छा नसल्यामुळें कर्मानुष्ठान जरी न केलें तरी तत्त्वसाक्षात्कारासाठीं श्रवणादिक अवश्य करावयास पाहिजे' अशी आशंका घेऊन म्हणतात -

शृण्वंत्वज्ञाततत्त्वास्ते जानन्कस्माच्छृणोम्यहम् ।
मन्यंतां संशयापन्ना न मन्येऽहमसंशयः ॥२६०

अन्वयार्थ - [ये अज्ञाततत्त्वाः ते शृण्वन्तु-] ज्यांना तत्त्व समजेलेलें नाहीं ते श्रवण करोत. [अहं तु जानन् सन् कस्मात् शृणोमि-] मी तर तत्त्वाला जाणतों, तेव्हां आतां कशाकरितां श्रवण करूं ? [संशयापन्नाः मन्यतां-] ज्यांना संशय असेल ते खुशाल मनन करोत. [अहं असंशयः न मन्ये-] मी संशयरहित असल्यामुळें मनन करीत नाहीं.

प्रकाश - गुरु व शास्त्र यांच्या वचनावर ज्यांची श्रद्धा नसते व त्यामुळें ज्यांना अनेक संशय असतात, त्यांच्याकरितां मननानें विधान केलेलें असतें. पण मला मुळीं संशयच नसल्यामुळें त्याचा कांहीं उपयोग नाहीं व म्हणून मी एकांतांत बसून यथाविधि मनन करीत नाहीं. त्याचप्रमाणें आत्मतत्त्वाचा साक्षात्कार झाल्यामुळें मला श्रवणाचाहि कांहीं उपयोग नाहीं. श्रवण हें मननापूर्वीं करावयाचें असतें व अज्ञांकरितां त्याचें विधान केलेलें आहे. ॥२६०॥

-'श्रवण-मनन जरी नको असलें तरी विपरीत भावनेची निवृत्ति होण्यासाठीं निदिध्यासन करावें' म्हणून म्हणाल तर सांगतों -

विपर्यस्तो निदिध्यासेत्किं ध्यानमविपर्ययात् ।
देहात्मत्वविपर्यासं न कदाचिद्भजाम्यहम् ॥६१

अन्वयार्थ - [विपर्यस्तः निदिध्यासेत् -] ज्याची विपरीत भावना झाली असेल, त्यानें निदिध्यासन करावें. [अविपर्ययात् ध्यानं किम्-] पण विपरीत भावनाच जर झालेली नाहीं तर ध्यानाचा काय उपयोग ? [अहं देहात्मत्वविपर्यासं स कदाचित् भजामि-] मी 'देह हाच आत्मा आहें' अशी विपरीत भावना कधींच होऊं देत नाहीं.

प्रकाशः- ज्याची विपरीत भावना झालेली असते त्यालाच निदिध्यासनाचा उपयोग होतो. 'देह आत्माच आहे' हीच मुख्य विपरीत भावना असून तिच्यामुळें प्राण्यास संसारांत पडावें लागतें, हें शास्त्राशीं ज्यांचा परिचय असतो, त्यांस ठाऊक असतेंच. पण माझ्या मनांत अशी विपरीत भावना नसल्यामुळें मला त्याचा कांहीं एक उपयोग नाहीं. निदिध्यासन म्हणजे तत्त्वाचें सतत चिंतन होय. ॥२६१॥

-'अहो पण, विपरीत भावनेवांचून 'मी मनुष्य आहें' हा व्यवहार कसा होतो ?' उत्तर -

अहं मनुष्य इत्यादिव्यवहारो विनाऽप्यमुम् ।
विपर्यासं चिराभ्यस्तवासनातोऽवकल्पते ॥६२

अन्वयार्थ - [अहं मनुष्यः इत्यादिव्यवहारः-] 'मी मनुष्य आहें' इत्यादि प्रकारचा व्यवहार [अमुं विपर्यासं विना अपि चिराभ्यस्तवासनातः अवकल्पते-] या विपर्यासावांचूनहि दीर्घकाल जिचा अभ्यास झाला आहे, अशा वासनेच्या योगानें होऊं शकतो. (दृढ वासनेमुळें तसा व्यवहार संभवतो.)

प्रकाशः- मी मनुष्य आहें इत्यादि व्यवहारास विपरीत भावनाच पाहिजे असें नाहीं. कारण मागचे अनेक जन्म व प्रस्तुत जन्मभर ही संवय झालेली असल्यामुळें बाधितानुवृत्तीनें 'मी मनुष्य आहें' इत्यादि प्रकारें सामान्य व्यवहार होऊं शकतो. ॥२६२॥

-'तर मग या व्यवहाराची निवृत्ति होण्यासाठीं ध्यान करावें,' म्हणून म्हणाल तर सांगतों -

प्रारब्धकर्मणि क्षीणे व्यवहारो निवर्तते ।
कर्माक्षये त्वसौ नैव शाम्येद्ध्यानसहस्रतः ॥६३

अन्वयार्थ - [प्रारब्धकर्माणि क्षीणे सति

व्यवहार: निवर्तते-] प्रारब्धकर्म क्षीण झालें असतां व्यवहार आपोआप निवृत्त हातो. [कर्माक्षये तु असौ ध्यानसहस्रत: न शाम्येत् एव-] पण कर्मक्षय होईतों हा हजारों वेळां ध्यान केल्यानेंहि नाहींसा होत नाहीं.

प्रकाश:- भोग भोगिल्यामुळें प्रारब्धकर्म नि:शेष नष्ट झालें असतां सर्व प्रकारचा व्यवहार सहजच निवृत्त होत असतो असें पूर्वींहि सांगितलेंच आहे. भोगावांचून प्रारब्धकर्माचा क्षय होत नाहीं, असा मीमांसेचाहि सिद्धांत आहे. कर्माचा क्षय झाल्यावांचून कितीहि जरी ध्यान केलें, तरी तें निरुपयोगी ठरतें. ॥२६३॥

-आतां 'प्रारब्धामुळें प्राप्त झालेला व्यवहार विरल होण्याकरितां ध्यान केलें पाहिजे' म्हणून म्हणशील तर सांगतों -

विरलत्वं व्यवहृतेरिष्टं चेद्ध्यानमस्तु ते ।
अबाधिकां व्यवहृतिं पश्यन् ध्यायाम्यहं कुत: ॥६४

अन्वयार्थ - [व्यवहृते: विरलत्वं इष्टं चेत् ते ध्यानं अस्तु -] व्यवहार थोडा तरी कमी व्हावा हें इष्ट आहे, असें जर म्हणशील तर तूं त्याकरितां ध्यान कर. [अबाधिकां व्यवहृतिं पश्यन् अहं कुत: ध्यायामि-] पण व्यवहार बाधरहित आहे असें पहाणारा मी कशाकरितां ध्यान करूं ?

प्रकाश: - व्यवहाराचा वेग कमी भासावा म्हणूनच जर ध्यान करावयाचें असलें तर खुशाल करावें, पण प्रारब्धकर्म अनुल्लंघनीय आहे असा माझा दृढ निश्चय असल्यामुळें मला व्यवहाराचा वेग कमी होईल ही आशाच नाहीं. या व याच्या पूर्वींच्याहि कांहीं कांहीं श्लोकांत केवळ द्वैतवादाचा भास होण्यासारखा आहे. यास्तव हा वाद सामान्य लोकांकरितां नसून तितक्या योग्यतेच्या व दृढनिश्चयी साधकांकरिता आहे, एवढें येथें सांगून ठेवणें अवश्य दिसतें. ॥२६४॥

-'ध्यानाची जरी आवश्यकता नसली, तरी विक्षेपाचा परिहार व्हावा म्हणून समाधि तरी करावी लागेल !' असें कोणी म्हणेल म्हणून सांगतात -

विक्षेपो नास्ति यस्मान्मे न समाधिस्ततो मम ।
विक्षेपो वा समाधिर्वा मनस: स्याद्विकारिण: ॥६५

अन्वयार्थ - [यस्मात् मे विक्षेप: नास्ति तत: मे समाधि: न -] ज्याअर्थीं मला विक्षेप नाहीं, त्या अर्थीं मला समाधीचीहि आवश्यकता नाहीं. [विक्षेप: वा समाधि: वा विकारिण: मनस: स्यात्-] विक्षेप किंवा समाधि हा विकारी मनाचा धर्म आहे.

प्रकाश - विक्षेपाच्या नाशाकरितांच समाधि हवी असते हें उघड आहे, पण मला विक्षेपच नसल्यामुळें तिची जरूर नाहीं. विक्षेप व समाधि या तरी अवस्थाच असल्यामुळें त्या विकारी मनाला होणेंच युक्त आहे. मज निर्विकाऱ्याशीं त्यांचा संबंध होणें त्रिकालींहि शक्य नाहीं. ॥२६५॥

-'अहो पण समाधीचें फल जो अनुभव तो तुम्हांला संपादन केलाच पाहिजे,' म्हणून म्हणाल तर -

नित्यानुभवरूपस्य को मे वाऽनुभव: पृथक् ।
कृतं कृत्यं प्रापणीयं प्राप्तमित्येव निश्चय: ॥६६

अन्वयार्थ - [नित्यानुभवरूपस्य मे क: वा पृथक् अनुभव: -] नित्य अनुभवरूप अशा माझ्याहून दुसरा पृथक् अनुभव कोणता आहे ? [कृत्यं कृतं प्रापणीयं प्राप्तं इति एव निश्चय: अस्ति-] मला करण्यास जें योग्य होतें तें सर्व मी केलें व प्राप्त करून घेण्यासारखें जेवढें होतें तेवढें प्राप्तहि करून घेतलें, असाच माझा निश्चय आहे.

प्रकाश:- कूटस्थ स्वत: अनुभवरूप आहे इत्यादि प्रकार प्रथम भागांतील तिसऱ्या प्रकरणाच्या तेराव्या श्लोकांतहि स्पष्ट होऊन गेला आहे. सूर्यादि प्रकाशरूप पदार्थास जशी अन्य पदार्थाची गरज नसते, त्याप्रमाणें अनुभवरूप आत्म्यास अन्य अनुभवाची गरज नसते. ज्ञानाचा निश्चय कसा असतो, हें येथल्याप्रमाणें पूर्वीं दोनशें बावन्नाव्या श्लोकांतहि सांगितलें आहे. ॥२६६॥

-'अहोपण, कशाचेंच कर्तृत्व न मानल्यास अनियत प्रवृत्ति होण्याचा प्रसंग येईल !' उत्तर -

व्यवहारो लौकिको वा शास्त्रीयो वाऽन्यथाऽपिवा
ममाकर्तुरलेपस्य यथाऽऽरब्धं प्रवर्तताम् ॥६७

अन्वयार्थ - [मम अकर्तु: अलेपस्य-] अकर्ता व निर्लेप असा जो मी त्या माझा [लौकिक: वा शास्त्रीय: वा-] लौकिक किंवा शास्त्रीय [अन्यथा अपि वा व्यवहार:-] किंवा प्रतिषिद्ध व्यवहारहि [यथा आरब्धं प्रवर्तताम्-] प्रारब्धानुरूप खुशाल होऊं दे.

प्रकाश - मी परमार्थत: असंग असल्यामुळें अकर्ता आहें, व आकाशाप्रमाणें निरवयव असल्यामुळें मला कोणत्याहि प्रकारचा लेप लागत नाहीं. खरा प्रकार हा असा असल्यामुळें प्रारब्धकर्मानुरूप निद्रा, भिक्षा इत्यादि लौकिक व ध्यान, जप इत्यादि शास्त्रीय आणि हिंसादि प्रतिषिद्ध व्यवहार जरी माझ्या देहाकडून होत आहे असें वाटलें, तरी त्यापासून माझी कांहीं हानि नाहीं. ॥२६७॥

ह्याप्रमाणें वस्तुतत्व सांगून पुन: प्रौढवादानें म्हणतात -

अथ वा कृतकृत्योऽपि लोकानुग्रहकाम्यया ।
शास्त्रीयेणैव मार्गेण वर्तेऽहं का मम क्षति: ॥६८

अन्वयार्थ - [अथ वा अहं कृतकृत्य: अपि-] **किंवा मी जरी कृतकृत्य आहें, तरी [लोकानुग्रहकाम्यया शास्त्रीयेण एव मार्गेण वर्ते-] लोकांवर अनुग्रह करण्याच्या इच्छेनें शास्त्रीय मार्गानेंच जातों. [तथा च मम का क्षति:-] तेव्हा त्यानें माझी काय हानि होणार आहे ?**

प्रकाश:- भगवद्गीतेच्या तिसऱ्या अध्यायाच्या पंचविसाव्या श्लोकांत ''हे अर्जुना, ज्याप्रमाणें अविद्वान (कर्मांमध्यें) आसक्त होऊन कर्में करितात, त्याचप्रमाणें लोकसंग्रह करण्याची इच्छा करणाऱ्या विद्वानानें आसक्त न होतां कर्में करावी.'' असें श्रीकृष्णांनीं सांगितलें आहे. लोकसंग्रह म्हणजे शास्त्रीय मार्गास सोडून आचरण करणाऱ्या लोकांचें निवारण. असो; स्वत: भगवानांचें असें वचन असल्यामुळें जरी मी कृतकृत्य आहें, तरी लोकोपकारार्थ केवळ शास्त्रीय मार्गाचेंच अवलंबन करीत असतों व त्यामुळें मला कशाचीहि भीति नाहीं ॥२६८॥

-'मी शास्त्रीय मार्गानेंच वर्तन करणारा' असें एकदा म्हटलें कीं मग त्या अभिमानामुळें मनाला विकारहि होईल.'

उत्तर -

देवार्चनस्नानशौचभिक्षादौ वर्ततां वपु: ।
तारं जपतु वाक् तद्वत्पठत्वाम्नायमस्तकम् ॥६९
विष्णुं ध्यायतु धीर्यद्वा ब्रह्मानंदे विलीयताम् ।
साक्ष्यहं किंचितप्यत्र न कुर्वे नापि कारये ॥२७०

अन्वयार्थ - [वपु: देवार्चन-स्नान-शौच-भिक्षादौ वर्ततां-] शरीर देवपूजा, स्नान, शौच, **भिक्षा इत्यादि कर्मामध्यें प्रवृत्त होवो, [तद्वत् वाक् तारं जपतु-] तशीच वाणी प्रणवाचा जप करो [वा आम्नायमस्तकं पठतु-] किंवा वेदान्ताचें पठन करो, [यत् वा धी: विष्णुं ध्यायतु-] अथवा बुद्धि विष्णूचें ध्यान करो [वा ब्रह्मानन्दे विलीयताम्-] कीं ब्रह्मानन्दांत निमग्न होवो. [अहं साक्षी अत्र किंचित् अपि न कुर्वे न अपि कारये-] मी साक्षी यांपैकीं कांहीं करीत नाहीं व करवीत नाहीं.**

प्रकाश:- देवतार्चनादि शारीरिक कर्में शरीराकडून **खुशाल घडोत; उपांशु जप व पठण वाणी बेलाशक करो; व बुद्धि ध्यान करो कीं समाधींत लीन होवो, त्यांच्या कर्मांशीं व स्थितीशीं माझा कांहीं एक संबंध नाहीं. मी कूटस्थ, केवल, साक्षी आहें. या दोन्ही श्लोकांत-कायिक, वाचिक व मानसिक कर्में शरीर, वाणी व मन यांच्या द्वारा होत असल्यामुळें ती जरी** शास्त्रीय असलीं तरी त्यांच्या ठायीं कर्तृभाव ठेवणें मला योग्य नाहीं-असें मनांत बाळगून विद्वान् पुरुष लोकसंग्रहार्थ व्यवहार करितो- असें स्पष्टपणें सांगितलें

आहे. ॥२६९,२७०॥

-तात्पर्य-

एवं च कलह: कुत्र संभवेत्कर्मिणो मम ।
विभिन्नविषयत्वेन पूर्वापरसमुद्रवत् ॥७१

अन्वयार्थ - [एवं च पूर्वापरसमुद्रवत् विभिन्नविषयत्वेन-] आणि असा पूर्व व पश्चिम समुद्राप्रमाणें प्रत्येकाचा विषय अति भिन्न असल्यामुळें [कर्मिण: मम च कलह: कुत्र संभवेत्-] कर्मी पुरुषाचा व माझा कलह कोठून संभवणार ?

प्रकाश:- पूर्वोक्त रीतीनें विचार केला असतां कर्मठ पुरुष व ज्ञानी यांचा कलह होणें अशक्यच होतें. कारण त्यांतील प्रत्येकाचा विषय अति भिन्न असल्यामुळें गंगा व कृष्णा यांचा जसा समागम होणें शक्य नाहीं, त्याप्रमाणें त्या उभयतांचा कलह होणेंहि शक्य नाहीं. ॥२७१॥

'ज्ञानी व कर्मी यांचा पूर्व व पश्चिम समुद्राप्रमाणें भिन्न विषय कसा ?' उत्तर -

वपुर्वाग्धीषु निर्बंध: कर्मिणो न तु साक्षिणि ।
ज्ञानिन: साक्ष्यलेपत्वे निर्बंधो नेतरत्र हि ॥७२

अन्वयार्थ - [कर्मिण: वपुर्वाग्धीषु निर्बंध: साक्षिणि तु न-] कर्मी पुरुषाचा शरीर, वाणी व बुद्धि यांच्याविषयीं आग्रह असतो, पण साक्षीविषयीं नसतो [ज्ञानिन: साक्ष्यलेपत्वे निर्बंध: इतरत्र न हि-] आणि ज्ञानाचा साक्षी लेपरहित आहे ह्याविषयीं आग्रह असतो, दुसऱ्यां कशाविषयींहि नसतो.

- पण असें असूनहि जे ज्ञानी व कर्मी परस्पर कलह करतात ते दोघेहि खऱ्या विद्वानाच्या उपाहासास पात्र होतात, असें सांगतात -

एवं चान्योन्यवृत्तान्तानभिज्ञौ बधिराविव ।
विवदेतां बुद्धिमन्तो हसन्त्येव विलोक्य तौ ॥७३

अन्वयार्थ - [एवं च बधिरौ इव अन्योन्यवृत्तान्तानभिज्ञौ विवदेताम्-] असें असतांना दोन बहिऱ्यांप्रमाणें एकमेकांचा अभिप्राय न जाणणारें दोघे पूर्वोत्तर मीमांसक कडाक्याचा वाद करितात. [बुद्धिमन्त: तौ विलोक्य हसन्ति एव-] पण बुद्धिमान त्यांस पाहून हंसतात मात्र.

प्रकाश:- शास्त्राचें रहस्य ज्यांना समजत नाहीं व त्यामुळें तात्पर्याकडे ज्यांची दृष्टि जात नाहीं ते उगीच अभिमानानें भांडूं लागतात. या त्यांच्या भांडणास बहिऱ्यांच्या भांडणाचा दृष्टांत दिला आहे. म्हणजे जसें दोन बहिरे एके ठिकाणीं जमले असतां एकमेकांचें बोलणें एकमेकास न समजल्यामुळें प्रत्येकाची कांहींतरी विपरीत भावना होऊन हातघाईवर काम येतें, त्याप्रमाणें शास्त्राचें तात्पर्य न समजल्यामुळें हे पूर्वोक्त मीमांसकहि मीमांसेचा चूर करून सोडितात. या दुष्ट संवयींमुळेच आपल्या देशाची आज अपरिहार्य हानि झाली आहे. अनेक मतें, अनेक शास्त्रें, अनेक पंथ व अनेक व्यवहार होण्याचेंहि कारण ही गैरसमजूतच होय. खरोखर असला हा अज्ञानमूलक संवाद ऐकून ज्ञानी पुरुषास तर हंसू येतें. ॥२७३॥

तें कां ? उत्तर -

यं कर्मी न विजानाति साक्षिणं तस्य तत्त्ववित् ।
ब्रह्मत्वं बुध्यतां तत्र कर्मिण: किं विहीयते ॥७४

अन्वयार्थ - [यं साक्षिणं कर्मी न विजानाति तस्य ब्रह्मत्वं तत्त्ववित् बुध्यतां-] ज्या साक्षीला कर्मठ जाणत नाहीं, तोच ब्रह्म आहे असें तत्त्वज्ञ समजेना; [तत्र कर्मिण: किं विहीयते-] त्यांत कर्म्याची काय हानि आहे ?

प्रकाश:- जो आपला विषयच नव्हे त्याविषयीं दुसरा कांहीं कां समजेना त्यांत आपलें काय नुकसान आहे ? असा पोक्त विचार कर्मठास करितां येत नाहीं. व एकदा अभिमानयुक्त झाल्यावर कोणालाहि झाला तरी असा विचार सुचणें कठिणच होय. ॥२७४॥

- तसेंच -

देहवाग्बुद्धयस्त्यक्ता ज्ञानिनाऽनृतबुद्धितः ।
कर्मी प्रवर्तयत्वाभिर्ज्ञानिनो हीयतेऽत्र किम् ॥७५

अन्वयार्थ - [ज्ञानिना देहवाग्बुद्धयः अनृतबुद्धितः त्यक्ताः-] ज्ञान्यानें देह, वाणी व बुद्धि हीं सर्व मिथ्या आहेत अशा बुद्धीनें टाकिलीं, [आभिः कर्मी प्रवर्तयतु] मग त्यांच्यायोगानें कर्मी प्रवृत्ति करीना [अत्र ज्ञानिनः किं हीयते-] त्यांत ज्ञान्याचें काय नुकसान आहे ?

प्रकाशः- या श्लोकांत ज्ञान्यानेंहि शांति कशी करावी तें सांगितलें आहे; कर्माची सामग्री निराळी व ज्ञानाची निराळी. तेव्हां कर्मठाशीं ज्ञान्यालाहि भांडण्याचें कांहीं कारण नाहीं. पण अभिमानाचा सर्वथैव नाश न झाल्यामुळें कर्मठाप्रमाणेंच यालाहि प्रस्तुत विचार सुचत नाहीं ॥२७५॥

-पण कर्मानुष्ठान व्यर्थ असल्यामुळें ज्ञानी त्याचा स्वीकार करीत नाहीं, अशी शंका घेऊन सांगतात -

प्रवृत्तिर्नोपयुक्ता चेन्निवृत्तिः क्वोपयुज्यते ।
बोधहेतुर्निवृत्तिश्चेद्बुभुत्सायां तथेतरा ॥७६

अन्वयार्थ - [प्रवृत्तिः न उपयुक्ता इति चेत्-] प्रवृत्ति निरुपयोगी आहे असें जर म्हणशील तर [निवृत्तिः क्व उपयुज्यते-] निवृत्ति कोठें उपयोगी पडणारी आहे ? [निवृत्तिः बोधहेतुः इति चेत्-] निवृत्ति बोधाचें साधन आहे, असें जर म्हणशील तर [इतरा बुभुत्सायां तथा अस्ति-] प्रवृत्ति जिज्ञासेचें साधन आहे.

प्रकाशः- कर्मप्रवृत्ति निरुपयोगी आहे असें ज्ञान्याला म्हणतांच येत नाहीं व कर्मापासून निवृत्त होणें अयोग्य आहे असें कर्मठांस म्हणतां येणार नाहीं. कारण कर्मप्रवृत्ति चित्तशुद्धिद्वारा जिज्ञासेच्या जशी उपयोगी आहे, तशी कर्मनिवृत्तिहि साक्षात् ज्ञानाच्या उपयोगी आहे. यास्तव एकमेकांवर आक्षेप घेऊन उगीच भांडत बसणें व्यर्थ आहे. ॥२७६॥

'पण जो एकदा ज्ञानी झाला त्याला फिरून जिज्ञासा होणें शक्य नसल्यामुळें त्याला प्रवृत्तीचा कांहींएक उपयोग होत नाहीं' अशी शंका घेऊन समाधान करितात-

बुद्धश्चेन्न बुभुत्सेत नाप्यसौ बुध्यते पुनः ।
अबाधादनुवर्तेत बोधो न त्वन्यसाधनात् ॥७७

अन्वयार्थ - [बुद्धः न बुभुत्सेत चेत् असौ न अपि पुनः बुध्यते-] ज्ञानी जाणण्याची इच्छा करीत नाहीं म्हणून जर म्हणशील तर तो पुनरपि जाणतहि नाहीं. [बोधः अबाधात् अनुवर्तेत न तु अन्यसाधनात्-] कारण प्रबल प्रमाणानें बाधित न झाल्यास बोधाची आपोआप अनुवृत्ति होईल. ती दुसऱ्या साधनाच्या योगानें होणार नाहीं.

प्रकाशः- ज्याला एकदा ज्ञान होतें त्याला पुनः जिज्ञासा होणें शक्य नाहीं व त्यामुळें जिज्ञासेच्या उपयोगी जी प्रवृत्ति, तिचा त्याला कांहीं उपयोग नाहीं असें जर तूं म्हणशील तर त्यावर आम्ही तुला असें सांगतों कीं ज्याला एकदा ज्ञान झालें आहे, त्याला तें पुनः होणेंहि असंभवनीय आहे. व त्यामुळें ज्ञानाच्या उपयोगी पडणारी जी निवृत्ति तिचाहि त्याला कांहीं उपयोग नाहीं. आतां एकदा झालेलें ज्ञान दृढ होण्याकरितां तिचा उपयोग आहे म्हणून म्हणशील तर तें अयुक्त आहे. कारण ज्ञान दृढ होणें म्हणजे काय ? तें सतत राहणें असेंच कीं नाहीं ? झालें तर. एकदा झालेलें ज्ञान, त्याचा दुसऱ्या एकाद्या प्रबल प्रमाणानें बाध न झाल्यास आपणच स्थिर राहील ! त्याला पुनः निवृत्तिरूप अन्य साधनाची कांहीं जरूर नाहीं. वेदान्ताहून प्रबल असें दुसरें प्रमाणच नसल्यामुळें वेदान्तजन्य आत्मज्ञानाचा बाध होणें शक्य नाहीं, असें पूर्वी महाभूतविवेकाच्या एकशें आठव्या श्लोकांत सांगितलें आहे. ॥२७७॥

-'दुसरें प्रबल प्रमाण नसल्यामुळें जरी ज्ञानाचा बाध न झाला, तरी अविद्या किंवा तिचें शंका, कर्तृत्वादि कार्य, यांच्या योगानें त्याचा बाध होईल !'

अशी शंका घेऊन म्हणतात -

नाविद्या नापि तत्कार्यं बोधं बाधितुमर्हति ।
पुरैव तत्त्वबोधेन बाधिते ते उभे यत: ॥७८

अन्वयार्थ - **[यत: तत्त्वबोधेन ते उभे पुरा एव बाधिते-] ज्या अर्थी तत्त्वबोधानें त्या दोहोंचा पूर्वींच बाध झालेला असतो [तत: न अविद्या न अपि तत्कार्यं बोधं बाधितुं अर्हति-] त्या अर्थी अविद्या व तिचें कार्य या दोहोंतून एकहि बोधास बाधित करूं शकत नाहीं.**

प्रकाश:- अविद्यादि प्रतिबंधांची निवृत्ति झाल्यावांचून तत्त्वसाक्षात्कार होणेंच असंभवनीय असल्यामुळें ते बोधास बाधित करतील ही कल्पनाहि करणें व्यर्थ होय. स्वप्नाचा बाध केल्यावांचून जागृति होऊंच शकत नाहीं. व एकदा जागृतींत आल्यावर पुन: तेंच स्वप्न जागृतीस बाधित करील हें म्हणणें व्यर्थ आहे. ॥२७८॥

-'अहोपण, अविद्येचा बाध जरी झाला असला तरी तिचें कार्य प्रतीतीला येतें, तेव्हां त्याचा बाध झाला, असें म्हणतां येत नाहीं, अर्थात् त्यामुळें बोधाचा बाध होईल !'

बाधितं दृश्यतामक्षैस्तेन बाधो न शक्यते ।
जीवन्नाखुर्न मार्जारं हन्ति हन्यात्कथं मृत: ॥७९

अन्वयार्थ - [बाधितं अक्षै: दृश्यताम्-] बाधित झालेलें जगत् इंद्रियांच्या योगानें दिसो, [तेन बाध: न शक्यते-] त्याच्या योगानें तत्त्वज्ञानाचा बाध होणें शक्य नाहीं. [जीवन् आखु: मार्जारं न हन्ति-] जीवंत उंदीर जर मांजराला मारूं शकत नाहीं, तर [मृत: कथं हन्यात्-] मेलेला कसा मारील !

प्रकाश:- अविद्येचा जरी बाध झाला, तरी त्याच्या कार्याची (जगाची) प्रतीति येत असल्यामुळें तिच्या योगानें तत्त्वसाक्षात्काराचा बाध होईल असें म्हणणें योग्यहि नव्हे. कारण अविद्या हें जगाचें उपादान कारण आहे; तेव्हां त्याचाच नाश झाल्यावर जगद्रूप कार्याचें वस्तुत: अस्तित्व कसें होणार ? आतां इंद्रियांच्या योगानें त्याचा केवळ भास होईल हे खरें, पण त्यामुळें तत्त्वज्ञानाचा बाध होणार नाहीं, असें यांचें तात्पर्य समजावें. ॥२७९॥

-द्वैतदर्शनानें तत्त्वबोधाचा बाध होत नाहीं, ही गोष्ट दृढ करण्यासाठीं तदनुकूल दृष्टान्त देतात --

अपि पाशुपतास्त्रेण विद्धश्चेन्न ममार य: ।
निष्फलेषुविनुन्नांगो नंक्ष्यतीत्यत्र का प्रमा ॥२८०॥

अन्वयार्थ - **[य: पाशुपतास्त्रेण अपि विद्ध: चेत् न ममार-] जो पाशुपत अस्त्रानेंहि विद्ध होऊन मृत झाला नाहीं, [निष्फलेषुविनुन्नांग: नक्ष्यति इति अत्र का प्रमा-] तो निष्फल बाणानें व्याकुल होऊन मरेल, याविषयीं प्रमाण काय ?**

प्रकाश:- पाशुपतासारख्या अमोघ शस्त्राचाहि ज्याच्यावर परिणाम झाला नाहीं, तो सामान्य बाणाच्या योगानें मरेल, अशी आशा करणें म्हणजे खुळेपणाच होय. ॥२८०॥

-दृष्टान्तांनीं सिद्ध झालेल्या अर्थाचीच दार्ष्टान्तिकाचें ठिकाणीं योजना ---

आदावविद्यया चित्रै: स्कार्यैर्जृंभमाणया ।
युद्ध्वा बोधोऽजयत्सोऽद्य सुदृढो बाध्यतां कथम् ॥२१८॥

अन्वयार्थ - [य: आदौ चित्रै: स्वकार्यै: जृंभमाणया अविद्यया सह युद्ध्वा तां अजयत्-]- जो प्रथमत: विचित्र कार्यांच्या योगानें विकास पावणाऱ्या अविद्येशीं युद्ध करून तिला जिंकता झाला [स: अद्य सुदृढ: बोध: कथं बाध्यताम्-] तो आतां अतिदृढ झालेला बोध कसा बाधित होईल ?

प्रकाश:- आदौ-विद्याभ्यासकालीं. **कार्यै:-** प्रमातृत्व, कर्तृत्व, भोक्तृत्व, इत्यादिरूप अनेक

प्रकारच्या कार्यांनीं (वृद्धिंगत होणाऱ्या अविद्येशीं) साधनकालींहि एकसारखा प्रयत्न करून ज्या बोधानें कार्यासह अविद्येस जिंकलें त्या बोधास सिद्धकालीं माया किंवा तिचें कार्य जिंकूं शकेल हें नांव कशास पाहिजे ? ॥२८१॥

पुनरपि रूप करून प्रपंचाची प्रतीति इष्टच आहे, असें सांगतात-

तिष्ठंत्वज्ञानतत्कार्यशवा बोधेन मारिता: ।
न भीतिर्बोधसम्राज: कीर्ति: प्रत्युत तस्य तै: ॥८२

अन्वयार्थ - [बोधेन मारिता: अज्ञानतत्कार्यशवा: तिष्ठन्तु-] **बोधानं मारून टाकिलेलीं-अज्ञान व त्याचीं कार्ये, यांचीं प्रेतें खुशाल पडून राहोत. [बोधसम्राज: न भीति:-] बोधसंज्ञक चक्रवर्ती राजाला त्यांची भीति नाहीं. [प्रत्युत तस्य तै: कीर्ति: भविष्यति-] उलट त्यांच्या योगानें त्याची कीर्तिच होईल.**

प्रकाश:- ज्याप्रमाणें एकाद्या धनुर्धाऱ्यानें असंख्य सैन्यास मारून टाकून त्याचें वैभव घेतलें असतां त्यास त्या प्रेतांची मुळींच भीति वाटत नाहीं. व तीं उलट त्या वीराच्या कीर्तीलाच कारण होतात, त्याप्रमाणें बोधानें ज्यांना नि:सत्त्व करून सोडिलें आहे अशा अज्ञानादिकांची बोधरूपी सार्वभौम राजास मुळींच भीति नसते. व उलट, वाहवा ! केवढा या बोधाचा प्रभाव आहे ? ज्यांनीं या सर्व सृष्टीला त्राहि करून सोडिलें होतें, त्या ह्या अज्ञानादिकांस यानें आज नि:शेष करून टाकिलें आहे-असा त्याचा गौरव करितात. ॥२८२॥

सारांश-

य एवमतिशूरेण बोधेन न वियुज्यते ।
प्रवृत्त्या वा निवृत्त्या वा देहादिगतयाऽस्य
किम् ॥८३

अन्वयार्थ - [य: एवं अतिशूरेण बोधेन न वियुज्यते-] **जो ह्याप्रमाणें अतिशूर बोधाशीं वियुक्त होत नाहीं, [अस्य देहादिगतया प्रवृत्त्या वा निवृत्त्या वा किम्-] त्याचें देहादिगत प्रवृत्ति व निवृत्ति यांच्या योगानें काय होणार आहे ?**

प्रकाश:-बोधाच्या म्हणजे आत्मसाक्षात्काराच्या शौर्याचें यथार्थ वर्णन नुक्तेंच केलें आहे. तेव्हां अशा शौर्यशाली बोधाशीं ज्याचा कधींच वियोग होत नाहीं, म्हणजे तो सतत आत्मानुभव घेत असतो, त्याचें देह, इंद्रियें व मन यांच्या योगानें होणाऱ्या प्रवृत्तीमुळें किंवा निवृत्तीमुळें काय इष्ट किंवा अनिष्ट होणार आहे ? हा आक्षेप असल्यामुळें त्याचें-कांहीं एक इष्टानिष्ट होणें शक्य नाहीं-असें तात्पर्य समजावें. ॥२८३॥

-'तर मग ज्ञानी पुरुषाप्रमाणें अज्ञानी पुरुषाचाहि प्रवृत्तीविषयीं आग्रह असणें अयुक्त आहे,' असें म्हणाल तर सांगतों-

प्रवृत्तावाग्रहो न्याय्यो बोधहीनस्य सर्वथा ।
स्वर्गाय वाऽपवर्गाय यतितव्यं यतो नृभि: ॥८४

अन्वयार्थ - [बोधहीनस्य प्रवृत्तौ आग्रह: सर्वथा न्याय्य:-] **बोधहीन पुरुषाचा प्रवृत्तीविषयीं आग्रह असणें सर्व प्रकारें युक्तच आहे. [यत: नृभि: स्वर्गाय अपवर्गाय वा यतितव्यम्-] कारण पुरुषांनीं स्वर्गाकरितां किंवा मोक्षाकरितां यत्न करणें अत्यंत अवश्य आहे.**

प्रकाश:- जो मनुष्य जन्मास येऊन चारी पुरुषार्थांपैकीं एकाचीहि प्राप्ति करून घेत नाहीं त्याचा जन्म व्यर्थ होय, असें शास्त्रामध्यें म्हटलेलें असल्यामुळें मनुष्यास मोक्षाकरितां किंवा निदान स्वर्गाकरितां प्रयत्न करणें जरूर आहे. यास्तव ज्याला कोणत्याहि प्रकारें बोध नसतो त्याला नुस्ती प्रवृत्तीहि हितकर असल्यामुळें त्यानें तिच्याविषयीं अवश्य आग्रह धरावा. ॥२८४॥

-'तर मग विद्वानानें प्रवृत्तिमार्गी लोकांमध्ये असतांना काय करावें ?'' उत्तर -

विद्वांश्चेत्तादृशां मध्ये तिष्ठेत्तदनुरोधतः ।
कायेन मनसा वाचा करोत्येवाखिलाः क्रियाः ॥८५

अन्वयार्थ - [तादृशां मध्ये विद्वान् तिष्ठेत् चेत्-] तशा पुरुषांमध्यें जर विद्वान् रहात असला तर **[सः तदनुरोधतः कायेन मनसा वाचा अखिलाः क्रियाः करोति एव-]** तो त्यांच्या अनुरोधानें शरीर, मन व वाणी यांच्या योगानें सर्व क्रिया करितोच.

प्रकाशः- लोकांनीं उन्मार्गी होऊन स्वार्थापासून भ्रष्ट होऊं नये म्हणून विद्वानानें, भगवानांनी अर्जुनास सांगितल्याप्रमाणें, त्यांच्या प्रमाणेंच प्रवृत्ति करावी. पण तिच्यामध्यें आसक्त होऊं नये व काम्य आणि निषिद्ध कर्में करूं नयेत. कारण त्यांच्या योगानें अनर्थप्राप्ति होत असते. या श्लोकांत वस्तुतः कर्में करावीं असें विधान नसून तो परोपकारार्थ कर्में करितो म्हणजे स्वतःकरितां निरुपयोगी असलेलें कर्म तो इतरांच्या कल्याणार्थ करितो, असें सांगितलेलें आहे. त्यावरून अज्ञांचा बुद्धिभेद करणें व त्यांना श्रद्धाभ्रष्ट करणें किती हानिकर आहे, हें व्यक्त होत आहे. ॥२८५॥

-तसेंच तो जर तत्त्वजिज्ञासूंमध्यें असेल, तर त्यानें काय करावें, तें सांगतात -

एष मध्ये बुभुत्सूनां यदा तिष्ठेत्तदा पुनः ।
बोधायैषां क्रियाः सर्वा दूषयंस्त्यजतु स्वयम् ॥८६

अन्वयार्थ - [एषः पुनः यदा बुभुत्सूनां मध्ये तिष्ठेत्-] पण हा पुनः जेव्हां जिज्ञासूंच्या मध्यें रहात असेल **[तदा एषां बोधाय सर्वाः क्रियाः दूषयन् स्वयं त्यजतु-]** त्या वेळीं त्यांच्या ज्ञानाकरितां सर्व क्रियांना दूषण देऊन स्वतः खुशाल त्यांचा त्याग करो.

प्रकाशः- अज्ञानी लोकांची हानि होऊं नये म्हणून त्यांच्याप्रमाणें वागण्याविषयीं जसें पूर्वी सांगितलें आहे, तसेंच येथे जिज्ञासूंच्या हिताकरितां त्यांच्याप्रमाणें वागण्याविषयीं ग्रंथकार अनुज्ञा देत आहेत. व हें त्यांचें कृत्य अनेक श्रुतिस्मृतीशीं संगत आहे. स्वतः भगवानांनींहि ''सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज- म्हणजे इतर सर्व धर्मांचा त्याग करून मला शरण ये'' इत्यादि प्रकारें उपदेश केलाच आहे. सारांश, जशी संगति मिळेल, तशी वागणूक ठेवावी. मात्र त्यापासून आपलें अहित न होईल अशी खबरदारी राखावी. ॥२८६॥

-'पण त्यानें असें कां करावें ?' उत्तर -

अविद्वदनुसारेण वृत्तिर्बुद्धस्य युज्यते ।
स्तनंधयानुसारेण वर्तते तत्पिता यतः ॥८७

अन्वयार्थ - [यतः स्तनंधयानुसारेण तत्पिता वर्तते-] ज्या अर्थीं स्तनपान करणाऱ्या मुलाच्या अनुरोधानें त्याचा पिता वागतो [अतः अविद्वदनुसारेण बुद्धस्य वृत्तिः युज्यते-] त्याअर्थीं अविद्वानाच्या अनुरोधानें ज्ञानी पुरुषाचें वागणें युक्तच होय.

प्रकाशः- एकाद्या नुक्त्या रांगूं लागलेल्या मुलाच्या इच्छेप्रमाणेंच त्याचा ज्ञानी पिता वागतो. तें मूल जिकडे रांगत जाईल तिकडे हा त्याच्या मागोमाग जातो; तें जें हातांत घेण्याची इच्छा करील, तें त्यास देतो. इत्यादि प्रकार संसारिकांस सांगण्याची गरज नाहीं. पण यावरून एक सिद्धान्त ठरतो. तो हा कीं, ज्ञानी पुरुषानें अज्ञांच्या अंतःकरणास दुखविणें बरें नव्हे. तर त्यांच्या श्रद्धेचा भंग न होईल अशा रीतीनेंच त्यानें त्यांच्याशीं वागलें पाहिजे. कारण असें न केल्यास त्यांचा (अज्ञांचा) नाश होण्यास उशीर लागत नाहीं. ॥२८७॥

-'पिता स्तनपान करणाऱ्या पुत्राचें अनुवर्तन कसें करितो' तें सांगतात-

अधिक्षिप्तस्ताडितो वा बालेन स्वपिता तदा ।
न क्लिश्नाति स कुप्येत बालं प्रत्युत लालयेत् ॥८८

अन्वयार्थ - [बालेन अधिक्षिप्तः ताडितः वा स्वपिता न क्लिश्नाति-] अज्ञान अवस्थेंत असतांना बालकानें ज्याचा अधिक्षेप-अवज्ञा-तिरस्कार केला

आहे, किंवा ज्याला ताडन केलें आहे, असा त्याचा पिता दु:खी होत नाहीं; [तदा स: बालं प्रति न कुप्येत-] त्यावेळीं तो आपल्या बालकावर रागावतहि नाहीं; तर [उत लालयेत्-] उलट त्याचें लालनच करितो.

प्रकाश:- बाल्यावस्थेंत व्यावहारिक किंवा शास्त्रीय ज्ञान नसल्यामुळें अज्ञ मूल आपल्या पूज्य पित्यास लाथाहि मारतें व शिव्याहि देतें. पण बापास त्यापासून दु:ख होत असल्याचें किंवा तो त्यांच्यावर रागावल्याचें आढळत नाहीं. तर उलट जणूं काय त्या पित्यास 'आपण धन्य आहों' असेंच वाटतें व त्यामुळें तो त्याचे अधिक लाड करितो; असें सर्वत्र दिसतें. 'अहो हेंच ऐहिक सुख आहे' असें म्हणणारे अनेक पिते कोठेंहि सांपडतील. सारांश, अज्ञांच्या हातून घडलेल्या अपराधामुळें ज्ञानी चिडत नाहींत, तर त्याचें कौतुक करितात. ॥२८८॥

वादी:- बालक अगदी व्यवहारशून्य असल्यामुळें तुम्ही सांगतां तसा प्रकार घडतो, हें खरें. पण ज्यांना कांहीं व्यावहारिक ज्ञान म्हणून आहे, ते ज्ञात्यांची निंदा करितील हे म्हणणें जरा अतिशयोक्तीचें वाटतें.

सिद्धांती:- छे: ही अतिशयोक्ति नव्हे. हा अगदीं खरा प्रकार आहे. कसा म्हणशील तर सांगतों. ज्या वेळी विवेकी अज्ञान्यांच्या समुदायांत असतो, त्या वेळीं तो सत्कर्मे मात्र करीत असल्याचें दिसतें. पण जेव्हां मुमुक्षूंच्या समागमांत जातो तेव्हां सत् व असत् अशा दोन्ही प्रकारच्या कर्मांस दोष देतो. आणि त्याची अशी ही अवस्था पाहून विषयी लोक निंदा करूं लागतात. हा प्रकार श्रीमद्भागवताच्या एकादश स्कंधांतील भिक्षुगीतामध्यें सांगितलेला आहे, व वायुपुराणांतर्गत माघमाहात्म्यांत मांडव्यास शूलावर चढविल्याची जी कथा आहे, तींत वर्णिला आहे. यास्तव 'ज्ञानी पुरुषानें निंदा, इत्यादिकांस समान मानावें, असें जें भगवद्गीतावचन आहे, त्याप्रमाणें विवेक्यानें वागावें. कारण त्याच्याकडे पाहणारे विषयी मुख्यत: याच लक्षणावरून त्यास ओळखतील व पुनरपि निंदा करणार नाहीं. सारांश ज्यांच्या योगानें त्यांस बोध होईल, असें आचरण करावें, असें आतां थोडक्यांत सांगतात-

-पूर्वोक्त दृष्टान्ताची दार्ष्टांतिकाचे ठिकाणीं योजना करितात-

निन्दित: स्तूयमानो वा विद्वानज्ञैर्न निन्दति ।
न स्तौति किं तु तेषां स्याद्यथा बोधस्तथाऽऽचरेत् ॥८९

अन्वयार्थ - [अज्ञै: निंदित: स्तूयमान: वा विद्वान्-] अज्ञांकडून निंदा केला गेलेला किंवा मुमुक्षूंकडून स्तुति केला गेलेला विद्वान् [न निन्दति च न स्तौति-] त्यांची निंदा किंवा स्तुति करीत नाहीं, [किंतु यथा तेषां बोध: स्यात् तथा आचरेत्-] तर ज्याच्या योगानें त्यांस बोध होईल असें आचरण करितो.

प्रकाश:- अज्ञ आपली निंदा करितात म्हणून आपणहि त्यांची निंदा करावी व मुमुक्षु स्तुति करितात म्हणून आपणहि उलट स्तुति करावी, असें ज्याच्या मनांत येत नाहीं, तोच तुल्यनिंदास्तुति: होय. अज्ञ व मुमुक्षु या उभयतांसहि ज्याच्या योगानें बोध होईल असें आचरण करण्याचेंच त्याचें शील असतें ॥२८९॥

-असें आचरण करण्याचें कारण सांगतात -

येनायं नटनेनात्र बुध्यते कार्यमेव तत् ।
अज्ञप्रबोधान्नैवान्यत्कार्यमस्त्यत्र तद्विद: ॥२९०

अन्वयार्थ - [अयं अत्र येन नटनेन बुध्यते तत् कार्यं एव-] हा अज्ञानी या लोकीं ज्या आचरणानें तत्त्वज्ञ होईल, तें ज्ञान्यानें अवश्य करावेंच. [तद्विद: अत्र अज्ञप्रबोधात् अन्यत् कार्यं न अस्ति एव-] कारण तत्त्ववेत्त्याला इहलोकीं अज्ञाला ज्ञानी करण्यावांचून दुसरें कर्तव्य नसतें.

प्रकाश:- या श्लोकांत नटनेन असा शब्द योजून

ज्ञानी पुरुषाची कोणतीहि क्रिया वास्तविक नसते, असें सुचविलें आहे. **शंका:**- करुणेमुळेंच जर ज्ञानी कर्मांमध्यें प्रवृत्त होत असला, तर दरिद्र्यांस द्रव्य मिळवून द्यावें म्हणून सेवादि कष्टकर कर्मांमध्येंहि प्रवृत्ति होणें शक्य आहे. **समाधान:**- केवल अज्ञांस सुज्ञ करण्यापलीकडे त्याचें काम नाहीं. पूर्वोक्त मृगजलाच्या दृष्टान्तांत - हें मृगजल आहे, असें समजून जो परत फिरलेला असतो, तो पाण्याच्या आशेनें तिकडे धांवणाऱ्यांस करुणेनें मृगजलांचे ज्ञान करून देतो एवढेंच म्हटलें आहे. त्यांना इतर विपत्तींतून सोडविण्याचाहि तो प्रयत्न करितो, असें म्हटलेलें नाहीं. ॥२९०॥

-तात्पर्य -

कृतकृत्यतया तृप्त: प्राप्तप्राप्यतया पुन: ।
तृप्यन्नेवं स्वमनसा मन्यतेऽसौ निरंतरम् ॥९१

अन्वयार्थ - [कृतकृत्यतया तृप्त:-] कृतकृत्यतेमुळें तृप्त झालेला [पुन: प्राप्तप्राप्यतया तृप्यन् असौ-] व पुनरपि प्राप्तप्राप्यतेमुळें तृप्त होणारा हा ब्रह्मनिष्ठ [स्वमनसा निरंतरं एवं मन्यते -] आपल्या मनानें सर्वदा असें मानतो.

प्रकाश:- जें कांहीं कर्तव्य होतें तें करून टाकिल्यामुळें पूर्वींच तृप्त झालेला व आतां पुढील प्रकरणांत जिचा उल्लेख होणार आहे, त्या-प्राप्त करून घेण्यास योग्य अशा-स्थितीची प्राप्ति करून घेतल्यामुळें तृप्त होणारा, हा ब्रह्मनिष्ठ मुनि आपल्या मनामध्यें सर्वदा कसा विचार करितो तें आतां यापुढील सहा श्लोकांत सांगितलें आहे. ॥२९१॥

-'तो कसें चिंतन करितो ?' उत्तर-

धन्योऽहं धन्योऽहं नित्यं स्वात्मानमंजसा वेद्मि।
धन्योऽहं धन्योऽहं ब्रह्मानंदो विभाति मे स्पष्टम् ॥९२

अन्वयार्थ - [अहं स्वात्मानं नित्यं अंजसा वेद्मि-] मी आत्म्याला सतत साक्षात् जाणतों, [अत: अहं धन्य: अस्मि अहं धन्य: अस्मि-] यास्तव मी धन्य आहें; धन्य आहें. [मे ब्रह्मानन्द: स्पष्टं विभाति-] मला ब्रह्मानन्द स्पष्ट भासतो; [अत: धन्य: अहं धन्य: अहं अस्मि-] यास्तव मी धन्य आहें; धन्य आहें.

प्रकाश:- **नित्यं** हा शब्द **स्वात्मानं** या शब्दाचें विशेषण आहे असें समजावें किंवा क्रियाविशेषण समजावें. क्रियाविशेषण केल्यास 'मी स्वात्म्यास सतत साक्षात् जाणतों' असा अर्थ होतो. म्हणजे माझ्या साक्षात्काराचा विच्छेद कधींच होत नाहीं असा याचा भावार्थ निघतो. या व यापुढील श्लोकांत **'धन्योहं, अहो पुण्यं, अहो शास्त्रं, अहो गुरु:'** इत्यादि वाक्यांची जी द्विरुक्ति आहे ती आदर दर्शविण्याकरितां आहे असें समजावें. **स्वात्मानं** हा कर्मधारय समास आहे व त्यामुळें त्याचा अर्थ स्व हाच आत्मा असा होतो. स्व-कूटस्थ चिदात्मा, त्वं पदाचा शुद्ध अर्थ. व आत्मा म्हणजे सच्चिदानंदरूप ब्रह्म. तात्पर्य ब्रह्म व प्रत्यगात्मा यांचें ऐक्य आहे, असा साक्षात्कार झाल्यामुळें मी धन्य आहें. साक्षात्काराच्या योगानें ब्रह्मानन्दाचा स्पष्ट प्रत्यय आल्यामुळेंहि मी धन्य आहें. ॥२९२॥

-याप्रमाणें इष्टप्राप्तीनें झालेला संतोष दाखवून अनिष्टनिवृत्तीनेंहि तो संतुष्ट होतो. असें सांगतात-

धन्योऽहं धन्योऽहंदु:खं सांसारिकं नवीक्षेऽद्य ।
धन्योऽहं धन्योऽहं स्वस्याज्ञानं पलायितं क्वापि ॥९३

अन्वयार्थ - [अद्य सांसारिकं दु:खं न वीक्षे-] आज संसारसंबंधीं दु:ख मला मुळींच दिसत नाहीं, [अत: अहं धन्य: अहं धन्य:-] त्यामुळें मी धन्य आहें; धन्य आहें. [स्वस्य अज्ञानं क्व अपि पलायितं-] आत्मसंबंधीं अज्ञान कोठें तरी पळून गेलें आहे, [अत:

अहं धन्य: अहं धन्य: अस्मि-] त्यामुळें मी धन्य धन्य झालों आहें.

प्रकाश:- जोपर्यंत आत्म्याचा साक्षात्कार झालेला नसतो तोपर्यंत पुरुषास संसार आवडतो व आत्म्याचा साक्षात्कार झाला कीं तोच त्याला विषासारखा कडू वाटतो. कारण संसार हा आत्मसुखाचा पडदा आहे, किंवा त्यास प्रतिबंध करणारा एक पदार्थ आहे. त्यामुळें आत्मसुखाची गोडी कळण्यापूर्वी जरी तो इष्ट वाटत असला, तरी आत्मसुखानुभवानंतरहि तो तसाच वाटणें शक्य नाहीं. फार काय, पण तो त्या अवर्णनीय सुखास प्रतिबंध करीत असल्यामुळें शत्रूसारखा वाटणेंच साहजिक आहे. आत्मसाक्षात्कार स्थिर झाला असतां म्हणजे अनुसंधानानें चित्तवृत्ति एकसारखी आत्म्यामध्यें तल्लीन होऊन गेली असतां, जीवन्मुक्तीचा अनुभव येतो. त्या अवस्थेंत संसार व संसारसंबंधीं दु:ख यांचा लेशहि रहात नाहीं. कारण सर्व प्रकारचे प्रत्यय मनावर अवलंबून आहेत. जोपर्यंत मन चंचल अवस्थेंत राहून क्षणोक्षणीं निरनिराळ्या पदार्थांचा प्रत्यय घेत असतें तोंपर्यंत त्या त्या इष्ट किंवा अनिष्ट प्रत्ययाप्रमाणें पुरुषास सुख किंवा दु:ख होतें. पण अभ्यासबलानें तें एकदा आत्मवश झालें व आत्म्यास सोडून क्षणोक्षणीं बाहेर पळण्याचा त्याचा स्वभाव नष्ट झाला कीं प्रपंचांतील पदार्थांचा प्रत्ययच येईनासा होतो. यां उच्च अवस्थेचा ज्यास अनुभव आला आहे असा ज्ञानी माझा दु:खरूप संसार नष्ट झाला, व त्यामुळें मी कृतकृत्य झालों आहें; आणि आजपर्यंत आत्म्यास मी जाणत नाहीं असें जें मला वाटत होतें, तें आतां वाटेनासें झालें व त्यामुळेंहि परम धन्य झालों, असें म्हणू लागतो. या श्लोकांतील 'अज्ञान'या शब्दाचा अर्थ-अनेक कर्मवासनांचा समूह-असा रामकृष्णांनीं केला आहे. ॥२९३॥

-अज्ञानाच्या निवृत्तीचें फल-कृतकृत्यत्व व प्राप्तप्राप्तव्य दाखवितात-

धन्योऽहं धन्योऽहं कर्तव्यं मे न विद्यते किंचित्।
धन्योऽहं धन्योऽहं प्राप्तव्यं सर्वमद्य संपन्नम्॥९४

अन्वयार्थ - [मे किंचित् कर्तव्यं न विद्यते-] मला कांहीं एक कर्तव्य राहिलेलें नाहीं. [अत: अहं धन्य: अहं धन्य:-] यास्तव मी धन्य आहें; मी धन्य आहें. [अद्य सर्वं प्राप्तव्यं संपन्नं-] आज सर्व प्राप्तव्य मला प्राप्त झालें आहे, [अत: अपि अहं धन्य: अहं धन्य:-] त्यामुळेंहि मी धन्य व कृतकृत्य आहें.

प्रकाश:- आत्मसाक्षात्कार होऊन अज्ञानाची निवृत्ति झाली असतां त्या ज्ञानी पुरुषास ''मला कांहीं कर्तव्य आहे व तें केलें पाहिजे'' असें कधींच वाटत नाहीं. त्याचप्रमाणें ''मला अमुक एक वस्तु प्राप्त झालेली नाहीं. व ती प्राप्त करून घेतली पाहिजे'' असेंहि वाटत नाहीं अर्थात् तो धन्य पुरुष निरिच्छ होतो. निरिच्छ होणें हें काम सोपें नव्हे. त्यासारिखें सुखहि दुसऱ्या कशांत नाहीं. अर्थात् ज्या भाग्यवानाच्या सर्व तृष्णा नाहींशा झाल्या आहेत त्यास ''मी धन्य आहें किंवा कृतकृत्य आहें'' असेंहि वाटल्यास नवल तें कोणतें ?'' ॥२९४॥

-आतां कृतकृत्यत्वामुळें झालेल्या तृप्तीचें निरतिशयत्व सांगतात-

धन्योऽहं धन्योऽहं तृप्तेर्मे कोपमा भवेल्लोके ।
धन्योऽहं धन्योऽहं धन्यो धन्य: पुन: पुनर्धन्य: ॥९५

अन्वयार्थ - [धन्य: अहं, धन्य: अहं-] मी धन्य आहें, मी धन्य आहें. [लोके मे तृप्ते: का उपमा भवेत्-] लोकांमध्यें माझ्या तृप्तीला कोणती उपमा आहे ? [धन्य: अहं, धन्य: अहं धन्य: धन्य: पुन: पुन: धन्य: अस्मि-] तात्पर्य, मी धन्य, कृतकृत्य, अत्यंत तृप्त व त्यामुळेंच अति संतुष्ट झालों आहें.

प्रकाश:- नि:स्पृह व कृतकृत्य आत्मज्ञान्याच्या तृप्तीस जगांत उपमाच नसल्यामुळें त्या पुरुषास मीं धन्य

आहें, असें वारंवार वाटत असतें. ॥२९५॥

-पण ही कृतकृत्यता व अवर्णनीय तृप्ति ज्याच्यामुळें प्राप्त झाली, त्या पुण्यपुंजाच्या परिपाकाचें स्मरण करून संतुष्ट होतो -

अहो पुण्यमहो पुण्यं फलितं फलितं दृढम् ।
अस्य पुण्यस्य संपत्तेरहो वयमहो वयम् ॥९६

अन्वयार्थ - [अहो पुण्यं अहो पुण्यं फलितं फलितं दृढं-] अहाहा केवढें माझें पुण्य; केवढें हें माझें भाग्य ! खरोखर मला त्याचें फल मिळालें. दृढ फल मिळालें; नि:संशय मला पुण्यफल मिळालें. असलें पुण्य संपादन करणाऱ्या स्वत:ला आठवून आत्मज्ञ संतुष्ट होतो. [अहो वयं-] आम्ही मोठे भाग्यवान् आहों. [अस्य पुण्यस्य संपत्ते: अहो वयम्-] या पुण्याच्या संपत्तीमुळें आम्ही मोठे भाग्यशाली झालों आहों.

प्रकाश:- अनेक सहस्र जन्मांतील प्रचंड पुण्यसंचयावांचून आत्मसाक्षात्कार होत नाहीं. यास्तव निरतिशय तृप्ति, परमानंद इत्यादि जें जें म्हणून या साक्षात्काराच्या फलाला नांव द्याल, तें तें त्या पुण्यसंचयाचेंच कार्य असणार हें उघड आहे. आणि एवढ्याकरितांच त्या ज्ञानी पुरुषास आपल्या पुण्याविषयीं आश्चर्य कसें वाटतें व त्या पुण्यसंचयामुळें प्राप्त झालेल्या फलाच्या योगानें मी धन्य झालों आहें असें त्यास कसें वाटतें तें येथें दाखविलें आहे. मी असें न म्हणतां आम्ही असें येथें म्हटलें आहे. व त्याचें तात्पर्य असें आहें की, मी या मराठी शब्दास संस्कृतांत ''अहं'' हा प्रतिशब्द आहे. व ''अहं'' असें म्हणणें हें अहंकाराचें द्योतक आहे. करितां त्या अनर्थकारक अहंशब्दाचा प्रयोग आत्मज्ञानी करीत नाहींत; हें सुचविण्याकरितां श्रीभारतीतीर्थांनीं येथें आम्ही (वयं) असें मुद्दाम म्हटलें आहे. ॥२९६॥

-आतां आत्म्याच्या यथार्थ ज्ञानाचें साधन शास्त्र व त्याचा उपदेश करणारे गुरु, यांचें स्मरण करून ज्ञानी संतुष्ट होतो -

अहो शास्त्रमहो शास्त्रमहो गुरुरहो गुरु: ।
अहो ज्ञानमहो ज्ञानमहो सुखमहो सुखम् ॥९७

अन्वयार्थ - [अहो शास्त्रं अहो शास्त्रं-] अहाहा ! काय या अद्वैतप्रतिपादकशास्त्राची योग्यता सांगावी ! [अहो गुरु: अहो गुरु:-] अहाहा ! परम दयालु गुरूचा केवढा हा चमत्कार !! आतां शास्त्रजन्य ज्ञान व त्याचें फल-सुख यांस आठवून संतुष्ट होतो- [अहो ज्ञानं अहो ज्ञानं अहो सुखं अहो सुखम्-] ज्ञानाच्या महिम्याचें तरी किती वर्णन करावें ? धन्य धन्य आहे या सुखाची !!!

प्रकाश:- ज्या शास्त्रादिकांच्या द्वारा साधकास सिद्ध होतां आलें व अनुपमेय सुखप्राप्ति झाली, त्या शास्त्रादिकांविषयीं त्यास मागून आश्चर्य वाटणें व त्यांचें वारंवार स्मरण होणें साहजिक आहे. ॥२९७॥

-आतां श्रीभारतीतीर्थ या ग्रंथाच्या अभ्यासाचें फल सांगून प्रकरणाचा उपसंहार करितात-

तृप्तिदीपमिमं नित्यं येऽनुसंदधते बुधा: ।
ब्रह्मानंदे निमज्जंतस्ते तृप्यन्ति निरंतरम् ॥९८

इति पंचदश्यां तृप्तिदीप: ॥७॥

अन्वयार्थ - [ये बुधा: इमं तृप्तिदीपं संदधते-] जे ज्ञानी या तृप्तिदीपाचें पठनपाठनादिकांच्या द्वारा सतत अनुसंधान करितात, [ते ब्रह्मानन्दे निमज्जन्त: सन्त: निरंतरं तृप्यन्ति-] ते ब्रह्मानन्दामध्यें निमग्न होत्साते निरंतर तृप्तीचा अनुभव घेतात.

प्रकाश:- या तृप्तिदीप नामक प्रकरणाच्या आरंभीं ''आत्मानं चेद्विजानीयात्०'' इत्यादि बृहदारण्यकोपनिषदांतील मंत्रांचें व्याख्यान करण्याकरितां त्या मंत्राचा उल्लेख केला. व त्याचें व्याख्यान करीत असतांना विचाराच्या सात भूमिकांचे सविस्तर वर्णन केलें. त्यांतीलच तृप्ति ही शेवटची भूमिका असून

तिचाहि वरील श्लोकांत उपसंहार केला. व या शेवटच्या श्लोकांत या प्रकरणाचें सतत चिंतन करणाऱ्यास ब्रह्मानंदाची प्राप्ति-निरंतर तृप्ति-हें फल सांगितलें. तात्पर्य, या प्रकरणाचा अभ्यास आत्मसाक्षात्काराच्या उपयोगीं असल्यामुळें तो अवश्य करावा. व आत्मसाक्षात्कार हेंच परमसुखाचें, परमतृप्तीचें व परमपुरुषार्थाचें निमित्त आहे. ॥२९८॥

॥ श्री ॥

८ कूटस्थदीप:

श्रीभारतीतीर्थ मुनींनीं पंचदशीच्या गेल्या सातव्या प्रकरणांत 'अज्ञानादि सात अवस्था चिदाभासाच्या आहेत, कूटस्थाच्या नव्हेत,' असें सांगितलें. पण कूटस्थ कोण, हें अजूनपर्यंत व्हावें तसे स्पष्ट झालेले नाहीं. यास्तव तें स्पष्ट करण्याकरिता कूटस्थ व चिदाभास यांचें विवेचन करितात -

खादित्यदीपिते कुड्ये दर्पणादित्यदीप्तिवत् ।
कूटस्थभासितो देहो धीस्थजीवेन भास्यते ॥१

अन्वयार्थ - [खादित्यदीपिते कुड्ये-] आकाशांतील सूर्याच्या प्रकाशानें प्रकाशित केलेल्या भिंतीतील [दर्पणादित्यदीप्तिवत् -] आरशांत प्रतिबिंबित होऊन परावृत्त झालेल्या सूर्यकिरणांनीं त्या भिंतीला जसें प्रकाशित करावें त्याप्रमाणें [कूटस्थभासित: देह:-] कूटस्थाकडून सामान्यत: प्रकाशित केला गेलेला देह [धीस्थजीवेन भास्यते-] बुद्धिस्थ चिदाभासाकडून प्रकाशित केला जातो.

प्रकाश:- सूर्यनारायण उदय पावला असतां सर्व सृष्टि प्रकाशित होते, हें सर्वांस ठाऊक आहेच. सूर्याच्या प्रकाशानें आपल्या घरांतील भिंत सामान्यत: प्रकाशित झालेली असते, म्हणजे तिच्यावर प्रकाश सर्वत्र पडलेला असतो. आणि इतक्यांत कोणी सूर्याचें प्रतिबिंब आरशांत घेऊन त्याचा प्रकाश घरांतील भिंतीवर पाडल्यास ती पुन: अधिक प्रकाशित होते, हा दृष्टांत होय. याप्रमाणेंच कूटस्थ या भौतिक देहास प्रथमत: सामान्यरीत्या प्रकाशित करितो. दृष्टांतांतील भिंत, सूर्य, आरसा व